म. ग्रं. सं. ठाणें

विषय
इतिहास

लेखक व्ही. एन्. आपटे

सन
१९४७

संग्रहालय क्रमांक
१५२

पुस्तकाचें नांव सुंदर राजस्थान भाग १

१५२

व्हावे.

# दुसरें स्थान.

## भाग १ ला.

ग्रंथ संग्रहालय
भाषा
दि. यांत

( 'विक्षिप्त' पत्राचे अंकांचा सर्व मजकूर असून हल्लीही थोडासा आहे. )

---

हें पुस्तक

व्ही. एन्. भाट्ये,

'विक्षिप्त' कर्ते,

यांनीं लिहून

मुंबईत

आपल्या 'बॉम्बे न्यू प्रेस' मध्यें छा. प्र. केलें.

सन १८९५.

---

किंमत १२ आणे.

# प्रस्तावना.

सन १८९९ च्या १९ जून पासून 'इंदूर संस्थान' या मथाळ्याखालीं "विक्षिप्त" पत्रांत येत असलेले नंबरवारी लेख वाचकांचे वाचण्यांत आलेच आहेत. सदर्हू लेख पुस्तकरूपानें छापवून स्वदेश-बांधवांस सादर करावे, व इंदूरस्थ क्रूर, जुलूमी व राक्षसी महाराजांच्या दुष्ट व आपस्वार्थी वर्तनाचें प्रदर्शन पुस्तक रूपानें त्यांच्या पुढें ठेवून, या योगानें तरी ते आपलें दुष्ट वर्तन सुधारतील अशा अत्युत्कट इच्छेनें छापविलें आहे. इतक्या थोड्या अवकाशांत या पुस्तकास दोन हजारांवर मागण्या येऊन चुकल्या व प्रत्यहीं येतच आहेत; यावरून हें पुस्तक किती लोकप्रिय होईल हें आलेल्या मागण्यांवरून सहज समजून येईल.

हे क्रूर व जुलूमी महाराज जोंपर्यंत पेन्शनांत गेले नाहींत अथवा यांनीं आपलें वर्तन सुधारून खरें व नीतीचें प्रजावात्सल्य दाखविलें नाहीं तोंपर्यंत किंवा इंदूरस्थ प्रजा त्यांच्या जाचांतून मुक्त झाली नाहीं तोंपर्यंत 'इंदूर संस्थान' या प्रकरणाचे जितके भाग होतील तितके आम्हीं एकामागून एक प्रसिद्ध करणार आहोंत.

सदरहू पुस्तकाचा दुसरा भाग येत्या डिसेंबर महिन्याचे पहिल्या तारखेस तयार होऊन वाचकांस मिळेल. या दुसऱ्या भागांत, अक्टोबर व नवंबर महिन्यांत 'विक्षिप्त' पत्रांत येणारे लेख तर येतीलच पण त्याशिवाय-ही दुसरे कित्येक महत्वाचे खटले देण्यांत येतील.

'विक्षिप्त' पत्रांत या भ्रमिष्टशिरोमणी महाराजांचीं दुष्ट कृत्यें येऊं लागल्यापासून हे महाराज या पत्रास वर्गणीदारही झाले आहेत व याबद्दल आम्हीं त्यांचे फार आभारी आहोंत.

आतां शेवटीं या असल्या भ्रमिष्ट महाराजांचीं दुष्ट कृत्यें आणण्यास आमचे इंदूरस्थ बातमीदार × × × यांनीं आह्मांस साह्य केल्याबद्दल त्यांचें अभिनंदन करावें तेवढें थोडेंच. शिव महाराजांचा बरावाईट परिणाम लागून इंदूरस्थ प्रजा सुखी ही इ या एकंदर गोष्टींचें श्रय आह्मीं आपल्या बातमीदारास ल्याचें प्रांजलपणें कबूल करून, ही प्रस्तावना पुरी करितों.

विक्षिप्त.

---

हीं तोंप
पर्यंत
ह्मीं
सद
घर
र
हुसं
ं

## पुस्तकार्पण.

हें पुस्तक,

सकल गुणसंपन्न, इंदुराधिपती श्रीमन्महाराज शिवाजीराव होळकर सरकार, यांस त्यांच्या राक्षसी, क्रूर, भयंकर आणि दुष्ट वर्तनाचें प्रदर्शन, त्यांच्या समोर मांडून त्यांचें वर्तन सुधारण्यास्तव, त्यांची परवानगी न घेतां, मोठ्या दिलगिरीनें व नम्रपणानें अर्पण केलें आहे.

विक्षिप्त.

# इंदूर संस्थान.

## भाग पहिला.

### नंबर १.

( विक्षिप्त अंक ३७ ता. १५ जून ९५ )

**नशिब फिरलें, जग अवघड सुंदर बाळा ।प्रति पालक उरला नाहीं ।**

येथील आर्यसुबोध नाटक मंडळीच्या लोकप्रिय झालेल्या **बलसिंह**—**तारा** नाटकांतील वरील पद्यारंभ आहे. लहान बाळ **बलसिंह** आपल्या आई करितां रडत असून वडील बहिण **तारा**, ही त्याची समजून घालतांना वरील पद्य म्हणत असते. त्या वेळचा देखावा पाहून प्रेक्षकांचे डोळ्यांतून पाणी आल्या शिवाय रहात नाहीं. तसा पाणी येण्याजोगा प्रकार इंदूर संस्थानांत चालू असल्याचें समजतें. ज्या कित्येक जुलूमी गोष्टी त्या संस्थानांत घडत असल्याचें सभ्यां बाहेर आलें आहे त्या ऐकून, शिवाजी महाराजांनीं निव्वळ मोंगलाईच आरंभिली आहे असें म्हणावें लागतें. परंतु प्रस्तुतकाळीं अशा प्रकारची मोंगलाई फार दिवस चालावयाची नाहीं. हें होळकर महाराजांनीं पुरें लक्षांत आणलें पाहिजे. आपण आपल्या संस्थानचे सत्ताधीश आहोंत आणि वाटेल तें केलें तरी चालेल असा विचार मनांत आणून रयतेस त्रासविणारीं अनन्वित कृत्यें करूं लागणें म्हणजे आपल्या हातांनींच आपल्या पायांवर कुऱ्हाड मारून घेणें होय. राजाचे अंगीं प्रजावात्सल्य असलें पाहिजे. प्रजेचा छल करण्याचें वात्सल्य ज्याचे अंगीं असेल त्यास राजा म्हणणेंही शोभत नाहीं. जो राजा स्वसत्तेच्या जोरावर मनास वाटतील तशीं दुष्ट कृत्यें करून रयतेस रडवितो, त्रासवून सोडतो आणि त्यांतच आपल्या जिवाचें समाधान मानून घेतो त्यास राक्षसी अवतारांतला राजा गणण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं. अशी उपमा प्रस्तुतच्या आमच्या इंदूर संस्थानिकांना न मिळावी ही आमची मनापासून इच्छा आहे परंतु त्यांचें जो जुलूमी प्रकार चालू आहे तो तसाच सहील तर आमच्या इच्छेचा कांहींच उपयोग होणार नाहीं. श्रीमंत बाळासाहे-

बांची दुष्ट कृत्यांकडे प्रवृत्ती गादीवर बसण्यापूर्वी पासूनची आहे व ती त्यांचे अंगीं भिनून गेल्यामुळें त्यांस स्वकर्तव्याची दिशा कोणती आहे तें मुळींच समजत नाहीं असें पुष्कळांचें म्हणणें आहे. व तें लोकांचें म्हणणें दिवसानुदिवस बाळासाहेब आपल्या जुलूमी कृतीनें दृढ करून दाखवूं लागले आहेत. तेव्हां मथाळ्यावर दिलेल्या पद्याच्या प्रथम चरणा प्रमाणें वेळ आली कीं काय असा भास होतो. शिवाय इंदूर संस्थानच्या रयतेचे उद्गार ऐकूनही असें वाटतें कीं, त्या संस्थानचा 'प्रतिपालक उरला नाहीं.' कै० महाराज तुकोजीराव होळकर हयात असतां ज्या संस्थानाचा दरारा आमच्या सार्वभौम सरकारासही वाटत होता, त्या संस्थानच्या गादीवर बाळासाहेबां सारखा जुलूमी राजा स्थानापन्न होऊन संस्थानास कालिमा लावणारा निपजावा, हें त्या प्रजेचें दुर्दैवच समजलें पाहिजे ! एखाद्या जबरदस्त पिशाच्चानें तर बाळासाहेबांस पछाडलें नसेना ? जर तसा कांहीं प्रकार असेल तर त्यांचे पदरीं असणाऱ्या बड्याबड्या लोकांपैकीं कोणीं पुढें सरसावून त्यांचें पिशाच्च काढण्याचा प्रयत्न करावा, असें आम्हांला वाटतें. रा. ब. खंडेराव बेदरकरांसारखे विद्वान, शार, इंग्रजींत वागलेले असे कारभारी असतां त्यांच्या हातून बाळासाहेबांना पछाडलेल्या पिशाच्चाचें पारिपत्य होत नाहीं हें नवल आहे. एखाद्या साधारण मनुष्या वरील पिशाच्चबाधा काढणें सोपें आहे परंतु बाळासाहेबां सारख्या मनःसोक्त वर्तनाच्या राजावरील पिशाच्च हटविणें बिकट आहे असें कोणी म्हणेल, परंतु तें म्हणणें सयुक्तिक नाहीं. साधारण रोगाला साधारण जाणता वैद्य मिळाला असतां जसें काम होतें तसें प्रमाण महाराज बाळासाहेब होळकरांकरितां जरी लागू करतां येत नाहीं तरी आमच्या सार्वभौम सरकारच्या एजन्टा करवीं महाराजांचें पिशाच्च काढविण्याचा प्रसंग येण्यापेक्षां त्यांच्या पदरच्या लोकां पैकींच कोणीं शहाणा व चतुर जादुगार उत्पन्न होईल तर तें विशेष फायदेशीर होईल, असें आम्हांला वाटतें.

सध्यां बहुतेक पत्रांतून इंदूर येथील जुलूमाचा नमुना म्हणून ज्या कांहीं गोष्टी प्रसिद्ध झाल्या आहेत त्या वाचून आंगावर कांटाच उभा रहातो. त्या ह्या कीं, श्रीमंत शिवाजीराव महाराजांनीं आपल्या पदरच्या एका नातलगास जुन्या

इंदूरांचा नजराणा पाठविला. राजवाड्या पुढून एका सुजन व सुखवस्तु ब्राह्मणाची मुलगी किंवा सून रजोदर्शन झालेली भिरवत जात असतां तिला आणवून तिचें वपन करविलें. नव्या राजवाड्या जवळून जाणारे लोकांना रहदारीची बंदी केली. या व अशा अनुचित जिकिरीमुळें व तसदीमुळें मोठमोठे श्रीमान, व्यापारी, राजधानी सोडून बाहेर ठिकाणीं गेले. नोकर लोकांस बहाली बडतर्फी एक दिवसांत ३ वेळां मिळते. सासुरवासणीस व माहेरवासणीस आपआपल्या ठिकाणीं जाण्यास मोठी पंचाईत पडते. त्यांच्या नीट नेटक्या व सुरेख चेहेऱ्यांचें दर्शन झालें कीं, त्यांस जुलूमानें पकडून वाटेल तसा त्यांजवर बलात्कार करण्यांत येतो. परकी मनुष्य इंदुरास गेला कीं त्याचे मागें डिटेक्टीव्ह असतात. व साधल्यास कांहींतरी कचाटही त्याजवर आणलें जातें. वर्तमानपत्राचा वातमीदार अगर साशीं संबंध ठेवणारा जो असेल त्याजवर मोठा कटाक्ष असतो. अशा अनेक गोष्टी बाहेर आल्या आहेत. कोणत्या मगरूरीच्या भरांत-महाराजांनीं ह्या गोष्टी चालविल्या आहेत तें समजत नाहीं. असल्या जुलूमी राजाला आन्दमान वेटाची हवा खाण्याचा प्रसंग आल्यावर कृतकृत्यांचा पश्चात्ताप होऊन डोळे चटकन उघडतील, परंतु ईश्वरानें अशी वेळ न आणावी.

गेल्या ९ तारखेच्या दीनबंधूंतही महाराज बाळासाहेबांनीं जागेंहोण्याजोगा असा लेख आहे. त्या लेखांत 'थैल्यांचीं तोंडें खुलीं ठेविलीं असतील' ह्मणून असे जुलूमी प्रकार बाळासाहेबांचे हातून घडत असतील असा संशय घेण्यांत आला आहे. खराप्रकार काय असेल तो न कळे. परंतु आह्मांस असें वाटतें कीं, कोणत्याही प्रकारें बंदोबस्त करूनही जरी हे जुलूमी प्रकार महाराजांनीं चालविले असतील तरी ते त्यांच्या नाशास कारणीभूत आहेत. रयतेचा तळतळाट घेऊन बाळासाहेब सध्यां जरी आपल्या मनसोक्त कृतीनें सौख्य मानून घेत आहेत तरी भावी परिणामाकडे जरा नजर फेंकतील तर त्यांचें त्यांनाच कांहीं कळून येईल. मदांधपणाचा शेवट कसा होतो हें पहाण्यास फार लांब जावयासि नको. मल्हारराव गायकवाडांचा शेवट कसा झाला हें मनांत आणलें असतां

पुरे होईल. बरेच दिवसांपासून बाळासाहेबां संबंधानें हांकाटी चा ल्ली आहे आणि त्यांच्या पापाचा घडाही भरूं घातल्या सारखें दिसतें. करितां महाराजांनीं एवढ्यांतच समजून आपला वर्तनक्रम सुधरावा, प्रजावात्सल्य मनांत आणावें आणि प्रस्तुत जो त्यांच्या जुलूमी कृत्यांचा पुकार होत आहे तो नाहींसा करावा ह्मणजे त्यांतच ईश्वरही राजी राहील, अशी ही सविनय प्रार्थना करून आज हा लेख आटपतों.

---

## नंबर २.

( विक्षिप्त अंक ३९ ता. २९ जून ९५ )

गेल्या ता. १९ मिनहूच्या अंकांत श्रीमंत होळकर महाराजां संबंधानें गवगवा झालेली हकिकत आह्मीं वाचकां पुढें ठेवलीच आहे. त्यानंतर ज्या कित्येक गोष्टी आमचे ऐकण्यांत आल्या आहेत त्या आज येथें देतों. या गोष्टी बाहेर काढण्याचा उद्देश एवढाच कीं, महाराजांनीं आपला वर्तनक्रम सुधरावा, आणि आपल्या प्रजेस प्रिय व्हावें. मोंगलाई वर्तन केलल्यापासून आपल्या एका जिवाचें क्षणैक समाधान होतें खरें परंतु लहान पोरापासून तों थोरापर्यंत सर्वांचें मन विटून जाऊन जी कांहीं पूज्यबुद्धि आपल्या राजा विषयीं असणें जरूर आहे ती हिंशी होते. इतकेंच नव्हे पण असलं जुलूमी राजा असण्यापेक्षां तो नाहिंसा होऊन दयाळू इंग्रज सरकारच्या छत्राखालीं स्वतंत्रपणें रहाणें चांगलें, असेंही ज्यास त्यास वाटतें. प्रजेस असें वाटूं देणें हें राजास मोठें लांच्छन आहे. परंतु जो राजा अशा गोष्टींकडे लक्ष देईल व डोकें ठिकाणावर ठेवून विचार करील त्याचे हातून एखाद्या भ्रमिष्टा सारखीं कृत्यें कदापी होणार नाहींत हें खास आहे. प्रस्तुतचे इंदूराधिपती शिवाजी महाराज यांना आपल्या प्रजेच्या टिवल्याबावल्या करण्याची संवय गादीवर बसण्या पूर्वी पासूनची आहे ह्मणतात. व ती त्यांनीं तहाह्यात चालविण्याचें व्रतच घेतलें आहें कीं काय नकळे. ज्या कै. तुकोजीराव महाराजांनीं आपली कारकिर्द प्रजेस सुखावह अशी ठेविली, त्यांचे पोटीं शिवाजीराव महाराजां सारखें रत्न निपजून अधिकाराच्या आणि पैशाच्या जोरावर दिवसा ढवळ्या आपल्या प्रजेस मनमुराद चिरडण्यास तयार व्हावें, हें राज्य बुडविण्याचेंच लक्षण नव्हे काय? जन्मास आल्या सारखें कांहीं तरी नांव करावें अशें ह्मणण्याची आपल्यांत

बेत्त आहे. त्या ह्मणण्याची सत्यता राजेसाहेब कोणत्या प्रकारें करून दाखविणार तें समजत नाहीं. ज्या एकेक नव्या नव्या बातम्या आमचे ऐकण्यांत येतात त्यांवरून बाळासाहेबांचा भावी परिणाम चांगला होईलसें दिसत नाहीं. व कोणत्याही प्रकारें त्यांचा परिणाम झाला तरी त्यांची प्रजा त्याबद्दल विषाद मानील असेंही आह्मांस वाटत नाहीं. उलट जें लोक त्यांच्या हरएक प्रकारच्या छळणुकीनें गांजले गेले आहेत ते तर समाधान मानतील आणि आनंददर्शक शर्कराही वांटतील असें अनुमान होतें. केवळ बाळासाहेबांच्या दुर्वर्तनामुळें एवढा हा भयंकर प्रसंग येऊं घातला आहे याजबद्दल अंतःकरणापासून आह्मांस फार दुःख होतें.

श्रीमंत बाळासाहेब गादीवर आल्यापासून जितकीं त्यांचे हातून कृत्यें झालीं तितकीं बहुतेक अघोर वर्गांतलीं गणलीं जातात. सत्कृत्यें अशीं फारच थोडीं यांचे हातून झालीं असतील असा कैकांचा समज आहे. सत्कृत्य होण्याला सुबुद्धि आणि पूर्व पुण्याई लागत असते. आपल्या मनसोक्त वर्तनाचा बोभाट न व्हावा एतदर्थ ज्या कांहीं थैल्या अगर पुडकीं रिकामीं करण्यांत आलीं असतील तीं सत्कृत्यें झालीं असें कोणीही समजणार नाहीं. बाळासाहेबांच्या वडिलांनीं जीं सत्कृत्यें केलीं, जे प्रजेवर उपकार केले, जो कित्ता घालून दिला, जो लौकिक मिळविला त्याच्या उलट सर्व प्रकार बाळासाहेबांनीं चाल. विलेला पाहून यांच्यासारखा दुष्ट राजा क्वचित्च असेल असें मनांत येतें. मोठ्या दिलगिरीनें बाळा साहेबांसारख्या बड्या संस्थानिकाचीं विचित्र कृत्यें बाहेर काढण्याचा प्रसंग आला आहे या बद्दल फार वाईट वाटतें.

अलिकडे बाळासाहेबांनीं एका भंग्यास ब्राह्मणी पोशाखानें दोन राजवाड्यांच्या मध्यें बसविला आहे ह्मणून समजतें. सा भंग्यास शेंडी ठेवण्यांत आली आहे. सानें जो कोणी ब्राह्मण त्या रस्त्यानें जाईल येईल त्यास नमस्कार करावा. व तो त्याचा नमस्कार जाणाऱ्या येणाऱ्या ब्राह्मणानें अवश्य घेतला पाहिजे. जर कोणीं न घेतला तर त्यास भंग्याचे हातच्या झाडूनें वक्षीस मिळतें. दुसरा प्रकार, ब्राह्मणाकरवीं पखाल बगलेंत देऊन रस्त्यावर पाणी शिंपडविणें हा होय. तिसरा प्रकार, शिकारीचे वेळीं

जनावरास बाहेर काढण्याकरितां ब्राह्मण लोक नेण्यांत येतात. चवथा प्रकार राजवाड्यावरून जाणाऱ्या नव्या एखाद्या मनुष्यास वर बोलावून, कोण, कुठले, कुठे जातां वगैरे विचारपूस करून २५ थोवाडींत मारून घ्या अगर ५० उठाबशा काढा वगैरेची बक्षिसी देऊन त्यास हांकलून देण्यांत येतो. कोणाची शेंडी अगर घेरा मोठा असल्यास चटसफा करण्यांत येतो. अशा पुष्कळ गोष्टी आमचे कानीं आल्या आहेत. किती अनन्वीत प्रकार हा ! ब्राह्मणाचा विशेष छल करण्याकडे महाराजांचा कल असावासें दिसतें. परंतु हें बाळासाहेबांचें अज्ञान आंहे. ब्राह्मणाचा छल केल्यापासून '**कुलक्षय**' होतो असें जुनें वाक्य आहे. अलिकडच्या सुधारणेंत तें वाक्य खरें आहे असें कदाचित् कोणी मानीत नसतील तरी, त्या वाक्यास समग्र हरताळ लावण्याची शक्ती कोणामध्यें आल्याचें अद्याप दिसत नाहीं. बाकी ब्राह्मण ज्ञातीचा जर बाळासाहेबांस मनापासून कंटाळा आला असेल तर असा छलवाद न करतां हळू हळू अक्कलेनें आपल्या डोळ्यांसमोर ते न दिसतील अशी कांहीं व्यवस्था करावी. परंतु बदनाम होईल असें करणें ठीक नाहीं.

---

## नंबर ३.

( विक्षिप्त अंक ४० ता. ६ जुलई ९५ )

या संस्थानासंबंधानें आजच्या अंकीं कांहीं लिहावयाचें नाहीं असा आम्हीं विचार करून होतों तोंच ताज्या बातमीनें पुढील अंकापर्यंत वाट न पहातां याच अंकीं स्थल मागितल्यामुळें देणेंही भाग पडलें. कित्येक व्यापारी लोक ज्यांना इंदूर सोडून इंग्रज सरकारच्या छत्राखालीं येऊन रहाण्याचा प्रसंग आला आहे त्यांच्या तोंडून श्रीमंत बाळासाहेबांची कारकिर्द फारच भयंकर प्रकारची ऐकण्यांत येते. ते म्हणतात कीं, असला क्षुद्रीक बुद्धीचा राजा केव्हां कोणावर कशी आग पाखडील याचा नेम नाहीं. सद्योदित वहिमानें भरलेलें बाळासाहेबांचें मन असतें. त्यांना इमानदार, भरंवशाचा असा मनुष्य कोणींच दिसत नाहीं. एकंदर प्रजा त्यांचे धाकानें आजचा गेला उद्यांचा कसा जातो या काळजींत रात्रंदिवस असते. महाराजांची इतकी नाजूक अथवा भ्रमिष्टासारखी स्थिती कां झाली याचा कोणासही अजमास लागत नाहीं. त्यांच्या पदरीं चांगले

घांगले लोक आहेत परंतु तेही केवळ द्रव्याशेनें आपल्या नोकरीचे दिवस लोटीत आहेत. त्या लोकांची विद्वत्ता, त्यांचा अनुभव, त्यांची सल्ला मसलत वगैरे सारीं त्यांना आपल्या घरगुती दप्तरांत बांधून ठेवणें भाग पडलें आहे. त्यांना त्यांचा उपयोग करून दाखविण्याचा सुदीन प्रस्तुतच्या श्रीमंतांचे कारकिर्दीत तर येणेंच नाहीं. रा. ब. खंडेराव चिमणराव हे आमच्या इकडे नांवाजलेले आणि बडे हुद्देदार आहेत परंतु इंदुराधिपती जवळ त्यांची हुशारी इकडच्याप्रमाणें कांहीं चालत नाहीं. याचें कारण, महाराजांची अद्भुत लहर होय. त्यांची लहर केव्हां कशी लागेल याचा अजमास कोणाच्यानेंही करवत नाहीं. लहानशा शिपायापासून तों बड्या अधिकाऱ्या पर्यंत महाराजांची लहर सारखी असते. वाटेल त्याशीं लागेल त्या प्रमाणें ते हवातसा खेळ करून आपल्या मनाची हौस पुरी करून घेतात. त्यांचे मध्यें मोठी खुबी ही आहे कीं, मनांत येईल तें—मग तें चांगलें असो वा वाईट असो, अगर त्या पासून हवें तेवढें नुकसान होण्याजोगा प्रकार जरी असला तरी मागें पुढें विचार न करतां तें करून अथवा करवून आपल्या मनाची हौस पुरी करून घ्यावयाची. समजा कीं एखादे वेळेस महाराजांची दृष्टी, समोर उभे असलेल्या रिसाल्याच्या स्वारांकडेस फिरली आणि त्यांस वाटलें कीं, हे मजबूत पोषाख करून सज्ज झालेले आहेत तर त्यांस 'कपडे काढा आणि लंगोटी लाऊन उभे रहा' असें म्हणण्यास अगर हुकूम करण्यास कांहीं दिक्कत वाटणार नाहीं; तसाच प्रकार एखाद्या बड्या कामदारासंबंधानें सुद्धां समजण्यास कांहीं हरकत नाहीं. मात्र तो इंग्रजींतून गेलेला नसावा. बाकी इंग्रजींतून गेलेल्या आळ्येतेच्या कामदाराची पूजा करण्यास अगर मनांत येतील तशा शिव्या देण्यास म्हणजे महाराजांना भीति वाटते असें मुळींच नाहीं. मात्र इतकाच विचार त्याच्या संबंधानें करावा लागत असेल कीं, हा इंग्रजींतून तिकडे आपला हक्क कायम ठेवून आलेला आहे, तेव्हां वारनिशी खरडणाऱ्या कारकुनाचें काम त्यास सांगितलें असतां तो करणार नाहीं हें खास आहे. एवढा तरी विचार खात्रीपूर्वक महाराजांचे मनांत येतोच असें आमच्यानें म्हणवत नाहीं, पण येणें जरूर आहे इतकें म्हणतों. ज्या दिवशीं हा

विचार महाराज करणार नाहींत त्या दिवशीं त्यांच्या दुष्ट कृत्यांचा परिणामही नजिक आला असें लोक म्हणूं लागतील. राजाचे तोंडून शिवी बाहेर पडणें फारच वाईट आहे. परंतु बाळासाहेबांजवळ वाईट आणि चांगलें याचा विधीनिषेधच नाहीं. प्रत्यक्ष मातोश्रीला जुन्या खेंटरांचा नजराणा जो संस्थानाधिकारी पुत्र पाठवितो आणि प्रसंगोपात खेंटरें नजर पाठविण्याची आमच्यांत चाल आहे असें पोलिटिकल एजन्ट जवळ बोलण्यासही जो तयार आहे, त्याच्या जवळ चांगल्या वाईटाचा विधीनिषेध तो असणार कोठून ? तसेंच आम्हीं कुठेही गेलों अगर इंग्रज सरकारनें आम्हांस राजकीय कैदी म्हणून कुठेही नेऊन ठेवलें तरी आमची चालू चैन मुळींच कमती होणार नाहीं. मात्र त्यांनीं चार लाखांची नेमणूक करून दिली पाहिजे. असे उद्गार ज्या राजाचे तोंडून निघतात अथवा ज्याची समजूत अशी आहे तो किती अकलेचा समजावयाचा ? असले अपवित्र शब्द ऐकून कोणासही वाईट वाटल्यावांचून रहाणार नाहीं.

---

## नंबर ४

( विक्षिप्त अंक ४१ ता. १३ जुलई ९५ )

गेल्या तीन नंबरांत श्रीमंत महाराज बाळासाहेब उर्फ शिवाजीराव होळकरांच्या जुलूमी कृत्यांचा थोडासा आम्हीं उल्लेख केला असून, अद्याप त्याचा प्रतिकार करण्यांत आला नाहीं, यावरून आम्हांकडेस आलेल्या बातम्या सर्वस्वी खऱ्या आहेत असें ठरतें. महाराजांनीं आपली सत्ता नष्ट करण्याचा हा अद्वितीय प्रयत्न चालविला आहे असें येत असलेल्या नव्या नव्या बातम्यांवरून म्हणावें लागतें. त्यांना अद्याप त्यांच्या दुष्ट कृत्यांनीं गादीवरून ढळूं दिलें नाहीं हें त्यांचें सुदैव समजण्या पेक्षां त्यांच्या वडिलांची पुण्याई जबरदस्त असून ती अद्याप पर्यंत सरली नाहीं असें म्हणणें रास्त ठरेल. ज्या ठिकाणीं परलोकवासी तुकोजीराव महाराजांनीं आपल्या शहाणपणाच्या कर्तबगारीनें आणि सुस्वभावी धोरणानें राज्यशकट हांकून कीर्ति मिळविली व संस्थानची सुव्यवस्था केली त्या ठिकाणीं त्यांचे गादीवर त्यांच्या नालायक चिरंजिवांनीं बसून धनगरी कारकिर्दीचा झेंडा फडकवून जुलूमी कृत्यांचा भडीमार चालवावा हें होळकरशाहीला सडेसाती ला-

गल्याचेंच लक्षण नव्हे काय? राजघराण्या मध्यें जन्म घेऊन पूर्वजांच्या कीर्तिस काळोखी लावण्या जोगें वर्तन शिवाजी या नामाभिधानास मुळींच शोभत नाहीं. नांव किती सुंदर आणि कृत्यें पहावीं तर फारच भयंकर! अहाहा! एक शिवाजी असा अवतारी शूर वीर होऊन गेला कीं ज्यानें महा प्रबल आणि जुलूमी झालेल्या अशा मोंगलशाहीस दे माय धरणी ठाय असें करून सोडलें आणि हिंदु पदपादशाही स्थापन करून चिरकाल कीर्ति मिळविली व स्वदेशाभिमानाचें बीं अंशतः तरी आपल्या लोकांत पेरून ठेविलें, त्या नामधारी प्रस्तुतच्या होळकर संस्थानाधिपती शिवाजीनें आपल्या अंगचें खरें पाणी घालवून दुष्ट कृत्यांच्या योगानें उलट कीर्ति करून घेण्याचा क्रम चालविलेला पाहून कोणासही या महाराजां विषयीं कळकळ न वाटतां, होईल तितका यांचा धिक्कार करावासें वाटल्यास गैरवाजवी होणार नाहीं. आजकाल महाराजांनीं मांडलेल्या मोंगलाई कृत्यांवरून त्यांस खास वेड लागलें असावें असें अनुमान होतें. वेड्या मनुष्याचे हातून अशींच अनन्वित कृत्यें व्हावयाचीं. गेल्या महिना दोन महिन्यांत ज्यांच्या वर महाराजांची वक्रदृष्टी होऊन आग पाखडली गेली, त्यांपैकीं कांहींची मालिका आज येथें देतोः—

१ पर्शराम पोशाखवाला नांवाचा एक जुना नोकर होता. त्याचें तुकोजीराव महाराजांचे वेळीं फारच वजन होतें. ज्या लोकांचें महाराजांकडे अथवा मां साहेबांकडे काम पडे त्यांचें या पोशाखवाल्याची भेट झाली कीं अर्धें काम झालें असें त्यांस वाटे. त्या इमानी नोकरास बाळासाहेब गादीवर बसतांच काढून दिला. काढून देण्यापूर्वी कैदेंतही ठेवला. पुढें भानपुऱ्यास पाठविला. नंतर पुन्हां बोलावून आणून त्याचे पायांत बिड्या ठोकून त्यास कैदखान्यांत ठेवला होता. हल्लीं पांच सात दिवस झाले, त्याची अतिशय विटंबना करून त्यास सोडून दिला आहे.

२ प्रसिद्ध सावकार श्रीमंत किबे साहेब ज्यांचीं दुकानें गणेशदास किसनाजी या नांवानें प्रसिद्ध आहेत, त्यांचा देवास दुकानचा मुनीम भिकाजीपंत इंदूर शहरांत आंबे खरेदी करण्याकरितां बाजारांत उभा होता. त्याजवर बाळासाहेबांची नजर गेली. मग काय विचारतां (!) एकदम पकडून आणण्याचा हुकूम दिला. हुकूमाप्रमाणें त्यास आणल्यावर उभा करून तूं कोण, कुठे

असतोस, येथें कां आलास वगैरे विचार पूस करून 'तूं लुच्चा दिसतोस, पुन्हां शहरांत येऊं नकोस वगैरे, अंगीं खिळलेल्या शिव्यांनीं त्याची पूजा करून त्यास घालवून दिला.

३ सात असामी लखपती साहूकार ज्यांनीं महाराजांचे मंजूरीनें तेथील सुताचे गिरणींतील कापड खरेदीचें कंत्राट घेतलें होतें, त्यांजवर सध्यां महाराजांनीं आग पाखडली आहे. घेतलेलें कंत्राट 'लबाडीचें असून आमचें नुकसान केलें असें बाळासाहेबांचे मनांत येऊन विचारपूस तपास वगैरे कांहींएक न करतां, तसेंच त्या साहूकारांच्या इभ्रतीकडेस लक्ष न देतां मोंगलाई हुकूम देऊन त्यांच्या स्थावर व जंगम इस्टेटीची एकदम जप्ती केली आहे. इतकेंच नव्हे तर त्या इस्टेटीचें लिलांव करून जी येईल रकम ती तिजोरींत जमा करून बाकी राहील ती त्यांच्यापासून अन्य मार्गानें वसूल करा, असा हुकूमही दिला आहे. जे साहूकार हिशेबानें बाकी काढून न्यायानें मागितल्यास लाख लाख रुपये प्रत्येकगणा तक्रार न करितां देणारे, त्यांच्यावर बाळासाहेबांचा असा जुलूम! असल्या जुलूमी सत्ताधीशास राजा म्हणण्या पेक्षां पेंढारी, लुटारू, दरवडेखोर इत्यादि शब्दांनीं अलंकृत केल्यास ईश्वराचे घरीं देखील दोष लागावयाचा नाहीं. धिक्कार अशा जुलूमी संस्थानिकाला आणि त्याच्या हुकुमाला !! या सात साहुकारांचा जसा छल झाला आहे आणि त्यांच्या अब्रुची राळ करण्याचें महाराजांनीं मांडलें आहे तद्वत बाळासाहेबांचा छल होण्याची व त्यांच्या अब्रूचें लिलांव होण्याची वेळ समीप येऊन ठेपली आहे असें क्रोधाविष्ट झालेलें अंतःकरण तेव्हांच म्हणूं शकेल, यांत नवल तें काय? साहुकारांच्या संबंधानें ज्यास त्यास हळ हळ वाटेल परंतु बाळासाहेब महाराजांवर प्रसंग आल्यावर कोणासही विषाद वाटणार नाहीं. हर! हर!! बाळासाहेबांचें दुर्दैव ओढवत चाललें यांत कांहीं शंका नाहीं.

४ रामभाऊ जोशी या नांवाचे सद्गृहस्थ पूर्वी सरकारचे आश्रित होते. व त्यांच्यावर प्रस्तुत महाराजांची गादीवर बसण्यापूर्वी अतिशय मेहेरबानी होती. पुढें गादीवर बसतांच महाराजांनीं त्यांना इंदुरांतून हांकून दिलें. नंतर हे ७ वर्षेपर्यंत इकडच्या प्रांतांत रहात होते. हल्लीं दोन वर्षांपूर्वीं यांना बाळासाहेबांनीं शहरांत बोलाविलें. ते गेल्या ता०

२१ जून पावेतों भयभीत अंतःकरणानें सुरक्षित होते; पण ता. २२ जून रोजीं त्यांना समक्ष बोलावून पन्नास उठाबशा काढवून, तोंडांत थापड्याही स्वतः महाराजांनीं मारल्या. नंतर तुह्मीं शिवाप्रसाद वकील जे छावणींत आहेत त्यांच्या घरीं जात असतां काय ? ह्मणून विचारलें व तोच आरोप त्यांचेवर लादला. पुढें दुसरे दिवशीं ( ता. २३ रोजीं ) १२ वाजतां रात्रीं हुजरे व शिपाई त्यांच्याकडेस पाठवून १०० रुपये दंड या वेळेस द्या, न दिल्यास तुह्मांस कैद केलें जाईल, असें धरणें पाठविलें. अब्रुकरितां बिचाऱ्यानें बायकांच्या आंगावरील चांदीच्या रकमा एक शेर अदपाव वजनाच्या देऊन त्यांस रवाना केले व आपली लुटका करून घेतली. ती वेळ टळल्यानंतर रामभाऊस ता० २४ रोजीं शहरांतून निघून जा असा हुकूम दिला. रामभाऊ गेल्यावर तारीख २५ रोजीं दिवसा आठ वाजतां २५ शिपायी व कोतवाल असे पाठवून रामभाऊच्या स्थावर जंगम मालाची जप्ती करून सर्वांस घरांतून निघून जाऊन घर खालीं करून देण्यास सांगितलें. मालाची मोजदाद होणें बाकी होती ह्मणून त्या रात्रीं एका खोलींत सर्व मनुष्यें राहिलीं. व बांकी सर्व घरांत पोलीसचे शिपाई होते. रामभाऊचें घर सुमार ५००० हजार रुपये किंमतीचें असून तें सर्व शिपायांनीं भरून गेलें व त्यांच्या मनुष्यांनां एक खोली मिळाली ! नंतर दुसरे दिवशीं दिवसा ११ वाजतां एक एक वस्त्रानें बाया, मुलें यांस त्या यमदूतांनीं जबरीनें घरांतून काढून देऊन घरास कुलूपें लाविलीं. तेव्हां तीं मनुष्यें सर्व छावणींत गेलीं. व रेसिदेंत साहेबांस रामभाऊनें भेटून सर्व हकिकत कळविली. साहेबबहादुरांनीं महाराजांस या बाबतींत विचारलें किंवा नाहीं तें समजलें नाहीं. चौथे दिवशीं रामभाऊचे भावास महाराजांनीं बोलावून सर्व जिनगी त्याचे स्वाधीन करून त्याची पावती घेतली व रामभाऊनीं पुन्हां इंदूर शहरांत येऊं नये असा ताज्वल्य हुकूम दिला. सध्यां रामभाऊ छावणींत रहात आहे. महाराजांनीं हा शोटिंग प्रकार कां केला याचें कारण त्यांना कोणी विचारीत नाहीं व ते आपलीं राक्षसी कर्में सोडीतही नाहींत.

५ नान्या दरज़ी सरकारांत शिवण्याचें काम करीत होता. त्याजला समक्ष बोलावून मारपीट केल्यामुळें तो छावणींत पळून गेला. त्याचे ऐवजीं ज्याचा अर्थी अर्थी कांहीं संबंध

नाहीं असा जुना संभावित मातबर ७५ वर्षे वयाचा **मिसर दरजी** यास कैद केला आहे. व नान्याकडील तीन वर्षांत त्याजला जी शिलाई दिली गेली आहे, ती दंडासुद्धां १००० रुपये **मिसर दरजी** या जवळ मागतात. व त्या करितां त्याची स्थावर जंगम इस्टेट देखील जप्त केली आहे.

६ **हाब्बु रंगारी** याला बिडी घालून कैदेंत ठेविला असून, तीन किंवा ४ वर्षांत त्याजला जी रंगाई दिली असेल ती त्याजकडून वसूल करावी व त्याचे ९०० रुपये देणें आहेत ते देऊं नयेत असा एकाएकीं सक्त हुकूम सुटला आहे.

७ **खुदा बकस पिंजारा** हा—रंगारी, धोबी व शिंपी यांच्यांत सामील असेल म्हणून त्यानें ७ वर्षांत आपलें काम चांगलें केलें नाहीं अशा सबबीनें त्याला ( खुदाबकस यास )कैदेंत ठेविला असोन ६ हजार रुपये त्याजपासून वरील लोकांचे कसुरीबद्दल घेण्याचा हुकूम झाला आहे.

८ **सखाराम पगडबंद** जातीचा ब्राह्मण. याला खुद्द महाराजांचें पागोटें बांधण्या करितां ८ रुपये दरमहा ठरवून नोकर ठेवण्यांत आला. व लगेच त्यास तो कोठें पळून जाईल म्हणून कोतवालीन पिंजऱ्यांत अडकवून ठेवला. तीन महिने पर्यंत त्यास त्या पिंजऱ्यांत कैद ठेवण्यांत आला. त्या मुदतींत दोन तीन वेळ समक्ष बोलावून **शिव्या, मारपीट, उठाबशा** इत्यादि प्रकार करवून मनाची शांतता होईना म्हणून आणखीं त्याजकडून **भिस्त्याच्या पखालीही** भरविल्या. एवढ्यानें तरी बाळासाहेबांची आग शांत झाली असती तर बरें होतें परंतु तसें न होतां गेल्या ता. १६ मे रोजीं पुन्हां सखारामास समक्ष बोलावून त्याच्या **मलद्वारांत 'बर्फ सारा'** असा हुकूम दिला. ( किती नीच आणि वेडगळ हुकूम आहे. हा ! असा हुकूम देणारा कोणत्या प्रकृतीचा मनुष्य समजावा ? अशी लोकांस शंका येणें साहजिक आहे. ) महाराजांचा असा हुकूम होतांच सखारामास थोडें हंसूं आलें. 'तें पाहून **'हा हंसतो कां ? पिटा गुलामास, ठोका चापून'** इत्यादि ताळेबंद हुकूम दिले. नंतर जवळ असलेल्या हुजऱ्यां पैकीं एकाकडून त्याची शेंडी, दोघांकडून दोन्ही कान, दुसऱ्या दोघांकडून त्याचे दोन्हीं हात असे पकडवून दोघां इसमास त्याचे थोबाडांत थापटा मारण्यास लावले. हुकूमा प्रमाणें दोन तास पर्यंत थापटा मारण्याचा तडाखा चालू होता. ह्या थापटा, माशा मारण्या सारख्या न-

व्हत पण फारच क्रूरतेनें, कीं ज्याचा परिणाम तोंडांतून, नाकांतून, कानांतून रक्तस्राव होण्यापर्यंत झाला. जेव्हां लालीलाल पाण्याचा झरा सुटला तेव्हां त्याचें पागोटें आणवून त्यानें तें पुसविलें परंतु मारणें चालूच होतें. पुढें तो फारच घाबरला व बेशुद्ध होण्यापर्यंत त्याची मजल येऊन पोंचली. तेव्हां त्याला मोकळा करून सांगितलें कीं, जा खालीं आणि पागोटें बांधून घेऊन वर ये. बिचाऱ्या मरणप्राय झालेल्या सखारास त्यावेळीं यमाचे हातून सुटलों असें झालें असेल हें निर्विवाद आहे. पुढें तो खालीं आला व **गोपाळराव पोशाखवाला** यास 'पाणी पिऊन येतों' असें सांगून आपल्या घरच्या रस्त्यास लागला. पण एकटा नव्हे बरें, त्याचे बरोबर तुरुंगाचा शिपाई गोपाळरावानीं दिला, तो शिपाई नित्य पागोटें बांधून आणण्याच्याच कामगिरीवर ठेवलेला होता असें म्हटलें तरी चालेल. सखाराम त्या यमदूतासह आपल्या घरीं आला व आंत जाऊन पाठीमागच्या दारानें जीव वांचविण्या करतां एकदम छावणीच्या रस्त्यास लागला. छावणींत येतांच त्यानें रेसिडेंट साहेबांकडेस झाल्या हकिकतीचा अर्ज देऊन मारामें सुजलेलें तोंडही दाखविलें.

इकडे सखाराम पळाल्याची हकिकत महाराजांस समजतांच शिपायाचे पायांत बिडी ठोकली जाऊन त्यास सहा महिन्याची कैद झाली. त्यास तुरुंगांत घाडल्यावर गोपाळराव पोशाखवाल्यास बोलावून त्यास बेदम मारला. तितक्यांत तोही युक्तीनें पळून गेला. तो व सखाराम दोघेही इसम पळून गेल्यामुळें महाराजांचें डोकें एकदम भणाणलें. त्यांचे आंगाची लाही झाली. एखाद्या खुनी मनुष्याप्रमाणें त्यांची तेवढ्यांत वृत्ती पालटून हुकूम दिला कीं, सखारामाचे घरीं जाऊन जो त्याचे घरांत सांपडेल त्यास पकडून कैदेंत घाला. हुकूमाप्रमाणें सानिध्य असलेल्या माणसांनीं सखारामाचे घरीं जाऊन त्याचे भावास कैद करून कैदखान्यांत तर घातला. पोशाखखान्यांतील १२।१४ कारकून व दुसरे कित्येक लोक यांसही पकडून लगेच कैदखान्याची भरती केली. गोपाळरावाचें आडनांव **तारे** असें होतें म्हणून त्या **आड नांवाचे** जेवढे सांपडले तेवढे कैदेंत घातले. एवढ्यावर तरी महाराजांचा अग्नी शांत झाला काय ? नाहीं. जेव्हां गोपाळरावाचे अडोशी पडोशी लोक होते त्या सर्वांस पकडून कैदेंत घातले तेव्हां थोडासा बाळासाहेबांचा अग्नी शांत झाला.

होळकर महाराजांची ही जुलूमी तऱ्हा ऐकून मार सोसणाऱ्या आणि कैदेंत बसणाऱ्या लोकांची तारीफ करावी तितकी थोडीच आहे असें आह्मांस वाटतें. वाघ ह्मटला तरी खातो आणि दाढीचा ह्मटला तरी खातो अशी जेथें स्थिती आहे तेथें आपला सत्शिलपणा अगर सौजन्य दाखविण्यापेक्षां दोन देणें घेणें हें कीर्तिस विशेष कारण होणार आहे. मारा, पिटा, ठोका वगैरे वगैरे जेव्हां बाळा साहेब सांगतात तेव्हां लगेच जें होईल तें होईल समजून, त्यांनां उलट चौदावें रत्न देणारा हिंमतदार इसम कोणी पुढें सरसावेल तर पहिल्या, दुसऱ्या किंवा चवथ्या वेळेस तरी महाराज शुद्धीवर येऊन त्यांचें खाडकन् डोकें उतरेल हें निःसंशय आहे. आतां मागें वळूं.

सखारामाचे आईनें १९।२० दिवसांनीं सडकेवर उभें राहून महाराजांस अर्ज केला कीं, माझा एक मुलगा पळून गेला व एक सरकारानें कैदेंत बसविला आहे, यामुळें माझे फार हाल होत आहेत. करितां महाराजांनीं दयालू होऊन माझ्या मुलास कैदेंतून सोडून त्याचे ऐवजीं माझा नवरा जो वृद्धावस्थेमुळें रिकामा घरांत बसून आहे त्यास कैदेंत ठेवल्यास घरीं बसण्या ऐवजीं सुखासमाधानानें तो तेथें बसून राहील. हा अर्ज महाराजांनीं ऐकतांच त्यांस दया उत्पन्न झाली आणि हुकूम दिला कीं, मुलास सोडून त्याचे बापास त्या जागीं बसवा. हुकूमा प्रमाणें लागलीच व्यवस्थाही झाली.

सखाराम जो छावणींत पळून गेला तो पुन्हां इंदूर शहरांत न जातां तेथेंच राहिला असून पागोटीं बांधण्याचा धंदा करीत आहे. बिचारा यमाजीभास्करच्या हातून सुटून इंग्रज सरकारच्या छत्राखालीं निर्धास्त राहिला आहे. सखारामा पूर्वी **गणपतराव** नांवाचा एक मराठा महाराजांचें पागोटें बांधीत होता. त्यालाही महाराजांनीं असाच छळला, मारला, ठोकला ह्मणून तोही पळून जाऊन छावणींत राहिला आहे. त्यानेंही रेसिडेंट साहेबांकडेस अर्ज वगैरे केला होता. आतां उभय पगडबंदांचा महाराजांकडे कांहीं संबंध उरला नाहीं. तथापि मराठ्याकडेस केव्हां केव्हां पागोटें बांधण्यास जातें व प्रत्येक 'पागोट्या'बद्दल तो ५।१० रुपये प्रमाणें वेत असतो. हा मराठा छावणींत जाऊन राहिल्यास एक वर्ष झालें.

सखारामाचे बापास कैद केल्यावर छावणींत मराठ्या पगडबंदाकडेस एकदां पागोटें बांधण्यास गेलें व

त्यानें बांधूनही दिलें. तेव्हां महाराजांनीं सखारामाचे बापास कैदेंतून आपल्या समोर बोलावून त्यास सांगितलें कीं, 'तुझ्या मुलाकडेस छावणींत पागोटें बांधण्यास पाठविलें होतें तें त्यानें बांधलें नाहीं, त्यामुळें गणपतरावाकडेस द्यावें लागलें. त्या बद्दल २५ रुपये व तुझ्या मुलानें हुकूम तोडला म्हणून २५ रुपये, मिळून ५० रुपये दंड देशील तर तुला कैदेंतून सोडून देईन.' बिचाऱ्या त्या म्हाताऱ्यानें सुटका होण्याकरितां ५० रुपये भरले व आपली सुटका करून घेतली. कसा जबरदस्तीचा प्रकार आहे हा !

९ **एक धूळ धोया**—म्हणजे रस्त्यांतील माती व कचरा घेऊन तो धुवून त्यांत कांहीं सांपडेल तर त्यावर निर्वाह करणारा. ( असे लोक शहरांत पुष्कळ आहेत व त्या गोष्टीचा सरकारांतून ठेकाही दिला जात असतो. ) तो मनुष्य रत्यावर एकदां कोठें दिसला. तेव्हां त्यास समक्ष बोलावून शिव्या वगैरे देऊन हुकूम दिला कीं, तूं शहरांतून एकदम निघून जा. तो गरीब इंदूर छावणींत गेला व सध्यां तेथें आहे.

१० **खुबा दरजी**, रामा जोशाचे बरासमोर ( रामभाऊ जोशी ) राहतो. त्याजला एकदम पकडून आणून तुझे भावानें आमचे येथें शिवण्याचें काम केलें, तें चांगलें केलें नाहीं; करितां ६ महिन्याचा तनखा ( पगार ) ६० रुपये तूं आतांच दे, नाहींतर तुला कैदेंत पाठवूं, अशी महाराजांनीं धमकी दिली. त्यावरून त्यानें रु० ६० आणून भरले.

११ **श्रीमंत पार्वतीबाई साहेब**—महाराजांची सापत्न मातोश्री, स्टेशनाजवळ पण महाराजांचे हद्दींत रहात आहेत. त्यांच्याकडेस महाराजांनीं जोडे, केरसुण्या वगैरे अमंगळ पदार्थांचीं तांटें भरून पाठविल्याचें बाहेर आलेंच आहे. ता. ६।७ मिनहू रोजीं मा साहेब रहातात त्या मोहल्यांतील म्हणजे गवाळटोळींतील ५।२० लोक व स्टेशनच्या फाटकाचे आंतील म्हणजे शहरगचे हद्दींत महाराजांचे नांवाचा गंज आहे त्या गंजांतील २००।३०० लोक महाराजांचे समक्ष बोलावण्यावरून वाड्यांत गेले होते. परंतु बाळासाहेबांची स्वारी **राळामंडळास** गेल्यामुळें गेलेले लोक परत आले. ( राळा मंडळ म्हणून एक इंदूर शहराजवळच शिकारीची जागा आहे. त्या ठिकाणीं महाराजांनीं बंगला वगैरे बांधलेला आहे. व राळामंडळावर शिकारी जनावरें

ओरड करून बाहेर काढण्याकरितां ब्राह्मण लोकांस—भिक्षुकांस नव्हे पण कारकून मंडळीस नेण्यांत येतें. तो प्रकार नं. २ मध्यें आह्मीं सांगितलाच आहे. ) गेलेले लोक कारभारी साहेबांस भेटले व त्यानीं बोलावण्याचें कारण विचारलें. परंतु **'माहित नाहीं.'** असा कारभारी साहेबांनीं जबाब दिला. ज्या मोहोल्यांतील लोकांस बोलावण्यांत आले होते त्या मोहोल्यांतील लोकांवर मा साहेबांस मदत करतात असा आरोप ठेवण्यांत येणार आहे. त्या दिवशीं तर ते वांचले, पुन्हां केव्हां त्यांच्यावर वक्रदृष्टी होईल त्याचें अनुमान करवत नाहीं.

---

## नंबर ५.

( विक्षिप्त अंक ४२ ता. २० जुलई ९५ )

इंदूरसंस्थान संबंधानें **विक्षिप्त**-पत्रांत लेख येऊं लागल्यापासून कित्येक आमचे मित्र व हितचिंतक आमच्या विषयीं काळजी करूं लागले आहेत, याजबद्दल आह्मांस मोठें आश्चर्य वाटतें. त्यांच्या समजूतीनें आह्मीं हातीं धरलेलें कृत्य फार साहसाचें असून परिणामीं आह्मांस नें जरूर असें होईल आणि ह्मणून थोरा मोठ्यांच्या चांगल्या अगर वाईट गोष्टींत आह्मीं न पडावें असें ठरतें, निदान त्यांच्या कळकळी वरून असें दिसून तरी येतें. तथापि आह्मांस त्याचो कांहींच काळजी वाटत नाहीं. आह्मीं आमचें कर्तव्य खरें व राजनिष्ठेनें बजावित आहोंत अशी आमची समजूत आहे. स्वकर्तव्य बजावीत असून त्यांत जर कांहीं अडथळा आला अगर पैशाचे जोरावर अनेक खटखटींमुळें आह्मांस आमच्या कर्तव्यापासून दूर व्हावें लागलें तर त्यांत आमचें सर्वस्वी नुकसान झालें अगर आमच्या कर्तव्याचा परिणाम असा दाखल्यास आला असें ह्मणून आह्मीं मुळूमुळू रडत बसणार नाहीं हें खास आहे. **द्रव्येणसर्वेवशाः** याच तत्वावर नजर पोंहोंचवून आमचे मित्रांस आमची काळजी पडली असेल हेंही खरें; पण त्या तत्वांत न्याय अगर अन्याय हीं दोन मुख्य पाहिलीं पाहिजेत. द्रव्या पुढें न्यायदेवताही भाळली जाऊन तिची जागृतावस्था नाहींशी होते आणि ती आपलें खरें कर्तव्य विसरून जाऊन तोंडपुजे लोकांच्या हांजीस राजी होते असें कित्येक आमच्या हितचिंतकांचें व मित्रांचें ह्मणणें आहे. परंतु या गोष्टीस फारसा आह्मीं मान देत नाहीं. इंग्रजी राज्यांत अशा भुलवणीवर

आपलें कर्तव्य विसरणारी न्यायदेवता असेलच असें अनुभवास येईपर्यंत तरी ह्मणणें आह्मांस रास्त दिसत नाहीं. नेटिव संस्थानांत कदाचित्‌ अशा ह्मलची न्यायदेवतेचें विशेष स्तोम मांनलेलें असेल परंतु तसेंही आह्मीं आज ह्मणूं शकत नाहीं. खऱ्या गोष्टी बाहेर काढून दुर्वर्तनी मनुष्याची सुधारणा होण्यास्तव प्रयत्न करणें गैरवाजवी आहे असें आह्मांस तर वाटत नाहीं. एतद्देशिय संस्थानिकांविषयीं आमची पूज्यबुद्धि आहे. त्यांनीं आपल्या संस्थानाचा पूर्णोपभोग घ्यावा आणि आपल्या प्रजेस पुत्रवत समजून त्यांचा प्रतिपाल करावा अशी आमची मनापासून इच्छा खरी; परंतु जो संस्थानिक आपलें खरें कर्तव्य न समजतां रयतेवर जुलूम करण्यांतच प्रजावात्सल्य आहे असें मानतो व एखाद्या भ्रमिष्टा सारख्या खुळसट चेष्टा करून आपल्या प्रजेस त्राही त्राही करून सोडतो, त्याचे बाबतींत मौन्यव्रत धारण करून बसण्यापेक्षां त्याचे डोळे उघडण्याचा प्रयत्न करण्यांत कांहीं प्रमाद होतो असें समंजस मनुष्याचे तोंडून तरी केव्हांच बाहेर येणार नाहीं. श्रीमंत शिवाजीराव महाराज होळकर हे शिकलेसवरलेले असून त्यांच्या डोक्याचा मेंदू बिघडला गेल्यामुळें त्यांना वेडगळ आणि जुलूमी कृत्यें करण्याची संवय लागून त्यांनीं मांडलेल्या दुष्ट कृत्यांचा बोभाट होऊं लागला यांत आमचा किंवा दुसऱ्याचा तरी काय वांक आहे? रास्त विचारानें पाहूं लागल्यास आमच्या सार्वभौमसरकारची श्रीमंत बाळासाहेबांस गादीवर बसविण्याचे बाबतींत पहिली व मोठी चुक झाली ह्मटली पाहिजे. कारण, बाळासाहेब राज्याधिकारास मुळींच पात्र नाहींत असें त्यांच्या वडिलांनींच ठरवून ठेविलें होतें. शिवाय लॉर्ड रीपन यांनीं ता. १६ आगस्ट सन १८८४ चें महाराज तुकोजीराव होळकर यांस एक पत्र पाठवून त्यांत बाळासाहेबांचे जुलूमी कृत्यांचा बंदोबस्त करा, अशीही मित्रभावानें सूचना केली होती. परंतु तें सारें बाजूस राहून तुकोजीरावांचे मागें इंदूर प्रजेच्या दुर्दैवानें हेंच रत्न त्या गादीस लाभलें. होळकरशाहींत हें अद्वितीय दुसरें रत्न निपजलें ह्मणतात. पहिलें रत्न अहिल्याबाईचे पोटीं जन्मास आलें असून त्याचें नांव मालेराव असें होतें. तेंही बाळ अज्ञानच गुणाचें होतें. परंतु राजसत्ता त्याचे हातीं नव्हती ह्मणून तें इतकया प्रसिद्धीस आलें नाहीं. असो.

श्रीमंत महाराज शिवाजीराव आहेत,' अशा अर्थाचीं व्हाइसराय यांच्या जुलूमाची मालिका गेल्या अंकापासून देण्याची सुरुवात झालीच आहे. त्या मालिकेचा शेवट होण्यास वर्ष सहा महिने तरी लागतील असें अनुमान होतें. दरम्यान जी जी ताजी बातमी विक्षिप्तच्या न्यायी कांड्यांत येऊन पडेल ती ती मोठ्या कष्टानें आमच्या वाचकवर्गापुढें मांडावी लागणार आहे. आज गेल्या पांच सात दिवसांत झालेली घडामोड व मागील कांहीं हकिकत जी लिहून आली ती खालीं देतों:—

" आमच्या महाराज होळकर साहेबांचें डोकें आज सात वर्षांपासूनच काय (?) पण त्या पूर्वीचेंच फिरलेलें आहे. एक तर त्यांचा जुलूमी व क्रूर स्वभाव आणि त्यांत अत्यंत अविचार. तशांतून हल्लीं तर त्यांच्या डोक्यांत फारच दोष उत्पन्न झाला आहे, आणि त्यामुळें प्रजेवर प्रस्तुत कहर होऊन राहिला आहे.

' ब्राह्मण लोक लबाड, ब्राह्मण लोक पैसे खातात, कामवाले जुने सर्व एक अमल्यामुळें मजला कांहीं कोणी कळूं देत नाहींत, यामुळें प्रजेचें फार नुकसान होतें वगैरे कारणांनीं मला त्रास झाला आहे; या करितां मीं गादी सोडण्यास तयार साहेबांकडेस पत्रें पाठवून एक प्रकारची धूळ फेंकून त्यांना भ्रमांत पाडलें आहे. पण हें सर्व खोटें आहे. ब्राह्मणाच्या पंचविसपट दुसऱ्या जातीच्या लोकांवर या महाराजांनीं जुलूम व अन्याय केल्याचें उघडपणें कोणासही दिसण्यासारखें आहे. काय हें रयतेचें दुर्दैव म्हणावयाचें !

पत्रकर्ते महाराज, आपण खात्री पूर्वक समजा कीं, मागिल अधिकारी म्हणजे मिनिस्टर आर. रघुनाथराव, रेसिडेन्सी वकील कृष्णाराव मुळे, नायब दिवाण शामराव नारायण आणि खुमानसिंग बक्षी हे चौघेही फार लायक, हुशार, महाराजांचे पूर्ण विश्वासू व खऱ्या अंतःकरणापासून महाराजांचें हितचिंतणारे असे असतां त्यांजवर महाराजांनीं सन १८८८ च्या ता. ८ फेब्रुवारीचे सुमारास निव्वळ खोटा आरोप लादून त्यांना वाक्पारुष्यानें ताडन केलें व अतिशय त्रास दिला, इतकेंच नव्हे पण राजिनामे देऊन मोकळे व्हा असा सक्तीचा हुकूमही दिला. एकाएकीं अशी गडबड उडवून देण्याला कारण खालील मजकूर होय. ता. ७ जानेवारी सन १८८८ च्या पायोनियर पत्रांत महाराजां-

विरुद्ध कांहीं मजकूर प्रसिद्ध झाला होता. तो मजकूर त्या वेळचे दिवाण बहादूर आर. रघुनाथराव यांनीं लिहिला व बाकीच्या तिघांनीं त्यांस मदत दिली, असा नुसता संशय महाराजांचे मनांत आल्यावरून त्यांनीं एकदम एवढी गडबड उडवून दिली. शहाण्या महाराजांचे हातून चौकशी केल्याशिवाय अशी अन्यायाची आग पाखडली गेली नसती हें कोणींही म्हणूं शकेल. पुढें ता० ८ फेब्रुवारी सन १८८८ रोजीं ह्या चौघांनीं राजिनामे दिले. व रघुनाथरावांखेरीज बाकीचे तर घरीं बसलेच. नंतर मार्च महिन्याच्या ९ तारखेचे सुमारास महाराजांनीं इंदूरचे त्या वेळचे रेसिडेन्ट **सर लिपल ग्रिफीन** यांना मिनिस्टर व वकील या उभयतांसंबंधानें वेडींवांकडीं पत्रें लिहिलीं. तीं पत्रें वाचून रेसिडेन्ट साहेबांचे नजरेस महाराज वेडगळ असून अन्यायी आहेत असें उलट चांगल्या प्रकारें दिसून आलें. परंतु लगेच महाराजांसंबंधानें विरुद्ध रिपोर्ट करण्याचें त्यांचे मनांत त्यावेळीं आलें नाहीं. कारण, थोडक्याच दिवसांपूर्वी त्यांनीं महाराजांचें स्तुतीस्तोत्र गाइलें होतें. तथापि थोडक्याच अवकाशांत साहेबबहादुरांची पूर्ण खात्री झाल्यावरून त्यानीं त्याच महिन्यांत महाराजांचे विरुद्ध रिपोर्ट केला. तो रिपोर्ट साधारणच होता. नंतर महाराजांची समजूत घालून त्यांनीं आपला राज्यकारभार सुरळीत चालवावा व प्रजेस सौख्य द्यावें असा पुष्कळ बोधही केला परंतु तो व्यर्थ गेला. नंतर दिवाणबहादूर आर. रघुनाथराव यांना अखेर काम सोडून जाणें भाग पडलें व ते ता० २३ एप्रील रोजीं १० वाजतां इंदूर सोडून रवाना झाले. रघुनाथराव गेल्याचें रेसिडेन्ट साहेबांस समजतांच त्यांनीं त्याच दिवशीं गव्हर्नमेंट ऑफ इंडियाकडे महाराजांविरुद्ध अति कडक मजकुराचा रिपोर्ट केला. त्यांत हा महाराज वेडा झाला आहे; याचा अधिकार रद्द करून मि. आर. रघुनाथराव यांस दिवाण नेमून इंदूर संस्थानची व्यवस्था करणें बरें होईल इत्यादि इत्यादि मजकूर असून, हिंदुस्थान सरकारानें तिकडे कानाडोळा केला म्हणून तेव्हांपासून आजपर्यंत लोकांस अन्याय व त्रास सहन करावा लागत असून, हजारों नव्हे पण लाखों रुपयांचें नुकसान प्रजेचें झालें व होत आहे. तेव्हांच महाराजांचे कान चांगले उपटले जाते तर अधिकाधिक जुलूम होत गेला नसता व हल्लीं जो भयंकर प्रसंग दिसूं लागला

आहे तोही टळता. प्रस्तुत प्रसंग महाराजांचें विशेष नुकसान होण्याचा दिसत असल्याबद्दल फार खेद होतो.

ब्राह्मण, ब्राह्मण हें नांव पुढें करून आपला अन्याय चालविण्यास महाराजांनीं जी युक्ति योजिली आहे ती अगदीं खोटी आहे. सव्वां ७।८ नवीन लक्षापती सावकारांवर न्याय व कायदा तसेच मिनिस्टर आणि कारखानदार यांचे अभिप्राय बाजूस झुगारून देऊन त्यांच्या विरुद्ध हुकूम देऊन सावकारांच्या मालमत्तेची जप्ती करून विनाकारण जुलूम चालविला असल्यामुळें सावकार लोकांत फारच हा हा:कार होऊन राहिला आहे. गेल्या १२ तारखेस सहा सावकार आपल्या मुलांसह आपला जीव व अब्रू वांचविण्याकरितां छावणींत पळून गेले आहेत, बाकी राहिलेले घाबरले आहेत. हा एवढा जुलूम महाराजांचा क्रूर स्वभाव, जुलूमी दृष्टी आणि संपयखोर मन या त्रिवर्गांमुळें होत आहे. कित्येक मुद्दा कामदारांनीं आपल्या गैरीस खोटा बसेल इतकी हुशारी ठेऊन जो काय बोध व अडथळा महाराजांस करावयाचा तोही केला, परंतु व्यर्थ.

सध्यां ज्या वाणी लोकांचे इरेच्या जप्त्या केल्या आहेत त्यां करण्यास कारण अथवा आधार मुळींच नाहीं. अन्यायानें ही आग ओतली गेली आहे. या वाणी लोकांवर कांहींतरी काहूर रचून त्यांस अपराधी बनवा आणि सारी त्यांची मालमत्ता सरकारांत घ्या व सज्जड शिक्षा त्यांस देतां येतील अशी कांहींतरी अजब युक्ति धुंडून काढा, असा मोठ्या सत्तीचा हुकूम महाराजांनीं मिनिस्टर व चीफ जस्टिस धुरंधर या उभयतांस दिला असल्याचें बोलतात. त्या हुकूमावरून मिनिस्टर यांनीं अडथळा घेतला. तेव्हां बरीच बाचाबाच होऊन महाराजांनीं उद्गार काढले कीं, 'आम्हीं सांगूं त्याप्रमाणें काम करा, नाहीं तर चालते व्हा. आम्हीं तुम्हांस कारभारी नेमिलें आहे परंतु तुम्हीं आम्हांस राजा बनविला नाहीं. तुमच्या मागें आम्हीं सखाराम मार्तंड यांस कारभारी नेमूं.' मजकूर उद्गारांची चिठी लिहून पाठविली असल्याचेंही बोलतात. शिवाय अति त्वरेनें गमन करणाऱ्या गरुडांकडेसही पांच हजारांची थैली पाठवून महाराजांचे मनांतलें हें इष्ट काम सिद्ध करण्याकरितां बोलावणें झाल्याचीही बातमी कळते. खरें असल्यास आज उद्यां इतक्यांत ते

येतील अशी बोलवा आहे. त्यांची हकेकत अवकाशानुरूप कळविली जाईल.

केवढें महाराजांस संकट पडलें आहे हें! इतका द्राविडी प्राणायाम महाराजांनीं कां मांडला आहे नकळे. हल्लींचे ग्रह त्यांचे निराळ्याच दिशेस वळले असावेत असें दिसतें. नाहींतर इतकी खटाटोप करण्यापेक्षां उचल कीं टांक कैदखान्यांत, असा हुकूम सुटला असता. वाणी लोकांचें नशीब कांहीं जोरावर असेलसें अनुमान होतें.

एडिटरराव, कित्येक मोठ्या गोष्टी असोत परंतु आमचे महाराज जुलूमी व वेडगळ असल्यामुळें त्यांचे हातून नित्य ज्या गोष्टी होतात त्यामुळें प्रत्येक व्यक्तिमात्रास इतका ताप व कोचवण झाली आहे कीं, जणूं काय इंदुरांतील सुख व शांतता समूळ नष्ट होऊन झोटिंगी अंमल वास करूं लागला आहे असा भास होतो. आम्हीं ईश्वरास अनुलक्षून आपल्यास सांगतों कीं, होळकरशाही आणि प्रस्तुतचे आमचे महाराज शिवाजीराव यांच्या कल्याणाविषयीं आमचें अंतःकरण तिळतिळ तुटलें जातें. जें खरें प्रेम तें आमचें आहे आणि या संस्थानचा प्रत्यक्ष सुख दुःखाचा अनुभवही वर्षोगणती घेतला असल्यामुळें आमचें मन फारच द्रवतें. बाकी महाराजांच्या चिखडलेल्या मेंदूंत उपदेशामृत घालण्याकरितां मनुष्य तर काय (?) पण प्रत्यक्ष ब्रह्मदेव जरी आला तरी त्यास हें वेडें पिशाच्च एकवेळ उठाबशा काढण्यास व थोबाड फोडून घेण्यास लाविल अशी हल्लींची स्थिती आहे. बोधानें सुधारणा होण्याची वेळ टळली. आतां जुलूमाचें चढतें मान आहे. इतक्यांत जर कांहीं निराळी व्यवस्था लागेल तर ठीक होईल. तसें होण्यापासून प्रजेचें अथवा महाराजांचें भावी नुकसान न होण्याचा संभव अधिक आहे. जर भावी प्रसंग टाळण्याची इच्छा सार्वभौम सरकारची असेल तर चौकशी वगैरे करण्याच्या भरीस तूर्त न पडतां व्हाइसरायसाहेबांनीं सध्यां शिवाजीमहाराजांस आपले आमचे जवळ नेऊन ठेवावे आणि अव्यवस्थित चांडाळ चौकडीचें इंदुरांत जें ठाणें असेल तें मोडून नव्या मुत्सद्दी लोकांचें एक कौन्सिल नेमून, त्याचे प्रेसिडेन्ट दिवाण बहादूर आर. रघुनाथराव किंवा नामदार रानडे अगर जे कोणी सरकारास योग्य वाटतील ते मुकरर करावे व त्यांच्या सल्लामसलतीनें होळकरशाहीचा रा-

आहे तोही टळता. प्रस्तुत प्रसंग महाराजांचें विशेष नुकसान होण्याचा दिसत असल्याबद्दल फार खेद होतो.

ब्राह्मण, ब्राह्मण हें नांव पुढें करून आपला अन्याय चालविण्यास महाराजांनीं जी युक्ति योजिली आहे ती अगदीं खोटी आहे. सव्वां ७।८ नवीन लक्षापती सावकारांवर न्याय व कायदा तसेच मिनिस्टर आणि कारखानदार यांचे अभिप्राय बाजूस झुगारून देऊन त्यांच्या विरुद्ध हुकूम देऊन सावकारांच्या मालमत्तेची जप्ती करून विनाकारण जुलूम चालविला असल्यामुळें सावकार लोकांत फारच हा हा:कार होऊन राहिला आहे. गेल्या १२ तारखेस सहा सावकार आपल्या मुलांसह आपला जीव व अब्रू वांचविण्याकरितां छावणींत पळून गेले आहेत, बाकी राहिलेले घाबरले आहेत. हा एवढा जुलूम महाराजांचा क्रूर स्वभाव, जुलूमी दृष्टी आणि संपयखोर मन या त्रिवर्गांमुळें होत आहे. कित्येक सुज्ञ कामदारांनीं आपल्या रेजीस खोन बसेल इतकी हुशारी ठेऊन जों काय बोध व अडथळा महाराजांस करावयाचा तोही केला, परंतु व्यर्थ.

सध्यां ज्या वाणी लोकांचे इस्टेतीच्या जप्त्या केल्या आहेत त्यांस करण्यास कारण अथवा आधार मुळींच नाहीं. अन्यायानें ही आग ओतली गेली आहे. या वाणी लोकांवर कांहींतरी काहूर रचून त्यांस अपराधी बनवा आणि सारी त्यांची मालमत्ता सरकारांत घ्या व सज्जड शिक्षा त्यांस देतां येतील अशी कांहींतरी अजब युक्ति धुंडून काढा, असा मोठ्या सक्तीचा हुकूम महाराजांनीं मिनिस्टर व चीफ जस्टिस धुरंधर या उभयतांस दिला असल्याचें बोलतात. त्या हुकूमावरून मिनिस्टर यांनीं अडथळा घेतला. तेव्हां बरीच बाचाबाच होऊन महाराजांनीं उद्गार काढले कीं, 'आम्हीं सांगूं त्याप्रमाणें काम करा, नाहीं-तर चालते व्हा. आम्हीं तुम्हांस कारभारी नेमिलें आहे परंतु तुम्हीं आम्हांस राजा बनविला नाहीं. तुमच्या मागें आम्हीं सखाराम मार्तंड यांस कारभारी नेमूं.' मजकूर उद्गारांची चिठी लिहून पाठविली असल्याचेंही बोलतात. शिवाय अति त्वरेनें गमन करणाऱ्या गरुडांकडेसही पांच हजारांची थैली पाठवून महाराजांचे मनांतलें हें इष्ट काम सिद्ध करण्याकरितां बोलावणें झाल्याचीही बातमी कळते. खरें असल्यास आज उद्यां इतक्यांत ते

येतील अशी बोलवा आहे. त्यांची हकिकत अवकाशानुरूप कळविली जाईल.

केवढें महाराजांस संकट पडलें आहे हें ! इतका द्राविडी प्राणायाम महाराजांनीं कां मांडला आहे नकळे. हल्लींचे ग्रह त्यांचे निराळ्याच दिशेस वळले असावेत असें दिसतें. नाहींतर इतकी खटाटोप करण्यापेक्षां उचल कीं टांक कैदखान्यांत, असा हुकूम सुटला असता. वाणी लोकांचें नशीब कांहीं जोरावर असेलसें अनुमान होतें.

एडिटरराव, कित्येक मोठ्या गोष्टी असोत परंतु आमचे महाराज जुलूमी व वेडगळ असल्यामुळें त्यांचे हातून नित्य ज्या गोष्टी होतात त्यामुळें प्रत्येक व्यक्तिमात्रास इतका ताप व कोचवण झाली आहे कीं, जणूं काय इंदुरांतील सुख व शांतता समूळ नष्ट होऊन झोटिंगी अंमल वास करूं लागला आहे असा भास होतो. आम्हीं ईश्वरास अनुलक्षून आपल्यास सांगतों कीं, होळकरशाही आणि प्रस्तुतचे आमचे महाराज शिवाजीराव यांच्या कल्याणाविषयीं आमचें अंतःकरण तिळतिळ तुटलें जातें. जें खरें प्रेम तें आमचें आहे आणि या संस्थानचा प्रत्यक्ष सुख दुःखाचा अनुभवही वर्षोगणती घेतला असल्यामुळें आमचें मन फारच द्रवतें. बाकी महाराजांच्या चिवडलेल्या मेंदूत उपदेशामृत घालण्याकरितां मनुष्य तर काय ( ? ) पण प्रत्यक्ष ब्रह्मदेव जरी आला तरी त्यास हें वेडें पिशाच्च एकवेळ उठाबशा काढण्यास व थोबाड फोडून घेण्यास लाविल अशी हल्लींची स्थिती आहे. बोधानें सुधारणा होण्याची वेळ टळली. आतां जुलूमाचें चढतें मान आहे. इतक्यांत जर कांहीं निराळी व्यवस्था लागेल तर ठीक होईल. तसें होण्यापासून प्रजेचें अथवा महाराजांचें भावी नुकसान न होण्याचा संभव अधिक आहे. जर भावी प्रसंग टाळण्याची इच्छा सार्वभौम सरकारची असेल तर चौकशी वगैरे करण्याच्या भरीस तूर्त न पडतां व्हाइसरायसाहेबांनीं सध्यां आमचे शिवाजीमहाराजांस आपले जवळ नेऊन ठेवावे आणि अव्यवस्थित चांडाळ चौकडीचें इंदुरांत जें ठाणें असेल तें मोडून नव्या मुत्सद्दी लोकांचें एक कौन्सिल नेमून, त्याचे प्रेसिडेन्ट दिवाण बहादूर आर. रघुनाथराव किंवा नामदार रानडे अगर जे कोणी सरकारास योग्य वाटतील ते मुकरर करावे व त्यांच्या सल्लामसलतीनें होळकरशाहीचा रा-

ज्यकारभार चालू करावा; आणि आजपर्यंत ज्या लोकांवर जुलूमी कृत्यांचा भडिमार होऊन अन्याय झाले आहेत त्यांची चौकशी करून त्यांस न्याय मिळेल अशी व्यवस्था करावी. अशा प्रकारची नवी कांहीं व्यवस्था न होईल तर मात्र पुढें काय प्रसंग ओढवतील हें अनुमानानें देखील आज कांहीं ठरवितां येत नाहीं."

## होळकर महाराज डोळे उघडा.

वामन सिताराम नांवाचा इसम तुम्हीं विनाकारण तुरुंगांत टाकला असून त्यास तेथें अपशब्दांनीं ताडन केलें जात आहे व तो मृत्युमार्गास लागला आहे. त्याची प्रकृती फारच बिघडली असून त्याचे पायांत बिडी आहे व त्यामुळें पायांच्या शिरांस रग लागून त्या फुगल्या आहेत व त्यास चालतां येत नाहीं. अशी खरी स्थिती त्याची झाली असून, त्याजपासून सकाळीं सहा वाजल्यापासून सायंकाळचे साडेसाहा वाजेपर्यंत ( मधला दीडतास वजा जाऊन ) मजुरी करवितां हें तुमच्या राजनीतिला कालिमा त्यासि नाहीं लोक राजी ॥ परी आणणारें नव्हे काय ? त्याची करिती हांजी हांजी ॥ आपुला जिवंत राहण्याची आशा थोडी जीव रक्षाया ॥ २ ॥ राजा अहे उरली आहे, करितां त्याचा न्याय अति क्रूर ॥ करीत असे सदा गुरकरून त्याची सुटका कराल तर गुर ॥ शिव्या गाळी मार फार ॥ चरें. चीफ जस्टिस धुरंधर यांजकडे अपील झालें आहे, त्या अपिलाचा निकाल केव्हां लागणार तें कळेल काय ? यासंबंधानें पुढील अंकीं विशेष लिहूं.

इशारा—सदर इसम कैदखान्यांतच मेला अगर आमच्या या लिहिण्यापासून त्यास विशेष त्रास झाला अगर महाराजांनीं त्याचा अधिक छळवाद मांडला तर त्याचे आप्त, इष्ट, मित्र, वगैरेनीं आह्मांस ती हकिकत जरूर कळवावी.

एडिटर विक्षिप्त.

( अति भयंकर, मन द्रवण्याजोगी, महाराजांचा तिटकारा येण्याजोगी आणि इंदुरांतील ताज्या जुलुमाची अशी बातमी आज आली आहे ती निरुपायास्तव पुढील अंकावर ठेवतों. )

## एका मित्राकडून.

### ओंव्या.

माळव्यांत संस्थान इंदूर ॥ जें पुणें कलकत्त्या पासोनि दूर ॥ तेथें अन्यायाचा पूर ॥ बहुतांपरि चालतो ॥ १ ॥ तेथें राजा आहे शिवाजी ॥ लोक राजी ॥ परी आणणारें नव्हे काय ? त्याची करिती हांजी हांजी ॥ आपुला जिवंत राहण्याची आशा थोडी जीव रक्षाया ॥ २ ॥ राजा अहे उरली आहे, करितां त्याचा न्याय अति क्रूर ॥ करीत असे सदा गुर- गुर ॥ शिव्या गाळी मार फार ॥

देतो सदां लोकांसी ॥ ३ ॥ लोकांसि झाल्या दुःख ॥ तेंचि तो मानि आपुलें सुख ॥ या कारणीं तयाचें मुख ॥ चालू असे अहोरात्र ॥ ४ ॥ कायदा न्याय आणि नीती ॥ ह्याचि नाहीं जया भीती ॥ जणो ज्याचि माता असे दीति ॥ हाहि तैसा भासतसे ॥ ५ ॥ लोकां दावी भयंकर मुद्रा ॥ ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शुद्रा ॥ शिव, ब्रह्मा आणि महा रुद्री ॥ दुःखी चालूं इच्छितसे ॥ ६ ॥ अर्थ दूषण ज्याचे ठाईं ॥ योग्यायोग्य कदापि न पाही ॥ याचें घेई त्यासी देई ॥ विलास त्याचा हाची असे ॥ ७ ॥ अपराधाविण शिक्षा करी ॥ राहूं नदे लोकां घरीं दारीं ॥ मारी सर्वांसी परोपरी ॥ अति अविचारें निर्दयें ॥ ८ ॥ वाक आणि दंड पारूषेय ॥ मुखीं हातीं , अमानुष्यें ॥ शंभर हीं गुरु पुण्यें ॥ येऊनि करिति काय तयां ॥ ९ ॥ मंगल शुक्र दोन्हीं वार ॥ चतुर्थ अष्टम द्वादश फार ॥ अनिष्ट चंद्र करि अपकार ॥ यास्तव असें होत म्हणे ॥ १० ॥ आपण निजेना अहो रात्र ॥ लोकांसी केलें तया पात्र ॥ चैन नसे ज्या क्षणमात्र ॥ तेंचि स्थिति लोकांची ॥ ११ ॥ अखंड ठेवि अन्याय चालू ॥ न म्हणे कोणाचेही पदरांत बालूं ॥ मौंज वाल्यासी देई शालू ॥ ऐशी रीति तयाची ॥ १२ ॥ अन्यायाचा बोभाट फार ॥ होतो जेव्हां शहरा पार ॥ तेव्हां विसांवा, महिने चार ॥ येऊनि समजावि लोकांतें ॥ १३ ॥ चार दोन सहा मास ॥ दुःख भोगिती खुलास ॥ सहज न झाली या शहरास ॥ ओलांडिती अनेक॥ १४ ॥ एक वेळीं एक मासीं ॥ अनेक येति साहेबापाशीं ॥ समजूत देवोनि राजाशीं ॥ साम करविति त्या काळीं ॥ ॥ १५ ॥ त्या उपरी चार दोन मास ॥ अर्ज न येति हें खास ॥ या योगें साहेब लोकांस ॥ भास होतो सुधारणेचा ॥ १६ ॥ परि नेणति राजाचे कौतुकि ॥ दुःख साहोनि लोक दाविती नेकी ॥ तो अवकाश सुधारणेच्या तुकी ॥ वर्णिला जातो तिकडोनी ॥ १७ ॥ आतां नाहीं बोभाट ॥ उत्तम चालला थाट ॥ ऐसें बोलोनि सुधारणेचा घाट ॥ दाऊनि स्वस्थ बैसति ॥ १८ ॥ परि ते नेणती मर्यादा ॥ दुःख साहुनी राजनिष्टेचे नादा ॥ लागले म्हणोनि विरुद्ध वादा ॥ आले नाहींत तूर्त ते ॥ १९ ॥ यास्तव दुमाही साहा माही ॥ अन्याय बंद दिसतो पाहीं ॥ परी त्यांत अर्थ कांहीं नाहीं ॥ सत्य सत्य हेंची असे ॥ २० ॥ आपुले

१ मान--हा एक विलक्षण तमाशा आहे.

अवगुण झांकाया ॥ गव्हरमेन्टासी असो. आतां आह्मीं आमच्या कर्ते होई गाया वाया ॥ ह्मणे मी गादी व्याकडे वळतों सोडितों पडतों पायां ॥ तुह्मींच व्यवस्था करावी ॥ २१ ॥ असें कळविलें अनेक वेळां ॥ कामचाले लचाड झाले गोळा ॥ माझा करिती ते सो हळा ॥ यास्तव राज्य नको तें ॥२२॥

## नंबर ६.

( विक्षिप्त अंक ४३ ता. २७ जुलई ९५ )

आजच्या अंकांत इंदुरांतील ताज्या जुलूमाच्या व अन्यायाच्या गोष्टी वाचकांपुढें मांडावयाच्या आहेत. त्या मांडण्या पूर्वी आमच्या लेखांनीं श्रीमंत महाराज शिवाजीराव होळकरांपर्यंत मजल पोंचविल्याचें दिसून आल्यावरून, एक प्रकारचा आनंद वाटतो. आह्मीं हें संस्थान प्रकर्ण हातीं धरल्या पासून प्रत्येक महाराजांकडेस पाठवित गेलों व त्यांतील मजकूर महाराजांचे कानीं गेला असावा, असा आमचा समज दरबार म्यानेजर मि. गरूड यांचें पत्र आल्यावरून झाला. त्या पत्रांत मिनिस्टरचे नांवें विक्षिप्तपत्राची एक प्रत गेल्या मे महिन्या पासूनचे सर्व अंक पाठवून पुढेंही पाठविण्याबद्दलचा मजकूर आहे. या त्यांच्या आश्रयाबद्दल आभार मानणें खरोखर रास्त आहे.

**चालू माहिन्यांतील निवडक अशा जुलूमी व अन्यायी गोष्टी.**

१ ली. सुताच्या गिरणींतील कंत्राटदार वाणी लोकांवर आग पाखडल्याची हकिगत मागें दिलीच आहे. त्यांपैकीं एक साहुकार महाराजांच्या फार दिवसांच्या वक्रदृष्टीमुळें इंदूर क्यांपमध्यें जाऊन राहिला होता. व बाकीचे सहाजण इंदूर शहरांत राहून २८ दिवस पर्यंत महाराजांकडून न्याय होऊन जसी उठेल अशी आशा व झटपट करीत होते. त्यांस ता० १२ मिनहून रोजीं कैद करण्याचा महाराजांनीं हुकूम दिला. आतां हा अघोर प्रसंग आपल्यावर येणार असें त्यांस समजतांच त्यांनीं आपल्या मुलांबाळांसह छावणीचा रस्ता धरला. सध्यां छावणींत ते वाणी रहात असून तेथील रेसिडेन्ट साहेबांकडेस व व्हाइसराय साहेबांकडेस त्यांनीं तार व अर्ज केले आहेत, त्यांच्या नकलाही आह्मांकडेस आल्या आहेत. त्या पहातां महाराजांच्या अन्याया संबंधानें कहर होऊन राहिला आहे असेंच दिसतें. या सात साहुकारांपैकीं जो प्रथम छावणींत निघून गेला ह्मणून वर सांगितलें त्याचें नांव अमोल्ि-

कचंद ह्मणून आहे. त्याचे संबंधानें गेल्या १४ तारखेस इंदूर शहरांत महाराजांनीं दंवडी पिटविली कीं, 'इंदूर शहरांत राहणाऱ्या कोणींही—मग तो नोकर असो अथवा नुस्ता रहाणार असो—अमोलिकचंदाशीं जो देवघेव करील त्यास ६ महिन्याची शिक्षा मिळेल.' किती न्यायाचा हा हुकूम आहे ! नुसत्या देवघेवी संबंधाचीच ही दंवडी पिटली ह्मणून बरें; नाहींतर 'जो कोणी अमोलिकचंदाशीं बोलेल अथवा त्यास पाहील अगर त्याची सावली घेईल त्यास देहांत शिक्षा मिळेल' असा वेळीं हुकूम झाला असता, अथवा दंवडी पिटली असती तर मोठी पंचाईत होती. या दंवडी संबंधानें आमचे मनांत एक कांक्षा उत्पन्न झाली आहे ती ही कीं, खुद्द महाराज साहेबांचा जर कांहीं न्यायानें अगर अन्यायानें त्यांच्याशीं देवघेवीचा संबंध जडला असेल अथवा पुढें जडेल तर त्या बाबतींतही, सोडल्या हुकूमाप्रमाणें महाराज शिवाजीरावांनीं सुद्धां शिक्षेस पात्र होणें रास्त आहे. व त्यांचे बरोबर जितके त्या प्रकरणाशीं संबंध ठेवतील तितक्यांनींही सहा सहा महिन्याचा काराग्रहवास भोगला पाहिजे !!

आतां आमचे वाचकांस अमोलिक चंदाची थोडी ओळख करून देतों. यांचा मुळचा व्यापार कापडाचा मोठा जबर आहे. लाख पन्नास हजारांचें कापड नेहमीं यांचे दुकानीं शिल्लक असतें. तशीच लाख पन्नास हजार लोकांकडेस यांची उधारीही आहेः याशिवाय रुई वगैरेचा यांचा व्यापार चालतो. असा हा प्रसिद्ध व हुशार व्यापारी इतर वाण्यापेक्षां चालाख, धूर्त, प्रसंगावधानी, महत्वाकांक्षी, आणि वकील बारिस्टरांप्रमाणें आपल्या ठिकाणींही शहाणपण आहे असें समजणारा असून फार वर्षांचा इंदुरांतील रहाणारा व प्रथमपासून सुताच्या गिरणीकडेस आपला व्यापार संबंध ठेवणारा, असा असल्यामुळें महाराजांनीं त्याजवर आपल्या अन्यायी, दुष्ट व क्रूरपणाच्या पराक्रमाचे हुकूम सोडले हें किती अधमपणाचें कृत्य होय ! वास्तविक पहातां अशा हुशार माणसाबद्दल महाराजांनीं अभिमान बाळगला पाहिजे होता. पण जुलूमी राजाला अशी वासना व्हावी तरी कशी ? या अमोलिकचंदशेटवर महाराजांची गदा येण्यास जें कारण झालें तें किती मूर्खपणाचें आहे तें खालील मजकुरावरून लक्षांत येईल.

सखाराम मार्तंड रेशिमवाले (ज्यांची हकिकत पुढें येणार आहे.) एक मोठे अधिकारी इंदुरांत होते. त्यांजवर महाराजांची नाराजी होऊन त्यांस इंदुरांतून निघून जाण्याचा प्रसंग आला. त्या वेळीं त्यांचे संबंधी, स्नेही, आप्त, इष्टमित्र वगैरे सर्वांवर गदा आली. त्या चक्राच्या फेऱ्यांत रेशिमवाल्यांचे स्नेही व त्यांच्याशीं व्यवहार संबंध ठेवणारे इंदुरांतील एक धनाढ्य व बडे अब्रुदार साहुकार, ज्यांचें नांव हुकूमचंद तिलोकचंद असें आहे, त्या तिलोकचंदासही इंदुरांतून निघून जा, असा महाराजांनीं हुकूम दिला. हुकूम मान्य न होईल तर पुढील सोंहाळे व्हावयाचे हें ठरलेलेंच. तेव्हां त्यांनीं शहर सोडून छावणींत जाऊन आपलें वास्तव्य केलें. या ठिकाणीं तिलोकचंदशेटचीही हकिकत लगेच सांगून पुढें जाणें प्रशस्त आहे. हे साहुकार फार मोठे, जुने आणि इंदूरचे रहिवासी असे असून, त्यांचा अफीण व हुंडीचा व्यापार २५ लाखांपेक्षां अधिक आहे. आमच्या मुंबईंतही यांचें मोठें दुकान आहे. अशा लखपतीस केवळ रेशिमवाल्यांशीं व्यवहार आहे म्हणून इंदूर सोडण्याचा प्रसंग आला. या तिलोकचंदाच्या मुलास अमोलिकचंदाची मुलगी दिलेली म्हणून त्यासही इंदुरांतून निघून जा असा हुकूम झाला. तोही छावणींत जाऊन राहिला. पुढें हे व्याहीद्वय ८।९ महिने पर्यंत छावणींत राहिले होते. हा प्रकार ९३ सालांतला आहे. त्या सालीं सध्यां प्रमाणेंच महाराजांचे नांवाचा पुकार उर्फ जुलूमी कारकिर्दीचा झेंडा फडकून राहिला होता. पण त्या वेळचे इंदूर हितैषी रेसिडेन्ट क्रास्थवेट साहेबबहादुर वगैरेनीं या उभय सावकारांची समजूत घालून व खात्रीचे लेखी परवाने देऊन त्यांस शहरांत जाण्यास सांगितलें. तेव्हां महाराजांनींही विशेष आग्रहानें त्यांस बोलाविले व त्यांच्या बोलावण्यास मान देऊन तेही निमूटपणें गेले. त्या वेळीं अमोलिकचंदास महाराजांकडून जो परवाना आला तो खालीं दिला आहे.

| शिक्का. | दि. जु. दाखला. नं. २ |
|---|---|
| दाखला. | १३०३ |

दरबार जुडीशियल डिपार्डमेन्टांतून.

अमोलिकचंद वजाज यास तुह्मांस शहरांत बोलावून घ्यावें ह्मणून हुजूर आज्ञेवरून दिवाण कचेरीकडील पत्र नं. ४३ ता. १५ जून १८९३ इसवीचें आल्यावरून तु

झांस या दाखल्याबरून कळावि-ण्यांत येतें कीं, सदरीं हुजूर हुकूम झाल्याप्रमाणें तुह्मीं शहरांत येऊन रहावें जाणिजे. ता. २० जून १८९३.

छोटी मोहो :-

तपासणी भिकाजी अनंत
रामचंद्र विठ्ठल व्यास.

बडे साहेबांच्या धमकावणी वरून या उभयतां सावकारांस इंदुरांत परत बोलावणें भाग पडलें असें महाराजांचे मनांत धुमसत होतेंच. तेव्हां पासून महाराज संधी पहात होते ह्मणण्यास काय हरकत आहे? प्रस्तुत संधी मिळतांच इतर सहा साहुकारां बरोबर अमोलिकचंदा-सही गुंडाळून त्याजवर विशेष कर-डी नजर आणि सक्तीचा हुकूम, हें कोणाचेही लक्षांत येणार आहे.

२ रीं. गवाळटोळींतल्या लो-कांस पाचारण झालें होतें, वगैरे मागें सांगितलेंच आहे. पुन्हां त्या लोकांस ता. १६ मिनहू रोजीं बोलावून प्रत्येकाची उत्तम रितीनें पूस तपास करून महाराजांनीं माहिती करून घेतली. एकंदर २०० मनुष्यें गेलीं होतीं. त्यापैकीं दोघांस कैद करून बाकीच्यांस हांकलून दिलें. या लोकांना नेतेवेळीं पोलिसानें आपली तिस्मारागिरी विशेष दाखविली ह्मणून कळतें.

३ रीं. इंदूर कॉलेजचे प्रोफेसर पाटणकर यांस महाराजांनीं समक्ष-बोलावून त्यांची पुष्कळ स्तुती क-रून त्यांना राजीनामा देण्यांस सांगितल्याचें कळतें. कारण बाहेर आलें नाहीं. परंतु अजमास असा होतो कीं, प्रोफेसर साहेब पुण्या-कडील रहाणारें असल्यामुळें महा-राजांचे अन्यायांचा सध्यां जो बोभाटा पसरला आहे तो यांनींच केला असावा अशी नुस्ती शंका महाराजांचे मनांत आल्यावरून त्यांनीं ही युक्ती लढविली असावी. पण ही शंका निराधार आहे असेंच ठरतें.

४ थीं. सिकदारसिंग जमी-दार नांवाचे गृहस्थ मोठे अब्रुदार व प्रसिद्ध असून १९ हजारांची जाहागीर यांना इंदुरांतून व ग्वाल्हेर संस्थानांतून आहे. यांचा लवाजमा श्रीमंती थाटाचा आहे. यांचे घरीं घोडेस्वार, शिपाई, हत्ती वगैरेचें ऐश्वर्य आहे. सुमार १९ दिवस झाले, त्यांच्या स्थावर जंगम इस्टे-टीची महाराजांचे हुकूमावरून जप्ती झाली आहे. त्यांच्याकडेस जी इनामी जमीन आहे, तींत कांहीं वाढली असल्याची सबब काढून त्यांजवर १९००० रुपये घेणें

काढलें आहे. वस्तुतः त्यांनीं देणें कांहीं नमून उलट त्यांची कांहीं जमीन विनाकारण जप्त आहे व त्याबद्दलही आपलें घेणें ते होळकर सरकाराकडेस काढीत आहेत. परंतु इन्साफ करतो कोण ? कारभारी साहेबांकडेस त्यांनीं अर्ज केला, त्यावरून त्यांना ता. १६ मिनहूचा दाखला मिळाला आहे कीं, 'महाराजांच्या हुकूमावरून ही जप्ती झाली आहे, करितां आम्हीं कांहीं करूं शकत नाहीं.' कारभारी साहेबांचा असा जबाब मिळाल्यावर मग काय राहिलें ! तिकडची निराशा झाली तेव्हां त्यांनीं रेसिडेन्ट साहेबांस भेटून सर्व मजकूर कळविला आहे व त्यांनीं त्यांस कांहीं अश्वासनही दिलें आहे म्हणून समजतें.

५ वी. खासगीकडील दिवाण **नागो भिकाजी दामले** हे वयोवृद्ध सद्गृहस्थ असून फार निस्पृही, स्पष्ट वक्ते, सत्यप्रिय आणि अनुभवी असे आहेत. यांचें वय सुमारें ६९ वर्षांचें आहे. हे गेल्या तीन चार वर्षांपासून दुसऱ्यानदां इंदूर संस्थानांत नोकर झाले. त्यांजवर महाराजांची चालू महिन्यांतच नाराजी झाली. नाराजी होण्याचें कारण पुढील मजकुरावरून दिसून येईल. सुताच्या गिरणी संबंधानें ज्या साहुकारांच्या जप्त्या वगैरे केल्या त्या बाबतींत दामले साहेबांनीं चौकशी वगैरे करून सरकारी घेणें काय निघतें तें काढून, आपल्या अभिप्रायाचा रिपोर्ट करावा असा त्यांस महाराजांचा हुकूम झाला. हुकूमाप्रमाणें अंमल बजावणी करून जो खराप्रकार त्यांस वाटला तो त्यांनीं भीड मुर्वत न धरतां स्पष्टपणें लिहून कळविला. **'साहुकार लोकांकडेस कांहीं घेणें निघत नाहीं व त्यांच्या जप्त्या विनाकारण झाल्या आहेत'** असा त्यांचा लेखी अभिप्राय आलेला पाहून महाराजांचे आंगाची लाही झाली, व एकदम कोपाग्नी भडकून गेला. तेव्हां नागोजीरावांस आपल्या समक्ष बोलावून तोंड्या रागानें **'तुम्हीं पूर्वीपासून या कामांत लक्ष कां दिलें नाहीं ? खासगीचे ताब्यांतील हें काम आहे'** वगैरे बोलण्याची महाराजांनीं भरारी मारली. त्याचें उत्तरही नागोजीरावांनीं खरें व सणसणीत असें दिलें. ते म्हणाले 'या कामांत मीं कांहीं पाहूंनये, सर्व अधिकार गिरणीवरील सु. इझिकियल साहेब यांस दिला गेला असून त्याजवर देखरेख दरबारची राहील अशा

अर्थाचा लेखी हुकूम आहे.' हा जबाब ऐकून महाराजांनीं तिसरेंच बोलणें काढून 'तुम्हीं असा अभिप्राय उर्फ रिपोर्ट कसा केला' वगैरे बोलले. नागोजीराव हे खुशामती गृहस्थांपैकीं नसल्यामुळें त्यांनीं स्पष्टपणें 'मला योग्य वाटला तसा अभिप्राय दिला' म्हणून सांगितलें. या ठिकाणीं या वयोवृद्ध गृहस्थांच्या निस्पृहीपणाबद्दल कोणासही तारीफ केल्यावांचून रहावणार नाहीं. असलेच निस्पृही कामदार असतील तर खरा न्याय मिळण्याची आशा तरी उत्पन्न होणार आहे. दामले साहेबांच्या शेवटच्या जबाबानें महाराजांचा राग किती अंशांवर चढला असेल याची कल्पना वाचकांनींच करावी. त्या रागाचे आवेशांत महाराजांनीं स्वभावास अनुसरून ह्या जुन्या, वयोवृद्ध कामदारांची वाक्पारुष्य आणि दंडपारुष्य या दोहोंनीं यथास्थित पूजा केली. कैदखान्याची भरती केली नाहीं हा उपकारच समजावयाचा ! यांच्या प्रमाणेंच **नायब कारभारी** राय **नानकचंद** यांचीही दशा केली. पुढें उभयतांनीं राजिनामे दिले. दामले साहेब आपल्या घरीं आल्यावर त्यांस त्यांच्या वृद्धापकाळचा समय पाहून फार दुःख झालें असेल, पश्चात्ताप झाला असेल यांत कांहीं संशय नाहीं. परंतु बाणेदार गृहस्थ पडल्यामुळें त्यांनीं लगेच बडोद्यास जाण्याची तयारी केली असेंही कळतें.

नागोजीरावांचा मागील वृत्तांत थोडासा कळवून पुढें जाऊं. हे गृहस्थ सर टी. माधवरावांचे वेळेस इंदूर संस्थानांत सुभे होते. नंतर कांहीं दिवस जज्ज होते. पुढें सर-टी. माधवराव बडोद्याच्या दिवाणगिरीवर गेले तेव्हां त्यांनीं इंदुरांतून जे कांहीं निवडक लोक तिकडे नेले, त्यांत हे दामलेही नेले. त्यांच्याकडेस बडोदे संस्थानांत नायब सुभ्याचें काम होतें. हल्लीं तिकडचें पेन्शन यांना मिळत आहे. अशा सुस्थितींत या गृहस्थांनीं आपले राहिलेले थोडे दिवस ईश चरणीं घालविण्याचें सोडून द्रव्याशेस्तव अविचारी महाराजांची नोकरी पत्करून राहिले. या ठिकाणीं महाराजांनीं बोलावल्यावरून हे इंदुरास गेले असें सांगणें गैर होणार नाहीं. यांची वृद्धावस्था अतिशय झाली असून आंगावर सुरकुत्याही पडल्या आहेत म्हणण्यास हरकत नाहीं. यांची प्रकृती चांगली रहात नाहीं तरी बेतावातानें, अन्यायाची आग लागून राहिलेल्या जुलुमी राजा जवळ आपल्या निस्पृही बाण्यानें व सत्यतेनें

जीजी न करतां इमानें इतबारें झाली तशी तीन चार वर्षें नोकरी करून अखेर स्वतःवर हा प्रसंग आणून घेतला. यास प्रारब्धयोग झणण्या खेरिज दुसरी उपमा नाहीं. बाकी एवढें खरें कीं, कितीही न्यायानें वागणारा कोणीही असला तरी सर्वच कामें त्याच्या हातून शिवाजीराव महाराजां सारख्या अन्यायी यजमानाजवळ राहून त्यांच्या मर्जी विरुद्ध तो करूं शकेलसें खात्रीनें झणतां येणार नाहीं. सरासरी प्रमाण काढून पाहिलें तर शेंकडा दहा कामें तरी यजमानाच्या मनाप्रमाणें अन्यायाचीं त्यास करावीं लागतील. असो. नागोपंतांनीं संतापानें एकदम इंदुरास शेवटचा रामराम ठोकण्याचा विचार करून सामान सुमानाची बांधाबांध वगैरे चालविल्याची हकिकत महाराजांस कळतांच, न जाण्याविषयींचा महाराजांनीं निरोप पाठविला. परंतु त्या निरोपास न जुमानतां नागोपंताची तयारी झाली समजून बळवंतराव गोरे नांवाचे एक बडे कामगार, जे नागोपंतांचे आप्त आहेत त्यांस व त्यांची समजूत करण्यास महाराजांनीं तिकडे पाठविलें. शिवाय गोऱ्यांस अशी ताकिद दिली कीं, जर नागोपंत गेले तर तीच स्थिती तुमची होईल. जबरदस्तापुढें इलाज नाहीं हें मनांत आणून बळवंतराव गोरे नागोपंतांकडे जाऊन, त्यांच्या पायां पडले वगैरे वेळेस अनुसरून ज्या गोष्टी कराव्या लागल्या त्या सर्व करून, त्यांचें जाणें त्या दिवशींचें त्यांनीं तहकूब केलें, हा सर्वप्रकार ता० १६ मिनहूचा आहे. एवढ्या भुलवणीस झातारा ऐकेलसें वाटत नाहीं. नच त्यानें ऐकलें तर महाराज त्यांस समक्ष बोलावून किंवा आपण त्यांच्या घरीं जाऊन, तुम्हीं जुने, आमचे हितेच्छु, वडिलां सारखे आम्हीं तुमच्या पोरा सारखे वगैरे वगैरे गोड गोड बोलून कांहीं इनाम वगैरे ते घेतील तर देऊन त्यांना तूर्त राहून घेण्याचा प्रयत्न करतील असेंही कित्येक झणतात. जुन्यापैकीं एवढाच कायतो झातारा आहे व तो न जावा अशा बद्दल महाराजांचीही खटपट आहे. आतां यांत परिक्षा पाहण्याचीच वेळ आहे. नागोपंतांनीं आपलें सर्व खटलें तर रवाना केल्याचें ताज्या वातमी वरून कळतें. एकदां विनाकारण विटंबना जेथें झाली तेथें रहाणेंही धूर्त व शहाण्या मुत्सद्यास लाजिरवाणें आहे. ज्याची दगडाची छाती असेल व ज्यास द्रव्य हेंच प्राधान्य वाटेल तोच इंदूर सारख्या जुलूमी राज्यांत

सुख मानून राहील, हें निर्विवाद ठरतें.

६ वी. गणपतराव सिताराम नांवाचे गृहस्थ पूर्वी इंदूरांत नोकर होते व सर टी. माधवरावांचे बोलण्यावरून बडोद्यास गेले व त्या संस्थानांत सुभायर्तीचे कामावर होते, त्यांचे चिरंजीव **नानासाहेब** हे इंदुरांत नोकर असून त्यांचें घरदार, सर्व इस्टेट, जमीन, इंदुरांतच आहे. त्यांस ता. १६ मिनहू रोजीं **हिंगळाजगड** येथें जाऊन रहाण्यास महाराजांचा हुकूम झाला आहे. या गृहस्थांजवळ दोन पैसे चांगले आहेत. त्यांस नोकरीची पर्वाही नाहीं, तथापि ते करीत आहेत. शिवाजीरावांसारख्या सुशील महाराजांची मर्जी राखण्याकरितां त्यांनीं जाण्याचेंही कबूल केलें आहे म्हणून समजतें. होळकरशाहींत अति वाईट हवेचें जें स्थान आहे व जेथें कैदी ठेवण्याची जागा आहे तो **हिंगळाजगड** होय. खुद्द महाराजांना तेथें जाऊन वास्तव्य करण्याचा प्रसंग येईल तर इंदुरांतील प्रजेस विशेष आनंदाचा दिवस उगवला असें वाटल्यास गैर होईल काय ?

७ वी. **बापु गोरे** नांवाचे इसम इंदूर कोर्टांत वकिली करीत होते. त्यांची वकिलीची सनद रद्द करून त्यांना ३ दिवसांत इंदुरांतून निघून जाण्याचा हुकूम महाराजांनीं दिला. असा हुकूम होण्याचें कारण, नागो भिकाजीच्या मुलास गोविंदराव गोऱ्यांची मुलगी दिली आहे. व त्या गोविंदराव गोऱ्यांच्या भाऊबंदांपैकीं रामभाऊ गोरे यांचा मुलगा बापु गोऱ्या म्हणजे नागोजीच्या व्याह्यांचे भाऊबंद हा संबंध जोडून त्यांजवर महाराजांनीं ही गदा आणली. असल्या इन्साफी राजास कोणती उपमा द्यावी तें सुद्धां सुचत नाहीं. याच महाराजांनीं अशाच अन्यायी वर्तनानें रामभाऊरावजी गोऱ्यांचे बंधुज्यांची हकिकत पुढें येणार आहे, त्यांची हवेली जुलूमानें घेऊन जांवयास दिली व त्यांना इंदुरांतून काढून दिलें. ही हकिकत मागची आहे.

८ वी. **सेवाराम** नांवाचा एक वाणी वकिलीची परिक्षा देऊन सनद मिळविलेला, कित्येक वर्षांपासून इंदुरांत वकिली करीत होता. व सरकारी दुकानच्या फिर्यादीचें कामही तोच करीत असे. त्याबद्दल त्यास वेगळा पगारही मिळत होता. परंतु सध्यां वाणी लोकांवर महाराजांची खपा मरजी झाल्यामुळें जे सात साहुकार छावणींत जाऊन राहिले व महाराजांच्या जुलूमी कृत्यांचें प्रदर्शन रेसिडेन्ट व व्हाइसराय साहेबांकडेस अर्ज व तार मार्फत मांडीत

आहेत, त्या कारणांवरून वाणी ज्ञातीवर वक्रदृष्टी होऊन पुढें पडणाऱ्या बळींपैकीं हा एक वकील प्रथम सांपडला तो दुर्दैवाच्या फेऱ्यांत गोंवून सोडला. ह्मणजे त्यास मिळत असलेला पगार बंद केला व त्याची वकिलीही बंद केली.

९ वी. इंदुरांतील एक श्रीमान गृहस्थ **गोविंदराव बाबासाहेब बुळे** यांनीं ता. १६ मिनहू रोजीं रात्रीं आपले वाड्यांत नाटक करविलें. त्यांचा वाडा सरकारी वाड्याच्या अगदीं जवळ आहे. त्या नाटकामुळें महाराजांस रात्रीं झोंप आली नाहीं ह्मणून दुसरे दिवशीं प्रातःकाळीं बुळ्यांकडील नवे जुने ह्मणजे जे नोकरी सोडून घरीं बसले आहेत ते व त्यांचे कडील पेन्शनर असे एकंदर १००।१५० लोक महाराजांनीं समक्ष बोलावून '**तुह्मीं नाटक केल्यामुळें आह्मांस झोंप आली नाहीं**' असा त्यांजवर आरोप लादून कोणास मार, कोणास शिव्या, कोणास उठाबशा वगैरे परिपाठांतल्या शिक्षा देऊन हांकलून दिलें. या गेलेल्या मंडळींत नाटकांत असणारे व हल्लीं बुळ्यांकडेस नोकर असलेल्या लोकांपैकीं १०।१२ च इसम कदाचित् असतील, बाकी सर्व बुळ्यांच्या संबंधानें दूषित झालेले असेच होते. आह्मीं नाटकांत नव्हतों, आह्मांस कांहीं माहित नाहीं वगैरे पुष्कळ लोकांनीं सांगितलें पण ऐकतो कोण? **हंम करेसो कायदा और इन्साफ**, एवढें या होळकर महाराजांजवळ पूर्ण वास्तव्य करितें.

१० वी. **विनायकराव** लोंढे नांवाचे गृहस्थ पूर्वी बुळ्यांकडेस दिवाण होते व हल्लीं त्यांना रेसिडेन्सी मार्फत ७५ रुपये पेन्शन बुळ्यांचे उत्पन्नांतून मिळतें व जे एक वर्षापूर्वीं होळकर इलाख्यांत ७५ रुपये महेवारीवर अमीन होते व त्या हुद्यावरून विनाकारण बडतर्फ होऊन घरीं बसले होते, त्यांनाही वर सांगितलेल्या नाटक संबंधानें महाराजां समोर जाणें भाग पडलें होतें. त्यांस पहातांच महाराजांनीं शिव्यांची वृष्टी केली, दम ह्मणता तितका ताशेरा झाडला. शिवाय त्यांचे तोंडांत थापटा मारून त्यांजकडून उठाबशा काढविल्या व स्वकीर्तिस शोभतील अशा जुन्या नव्या शिव्याही दिल्या. त्यांचेवर इतका प्रयोग करण्याचें मुख्य कारण, हा जुना व अब्रुदार आणि नागोभिकाजीच्या जातीचा कोंकणस्थ; इतकेंच नव्हे तर नागोभिकाजीच्या शेजारीं रहातो हा मोठा अपराध. शिवाय नागोपंताची पूजा होऊन ते

घरीं गेले त्यावेळीं प्रथम या लोंढ्यां तीन दिवस पूर्वी रावबहादुर वेदरकर कडेस गेले होते, असें एका हुजऱ्यानें कारभारी साहेब यांनीं महाराजांस जाऊन सांगितलें होतें. वड्याचें तेल वांग्ग्यावर काढायचें अशी जेथें नीति, तेथें अपराध पहाण्याची जरूरच नाहीं. येणें प्रमाणें लोंढ्यांची पूजा आर्ती महाराजांनीं केल्यामुळें ते इंदूर छावणींत जाऊन राहिले आहेत. त्यांचीं घरकुटुंबांतील माणसें अद्याप इंदूर शहरांतच असल्याचें समजतें. त्यांच्याकडे महाराजांची विषारी नजर फिरते कीं काय पहावें?

११ वी. अब्दुल्ला नांवाचा एक चाबुकस्वार सखाराम मार्तंड रेशिमवाले यांच्याकडे नोकर होता. गेल्या ता. १८ मिनहू रोजीं महाराजांची स्वारी कांहीं काम नसतां सखाराम मार्तंडचे घरीं गेली व त्यांच्याकडेस कोण कोण नोकर आहेत? काढून दिल्या पैकीं किंवा वजा केल्या पैकीं कोणी आहेत काय? वगैरे पूस तपास करितां कोणीं तसा नसल्याचें दिसून आलें, परंतु मन तृप्त होईना तेव्हां तेथें असलेल्या चाबुक स्वारास जवळ बोलावून शिव्या व मार पीट देऊन शहरांतून निघून जा, असा त्यास हुकूम दिला. तो सध्यां छावणींत जाऊन राहिला आहे.

१२ वी. ता. १६ मिनहूचे दोन चिठी पाठवून एक तासाची फुरसद असल्यास राजकीय कामाकरितां आपल्याशीं बोलावयाचें आहे म्हणून कळविलें. त्याप्रमाणें महाराजांनीं त्यांस बोलाविल्यावरून ते मराठी वर्तमानपत्रें बरोबर घेऊन गेले. व तीं महाराजांस हुकूम झाल्यावरून वाचून दाखविलीं. त्यांतील मजकूर ऐकून घेऊन महाराजांचे तोंडांतून बोल निघाले ते हे कीं, 'हें सर्व तुमच्या ब्राह्मणाचें कृत्य आहे. मीं सारें समजतों. जें काय होईल तें होवो, मीं या श्रावण महिन्यांत ब्राह्मणाची पुरी खोड मोडल्यावांचून रहाणार नाहीं,' वगैरे पुष्कळ बडबडले. राजाचे तोंडून असे बोल निघाल्याबद्दल खेद मानण्यापेक्षां त्यांनीं आपली योग्यता, आपली अक्कल व्यक्त करून दाखविली असें म्हणण्याखेरीज गत्यंतर नाहीं. शिवाजीरावांनीं काढलेले उद्गार खोटे होणार नाहींत हें त्यांच्या दुष्ट कृत्यांवरून कोणींही म्हणूं शकेल. ब्राह्मणावर तूर्त साडेसाती आली एवढें खरें. नित्य दहा ब्राह्मणास जोडे मारण्याचा महाराजांचा निश्चय झाला असल्याचें समजतें. व त्याप्रमाणें पोशाखवाल्यांनीं

व शागिर्दपेशांतील कारकून लोकां- तींत मोठमोठ्या लोखंडी गजाच्या वर प्रथम प्रयोग झाल्याची वार्ताही पिंजऱ्यांत त्यास दोन महिन्या पेक्षां कानीं आली आहे.

वामन सितारामची सांप्र हकिकत आजचे अंकीं देऊं म्हणून गतांकीं कळविलें होतें परंतु ती बरीच लांबलचक असल्यामुळें पुढील अंकावर ठेवणें भाग पडलें. तो खटला मुळारंभापासून जेव्हां वाचकांपुढें मांडला जाईल तेव्हां कशा प्रकारचा अन्याय त्याजवर झाला आहे हें सर्वांस समजून येईल. यांच्याच प्रमाणें इंजीनियरिंगकडील दोन कारकून जे कैद भोगीत आहेत त्यांचीही हकिकत फार मजेदार आहे. पुढील अंकीं हे दोन्हीं खटले प्रथम वाचकांपुढें मांडले जातील.

गेल्या १७ तारखेस १९ इसमांस कारागृहांतून मोकळे केल्याची वदंता आहे. या एकोणिसांत दोन ब्राह्मण व बाकीचे इतर ज्ञातवाले आहेत. त्यांत ८०।८९ वर्षांचा मिसर इसमही सुटला म्हणून कळतें. या म्हाताऱ्यास सोडला नसता तर तो लौकरच मरण पावला असता. त्याजवर कांहींएक अपराध नसतां त्यास कैदेंत घातला होता वगैरे हकिकत पूर्वी कळविलीच आहे. त्याला डोळ्यांनीं मुळीं दिसत नाहीं, भगंदर झालें आहे, अशा दुर्धर व्य अधिक दिवस पर्यंत अडकवून ठेवला होता. बिचाऱ्यानें अहोरात्र बसून राहून ढेंकूण, पिसा, उंदीर वगैरेचा त्रास सोसून दिवस काढले. विनाकारण अशांची विटंबना केल्यापासून सौख्य प्राप्ती कधींही व्हावयाची नाहीं. महाराज शिवाजीराव यांनीं जीं कृत्यें चालविलीं आहेत तीं इहलोकीं तर त्यांस घातक आहेतच पण परलोकींही घातक आहेत यांत कांहीं संदेह नाहीं. ज्या या १९ इसमांस कैदेंतून मोकळे केले त्यांना पुन्हां परत तेथें जाण्याचा प्रसंग येणार नाहीं अशीही शाश्वती नाहीं. तूर्त त्यांचें दैव उदेलें एवढें खरें. मग वर्तमानपत्रांनीं महाराजांचे मनांत ही प्रेरणा केली म्हणा किंवा बँडे साहेबांकडून चाबूक मिळाला म्हणा; कोणत्याही कारणांनीं कां होईना पण बिचारे निरपराधी लोक बंदमुक्त झाले, याज बद्दल समाधान वाटतें.

साहुकार लोकांच्यासंबंधानें बडे साहेबांनीं महाराजांस बराच बोध केला असून कांहीं धमकावलेंही आहे म्हणून कळतें. त्यावरून त्या लोकांस 'इंदूर शहरांत पाठवून द्या, शिरस्त्याप्रमाणें चौकशी करून निकाल करूं' असेंही महिनग्यानें

महाराजांनीं बडेसाहेबांस कळविलें असल्याचें कळतें. व साहेबबहादुरांनीं अविश्वासी महाराजांचे विनंतीवर विश्वास ठेवून त्या साहूकारांस शहरांत जाण्याचा हुकूमही दिला आहे. परंतु त्या लोकांस शिवाजीरावांची लहर, तेथिल न्यायाची स्थिती वगैरे प्रकार माहित असल्यामुळें त्यांणीं जाण्याचें नाकबूल केलें. त्यावरून साहेब बहादुरांची त्यांजवर थोडी खपामर्जी झाली म्हणतात. तथापि ते त्यांचे पूर्ण हितैषी असल्यामूळें त्यांच्या कल्याणाकडेसच साहेब बहादुरांची नजर, म्हणून त्यांनीं त्यांस जें काय म्हणणें असेल तें लेखी कळवा वगैरे सांगितलें. त्याप्रमाणें साहुकार लोकांनीं इंदुरांतील भयग्रद स्थितीचें चित्र त्यांपुढें मांडून हुकूमाप्रमाणें जाण्याचें कबूलही केलें आहे म्हणून समजतें. तसेंच महाराजांनीं आपलें वर्तन सुधरण्याचेंही बडे साहेबांजवळ कबूल केलें आहे, परंतु केव्हां सुधरेल हें कळत नाहीं. वेळीं सुधारण्याऐवजीं अधिक जुलूम करण्याचें मात्र सुरू होईल असेंही त्यांच्या नेहमींच्या वर्तन क्रमावरून म्हणण्यास जागा होते.

### अगदीं ताजी बातमी.

आमच्या इंदूरच्या विश्वसनीय मित्राकडून आलेली ताजी बातमी वाचून शिवाजीराव महाराजांस चरोखरीच

खूळ लागलें,

म्हणण्यास आमचे वाचक मागें पुढें पहाणार नाहींत असें वाटतें. जी बातमी आली ती अशी:—"अलिकडे आमचे शिवाजीराव महाराज दिवसारात्रीं भलत्याच वेळेस सर्व शहरांत अगर गल्लीकुचींतूनही तीन तीन चार चार फेरे घालीत असून, त्याप्रमाणें छावणींतही फेऱ्या घालण्याचा क्रम चालू आहे. आठ दहा दिवसां मागें एक दिवस गार्डींत बसून जात असतां, छावणीचे बाजारांत ज्या चेष्टा केल्या त्या फार नाजुक आहेत. छावणींतल्या सडकेवर श्रीनिवास आणि कंपनी या नांवाचें एक दुकान आहे. त्या दुकानची वहिवाट करणारे गृहस्थ बाळकृष्णपंत नांवाचे एक आहेत. त्यांची व महाराजांची चांगली ओळख आहे. त्या ओळखीचा इतिहास बराच लांबलचक आहे तो मागाहून कळविला जाईल. ह्या बाळकृष्णपंतास महाराजांचे विशेष ओळखीमुळें नोकरींतून व शहरांतून दूर व्हावें लागलें. पुढें त्यांनीं छावणींत जाऊन एक लहानसें सर्व प्रकारच्या मालाचें दुकान घातलें

आहे. तें दुकान सडकेवर आहे ह्मणून वर सांगितलेंच. त्या सडकेवरून नेहमीं जाण्याचा महाराजांचा रस्ता आहे. त्यामुळें महाराजांस नित्य बाळकृष्णपंताची भेट व त्यांचा रामराम घेण्याचा प्रसंग येतो. 'आपण काढून दिलेला व आपल्या नाराजिंतला मनुष्य छावणींत तरी दुकान लावून बसतो आणि आपल्यास नित्य रामराम करतो हें बरें नाहीं. याच्या रामरामीचें फळ याला दिलें पाहिजे,' असा विचार मनांत आणून कांहीं दिवस पर्यंत जातां येतां त्यांच्याकडेस पाहून डोळे वटारावे, नाक मुर्डावें, कपाळास आठ्या चढवाव्या असा बालिश प्रकार चालला होता. नित्य असा प्रकार होई जरी, तरी बाळकृष्णपंतांनीं राम राम करण्याचा क्रम सोडला नाहीं. कारण, महाराज साहेब ह्मणजे आपले राजे, आपले संस्थानिक, खुळे वेडे चाळे करणारे आणि दुष्ट–क्रूर, जुलूमी जरी असले तरी ते आपलेच व कांहीं दिवस पर्यंत तरी आपण त्यांचें अन्न खाल्लेलें असें समजून, ते आपल्या राम रामी क्रमास अद्यापी सोडीत नाहींत. तो त्यांचा क्रम चालूच आहे. तेव्हां परवां एक दिवस महाराजांची स्वारी गाडींतून त्या दुकानावरून जात असतां बाळकृष्णपंतांचा रामराम होतांच गाडीच्या बाहेर तोंड काढून जीभ पुढें करून, वेडेंवांकडें तोंड हालवून माकडासारख्या वेंचकुल्या महाराजांनीं करून दाखविल्या. अहाहा ! त्या वेळचा देखावा फोटो काढून घेण्यासारखाच होता. महाराजांचे मतानें तो प्रकार बाळकृष्णपंतास चिडविण्यासारखा असावा असें वाटतें. परंतु श्रीमंत, संस्थानिक, महाराज नामाभिधान पावलेले, अशा थोर मूर्तींकडून माकडचेष्टा होणें किती लांच्छनास्पद आहे, याचा विचार आपणच करावा. त्यांच्या त्या टिवल्याबावल्या आडोसी पडोसी लोकांनीं व त्या वेळीं दुकानावर जीं गिऱ्हाइकें होतीं त्यांनीं पाहून चमत्कार मानला. हा प्रकार होऊन गेल्यावर दोन दिवसांनीं एजिस्ट्रेटास एक चिठी पाठवून कळविलें कीं, **'बाळकृष्णपंताशीं शहरांतील व या इलाख्यांतील लोकांनीं व्यापार अथवा देवघेव करूं नये अशी शहरांत दंवडी पिटवावी.'** हुकूमाप्रमाणें दंवडी अद्याप पिटली गेली नाहीं परंतु ज्या अर्थी हुकूम झाला आहे त्या अर्थी पिटली जाईलच.

काल पुन्हां ( ता. २२ मिनहू ) सायंकाळीं हे वेडेराव, छे चुकलों,

खुळे महाराज—छावणींतून जात असतां बाळकृष्णपंतास हुकूम देतात कीं, 'उद्यां अनंदराव गरूड यांज बरोबर वाड्यांत ये; न आलास तर वारंट काढून पकडून नेऊं' हा महाराजांचा हुकूम ऐकून बिचारा बाळकृष्णपंत घाबरला आहे. वारंट काढण्याजोगा काय (?) पण कोणत्याही प्रकारचा यत्किंचित देखील अपराध बाळकृष्णपंताचे हातून घडलेला नाहीं. रामराम कर तो हाच जर महत् अपराध हे मूर्ख शिरोमणी समजत असतील तर तो त्यांच्या वेड्या चाळ्यांस आणि जुलूमी राजसत्तेस शोभण्याजोगा आहे. असल्या छळवादू राजाची सावली सुद्धां न घेणारे, दयाळू बादशाहिणीच्या अंमलांतील लोक खरोखरीच सुखी असतील यांत कांहीं संशय नाहीं. या दुष्ट राजाच्या नोकरीपासून दूर झाला, त्याचें शहर सोडलें, इंग्रजी हद्दींत जाऊन राहिला तरी तेथें यांची नाराजगी आहेच कायम. तेव्हां या जुलूमास काय म्हणावें? मृच्छकटिक नाटकांतील **शकार** आणि आमचे **शिवाजीराव** महाराज यांची जोडी समान शोभण्याजोगी आहे. एकदां नाराजगी झाली म्हणजे त्या मनुष्यानें नोकरी कुठे करूं नये, व्यापार धंदा करूं नये, भीकही मागूं नंये, उपाशीं देखील मरूं नये इतकेंच नव्हे, पण इंदूरच्या हद्दींत अगर इंग्रजी हद्दींत राहून महाराजांचे दृष्टीसही पडूं नये, हा केवढा जुलूम आहे बरें? अशा नाराजगींतल्या मनुष्यानें करावें तरी काय, हें महाराजांकडून जर प्रसिद्ध होईल तर बरें होईल. आतां बाळकृष्णपंतावर कोणती घोरपड येणार तें पहाण्या करतां टपून आहोंत.

**दुसरी गोष्ट.** कालरात्रीं (ता. २२ मिनहू) ११ वाजतां हे वेडेराव गाडींत बसून छावणींत गेले. तिकडेस गल्लोगल्ली फिरले. एवढ्या रात्रींस वेताळा सारखी महाराजांची स्वारी गल्लोगल्ली फिरूं लागल्याचें पाहून लोकांस आश्चर्य वाटलें. कित्येक तर यांच्या जिवाची काळजी घेण्या करितां उघड रितीनें पुढें न येतां मागून पाळथीवर होते. महाराजांची स्वारी जिकडे तिकडे फिरून अखेर मुरई मोहल्ल्यांत गेली. बाजारचे पाठीमागें एक गल्ली आहे, त्या गल्लींतून भंग्याचे गाडी शिवाय दुसरी गाडी कधींच जात नाहीं. त्या गल्लींत सरकार महाराज शिवाजीराव होळकर तेवढ्या रात्रीं शिरले. पायांनीं नव्हे पण वाहनांतून. नंतर एका मोडक्या तुटक्या घरा जवळ स्वारी उभी राहिली. त्या गल्लींतील

अडोसी पडोसी लोक हा तमाशा पहातच होते. पुढें स्वारी उभी राहिली त्या जवळच्या घरांतील दुर्गा नांवाच्या एका मराठ्णीस महाराजांनीं बाहेर बोलवून 'येथें यादवराव भैयाची सासू आली आहे काय?' म्हणून विचारलें. ती सासूबाई तेथें होतीच, तेव्हां तिला समक्ष बोलावून 'तुम्हीं यादवराव भैयाच्या सासूबाई आहांत काय? म्हणून विचारलें.' तिनें होय म्हटल्या नंतर त्या घरांतील बाईशीं १०।१२ मिनिटें कांहीं बोलणें करून, आपल्या गाडींत त्या सासूबाई व त्यांच्या बरोबरचा एक मुलगा होता त्यास घेऊन, स्वारी परत फिरली. पुढें वाड्यांत आल्यावर काय प्रकार झाला तो समजला नाहीं. ह्या सासूबाई छावणींत पारशी मोहल्ल्यांत रहात असून मुरई मोहोल्ल्यांत दुर्गाबाईच्चे घरीं त्यांचें कांहीं नातें असल्यामुळें गेल्या होत्या म्हणतात. ती बातमी महाराजांस लागून तेथें जाऊन त्यांचा शोध करून अपरात्रीं त्यांस घेऊन आले. छावणीसारख्या परस्थलीं जाऊन असें करणें राजास कसें शोभतें तें लोकांनींच पहावें व त्यांचे अकलेची पारख करावी.

आतां यादवराव भैया कोण? हेंही आपल्यास कळणें जरूर आहे. ज्यांच्या लग्नार्थ जोडे वगैरे अमंगल जिनसांचा अहेर उर्फ ताटें महाराजसाहेबांनीं आपल्या मातोश्रीकडेस पाठविलीं ते हे यादवराव भैया होत. याहून अधिक ओळखीची जरूर दिसत नाहीं.

आमचे वेडे झालेले महाराज, रात्रींदेरात्रीं छावणींत जाऊन गल्ली कुचींतून फिरतात व पाहिजे ती माहिती करून घेतात, यावरून त्यांच्या नाराजगींतले जे लोक छावणींत जाऊन राहिले आहेत, त्यांच्यावर श्रीमंतांच्या विपार दृष्टीचा कांहीं प्रयोग होणार कीं काय। तें कळत नाहीं. शेंकडों लोक अवकृपेंतले छावणींत रहात आहेत, त्या लोकांस भीति पडली, असेल हें निःसंशय आहे. महाराजांची दुष्ट लहर त्या लोकांवर केव्हां काय प्रसंग आणील यांचें अनुमानही होऊं शकत नाहीं. समजा कीं, एखाद्या यमदूतास एखादी मोहोर दिली आणि सांगितलें कीं अमक्या अमक्याला अमुक अमुक कर. तर सहजीं तो द्रव्य लोभास्तव तसें करण्यास प्रवृत्त होण्याचा संभव आहे. करितां ईश्वर आमच्या महाराजांस दयाळू करो आणि त्यांची विपारी दृष्टी नष्ट करो अगें खऱ्या अंतःक-

रणापासून आम्हीं इच्छितों. आजपर्यंत आमच्या महाराजांनीं कैकांस इनाम बक्षिसें देऊन अनेकांचे सूड उगविले, अनेकांस त्राहि त्राहि करून सोडलें, हजारोंचे श्राप मुद्दाम घेतले आणि जेवढे म्हणून जुलूम, अन्याय, करावेसे वाटले तेवढे केले. परंतु आतां त्यांच्या हुकूमाची तामील करणारे मुद्दां त्रासले आणि नको या क्रूर राजाची नोकरी, असेंही म्हणूं लागले व त्यांच्या अन्यायी हुकूमासही झुगारून देऊं घातल्याचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. हे सर्व प्रकार खुद्द महाराज समजत नाहींत असें नाहीं. ते समजून उमजून कित्येक कामें स्वतः करूं लागले आहेत, हेंही एक यांच्या भावी परिणामास घातक होत आहे, इतकें सांगून आजची २३ तारीख पुरी करतों.

## महाराजांचें दुर्दैव.

—:*×*:—

"वर्तमानपत्रें आपल्या विरुद्ध लिहितात तसतसे अधिक जुलूम करण्याचा आपण क्रम ठेवणार व त्यांचे खातमीदार व पत्रकार यांची चांगली खोड मोडणार आणि त्या करितां २९ हजार रुपयांची मंजुरी देऊन एका सुप्रसिद्ध पुणें मुंबईकडेस पत्राचा करणार" असा निश्चय महाराजांनीं केल्याचें ताज्या बातमी वरून कळतें. ही बातमी खरी असल्यास बातमीदारांचें मुद्दैव समजून महाराजांचें दुर्दैव ओढवलें असें त्यांचे जवळील एक कर्णपिशाच्च म्हणतें.

---

## अन्याय! अन्याय!!

ता. २३ मिनहू रोजीं दिवसा ३ वाजतां महाराजांच्या हुकूमावरून इंदूर शहरांत दंवडी पिटली कीं, 'छावणींत रहात असलेले गृहस्थ—सखाराम गणेश, शिवाप्रसाद, पेंढारकर, किबे साहेब, अमोलकचंद, लखमीचंद राठी, यांच्याशीं कोणीं बोलूं नये, यांना भेटूं नये, यांच्या सलामसलतींत राहूं नये, यांच्याशीं कोणीही पैचा देखील व्यवहार करूं नये व जो हें हुकूम तोडील त्यास शिक्षा देण्यांत येईल." केवढा अन्यायाचा आणि दांडगेपणाचा हुकूम आहे हा? मेहेरबान एजन्ट गव्हर्नर जनरल सेन्ट्रल इंडिया असल्या अन्यायांकडे लक्ष पुरविलेल काय?

---

## एक इशारा.

एकम. बाय. झेड् आंग कळावें

कीं, ईश्वरप्रीत्यर्थ आपण मला उत्तम प्रकारची मदत करण्याची सूचना केली त्या बद्दल मीं आपला फार आभारी आहें व विशेष 'आँपल्यास विनंती करतों कीं, आपण पूर्ण भरंवसा व माझा एक निश्चय समजून, मालाची यादी तपशीलवार जितक्या लवकर 'होईल तितक्या लवकर पाठवितील तर जास्त नफा होईल.

एक क्ष,

---

## श्रीमंत सरकार महाराज शिवाजीराव होळकर यांस सविनय प्रार्थना.

आपल्या अन्यायी गोष्टींचा बोभाट फार झाल्यावरून राजनिष्ठेनें, आपण आपलें वर्तन सुधराल या इच्छेनें, स्वराज्याचा अभिमान असल्यामुळें, सत्बुद्धी पूर्वक आह्मीं आपलें हें इंदूर संस्थान प्रकरण हातीं घेऊन हेात असलेल्या जुलुमाचें प्रदर्शन आपल्या समोर मांडण्याचें धाडस केलें आहे. प्रस्तुतचा हा सहावा नंबर आहे. या संबंधी कांहीं खुलासा आपल्याकडून होईल अशी आज पावेतों वाट पहात होतों परंतु तो न झाल्यामुळें आज ही सविनय प्रार्थना करणें इष्ट वाटलें. या प्रार्थनेचा विचार होऊन महाराजांकडून सविस्तर खुलासा कांहीं येईल अशी आशा करतों.

एडिटर विक्षिप्त.

---

## नंबर ७.

(विक्षिप्त अंक ४४ ता. ३ आगस्ट ९५.)

गतांकीं कळविल्याप्रमाणें आज प्रथम महत्वाचे दोन खटले वाचकां पुढें मांडतों. या खटल्यांत अदल इन्साफ झाला अगर हुजूर हुकूमाप्रमाणें महाराजांचे मर्जीस्तव आरोपींवरील आरोपांची शाबिदी करून त्यांस कराग्रहांत पाठवून दिले हें पहाण्याचें आह्मीं आमचे वाचकांवरच सोंपवितों. पहिला खटला वामन सिताराम चा घेऊन त्या खटल्याची मुळपासूनची हकिकत समजली ह्मणजे तंतोतंत न्याय इंदूर 'संस्थानांत जो सध्यां चालू आहे तो सर्वांचे लक्षांत येण्यास फारसें कठीण पडणार नाहीं, ह्मणून त्याची मुळारंभापासूनची हकिकत देतों.

इंदूर म्युनिसिपालिटींत नारायण गणेश नांवाचा २९ वर्षें उमरीचा एक इसम कंदिल लावण्याचे कामावर सात रुपये दरमहाचा नोकर होता. तो ९४ सालच्या जुलई महिन्यांत अगर त्या सुमारास प्रेसिडेन्ट गुप्ते साहेब यांचें हुकूमावरून

जे कांहीं लोक वजा केले ह्मणजे नोकरीवरून काढले गेले त्यांत त्यासही काढण्यांत आला. पुढें नारायण यानें महाराजांची आपल्यावर बहाल मरजी व्हावी या हेतूनें एक मोघम अर्ज 'म्युनिसिपालिटींतील लोकांनीं नुकसान केलें' अशा आशयाचा महाराजांकडेस दिला. तेव्हां महाराजांनीं तो अर्ज दरबारांत अगर म्युनिसिपालिटीच्या आफिसराकडे न पाठवितां, आपल्या सांगीप्रमाणें कामें करणाऱ्या स्पेशल माजिस्त्रेटाकडेस पाठवून दिला. मुस्तफाखां या नांवाचे ते माजिस्त्रेट त्या वेळीं अगदीं महाराजांच्या कृपेंतले होते. त्यांच्याकडेस अर्ज येतांच त्यांनीं फिर्यादीची जबानी घेऊन व विशेष तपास करून, त्यांत कांहीं अर्थ नाहीं व फिर्यादीस वकील मिळाल्या खेरीज तो कांहीं करूं शकत नाहीं वगैरे ह्मणतो असा हुजूरला रिपोर्ट केला. मुस्तफाखां यांच्याकडेस मजकूर अर्ज पाठविण्यापूर्वी अहेसानभली इंदूरचे सुभे, जे पूर्वी सरकारच्या बॉडीगार्डांत शिपाई होते व नुकोजीराव महाराजांचे वेळेस पोलिसांत ५ रुपये दरमहाचे शिपाई होते, त्यांना या महाराजांनीं ३०० रुपये महेवारीवर इंदूर जिल्ह्याचे सुभे केले आहेत व ते महाराजांचे प्रीतींतले असल्यामुळें त्यांच्याकडेस प्रथम तो पाठविला. परंतु त्यांनीं फुरसत नसल्याची सबब सांगून परत पाठविला. तेव्हां मागाहून मुस्तफाखां कडेस तो पाठविणें जरूर पडलें.

नारायण यास हुजूरांतून वकील देऊन काम चालवावें असा मुस्तफाखां यांस महाराजांकडून हुकूम गेला परंतु तेथून खांसाहेब बदलले जाऊन त्यांचे जागीं स्पेशल माजिस्त्रेट निलकंठ गोविंद रानडे नेमले गेले. त्यांनीं तें काम चालविलें. त्यावेळीं फिर्यादीनें म्युनिसिपालिटींत पूर्वी नोकर होता व वजा झाला होता तो कारकून, आपल्या मदतीस मिळावा ह्मणून अर्ज केला. त्याप्रमाणें महाराजांनीं त्या कारकुनास बोलावून फिर्यादीस मदत करण्यास सांगितलें अथवा त्याची नेमणूक केली ह्मटलें तरी चालेल.

म्युनिसिपालिटींत सहा इसमांनीं नुकसान केलें असा फिर्यादीचा अर्ज होता. त्या इसमांचीं नांवें:—१ नारायण दाजी; २ वामन सिताराम; ३ गणेश दाजी मराठा; ४ विनायक मोरेश्वर; ५ रामचंद्र शिवराम; ६ नारायण विठ्ठल. यांपैकीं गणेश दाजी हा मयत असून त्यासही फिर्यादीनें आपल्या अर्जांत नेमून केला. नंतर स्पेशल माजिस्त्रेट रानडे

यांनीं जिवंत असलेल्या पांच इसमा- चा जामीन घेतला. पुढें महाराजांची स्पेशल चिट्ठी आली कीं, 'वामन सिताराम यास कैदेंत ठेवावा;' त्या वरहुकूम त्यास कैदेंत ठेवण्यांत आला. एकंदर तो पांच महिनेपर्यंत कैदेंत होता. दरम्यान त्याची व इतरांची कोणी चौकशीच केली नाहीं. पुढें ता. २९।३० मेच्या मुमारास हुजूर हुकूमानें जेवढे लोक कोतवालींत कैदेंत होते त्या सर्वांस महाराजांनीं लालबागेंत आपल्यास- मक्ष बोलाविलें. त्यांत दुर्दैवी वामन सितारामही होता. त्याची विचार पूस वगैरे करून त्याचे दोन तोंडांत मारून रानडे यांस हुकूम दिला कीं, याची लवकर चौकशी करून निकाल कळवा. एवढा प्रकार त्या दिवशीं होऊन राहिला. नंतर पुन्हां ता. ९।१० जूनचे मुमारास हुजूर- च्या जरूरीच्या चिठ्या आल्या कीं, वामन सिताराम याची दोन दिवसांत चौकशी करून निकाल करून ठरावाच्या नकला आपल्या- कडे पाठवाव्या. अशा प्रकारचें दळण चालू झालें तेव्हां वामन सितारामावर खालील प्रमाणें आरो- प लागू करण्यांत आले.

कारकून केशव नथो याच्या टेबलां- तून दीड वर्षा पूर्वी २० रुपये वामन सिताराम यानें चोरले व मागाहून परत दिले असें फिर्यादी ह्मणतो. या त्याच्या ह्मणण्यास साक्षी पुरावा कांहीं नाहीं. केशव नथोची साक्षही घेण्यांत आली नाहीं व त्याची फिर्यादही नाहीं. आरोपी वामन सिताराम ह्मणतो कीं, केशवरावाचें टेबल उघडें होतें आणि तो तेथें नव्हता ह्मणून आं- तील रुपये मीं उचलून ठेविले व दुसरे दिवशीं लगेच त्यास परत दिले. असा प्रकार असतां चोरीचा गुन्हा लागू करण्यांत आला.

२ रा. म्युनिसिपालिटिच्या कि- रकोळ जमा खर्चाची सन १८८८ सालची वही होती, तिचीं कांहीं पानें फाटलीं होतीं. तीं कोणी 'फाडलीं हें कांहीं ठरलें नाहीं, तरी तीं वामन सितारामनेंच फाडलीं असें अनुमान धरून, तो एक अपराध लागू कर- ण्यांत आला. मजकुरी वही नारायण दाजीचे हातची सर्व लिहीलेली असून त्याची बदली ३ वर्षा पासून दुसरी- कडे झाली. तेव्हां पासून वही लि- हिणारा वामनराव असल्यामुळें जरी त्याजवर किंचितही पुरावा नाहीं तरी लिहीणारा हेंच अपराधाचें लक्षण मानलें गेलें. वहीचीं पानें फाटल्या

पासून नुकसान काय झालें, पानें फाडण्याचें कारण वामनरावास काय होतें वगैरे कांहींएक न पहातां, इंदूर पिनलकोड कलम ४३९ प्रमाणें अपक्रियेचा अपराध वामनरावाचे माथीं बसला. होळकर महाराज ह्मणतील ती अपक्रिया व तोच कायदा आणि ते ह्मणतील तें कलम लागू करण्याजोगें असल्यावर मग माजिस्त्रेट तरी काय करणार?

३ रा. गोपाळराव भैयाचे कंपौन्डांत मातीचा ढीग पडला होता. ती माती फालतु पडली असून हुजूर हुकूमान्वयें जागजागीं खाडे भरण्यांत घातली व लोकांसही ज्यांनीं मागितली त्यांस दिली. त्या प्रमाणें वामनराव यांनींही म्यानेजरच्या परवानगीनें थोडीशी नेली. तेव्हां मातीची चोरी केल्याचा तिसरा अपराध त्यांचे माथीं बसला.

४ था. म्युनिसिपालिटींतील पाहिजे त्या नोकर कारागिरास काम पडेल त्यानें न्यावा व त्याची मजूरी म्युनिसिपालिटींत भरावी व तितके दिवस म्युनिसिपालिटींत त्याची गैरहजेरी मांडली जावी, अशी रीत आहे. व त्याप्रमाणें केलेंही जातें. पुष्कळ सुखवस्तु लोक अशा कारागिरांस आपल्याकडे नेऊन आपलीं कामेंही करून घेतात. व ही परवानगी इतरांप्रमाणें म्युनिसिपालिटीचे म्यानेजर व दुसरे नोकर यांनाही आहे व त्यांनीं अनेक वेळां उपयोगिही केला आहे. त्याप्रमाणें वामनराव यानें कांहीं सुतार, राजमजूर आपल्या घरीं कामास नेले व त्यांची मजूरी कांहीं दिली व कांहीं देणें राहिली ती त्याचे नांवें म्युनिसिपालिटीच्या हिशेवांत लिहिली असून, त्याजवर म्यानेजरची सही देखील आहे. त्याचप्रमाणें दुसरें सामान जें म्युनिसिपालिटींतून रोखीनें व उधारीनें विकत दिलें जातें त्याजबद्दलचीं पुष्कळ खातीं आहेत. त्यां मध्येंच वामनराव यानें जें सामान नेलें त्याचेंही एक खातें असून त्यावर म्यानेजरची सही आहे. असें असतां वामनरावाचें विश्वासघाताचें कृत्य समजून, त्याजवर विश्वासघात केल्याचा गुन्हा लागू झाला. या एकंदर संबंधांत म्यानेजरची साक्ष वगैरे न घेतां सर्व गुन्हे शाबीत मानून अतिशय जरूरीकरितां व हुजूर हुकुमावर लक्ष देऊन, वरील सर्व अपराध एकत्र धरून त्यांबद्दल वामन सिताराम यास **दोन वर्षे पांच माहिने सक्त मजूरीची कैद व १५०० रुपये** दंड अशी शिक्षा देण्यांत आली. या ठरावाची नक्कल सवडीनुसार

प्रसिद्ध केली जाईल. बाकीचे आरोपी नारायण विठ्ठल, विनायक मोरेश्वर, रामचंद्र शिवराम हे एकाच फिर्यादीतले असून त्यांची चौकशी होणें बाजून राहून, एकट्या वामन सितारामासच महाराजांचे हुकूमाकरतां इतकी कडक शिक्षा देण्यांत आली, तेव्हां हा होळकरशाहीतला शिवाजीराव महाराजांचा अदलइन्साफ कसा आहे तें वाचकांनींच लक्षांत आणावें. इतर आरोपी अजून कैदेंतच बसलेले आहेत. त्यांची चौकशी होण्याचा काळ कधीं येईल तो येवो.

आमचे वाचकांस आतां अशी शंका येणें साहजिक आहे कीं, इतर आरोपींकडे दुर्लक्ष करून एकट्या वामन सितारामा करितांच महाराजांनीं ही व्यवस्था कां केली ? शंका योग्य आहे. व तिचें पुढील हकिकतीवरून निरसन होईल. लक्ष देऊन ऐका बरें. वामन सितारामाचा बाप सिताराम भाऊ शागिर्द पेशांत ३० वर्षं नायबीचें काम करित असून, तो तुकोजीराव महाराजांच्या विशेष मेहेरबानीतला होता. त्याचे पश्चात हे डोकेफिरू शिवाजीराव महाराज गादीवर बसतांच शागिर्दपेशाचे मुख्य जे शिवाजीरावांचे चुलते सर काशिरावदादा यांजकडून महाराजांनीं तें काम काढून त्या जागेवर एका मुसलमानाची नेमणूक केली. त्या मुसलमानाचें नांव अजमतअल्लिखां असें होतें. या खांची तेथें नेमणूक झाल्यावर पूर्वीचे जितके नोकर होते तितक्यांस महाराजांनीं बडतर्फ केलें. त्यांत सितारामभाऊ व त्यांचे बंधु तात्या यांनाही श्रीफळ दिलें. इतकेंच नाहीं तर त्यांना इंदूरांतून निघून जाण्याचाही हुकूम दिला. त्याप्रमाणें ते २ दोन वर्षं पर्यंत उज्जनीस जाऊन राहिले होते, नंतर महाराजांनीं पुन्हां त्यांस इंदूरास बोलावून घेतले. त्या उभय बंधुंपैकीं सिताराभाऊ मयत झाले. त्यांचा हा मुलगा वामन, हें जेव्हां महाराजांचे डोक्यांत शिरलें तेव्हां त्या गरीबावर जुलूमाची भाग ओतली गेली. सध्यां बिचारा "बेडीनिशीं सक्तमजूरीची कैद भोगीत असून तो किती दुःखांत आहे हें आम्हीं गेल्याच्या मागील अंकीं महाराजांस केलेल्या सूचनेंत कळविलेंच आहे. या खटल्यांतील मिनीट पाहण्याजोगी आहे. झालेल्या निकालावर अपील होऊन चुकलेंच आहे, त्याचा काय निकाल होतो तो पहावा. या खटल्यानें विक्षिप्त पत्रापर्यंत साग्र हकिकत कळविल्यामुळें, भोगित पडलेल्या वामनरा-

वास आणखीं कांहीं यातना महाराजांकडून न होवोत ह्मणजे झालें. उलट त्याच्या विषयीं सदय अंतःकरण महाराजांचें होऊन ते कारागृहांतून मोकळे होण्याचा वेळ येईल तर समाधान होईल.

आपल्यास कैद करणार असें याच खटल्यांतील आरोपी नारायण दाजी यास समजतांच तो संधी साधून छावणींत पळून गेला. त्याला पकडून नेण्याकरितां प्रायमाफेसी केस स्पेशल मा. रानडे यांनीं करून इंदूर दरबारांतून रेसिडेन्सींत लिहून पाठविण्यांत आलें होतें, व त्या वरून नारायण दाजी यास खटल्याचा निकाल होई पावेतों छावणींत अटकेंत ठेविला होता. पुढें फर्स्ट असि. क्याप्टन न्यूमार्च यांनीं खटल्याचें स्वरूप पाहून नारायण दाजीस सोडून देऊन, हा खटला बनावटीचा आहे असें सांगितलें. त्यामुळें नारायण दाजी अन्यायाचे शिक्षेंतून वांचला. याची स्वतंत्र हकिकत आली आहे परंतु ती तूर्त देणें जरूर दिसत नाहीं. नारायण दाजीस इंदुरांत नेण्याकरितां व पुराव्याविषयीं फर्स्ट असि. साहेबांची खात्री करण्याकरितां स्पे. मा. मि. रानडे एक वेळ छावणींत गेले होते व खुद्द महाराजही गेले होते ह्मणून समजतें. परंतु इष्टहेतु साधला नाहीं.

मि. निळकंठराव रानडे हे आमच्या लोकप्रीय न्यायमूर्ती रानडे साहेबांचे बंधु आहेत. त्यांना शिवाजी महाराजांसारख्या अन्यायी राजाजवळ नोकरी करण्याचा प्रसंग असून, महाराजांचे इष्टकामांतही त्यांना पडण्याचा प्रसंग येतो, याबद्दल फार खेद वाटतो.

म्युनिसिपालिटींत नुकसान झाल्याबद्दल तेथील म्यानेजरास अगर दरबारास न विचारतां व ऑर्डिनरी माजिस्त्रेटाकडेस तें काम न पाठवितां स्पेशल माजिस्त्रेटकडे जाणें, व जरूरी चिठ्या पाठवून दोन दिवसांत वामन सिताराम्चे खटल्याचाच निकाल करा ह्मणून हुकूम करणें, आणि निकाल ऐकविल्याबरोबर त्याचा रिपोर्ट आपल्याकडेस मागून घेणें, ह्या साऱ्या गोष्टी पोरखेळांत मोजण्याजोग्या असून, शिवाजीरावांचे क्रुरपणाचा मासला समजण्यासारख्या आहेत असें अनुमान करणें चुकीचें होणार नाहीं. महाराजांचे अंगीं असे अन्याय करण्याचा गुण जडलाच आहे. प्रथम पाहिजेल त्या मनुष्यास आपले मतानें कैद करावा, कांहीं दिवस गेल्यावर त्याजवर मोकदमा चालवावा व मध्येंच वाटतील तसे हुकूम

करावे आणि अखेर आपल्या इच्छेनुरूप निकालही करून घ्यावा, असें करणें न्यायदेवतेचे विरुद्ध आहे तरी, महाराज त्याची पर्वा न करितां आपल्या कारकिर्दीत दांडगेपणाचाच प्रभाव दाखवून राहिले आहेत.

## खटला २ रा.

इंजीनियरिंग खात्यांतील दोन कारकून जे सध्यां कैद भोगीत आहेत त्यांचीं नांवें. एक तात्याजी व दुसरा माधवराव अशीं आहेत. त्यांच्यावर आरोप कोणते आहेत हें खालील हकिकतीवरून समजण्याजोगें आहे. माच नामक एक बीभत्स तमाशा उज्जन कडल्या बाजूला होत असतो. त्या तमाशाचा महाराज साहेबांना शोक आहे. वारंवार तो करविण्याचा प्रसंग महाराज आणतात. त्या तमाशाकरतां जो माचवा बांधला, त्यास जेवढा खर्च लागावयाचा त्याहून अधिक लावला असा आरोप वरील दुर्दैवी कारकुनांवर लादला गेला. त्यांच्या हातांत पैसा नाहीं, त्यांणीं त्या कामांत पैसे जरूर खाल्ले असेंही शाबीत झालें नाहीं, असें असून. या दुष्ट महाराजांनीं विनाकारण त्यांस कारागृहांत लोटून दिलें आहे. याच म्हणजे इंजिनियरिंग खात्यांतील दुसरेही पुष्कळ लोक महाराजांच्या हुकूमावरून कैद भोगीत पडले आहेत. परंतु आह्मांसमोर आलेल्या या दोघांबद्दल फारच चमत्कार वाटतो. तात्याजी व माधवराव यांना कैदेंत पाठवितेवेळीं त्यांच्या बरोबर किसन सुतार नांवाचा तिसराही एक पाठविण्यांत आला होता, परंतु पुढें तो एकटा सुटला. महाराजांनीं त्यांना कैदेंत पाठवून त्यांना शिक्षा देण्याबद्दल फौजदार सिटी इंदूर ( फ. क्लाजि. माजिस्ट्रेट ) यांस हुकूम दिला. त्यांच्यावर कोणताही अपराध कायदेशीर रीतिनें लागू करण्यांत आला नाहीं व होतही नाहीं. हे सवा वर्षापासून कैदेंत आहेत. त्यांच्या पायांत बिड्याही अडकवल्या आहेत. त्यांची स्थिती मर्णोन्मुख झाल्याबद्दल तुरुंगावरील डाक्टरचें सर्टिफिकेटही आहे. शिवाय त्या इसमांना जामिनावर तरी सोडण्याचा हुकूम व्हावा असें माजिस्ट्रेटनें हुजूरास व दरबारासही कळविल्याचें समजतें परंतु अद्याप ते सुटत नाहींत. तेव्हां महाराजांचा दुराग्रही स्वभाव किती आहे तें यावरून दिसून येतें.

या खटल्यांत निव्वळ अन्याय झाला आहे, असें खात्रीनें आह्मीं ह्मणतों. या आरोपीं संबंधानें मा-

जिस्त्रेट सिटी इंदूर यांनीं आपल्या अभिप्रायासह जो रिपोर्ट केला आहे तिकडे इंदूरांतील कोणी न्यायी कामगार लक्ष पुरवील तर त्यास महाराजांनीं केवळ अन्यायानें या गरिबांस तुरुंगांत टाकलें आहे असेंच दिसून येईल. महाराजांचे हुकूमावरून फिर्याद गुजरण्यापूर्वीच त्यांना कैदखान्यांत अडकवून नंतर फार्स करून दाखविण्याची महाराजांची अशी वहिवाट आहे. तदनुसार त्यांनीं कृष्णपुरा कोतवाल यास त्याचे आफिसरामार्फत फिर्यादी होण्यास सांगितलें. कोर्टापुढें पुरावा करून देण्याविषयीं कोतवाल व त्याचे आफिसर यांस समज दिला गेला असून, फक्त ते कोर्टांत हजर होण्याखेरीज दुसरें कांहीं करीत नाहींत व त्यांनीं केलेंही नाहीं. तेवढ्या नुस्त्या त्यांच्या हजेरीवर मॉजिस्त्रेटनें तरी पुराव्याशिवाय निकाल काय करावा? अशा प्रकारें मॉजिस्त्रेट घोंटाळ्यांत पडून त्यांनीं गोपाळ लक्ष्मण नि॥ हुजूर यांस लेखी कळविलें कीं, पुरावा नसतां केवळ कोतवालाच्या हजेरीवर मला निकाल देतां येत नाहीं. आरोपींनीं भोगलेली सजा पुरती आहे व ते मर्णोन्मुख झाल्याबद्दलचीं डाक्टरचीं सर्टिफिकेटेंही आहेत. करितां महाराजांचे कानावर ही हकिकत घालून त्यांस सोडून देण्याची तजविज व्हावी. मॉजिस्त्रेटाच्या या रिपोर्टीही दाद लागली नाहीं; परंतु त्यावर महाराजांकडून कांहीं हुकूम आला, त्याप्रमाणें व्यवस्था होऊन पुन्हां मॉजिस्त्रेटकडून जबाब गेला कीं, या खटल्यांत झालेल्या पुराव्यावरून आरोपींवर कोणत्याही प्रकारचा फौजदारी गुन्हा कायदेशीर रीतिनें लागू होत नाहीं. महाराजांचा हुकूम शिक्षा देण्याचा झाला होता परंतु आरोपींपैकीं किसन सुतार हा महाराजांचे हुकूमावरून सुटला व फरारीही झाला. बाकी राहिलेले दोन आरोपी सवा वर्षापासून कैदेंत आहेत. ही त्यांनीं भोगलेली शिक्षा पुरे आहे इतकेंच नव्हे तर फार झाली आहे. तेव्हां यांस सोडून द्यावे अगर जामिनावर तरी सत्वर सोडण्याची व्यवस्था व्हावी. अशा प्रकारच्या अभिप्रायासह आरोपींच्या वारसाचे अर्जही मॉजिस्त्रेटकडून गेले असतां ते कैदमुक्त होत नाहींत, हें नवल नव्हे काय? लोकांना कोणत्याही प्रकारें त्रासच द्यावयाचा व त्यांचा छळवादच करावयाचा असा शिवाजीराव महाराजांचा अंतस्थ हेतु असावा, असें स्पष्ट या खटल्यावरून, व्यक्त

होतें. जर अशाच हेतु असेल आणि महाराजांची मनोदेवता आपल्या प्रजेच्या कल्याणाकडेस न जातां त्यांची राखरांगोळी करण्याकडेस धांव घेत असेल तर त्यांनीं आपल्या क्रूरस्वभावाप्रमाणें एखादें अघाट, चालू आहे यापेक्षां अति भयंकर आणि त्वरित मनकामना तृप्त होईल अशें वेडेपणाचें कृत्य करून जन्मास आल्याचें सार्थक करावें म्हणजे रोजचा हा नवा त्रास तरी चुकेल. एक आपण सुखी अथवा आपली प्रजा सुखी, असें दोहोंपैकीं एक कांहींतरी करून सध्यां जसें नांव गाजत आहे तसें आपल्या पश्चातही लोकांस स्मरण होण्याजोगें होईल तर बरें. असें होईल तर आमच्या दयाळू इंग्रज सरकारास तरी फार श्रम न पडतां शिवाजीराव महाराजांच्या इच्छेप्रमाणें त्यांची उचलबांगडी होऊन त्यांस चार लाख तर बाजूसच, पण खाण्यापुरती देणगी मिळून डोक्याची स्वस्थता तरी होईल आणि इंदूर प्रजेला सुखाचे दिवस तरी येतील असें फार दुःखानें म्हणावें लागतें. असो.

तात्याजी व माधवराव यांची खरी हकिकत जी कळली ती वाचकांपुढें व श्रीमंत महाराज शिवाजीराव यांस पुढें मांडून आम्हीं मोकळे झालों व महाराजांचा अन्यायही त्यांचे नजरे समोर आणून ठेवला. आतां तरी महाराज त्या बिचाऱ्यांस कैदमुक्त करतात कीं काय तें पहावें. व वास्तविक त्यांनीं आपला अन्याय उघडपणें नव्हे पण आपल्या मनांत ओळखून एकदम त्यांस सोडून द्यावे हेंच महाराजांना भूषणीय होणार आहे, असें आम्हांस वाटतें. आतां ज्या माचव्यावरून त्या उभयतांस कैदेंत जाण्याचा प्रसंग आला त्या माचव्या संबंधी मिळालेली माहिती देतों.

माच म्हणून एक प्रकारचा बीभत्स तमाशा आहे असें मागें सांगितलेंच. या तमाशाकरतां एक उंच माचवा बांधला जातो. मग त्याला छत, हांड्या लावतात. श्रीमंत महाराज शिवाजीराव यांना त्या तमाशाची विशेष आवड असल्यामुळें, सरकार वाड्याच्या कंपौन्डाच्या बाहेरील भितीवर तो माचवा बांधला जातो. त्याची उंची बहुधा महाराजांच्या बसण्याच्या जागे इतकी असते. तो तमाशा सर्व रात्रभर तर काय, पण दुसरे दिवशीं ४ घटका दिवस येई पावेतोंही होत असतो. प्रतिवर्षी महिना दोन महिने पावेतों हें काम चालतें, श्रीमंतांची स्वारी वर बसलीच आहे, इतर लोक जे पहाणार

ते सडकेवर बसलेच आहेत, तमाशांत अगदीं स्पष्ट अशा बीभत्स संगीत गाण्याची रेलचेल उडून राहिलीच आहे, अशा बहारदारींत तमाशांतलाच एक पुरुष एका स्त्रीवर रुसतो, नाराज होतो. ( रुसणारा इसम स्वतःच्याच बायकोवर रुसतो किंवा दुसऱ्याच्या बायकोवर रुसतो तें आह्मांस माहित नसल्यामुळें खुलासेवार सांगतां येत नाहीं. ) पुढें ती त्याची समजूत करते. ती समजूत करण्याची रीत संगीतांत असून जितके ह्मणून बीभत्स आणि शृंगारयुक्त शब्द असतील तितके त्यांत ती आणते. नंतर सर्व हंसाहंस उडते. श्रीमंत खुष होतात. शालू, पैठणी बक्षीस देतात, वगैरे वगैरे प्रकार होतात. आतां पुन्हां मात्र ह्मणजे काय, हें आमचे वाचकांस सांगण्याचें कारण पडणार नाहीं. श्रीमंतांना सर्व प्रकारची आवड असली पाहिजे. परंतु आमचे शिवाजीराव महाराज इंग्रजी उत्तम शिकलेले; संस्कृत, गणित वगैरेचे पूर्ण समजदार; जोतिषाचे आधारानें चालणारे आणि आपल्या प्रजेस ढळढळां अन्यायानें रडविणारे, हांकलून देणारे, असे असतां त्यांस या बीभत्स तमाशाची आवड कशी राहिली आहे नकळे, ज्यांनीं आपल्या शहरांतील नृत्य गायन करणाऱ्या विश्व योषितांनाही काढून दिलें, त्या महाराजांस बीभत्स तमाशाची आवड असणें नवल वाटण्याजोगें आहे. जसें ज्यावेळीं डोकें असेल तसें ते करतात असें जें बहुतांशीं ठरलें आहे तेंच खरें. दुसरें काय ह्मणावयाचें !

## वट हुकूम.

सरकारी दुकानचें. येणें—मग तें इजारदाराकडील बाकीचें असो" किंवा कोणत्याही प्रकारचें असो— ज्याकडेस कागदावरून जितकें प्रथम दर्शनीं निघत असेल त्यापैकीं निम्में रकम त्यानें तात्काळ भरून, नंतर हिशेबाची रुजवात वगैरे करण्याची इच्छा असल्यास करावी. तसें न करतां न्याय करा, हिशेब काढा, रुजवात करा वगैरे कोणीं ह्मणेल तर त्याचें ह्मणणें न ऐकतां त्याजकडेस जितकें येणें निघत असेल तें, वसूल करण्या करतां एकदम त्याची जिनगी जप्त करावी, असा वट हुकूम शिवाजीराव महाराजांनीं केला असल्याचें समजतें. या वट हुकूमामुळें लोकांस पिळून काढले जातात तांची तपासणी झाल्या खेरीज केवळ सरकारी दुकानदार अथवा कामदार जें येणें काढतील तें खरें रुजवात अथवा खरा हिशेब उभय-

मानून, एखाद्याच्या जिंदगीची जप्ती करणें हें मनसोक्त कायद्यांतील आडदांड कलम आहे. अधिकाराच्या जोरावरच जर अशा गोष्टी करावयाच्या आहेत तर एकदमच सर्व गोष्टींचा निकाल लावून टाकावा. ज्यांचा म्हणून सरकारशीं, सरकारच्या दुकानाशीं, सरकारच्या हद्दींत, सरकारच्या दृष्टीस पडेल अशा स्थलीं संबंध असेल त्या सर्वांच्या जिंदगीचा, त्यांच्या घरादारांचा, त्यांच्या आप्तांचा वगैरे निकाल एकाच वट हुकूमानें करून टाकल्यास आज एक, उद्यां दुसरा, परवां तिसरा असे शोधून काढण्याचे श्रम पडणार नाहींत. जर ही युक्ती महाराजांस पसंत पडत नसेल तर त्यांनीं दिलेला अन्यायाचा वट हुकूमही फिरवून शिरस्त्यानें व हिशेबानें ज्यांत अन्याय, जुलूम होणार नाहीं अशा तजविजीनें आपलें अगर सरकारी जें घेणें निघेल तें वसूल करण्याचा हुकूम देऊन, त्यावर आपली न्यायी नजर ठेवावी. पण महाराज शिवाजीरावांची न्यायी नजर अंधःकारांत रुतली असल्यामुळें, एवढा पुकार झाला आहे; जरी असा प्रकार आहे तरी सुधारणाही होतेच. प्रस्तुतच्या वट हुकूमानें जुलूम होत आहे. त्या जुलूमाचे शांत्यर्थ कारभारी साहेबांकडेस कोणी अर्ज करण्यास गेला तर हुजूर हुकूमा प्रमाणें व्यवस्था झाली आहे, यास्तव दरबारास त्यांत हात घालण्याचा अधिकार नाहीं, असा लेखी व तोंडी जवाब मिळतो. तेव्हां तोंड दाबून बुक्क्यांचा मार सोसण्याचा प्रसंग तेथील लोकांवर चालू आहे. महाराज निवळतील तर लोकांचें सुदैव समजावयाचें!!

## तात्या केळकर.

हे गृहस्थ फार संभावित असून व्यापारी आहेत. यांच्याकडेस सरकारी इजाऱ्याचीं गांवें ५०००० रुपये सालाचे उत्पन्नाचीं होतीं. मिनिस्टर आर. रघुनाथराव गेल्या बरोबर यांना कैदेंत बसविलें व यांची इस्टेट सर्व जप्त केली. गांवें खालसा करण्याचाही हुकूम दिला. त्या वेळेस इतर इजारदारां प्रमाणें यांच्याकडेसही कांहीं सरकारी बाकी होती. गांवांतील लोकांकडेसही तशी जमिनीच्या साऱ्याची वसुल बाकी येणें होती, तरी इतरांचा विचार बाजूस राहून तात्यांवरच वक्रदृष्टी झाली. त्यांना ६ महिनेपर्यंत कैदेंत बसविलें. नंतर तोड करून रुपयांच्या वसूलाची व्यवस्था झाल्यावर गांवें सोडून दिलीं. जिंदगीही परत

दिली. व पट्टचाचे मुदती पर्यंत गांवें चालतील वगैरे लेखी हुकूम दिला. पुढें एक वर्षानें तें सारें रद्द करून पुन्हां गांवें खालसा केलीं. त्यांत तात्याचें हजारों रुपयांचें नुकसान झालें. नंतर तीं गांवें दुसऱ्यास दिलीं. त्याजकडून वसूल आला नाहीं ह्मणून त्याचीही जप्ती केली आहे. दोन वर्षें तात्याकडेस तगादा नाहीं, कांहीं नाहीं. तात्याच्या झालेल्या नुकसानीची दाद लागण्यास कांहीं मार्ग नाहीं ह्मणून ते स्वस्थ घरीं बसले असतां, एक दिवशीं त्यांच्या दारावरून महाराजांची स्वारी जात असतां, आपली गाडी त्यांचे दारासमोर उभी करून, तात्यांस जवळ बोलावून हुजऱ्याकडून त्यांचे दोन थोबाडांत मारविल्या. व पुढें स्वारी चालती झाली. नंतर कांहीं दिवसांनीं ह्मणजे गोपाळराव पोषाखवाला पळाला तेव्हां, तो तारे आडनांवाचा होता व त्याचे भाऊबंद तात्यांच्या जागेंत भाड्यानें रहात होते त्या तात्यांस जेव्हां कैद केलें तेव्हां त्यासही कैद केलें. प्रस्तुत ह्मणजे सुमार २ महिने झाले, सर्व कोतवालीं वरील पिंजऱ्यांतले लोक महाराजांनीं समक्ष बोलाविले तेव्हां त्यांत तात्याही गेले. त्या वेळेस त्यांना पाहून महाराजांचें डोकें फिरलें व त्यांनीं तेथें तात्यांच्या दोनचार थोबाडांत मारविल्या व शिव्याही दिल्या. ज्या ज्या प्रकारें तात्यांचे हाल होतील तसे तसे करण्याचें महाराजांनीं मांडलें आहे. हल्लीं तात्यांस सांगण्यांत येत आहे कीं, तुला आह्मीं सोडून देऊं परंतु तूं इंदुरास न राहतां तुझीं घरेंदारें वगैरे खोदून घेऊन येथून चालता झाला पाहिजे. महाराजांच्या या ह्मणण्यास तात्या अद्याप कबूल नसल्यामुळें अटकेंत आहेत.

## पाय सोलून गेले.

किसन दरजाचे दोन मुलगे व तिसरा एक दर्जी असे कैदेंत कोंबले असून पहिल्या दोघांचे पायांत बिडी आहे. या त्रिवर्गास कित्येक महिन्यापासून महाराजांच्या मर्जीस्तव कांहींएक आरोप नसतां अमुक इसम पळाला, त्यास पळविणारे हेच असावे असा नुस्ता संपय धरून, त्यांना काराग्रहांत ढकलून दिले. ज्यांच्या पायांत बिड्या आहेत त्यांचे पाय सोलून गेले असून सुजलेही आहेत. अशा दुर्घट स्थितींत त्यांना कोतवालीवरील संकोचित पिंजऱ्यांत अडकवून त्यांचे हाल हाल महाराज करीत आहेत. यांच्या प्रमाणें दुसरेही ७९।८० लोक विनाकारण कैदेंत पडले आहेत. महाराजांची

लहर लागून एखादा केव्हां सुटतो पण पुन्हांही त्यास महाराजांची लहर वळली कीं, तेथें जाण्याचा प्रसंग येतो. मनुस्मृतींत जे दोष राजांस ठिकाणीं नसावेत म्हणून सांगितलें आहे ते सर्व, किंबहुना त्याहून अधिक, शिवाजीराव महाराजांच्या ठिकाणीं आहेत.

### यांना लागू नाहीं.

शिवाजीराव महाराजांच्या हकिकतींत पुष्कळ गोष्टी असंभवनीय अशा लोकांस सकृत दर्शनीं वाटतात परंतु तसें वाटणें दुसऱ्या राजाबद्दल योग्य ठरेल. हे बृहस्पती एकेक अशा विपरीत गोष्टी करणारे आहेत कीं, त्याचें अनुमानही करणें मोठें मुष्किलीचें आहे. यांच्या वागणुकीत अमुक एक प्रकारचा हा राजा आहे असें म्हणणारा देखील चुकीस पात्र ठरणार आहे. कारण, यांची शाश्वतीच नाहीं. यांचे हातून शेंकडों गोष्टी विपरीत घडलेल्या असून त्या लोकांनीं प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहिलेल्या अशा आहेत. त्याचा उच्चार आपल्या तोंडानें काढणें म्हणजे आपलें तोंड या दुष्ट महाराजांमुळें अपवित्र करून घेणें होय. तशा गोष्टी साधारण लोकांत देखील घडणें कठीण आहे. आज आह्मीं त्या अपवित्र गोष्टींचा उच्चार करीत नाहीं, तरी वेळ आल्यास मागें पुढेंही पहाणार नाहीं. महाराजांनीं तशी वेळ मात्र आणावी. महाराजांच्या अशाश्वती मुळें कोणताही नियम यांना लागू नाहीं असें म्हणणें भाग पडतें.

### कडीं नजर आहे.

महाराजांच्या त्रासामुळें ज्या लोकांस इंदूर छावणींत जाऊन रहाणें भाग पडलें आहे त्या लोकांवर महाराजांची फारच कडीं नजर आहे. त्या लोकांकडेस शहरांतला कोण जातो कोण शहरांत येतो याची फार कडक चौकशी ठेवली आहे. शहरांतला कोणी मनुष्य छावणींत नजरेस पडला कीं, त्याचेवर गदा आलीच म्हणून त्यानें समजावें. शेंकडों उदाहरणें अशीं घडलीं आहेत. जो शहरांतला मनुष्य छावणींत महाराजांच्या नजरेस पडतो त्याचे घरीं जाऊन पोलिसनें चौकशी केली नाहीं असें विरळा. असा प्रकार झाला म्हणजे ज्यांना अब्रुची, आपल्या जिवाची चाड आहे ते निमूटपणें छावणीचा आश्रय करतात. अलिकडे तर सर्वांशीं असा समज झाला आहे कीं, ज्याच्यावर महाराजांची दृष्ट नजर जाईल त्यास प्रथम मारपीट, नंतर कैद होते. पुढें त्याच्यावर कांहीं तरी फौजदारी खटला चालवावयाचा व त्यांत त्यास

'शिक्षा द्या' असा महाराजांचा हुकूम जावयाचा. अशा खटल्यांत सरकार तर्फे काम चालविण्यास सरकारी वकील असतो. आरोपीस वकील मिळत नाहीं. त्याला आपला पुरावा देण्याची संधी सांपडत नाहीं. त्याचा योग्य बचाव ऐकला जात नाहीं. शेवटीं हुजूर हुकूम आल्यामुळें आरोप बिलकूल शाबीत होत नसला तरी, महाराजांची मर्जी राखण्यासाठीं खऱ्या न्याय देवतेस नरकांत लोटून, माजिस्ट्रेट साहेब बिचाऱ्या निरपराधी मनुष्यास शिक्षा ठोठावतो. आजपर्यंतचीं अशीं शेंकडों उदाहरणें महाराज विचारतील तर तीं त्यांचे नजरे समोर ठेवण्यास आमची तयारी आहे. पण महाराज विचारतात कशाला? एवढी धमक त्यांच्याम्ध्यें आहे कुठे? आपण अन्यायाचें, दुष्ट कृतीचें आणि राज्य घालविण्याचें निशाण फडकावून राहिलों आहोंत असें ते पुरें जाणतात. तेव्हां **सबसे मेरी चुप** हीं वाक्यें त्यांनीं मुखोद्गत करून आपली पुंडाई चालविली आहे. या महाराजां जवळ कांहीं मूर्ती अशाही आहेत कीं, कायदा व न्याय यांस ओळखून व अन्यायाची भीति मनांत बाळगून महाराजांची ओशाळगत पदरांत बांधली नाहीं पावेतों, आपलें खरें आणि न्याय्य कर्तव्य बजावण्यास डगमगत नाहींत. तथापि एखादेवेळीं पोटाची वीतभर खळगी रिकामी पडेल या भीतीनें न्यायाची तराजू जरा झुकती करतात परंतु त्यांतही निरपराधी, बळी न जातां बचावतो व आपल्या पोराबाळांत जाऊन बसतो.

### रात्रभर झोंप नाहीं.

शिवाजीराव महाराजांस रात्रभर झोंप देखील शांततेनें लागत नाहीं म्हणतात. सगळ्या रात्रभर त्यांचा विचार चालत असतो कीं, उद्यां कोणाचें काय करावें, कोणाची जप्ती करावी, कोणास कैदेंत घालावें, कोणास इंदुरांतून हांकलून द्यावें, कोणास ठोकावा, कोणास उठाबशा काढण्यास लावावा इत्यादि इत्यादि विचारांनीं त्यांचें मन चलबिचल करीत असतें. इतक्यांत मनांत आलें म्हणजे रात्रींच्या रात्रीस देखील एखादा हुकूम सोडून एखाद्यावर मनाच्या लहरी प्रमाणें प्रयोगही केला जातो. तेव्हां या गरम रक्ताच्या महाराजांना वेताळाची उपमा कोणी दिली असतां वावगें होईल काय?

### ९ वर्षांत बोंचला नाहीं.

महाराज शिवाजीराव गादीवर बसल्यापासून शिंपी, न्हावी, धोबी, रंगारी, भिस्ती, पिंजारा अगर दु-

सरा कोणी, ज्यांशीं महाराजांचें खासगी काम पडतें, त्यांपैकीं मारपीट; शिव्यागाळी, कैद, शहरांतून हांकलून देणें, त्याची मालमत्ता जप्त करणें वगैरे गोष्टींतून कोणींही वांचला असेलसें वाटत नाहीं. दर दिवशीं २।४ इसमांवर तरी वरील प्रयोग झालेच पाहिजेत, त्या वांचून महाराज कावरे बावरे होतात. या गोष्टी खुद्द महाराजांना जर तापल्या तव्यावर उभे करून विचारल्या तर ते देखील नाहीं म्हणणार नाहींत, अशी लोकांची खात्री आहे. कारण, ते ज्या गोष्टी करतात त्या उघड करतात. चोरून किंवा आपल्यास अधिकार नाहीं म्हणून अथवा ईश्वराची भीति मानली पाहिजे अशा समजुतीनें ते मुळींच करीत नाहींत प्रसंगवशात ते करतात त्या सर्व गोष्टी **'होय मीं केल्या, करीत आहें'** असेंच त्यांना कबूल करावें लागेल. निगरगट्टपणानें एखादे वेळीं नाकबूल करण्याचा त्यांनीं प्रयत्न केला तर आम्हीं त्यांना देवासारखे कौल लावून बोलविण्यास कमती करणार नाहीं.

### बहुतेक त्रस्त आहेत.

सध्यां इंदुरांतील बहुतेक कामदार अगदीं त्रस्त आहेत. हे महाराज पेन्शनांत जाऊन बसतील व यांच्या चिरंजिवांस अथवा सार्वभौम सरकार ज्या योग्य वारसास गादीवर बसवितील त्यांची यथान्याय सेवाचाकरी करण्यास फार उत्सुक आहेत. प्रस्तुतच्या महाराजांनीं एखाद्या कारकुनास माजिस्ट्रेट बनविला अगर, एखाद्या फकिरास सुभा बनविला अथवा सुभ्याचा कारकून केला आणि माजिस्ट्रेटाच्या अगदीं कुलकुलता चुगलखोर केला व शेंकडों रुपये पगार दिला तरी तो चांगला नाहीं. निरुपायानें पोटाची खळगी भरलो पाहिजे म्हणून, महाराज सांगतील ते अन्याय, जुलूम, त्यांस राजी ठेवून करावे लागत आहेत. बाकी मनापासून एखाद्यास निरर्थक शिक्षा देणें, पकडणें, मारणें, जप्ती करणें वगैरे प्रकार करणें अगदीं प्रत्येकास अयोग्य वाटतें. दयाळू सार्वभौम सरकारनें या शिवाजी महाराजांचा फौजदारी अधिकार तरी काढून घ्यावा म्हणजे बरें होईल.

### फजीत होतात.

अन्यायाचे भीतीनें जे लोक छावणींत पळून जातात, तिकडून त्यांना नेण्याकरतां भलभलते पुरावे, भलभलते अपराध लागू करून दरबारांतून रेसिडेन्सींत पत्रव्यवहार

होतो. व इंदूर शहरांतील शिक्षा देणारे माजिस्त्रेटही आपला माजिस्त्रेटीचा बाणा बांधून गेलेल्या लोकांस आणण्याकरतां छावणींत जातात व तेथून ते फजीत होऊन नाक मुठींत घेऊन परत येतात. खरोखर विचार केला ह्मणजे छावणी जवळ असल्या मुळें पुष्कळ प्रकारें लोकांचा बचाव होतो. एक प्रकारचा त्यांस हा आधार आहे. लोकांचे जीव व अब्रू वांचण्याला हें एक साधन आहे. जर दहा पांच कोसांवर छावणी असती तर या दुष्ट महाराजांचे हद्दींतून पळून जाणेंही दुरापस्त होतें. एवढ्यावर न भागतां पळून जाणाऱ्या लोकांचे हाल हालही झाले असते. दयाळू इंग्रज सरकारचे, छावणी जवळ आहे ह्मणून आभारच मानले पाहिजेत.

## कां कोंडून ठेवित नाहीं !

आमचा राजनिष्ठ बातमीदार ह्मणतो कीं, पूर्वी दंग्याधोप्याचे दिवस होते, तेव्हां येशवंतराव होळकरांना वेड्यासारखें झालें होतें. तीं त्यांची त्या वेळची वेडगळ स्थिती पाहून त्यांच्या एका अविवाहीत तुळसाबाई नांवाच्या स्त्रीनें त्यांना तीन चार महिनेपर्यंत कोंडून ठेविलें होतें व सर्व राज्यकारभार सुरळीत चालविला होता. सध्यां या जुलूम बहादूर शिवाजी महाराजांना तशा रीतीनें खोलींत अडकवून व्यवस्था कोणी कां करीत नाहीं ? हें राजभिष्ठणाचें ह्मणणें कोणी वावगें ह्मणेलसें आह्मांस वाटत नाहीं. परंतु हा काल आणि जुलूमाच्या शिखरास पोंचलेले शिवाजीमहाराज, अशा कारस्थानास कितीसे जुमानतील याची शंकाच आहे. या महाराजांना अशा प्रकारचा कोंडवाडा देण्यापेक्षां यांच्या अन्यायी हुकूमाची अवज्ञा करणारे लोक तयार झाले पाहिजेत. तसे जर होतील तर हां हां ह्मणतां याच महाराजांचें डोकें ठिकाणावर येऊन हे व्यवस्थीत व न्यायानें वागूं लागतील यांत कांहीं संदेह नाहीं.

## ढवळाढवळ करूं लागले.

मिनिस्टर आर. रघुनाथराव व कीर्तने साहेब इंदुरांतून गेल्या नंतर महाराज शिवाजीराव दिवाणी फौजदारी कामांत हात घालून ढवळाढवळ करूं लागले. थोडीशी सुरुवात कीर्तने साहेब असतांच केली ह्मणतात. महाराजांचा हात या कामांत शिरल्यापासून न्याय बाजूस राहून अन्यायाची मात्र रेलचेल उडून गेली आहे. या महाराजांना व्यवस्थेशीर काम ह्मणून मुळींच आवडत नाहीं. आपल्या मनाजोगें

अन्यायानें कां होईना पण झालें. ज्या ठिकाणीं अशी स्थिती तेथील राज्यव्यवस्था कशी असेल हें महाराजांचे दुष्कृत्यांचे वोभाट्यांवरून दिसून येतच आहे. या महाराजांप्रमाणें डोकेफिराऊ, क्षणीक बुद्धिचा दुष्ट राजा यापुढें कोणी होईल किंवा नाहीं याची शंकाच आहे.

## शिव्यांचा मासला.

इतर लोक नव्या जुन्या पद्धतीच्या घोंटींव शिव्या देऊन वेळ मारून नेत असतील व नेतात असेंही केव्हां केव्हां सर्वांचे दृष्टीस पडतें. परंतु शिवाजीराव महाराजांची शिव्या देण्याची रीत अगदीं चमत्कारीक, हंसूं येण्याजोगी अशी असल्याचें समजतें. लुच्चा, गाढव, बदमाष ह्या तर आहेतच; पण तूं मरशील, तुझी बायको विधवा होईल, तुझें निसंतान होईल, तुझें वाटोळें होईल, तूं भीक मागशील, तुझे हाल झाले ह्मणजे मला आनंद होईल वगैरे सर्व अशाच प्रकारच्या नव्हत पण याहूनही बीभत्स, कीं ज्याचा उच्चार करणेंही अप्रशस्त आहे. ज्यांना अशा गालीप्रदानाची बक्षिसी मिळाली आहे ते यांची फार कींव करतात. आणि महामूर्ख महाराज आहेत समजून स्वस्थ बसतात. ही असली घाणेरडी टेव सत्संगती महाराजांस न लागल्यामुळें जडली असावी यांत कांहीं संशय नाहीं. राजाचे तोंडून शिवी निघणें अति गैर आहे. तशांत शिवाजीराव महाराजांसारख्या विद्वान राजाला तर खरोखर ही काळिमा आहे. परंतु सर्वच जुलूम जेथें आहे तेथें एकट्या शिव्यांचेंच काय ? असली ही टेव महाराजांनीं घालविली पाहिजे. व त्यांनीं विचार करून अवश्य घालवावी या हेतूनेंच आह्मींही येथें हा मासला मांडला आहे. आह्मीं अशा शिव्या मुळींच देत नाहीं असें कदाचित् महाराज ह्मणून आपलें उजळ डोकें करूं ह्मणतील तर त्याजवद्दल पुरावा आहे. महाराजांनीं आज्ञा करावी ह्मणजे ज्यांना ही बक्षिसी मिळाली आहे त्यांना महाराजांसमोर इंग्रजी हद्दींत उभे करण्यांत येतील. आह्मांस उमेद आहे कीं, महाराज यापुढें कोणासही शिव्या देणार नाहींत.

## फिर्याद होणार.

छावणींत रहाणाऱ्या लोकांचे संबंधानें महाराज शिवाजीराव यांनीं दंवडी पिटविल्याची हकिकत मागील अंकीं दिलीच आहे. ज्या गृहस्थासंबंधानें महाराजांनीं दंवडी पिटली ते गृहस्थ अब्रुदार असून त्यांच्या

अब्रूची नासाडी करण्याचा महाराजांनीं प्रयत्न केला तो अन्यायानें केला व तसें करण्यास महाराजांस कोणत्याही प्रकारचा अधिकार पोंचत नाहीं वगैरेचा विचार होऊन, मि. शिवाप्रसाद नांवाचे त्या मंडळींतील एक वकील, बॅरिस्टरचा सल्ला घेऊन सरकारांत त्याची दाद लावण्याची व्यवस्था करण्याकरतां मुंबईस आले होते म्हणून कळतें. खरें असल्यास महाराजांनीं आपली चुक आपसांत दुरुस्त करून पुढें हें प्रकर्ण न जाईल अशी व्यवस्था केल्यास ठीक होईल, असें आम्हांस वाटतें.

## ताजी बातमी.

गेल्या महिन्याच्या २८ तारखेस सायंकाळीं महाराजांच्या हुकूमा वरून पांच पन्नास पोलिस, कोतवाल, पोलिस सुप्रिन्टेडेंट वगैरे लोकांची इंदूरच्या बजाजखान्यांत गर्दी होऊन ज्या वाणी लोकांची जप्ती केली होती त्यांच्या एकंदर मालाची मोजदाद करण्याचें काम महाराजांचे लेखी हुकूमावरून, त्यांनी चालविलें होतें. हा गर्दीचा व धामधुमीचा प्रकार ऐकून छावणींत असलेल्या त्या वाणी लोकांस फारच दुःख झालें व आतां आपलें सर्वस्वी नुकसान होऊन आपल्या व्यापारधंद्यावर चांगलीच ठोकर बसणार अशेंही त्यांस वाटलें. दिड महिना झाला, जप्त्या खुल्या होत नाहींत, छावणींतही सुनवणी होत नाहीं, महाराज निकाल करीत नाहींत आणि मध्येंच नुकसानी होण्याची मात्र वेळ आली आहे. आपली सर्व मालमत्ता जप्तींत असल्यानें देशावरचा अडत्यांचा माल अटकला व दुसरा व्यापारही बंद झाला. नित्य हजारोंचें नुकसान होतें. अखेर तक्रार करून ब्रिटीशसरकारचे मार्फत न्याय मिळाला तरी फार झालें तर जप्त्या खुल्या होतील परंतु नुकसानीचा मोबदला मिळणार नाहीं. हा सर्व विचार मनांत आणून इंदूरच्या सरकारी दुकानचे मुखत्यार श्रीकिसन भगवान जे अहित त्यांच्या मार्फत सहा वाणी लोकांनीं महाराजांस शरण जाऊन, गिरणींतील माल जो पूर्वी आठ आणे एक पै रत्तलाच्या भावानें घेतला होता तो आठ आणे नऊ पैच्या भावानें चार लाखांचा माल केवळ महाराजांच्या मर्जी करतां घेण्याचें कबूल केल्यावरून, त्यांच्या जप्त्या खुल्या करण्याचा महाराज साहेबांनीं हुकूम दिला. त्याप्रमाणें त्या सहा सावकारांच्या जप्त्या खुल्या झाल्या. आतां त्या वाणी लोकांस दरबार वगैरे होऊन कपडे वगैरे देणार असल्याचें कळतें.

आधीं लात मारून मग पायां पडावयाचें तशांपैकींच हा प्रकार ह्मणावयाचा. यांत महाराजांनीं आपला हजारों रुपयांचा फायदा करून घेतला एवढें झालें. वाणी लोक विचारे करतात काय? तोंड दावून बुक्क्यांचा मार, अशी राजनीति शिवाजीराव महाराजांजवळ चिकटून बसली आहे.

## कायम आहे.

अमोलकचंद जो सातवा सावकार त्याची जप्ती अद्याप कायम आहे. थोड्या दिवसांत तीही महाराजांस उठवावी लागेल. पण त्या संबंधानेंही अमोलकचंदनें अशाच प्रकारें महाराजांस शरण जावें वगैरे खटपटी झाल्यावर ती उठेल असें अनुमान आहे. आह्मीं ह्मणतों कीं, महाराजांस शरण गेल्यापासून कांहीं कमीपणा नाहीं. कारण, आपला तो वेडा, जुलूमी, क्रूर असला तरी राजा आहे, धनी आहे, कांहीं प्रजेचा पालक आहे आणि आपणा सर्वांस अशा खुळ्या राजाबद्दलही अभिमान आहे; तेव्हां विलंबावर न टाकतां ठेवकरच व्यवस्था होऊन अमोलकचंदही संकटांतून मुक्त होईल अशी आशा करतों. महाराजांचे मर्जिकरतां जी थोडी बहुत नुकसानी सोसावी लागेल ती सोसून, चोराच्या तडाख्यांतच आपण सांपडलों असें समजून, त्यांचें दुःख त्यांनीं विसरून जावें.

## राजिनामे दिले.

रा. ब. खंडेराव चिमणराव वेदरकर कारभारीसाहेब इंदूर यांनीं आणि राय नानकचंद व लालाबिहारीसर यांनीं राजिनामे दिल्याचें कळतें. या त्रिवर्गांपैकीं रायनानकचंद यांनीं राजिनामा दिल्याचें मागेंच कळविलें आहे. कारभारी साहेब वाड्यांत जात नाहींत व त्यांनीं आपलें सामानसुमानही रवाना केल्याचें कळतें. हे त्रिवर्ग हुशार, पोक्त, अनुभवी, शहाणे असे असल्यामुळें शिवाजीरावमहाराजां सारख्या अन्यायी राजा जवळ यांनीं आजपर्यंत नोकरी केली हेंच जास्त आहे. आतां कोण कारभारी होतात पहावें.

## इंदूरच्या मित्राकडून.

इंदूरसंबंधानें विक्षिप्त पत्रांत उघड उघड मजकूर येत चालला आहे तरी आमचे महाराज काडीइतका आपला पाय मागें घेत नाहींत. रेसिडेन्सींतून ज्या कामांत अधिक जोर पोंचतो तेवढें काम मात्र त्या वेळे पुरतें केल्यासारखें दाखवून, साहेब बहादुरांना राजी करतात. बाकी महाराजांचा नित्य क्रम चालूच आहे. शहरांतील लोक अगदीं

त्रस्त झाले असून नित्य एक दोघांस ,महाराज शिवाजीरावांच्या भीती मारपीट केल्याशिवाय व दुसऱ्या मुळें आणि त्यांनीं एक दोन गुरवांस मनःकल्पीत शिक्षा दिल्यावांचून एक दिवसही जात नाहीं. पुणें शहरांत हिंदु मुसलमानाच्या झगड्याकरितां बाजे, वाजंत्रें वगैरे बंद अमून आमच्या इंदूर शहरांत महाराजांची व त्यांच्या प्रजेची आदावत पडल्यामुळें त्यांच्या सुखाच्या व आनंदाच्या सोई ह्मणून जेवढ्या आहेत, त्या महाराजांस बिलकूल आवडत नाहींत, त्यामुळें लोकांचे येथील कार्य प्रयोजनांत आनंदोत्पादक ज्या ज्या ह्मणून गोष्टी व्हावयाच्या ( नाच रंग तमाशे ) त्या तर बंदच आहेत परंतु नुस्तें वाजंत्र वाजविणें मुद्दां लोकांनीं बंद केलें आहे. नुसत्या टाळ्या वाजवून लग्न, मौंजी, उरकून घेतात. कोणी जवळपास उज्जन, ओंकारेश्वरीं जाऊन कार्य करितात. त्यांत उज्जनीस जाणेंही पसंत नाहीं. व तें किती धोक्याचें ह्मणें पुढें केव्हां तरी कळवीन. तशांत उज्जन, देवास, धार या तीन्हीं शहरांशीं आमच्या महाराजांची आदावत पडली आहे.

इंदुरास वाजंत्र्यांचीं घरें सहासात आहेत, फारतर १० असतील. त्यांना एका क्षणाचीही फुरसत गेल्या पांच वर्षां पूर्वी मिळत नसे. परंतु समक्ष बोलावून 'तुम्हीं पंडत लोकांकडेस फार बाजे वाजाविण्यास जातां' एवढाच त्यांचेवर आरोप लादून त्यांस मारपीट व उठाबशा करण्यास लाविल्यामुळें, तेही कोणाकडे जात नाहींत व लोकही बनेल पावेतों वाजंत्र्यांना बोलावित नाहींत. यामुळें गुरवांचा धंदा बंद झाल्यासारखा अमून कोणीं तंबाखू विकतात, कोणी मजूरी करतात, कोणी इतर कांहीं कामें करतात अशी त्यांची चमत्कारिक स्थिती झाली आहे.

गांवांत गाणाऱ्या रामजन्या पांच पंचवीस होत्या. त्यांत चांगल्या नसिद्ध व घरंदाज आणि चांगल्या लोकांत ज्यांचा विशेष वापर अशा ज्या:—एक बाटेवाली आडनांवाची, जिची इंदुरास ९ हजारांची हवेली आहे तिला व दुसरी तानी—ही तानी तुकोजीराव महाराजांनीं एक राधा बडोदेवाली ह्मणून नाटकशाळा ठेविली होती तिची मुलगी; तिसरी चुन्नामहूवाली व आणखी एक दोघी यांना आज तीन वर्षांपासून महाराजांनीं इंदुरांतून काढून दिलें होतें. परंतु पुन्हां गेल्या मोहरमच्या दिवसांत महाराजांची लहर लागल्या

वरून त्यांस एकदम तार करून इंदुरास बोलावून घेतलें. तात्पर्य, त्या रामजन्यास काढून दिल्यामुळें चांगल्या हिंदु लोकांतील गाणें बजावणें तर बंदच झालें. आतां त्यांना बोलाविलें आहे तरी, ज्या कारणां करितां त्यांना काढून दिलें होतें तें कायमच असल्यामुळें त्यांच्या येण्याचा कांहींच उपयोग नाहीं.

या महाराजांच्या विचित्र प्रकृतीमुळें नित्य नवी मेहेरबानगी व नवी नाराजी लोकांवर होत असल्यामुळें, कित्येक लोकांच्या दरम्यानच्या सोयरिकाही मोडल्या गेल्या. आपली मुलगी कोणाकडेस द्यावी व कोणाची आपल्याकडेस करावी या बद्दलही लोकांस फार आतां अडचण झाली आहे. व कांहीं लोकांस तर तुम्हीं अमुक गृहस्थाची मुलगी करूं नका, अमुक गृहस्थाकडे देऊं नका, अशी प्रत्यक्ष महाराजांनीं ताकिदही दिली आहे.

महाराजांचा वाडा मध्यवस्तींत आणि सर्वांत उंच असा असल्यानें वाड्याच्या आसपासच्या चोहों बाजूच्या दोन दोनशें घरांचा नित्यक्रम वगैरे बसल्या बसल्या महाराजांस कळतो. त्यामुळें कोणीं कोणाचे घरीं जाणें, जेवण करणें, बोलत बसणें, पाहुणे येणें, दुःखाचे प्रसंगीं रडणें, सुखाचे वेळीं हसणें, मंत्र जागरण करणें, कथा कीर्तन करणें इत्यादि गोष्टी महाराजांचे त्रासामुळें एक अष्टमांश देखील या शहरांत हल्लीं राहिल्या नाहींत. इंदूर शहरांत बारमहा कथा कीर्तनें बाहेरून येणाऱ्या हरदास बुवांचीं चालू असत. ब्राह्मण मंडळींचा विशेष भरणा झटला झणजे कृष्णपुरा, इमली बाजार, आडवा बाजार, जुना तोफखाना, या ठिकाणीं असल्यामुळें, कोणताही कीर्तनाचा प्रसंग इमली बाजारांतील बालाजीच्या मंदिरांत होण्याचा नेहेमीं सांप्रदाय आहे. त्या मंदिराच्या अगदीं जवळ नवा राजवाडा आल्यानें आतां तेथें समुदाईक कीर्तन मुळींच होत नाहीं. एखादे वेळेस झालें तरी फार थोडे लोक येतात व लवकर आटोपतात. ह्या मंदिरांत दोन हजार मनुष्यें बसण्याची जागा आहे. तथापि महाराजांच्या क्रूर स्वभावामुळें मंडळी एकत्र होत नाहीं. कोणीही दोन चार मनुष्यांनीं एकत्र होऊं नये हा मुख्य हेतु व दुसरा लोकांस त्रास देण्याचा असा असल्यामुळें, जास्त लोक जमण्यास भितात. एकदां एक परमहंस साधू ज्याचें अखंड मौन्यव्रत व केवळ लंगोटी वांचून ज्याची दुसरी इस्टेट नाहीं,

तीन रोट्या स्वतः भिक्षा मागून आणून खाणारा असा गांवाबाहेर एका आंब्याच्या झाडाखालीं रात्रंदिवस राहाणारा आणि लोक त्यास मौनीबुवा असें म्हणत असत, अशा त्या अत्यंत निरुपद्रवी साधूस, लोक त्यांच्या दर्शनास जातात म्हणून, तेथून निघून जाण्याचा महाराजांनीं हुकूम दिला. व त्याप्रमाणें तो गेला आणि देवलोकही झाला. तात्पर्य, ब्रिटीश राज्यांतील प्रजेप्रमाणें नसो परंतु नेटीव संस्थानांतील अत्यंत जुलमी व रानटी राज्यांतील प्रजेच्या एक शतांशानेंही इंदूरच्या प्रजेस स्वातंत्र्य हल्लीं नाहीं. आणि याची सुधारणा प्रस्तुत महाराजांच्या अस्तित्वांत व अधिकारांत होणेंही नाहीं अशी सर्वांची खात्री झाली आहे.

---

## सूचना.

**एक्स० बाय० झेड् यांस,**

आपल्याकडून आलेली यादी पोंचली. आपण ज्या विशेष सूचना केल्या त्या अक्षरशः आम्हीं मुळापासून पूर्णपणें जाणूनच दुकानचें काम चालविलें आहे. त्याविषयीं आपण काळजी न करतील. आमच्या अडत्याकडून एखादी भूलचुक झाली तर ती कोणीही लक्षांत आणूं नंय व तशी न होण्याची काळजी घेऊन आम्हीं व्यवस्था करीत आहों. सट्टेबाजीसारखा हा व्यापार नाहीं. माल तोलणें तुलावाण्याचा आहे याकरितां यास भरपूर पुंजी पाहिजे. आपणही मदत देणार आहांत व आमचे जवळही हवी तितकी आहे. आणखींही मिळविण्याची तजवीज करीत आहों.

मागचा तोच क्ष.

## चुकीची दुरुस्ती.

यादवराव भैयाचे सासूस महाराज शिवाजीराव होळकर यांनीं गाडींत घालून छावणींतून नेली वगैरे मजकूर गतांकीं आला आहे, त्या ठिकाणीं **फक्त मुलास गाडींतून नेला व सासूबाई थोडे दूरपर्यंत गाडीबरोबर गेल्या** असें समजावें. सासूबाई गाडींतून गेल्या नाहींत. मुलगा गाडींत बसलेला ज्यांनीं पाहिला त्यांची तशी समजूत सासूबाईबद्दलही झाली. परंतु ती चुक असल्याचें समजल्यावरून आम्हीं वाचकांसही आपला समज बदलण्याबद्दल आज कळवितों.

---

## नंबर ८.

(विक्षिप्त अंक ४५ ता. १० आगस्ट ९५)

कोणतेंही काम हातीं घेतल्या नं-

तर त्याची शहानिशा होईपावेतों त्याचा पाठलाग करणें जरूर आहे. तदनुसार आह्मीं प्रस्तुत हातीं घरलेल्या जुलूमी संस्थानिकाचे क्रूर कृत्यांचें प्रदर्शन आमचे वाचकां पुढें मांडण्याचें चालविलेंच आहे. त्यांत ज्या बातम्या, जे अन्याय, जे जुलूम आह्मीं प्रसिद्ध केले व करीत आहों ते प्रसंगोपात सप्रमाण सिद्ध करण्यासही आह्मीं तयार आहोंत. व जे अक्कलवान आहेत त्यांच्या लक्षांतही येऊन चुकलेंच असेल कीं, पुरावा जवळ असल्याशिवाय, शिवाजीराव होळकरां सारख्या बड्या राजाचीं दुष्ट कृत्यें उघड करण्याचें कोणींही धाडस करणार नाहीं. महाराजांचें वर्तन सुधरावें, त्यांनीं आपल्या प्रजेस प्रिय व्हावें, न्यायानें व राजनीतिनें त्यांनीं आपलीं अधिकार सूत्रें चालवून कोणावरही जुलूमानें आग पाखडूं नये असा आमचा हेतु असून, निर्धास्तपणें आह्मीं आरंभिलेलें प्रदर्शन मांडीत चाललों आहोंत. यांत कोणत्याही प्रकारचा द्वैतभाव नाहीं हें समंजस असेल तो तेव्हांच ह्मणेल, हें ध्यास आहे. खुद्द महाराज शिवाजीराव होळकर मुद्दां यत्ता वहकलेल्या मार्गांतून सोडविण्याचा प्रयत्न करील आणि करतो अमतीस असा आमचा समज आहे. खचित् समजावें. मराठी मजकूरानें विक्षिप्तांत लेख आल्याप्रमाणें महाराजांचे हातून जर कृत्यें घडलीं नसतीं तर त्यांनीं लगेच त्याचा प्रतिकार ही केला असता. अथवा या साऱ्या गोष्टी खोट्या आहेत वगैरे मजकूर खुलासेवार तरी कळविला असता. ज्या अर्थीं तसा कांहीं प्रकार आज पर्यंत झाला नाहीं त्या अर्थीं प्रसिद्ध झालेल्या सर्व गोष्टी खऱ्याच आहेत असें ठरतें.

मराठी पत्रांत ओरड झाल्यानें आपलें कांहीं देखील वांकडें व्हावयाचें नाहीं असा महाराजांचा समज असल्यास तो चुकीचा आहे; आणि तसा तो असल्याबद्दल महाराजांची लवकरच खात्री होईल असेंही आह्मीं त्यांस कळवितों. आपल्या दुष्कृत्यांवर इंग्रजी पत्रांचें झांकण आहे असें महाराजांनीं समजणें वाजवी नाहीं. तसाच वेडा वांकडा अशा प्रकारचा समज करून, आपली दुष्ट कृती दिवसेंदिवस जास्त प्रमाणावर चालू ठेवणें हेंही मुळींच हितकारक होणार नाहीं. जो पत्रकार खऱ्या अंतःकरणापासून व कळकळपूर्वक महाराजांना चुकलेल्या दिशेंतून अविचिप्तांतील लेख खरे असून आपल्या दुष्कृत्यांबद्दल दुःख मानीत तो हवे तितके उपाय योजील हें

तेव्हां कांहीं वळत नाहीं अथवा शिवाजीराव शुद्धिवर येत नाहींत असें खात्रीपूर्वक त्यास वाटेल तेव्हां तो इंग्रजी मजकूरानें आपलें कर्तव्य बजावण्यास कमी करील काय? मुळींच कमी करणार नाहीं. परंतु आपल्या महाराजांची झोटिंगी कारकिर्द इंग्रज लोकांपुढें मांडून त्यांनीं त्याचहल ओरड करावी आणि अशा बड्या जुलूमी महाराजांचा धिक्कार करून त्यांची झटपट उचलबांगडी करण्याचे प्रयत्नास लागावें हें अखेरचें कृत्य आहे असें आम्हीं समजतों. जों पर्यंत इलाज दिसतो आहे तों पर्यंत तसें करणें रास्त नाहीं.

कित्येक पत्रें जीं महाराजांचीं स्तुती स्तोत्रें गाऊन पुढें पुढें उडचा मारीत आहेत तीं महाराजांच्या अन्यायी वर्गातलींच आहेत असें ह्मणण्यास आम्हीं मुळींच डगमगत नाहीं. कोणत्याही प्रकारें तपास न करतां आम्हीं यंव केलें आहे, त्यंव केलें आहे अशी कोरडी शेखी मिरवून, आपल्या वात्रटपणाची कमाल करून दाखविणें चांगलें नाहीं. ज्याला पोटभर अन्नसुद्धां मिळण्याची पंचाईत अशा एखाद्या उपटसूळ बाणकोड्यानें निर्लज्जपणानें महाराज होळकरच्या जुलूमी कृत्यांविरुद्ध पोवाडे गाण्याचें आरंभून आम्हीं मुद्दाम वातमीदार पाठविला आहे ह्मणून पांच पन्नासां पुढें सांगणें, किती खरेपणाचें ठरेल हें वाचकांनींच पहावें. ज्याला कोणत्याही प्रकारची शरम नाहीं त्याला खोव्या कंड्या पिकविणें सहज साधतें. लांगूलचालनादि प्रकार असल्या हलक्या जातीला सुरेख साधतात, असल्या मूर्खांचे बडबडीकडे दुर्लक्ष करणेंच चांगलें.

बडोदावत्सल पत्रांत देवास यथील कोणी 'म' नांव धारकानें विक्षिप्त व पुणेंवैभव या दोन पत्रांतील इंदूर संबंधाच्या लेखावर कांहीं कुरकुर मांडली आहे. महाराजांची बाजू घेऊन लिहीत असतां देखील या बेड्याला आपलें खरें नांव उघड करण्याचें धाडस होत नाहीं, तेव्हा याच्या पत्राच्या खरेपणा बद्दल जबर शंका आहे. तशांत ढोंगी नामधारक आपल्या पत्राचा उत्तरार्ध लौकरच प्रसिद्ध करण्याचें आश्वासन देत आहे तेव्हां पुढें याच्या मुक्तांतून वाक्सें काय निघतात तीं पाहून, एक चरचरीत कोरडा या स्वारीला लगावण्याचा आमचा मानस आहे; तोंपर्यंत याकडे कानाडोळाच करणें रास्त दिसतें.

## महाराजांस सूचना.

आमचे होळकर महाराज यांनीं

मोंगलाईस लाजविणारें वर्तन चालविलें आहे त्याबद्दल प्रत्येक अंकांत आम्हीं फाडा वाचीत आहोंत परंतु त्याचा महाराजांचे मनावर यत्किंचित्ही सुपरिणाम होत नाहीं, उलट वाईट परिणाम होतो; म्हणजे ते आमच्या सुबोधामुळें लोकांस अधिक पीडा देऊं लागतात. तेव्हां आमच्या बोधाच्या उलट वागण्याचा त्यांचा शोंक दिसतो, म्हणून आम्हीं त्यांस आतां उलट बोध करतों तो असाः—महाराजांस एखादा मनुष्य अपराधी वाटतांच त्या मनुष्याच्या आडनांवी माणसासही महाराज छळतात. उदाहरणार्थ, आंबेकर नांवाच्या मनुष्यावर महाराजांची अवकृपा झाली तर सर्व आंबेकरांस त्याचें प्रायःचित्त मिळतें. जर असा प्रकार चालू आहे तर त्यांत महाराजांनीं थोडीशी सुधारणा करावी; ती अशी कीं, आंबेकर याचे दोन भाग करून पहिला भाग आंबे ( झाडें ) व कर ( हात ) हा अर्थ मनांत आणून नितकीं आंब्याचीं झाडें इंदुरांत अथवा त्या इलाख्यांत असतील तेवढीं सर्व तोडावीं, तसेच हात सर्व तोडावे आणि त्यांस एकत्र करून आंबेकरां बरोबर कारागृहांत टाकावे म्हणजे बहार होईल. ही नवी युक्ती महाराज अमलांत आणतील तर हरदास लोकांना कथेंत नकल करण्यास देखील ही गोष्ट उपयोगी पडेल. पहावें महाराज काय करतात तें !

## कठीण प्रसंग.

महाराज शिवाजीराव होळकर यांच्या जुलूमी कृत्यांचा वर्तमानपत्रांतून इतका बोभाटा होत असून एका कुत्र्याची सुद्धां त्यांच्यावर प्रीती नाहीं. सर्व लोकांचीं मनें दुःखी झालेलीं आहेत. राज्यांत कोणीही असा मोठा आफिसर किंवा सरदार, जमीनदार, जाहागिरदार नाहीं. कीं, त्यांच्यावर एखादा प्रसंग आला असतां तो उपयोगी पडेल व लोकांस त्यांची भीड मुर्वत पडून लोक त्यांच्या विरुद्ध जाणार नाहींत आणि करतील ती मदतच करतील; हें स्वप्नांत देखील मनांत आणावयास नको.

## शत्रुस्थानीं समजतात.

महाराज आपल्या आसपैकीं मनुष्यांस शत्रुस्थानीं समजतात. त्यांच्या उभयतां सापत्न आया व त्यांचा वंश यांच्या पेक्षां शत्रुस्थानीं जबर दुसऱ्या कोणासही ते समजत नाहींत. महाराजांच्या चारपांच राण्या आहेत, त्यांची महाराजांचे ठिकाणीं नैसर्गिक प्रीती असलीच पाहिजे. परंतु लोकांस त्रास देण्याचे कामांतून व दिवसरात्र गांवांत भटकत फिरण्याचे

कामांतून महाराजांस फुरसत होऊन ते राण्यांकडेस जाऊन त्यांना संतोष होण्यासारखें आपलें वर्तन ठेवीत असतील असेंही दिसून येत नाहीं. ज्या ऐवजीं त्रास देण्याचा महाराजांचा स्वभाव आहे त्यामुळें त्यांनाही त्रास होत नसेल असें म्हणण्यास मोठी शंका आहे. वेळीं त्रास होत आहे असें म्हटलें तरी चालेल.

## प्रयासानें आले.

महाराजांचे प्रत्यक्ष काका सर काशिरावदादा यांच्या प्रीती वद्दल तर विचारावयासच नको. मोठ्या नवसानें आणि फार प्रयासानें त्यांचें इंदुरास येणें झालें आहे. त्यांच्याशीं कोणत्याही प्रकारें महाराजांचें चांगलें वर्तन नाहीं. त्यांना आपल्या शत्रु पैकींच एक समजत असल्यामुळें प्रसंगोपात त्यांचाही उपयोग होणें नाहीं असें दिसतें.

## जांवई, शालक मंडळी.

आतां महाराजांची जांवई, शालक मंडळी राहिली; त्यांच्या संबंधानें विचार केला तर तोही वरील प्रमाणेंच आहे. त्यांच्यावर पुष्पवृष्टी, मंत्राक्षता ( शिव्यांच्या बरें ) पडतच असतात. एकदां गावंडे शालक निघून गेलेच होते. एक वेळेस मोठे जांवईही निघून गेले होते. सासरे मंडळीची पूजाअर्चा चालूच आहे. गेल्या आठवड्यांत भोजनाचे वेळेस रागांत धाकट्या जांवयास चिमटा किंवा चमचा मारल्यामुळें तो उताणा पडला व छाती जवळ थोडें रक्तही निवाल्याचें कळतें. ही स्थिती यामंडळीची आहे. आतां राहिल्या मुली. त्या मुळींच हिशेबांत धरण्या सारख्या नाहींत. अशा प्रकारचा आप्तां बरोबर झांडगाईचा प्रकार आहे. यांत प्रेमाचा अंश किती आहे याचा वाचकांनींच विचार करावा.

## प्रकरणें पडलीं आहेत.

वरिष्ट सरकारा कडून नेहेमीं कडक रितीनें ताकिदी येतात व विचारपूस होते. त्यांचे जवाब देण्याचीं प्रकरणें दरबारांतून महाराजांकडेस जाऊन पडलेलीं पुष्कळ आहेत. महाराजांशिवाय कोणींही त्या प्रकरणांचा जवाब देऊं शकत नाहीं. कारण, जबाब देण्यास साधनच नाहीं अशी स्थिती झाली आहे. एवढ्या थरास येऊन पोंचलेल्या स्थितींतही नित्य नव्या अन्यायांची आणि जुलूमाची भर पडतच आहे.

## दोघे कैद केले.

प्रतिवर्षीं इंदुरास नागपंचमीचा मेळा छत्रीबागेंत भरत असतो. ४० । ५० हजार मनुष्यांचा जमाव त्या मेळ्यांत जमतो. तेथें मराठ्यांच्या स्त्रिया एकत्र जमून गाणीं म्हणत

असतात. तो समुदाय पहाण्यास सरदार, कामदार वगैरे मंडळी कोणी हत्तीवर, कोणी घोड्यावर, कोणी बर्गीतून असे थाटानें जात असतात. महाराज सरकारचीही स्वारी जाते. त्याप्रमाणें यंदां गेल्या २६ तारखेस शुक्रवारीं महाराजांची स्वारी हत्तीवर बसून मेळा पाहण्या करितां चालली असतां, एका मराठ्यावर सरकारची दुष्ट नजर गेली. लागलीच त्याला व त्याजबरोबर जो दुसरा मराठा हाता त्याला पकडण्याचा हुकूम होऊन, उभयतांसही कैद केले व कोतवालीवर पाठविलें, अस्तमानीं महाराज वाड्यांत परत आल्यावर त्या दोघां पैकीं एकास ज्याचें नांव द्वारकूजीराव शिंदे असें आहे, त्यास समक्ष बोलाविला आणि शिव्या देण्यास आरंभ केला. द्वारकूजीराव शिंदे हा इसम अब्रुदार आणि सशक्त असल्यामुळें त्यानें 'तोंड संभाळून बोला' म्हणून महाराजांस सांगितलें, त्याचे एवढे शब्द तोंडांतून निघतांच दोन चार हुजऱ्यांनीं त्याच्या कमरेस लपेटून त्यास यथेच्छ मार दिला वगैरे ठरींव सोंहाळे त्याचे सर्व झाले. पुढें त्यास कोतवालीवर परत पाठवून दिलें. नंतर त्याच्या कोणी आप्तांनीं रेसिडेन्ट साहेबांकडेस तार वगैरे केली म्हणतात, त्यावरून किंवा महाराजांची लहर फिरली म्हणून त्याप्र ता० ३० रोजीं सोडून दिला. व पुन्हां शहरांत न येण्याविषयीं त्याजपासून मुचलका लिहून घेतला. एकंदर तीन ठिकाणीं त्याचे मुचलके लिहून घेतले, तेव्हां तो अटकेंतून सुटला. पुढें तो छावणींत निघून गेला व बडे साहेबांकडेस अर्ज वगैरे करणार आहे म्हणून कळतें.

### करमळकरांवर धाड.

गणपतराव सिताराम यांचे चिरंजीव नानासाहेब यांस हिंगळाजगडास जाऊन रहाण्याचा हुकूम झाल्याचें मागें कळविलेंच आहे. त्यांच्या संबंधाचा तो हुकूम कायम असून त्यांचे आत करमळकर म्हणून कोणी आहेत. या करितां करमळकर आडनांवाचे जेवढे इंग्रज इलाख्यांत नोकर असतील त्या सर्वांस नोकरींतून बजा करावे असा नुक्ताच हुकूम झाला आहे. सध्यां बजा करण्याचाच हुकूम झाला आहे परंतु पुढें पहावें आणखी काय होतें तें.

### रावबहादुर वेदरकर.

कारभारी साहेबांनीं राजिनामा दिला व त्यांनीं आपलें सामान सुमानही इंदुरांतून रवाना केलें आणि स्वतः निघण्याचे तयारींत आहेत. परंतु महाराजांनीं त्यांचेवरही आपलें जुलूमी शस्त्र सोडल्याचें ऐकण्यांत

येतें. महाराज ह्मणतात कीं, 'मु-ळच्या करारा पेक्षां ५०० रुपये पगार जो आह्मीं तुह्मांस अधिक दिला आहे तो ४ वर्षांचा परत द्या, सा वांचून तुमचें जाणें हो-णार नाहीं.' या बोलण्या वहल म-हाराजांच्या व बेदरकरांच्या दरम्यान झगडा चालू आहे. हा असा परि णाम होण्यास बेदरकरांचा सहनशी-लपणा व शांतपणा आणि कृतज्ञ-पणाच कारण झाला आहे. प्रथम पासून गैरकायदेशीर कोणचाही हुकूम महाराजांचा येतांच कारभारी साहेबांनीं परत करावयाचा होता. तो तसा न केल्यामुळें त्यांचें रहावें तसें वजन महाराजां जवळ राहिलें नाहीं, त्याचा हा परिणाम झाला आहे.

## चांगलें कृत्य केलें नाहीं.

कॉलेज स्थापन करण्याखेरीज दुसरें कोणतेंही कृत्य इंदूर रयते संबंधानें महाराजांनीं चांगलें केलें नाहीं. का-मवाले चांगले ठेविले नाहींत. कोणा-चा कोणास दर्प न राहिल्यानें ज्या-च्या मनास वाटेल तसें तो काम करूं लागला. वरिष्ठानें खालच्या नोकरास जरा कांहीं दाब दडप नास्त केली कीं तो चालला उठून महाराजांकडे. सांगितल्या कांहीं खोट्या नाट्या चुगल्या, आणि त्या ऐकतांच झाले हे उद्धूराव मस्त. महाराजांना असल्या गोष्टींची पड-ली आवड मोठी. कोणावर तरी कांहीं आफत यावी, आणावी व चांगल्या मनुष्यावर आली तर विशेष संतोष, अशी खुद्द महाराजांची दुष्ट वृत्ती असल्यामुळें, कामाकाजांत ताब्यां-तील नोकर आफिसरांकडून पूर्वी प्रमाणें कामें चालत नाहींत व त्या मुळें रयतेचें फार नुकसान होत आहे, अशा विषयीं पुष्कळ उदाह-रणें लेखी दाखवितां येण्याला आह्मीं सामर्थ्यवान आहोंत. विचारणारा मात्र कोणी नाहीं या बद्दल फार खेद होतो.

## व्यवस्थेशीर युक्ती.

या महाराजांचे हातपाय मांय-ल्या वांचून व खजिन्या वरील यांचा हुकूम बंद झाल्यावांचून इंदुरास जुडी-शियल संबंधी जे कायदे केले आहेत व रेव्हिन्यू संबंधानें जे नियम आहेत त्याप्रमाणें कधींही काम चालाक्याचें नाहीं. व तसें करण्यास वरिष्ट सर-कारास जीं कारणें लागत असतात त्यांचे शंभरपट या महाराजां कडून घडलेलीं व सध्यां घडत आहेत. मग सरकार कशाची वाट पहातें कळत नाहीं.

## महाराजांचे लेखी हुकूम.

सखाराम पगडबंद व गोपाळराव तारे पळून गेल्याबद्दल पुष्कळ लो-

कांस कैदेंत घातले वगैरे मनकूर पूर्वीच प्रसिद्ध झाला आहे. त्या संबंधांत महाराजां कडून पोलिस सुप्रिन्टेंडेंट व मिनिस्टर यांस जे लेखी हुकूम दिले गेले त्यांपैकी कांहीं हुकूमांतील मनकूर खालीं लिहिल्या प्रमाणें:—

१ ला.

हुजूर चिठी नंबर २१८८ ता० १७ मे १८९९ ची; हुजूर आज्ञा झाल्यावरून लिहिण्यांत येतें कीं, सखाराम पगडबंद हा रमजानखां कान्स्टेबल याचे ताब्यांतून फरारी झाला. त्यानें आज सायंकाळ पावेतों सखारामास आणून हजर न केला तर त्यास सहा महिने सक्तमजुरीच्या कैदेंत ठेवावा. तसाच बळवंतराव मराठा याचाही पूर्वी सखारामावर पाहरा होता करितां त्यासही कैदेंत ठेवावा व त्याच्या ताब्यांत जितके दिवस सखाराम होता तितके दिवसांचा पगार त्यास दंड करावा व सखारामा कडेस रामभाऊ वकील जात येत असे, तो जुन्या तोफखान्यांत रहातो, त्याची वकिलीची सनदही रद्द करावी.

( सही ) नानाजी केशव.

२ रा.

हुजूरचिठी नंबर २२१९ ता. १८ मे ९९ ची. पोशाखा कडील येशवंतराव कारकून, नथुरंगरेज, ह्युरंगरेज, कृष्णराव बापूजी उर्फ तात्या केळकर ( तात्या केळकरांची विस्तृत हकिकत गेल्या अंकांत दिलीच आहे. ) यांना कैदेंत ठेवावे. आणि पोशाखाकडील गोपाळराव कारकून पळून गेला आहे याकरितां पर्शराम—पर्शराम हा इसम तुकोजीराव महाराजांचे वेळीं पोशाखाचा कारखानदार होता. पुढें हे राजेश्री गादीवर बसल्यापासून याचा पोशाखाचा संबंध सुटला. एवढेंच नाहीं पण पूर्वी होता याच अपराधा बद्दल कित्येक वेळां तो कैदेंत बसला व सुटलाही. परंतु यावेळेस गोपाळराव पळून जाण्यास ९ वर्षां पूर्वी त्याचा ह्या पोशाखाशीं संबंध होता हें कारण लागून तो कैद केला गेला.—आणि विनायकराव जो पूर्वी पोशाखा कडेस नोकर होता तो मिळून सर्वांस कैद करावे.

( सही ) नानाजी केशव.

३ रा.

हुजूर चिठी नं० २२२२ ता० १८ मे ची मिनिस्टर यांस:—गोपाळ लक्ष्मण तारे हा महाराजांची नोकरी सोडून पळून गेला. याचें कारण त्याचे आप्तवर्गांनीं त्याला तसें करण्यास सांगितलें असेल किंवा उतेजन दिलें असेल. याकरितां गोपाळ

लक्ष्मण तारे याचे सर्व आप्त पकडून कैदेंत वालावे म्हणून पोलिस सुप्रिन्टेंडेंट यांस हुकूम केला आहे, तें आपल्यास कळावें.

## ४ था.

हुजूर चिठी नंबर २२२९ ता० १९ मे ९९ ची; किसन शिंपी याचे दोन मुलगे पूर्वीच कैदेंत ठेविले आहेत. त्यांच्या पायांत बिड्या घालाव्या व खुदाबक्ष पिंजारा याच्या जवळ पिंजऱ्यांत त्यांना कैदेंत ठेवावे.

## अशीं शेंकडों आहेत.

वरील चिठ्यांप्रमाणें अन्यायी चिठ्या शेंकडों पाठवून हजारों लोकांस कैद केल्याचीं अशीं शेंकडों उदाहरणें सप्रमाण आहेत. ब्रिटिश सरकारचा अम्मल हिंदुस्थानांत झाल्यापासून आजपर्यंत जी सुधारणा झाली आहे व सांप्रत इंदूर सारख्या सुधारलेल्या देशांत प्रजेस जे हक्क मिळाले आहेत त्या मानानें वर दाखविलेलीं चारच उदाहरणें या महाराजांस अधिकारभ्रष्ट करून प्रजा सुखी करण्यास पुरे आहेत असें कोणाही न्यायी मनुष्यास वाटेल. मग इंदूरच्या रयतेच्या दुर्दैवानें सार्वभौम सरकारास न वाटेल तर उपाय नाहीं.

## दरबार कसले !

इंदूर संस्थानांत जुडीशिअल काम पहाणारे दरबार, कौन्सील हीं देखील आहेत, तेथें महाराजांचे असे जुलूमाचे केवळ दुष्टपणामुळें हुकूम होतात व ज्यांचे संबंधानें हुकूम झाले आहेत त्यांचा तिलप्रायही अपराध नसतां त्यांस महिनो गणती पुन्हां महाराजांची लहर लागे पावेतों कैदेंत बिड्या पायांत घालून बसण्याचा प्रसंग येणें व दुर्योधनाच्या सभे प्रमाणें इंदुरांतील आफिसर व दरबार, कौन्सील यांना तें सहन करणें भाग होणें हें हल्लींच्या मन्वंतरांत लोकांनीं व वरिष्ट सरकारनें तरी योग्य मानावें अमें न्यायप्रिय कोणी म्हणूं शकेल काय ? असल्या जुलूमी राज्यव्यवस्थेंत असलेलें दरबार तरी कसलें समजावयाचें ! !

## विनायकराव लोंढे.

या गृहस्थांची हकिकत गेल्याच्या मागील अंकीं कळविलीच आहे. त्यांनीं छावणींतील बडे साहेबांकडेस अर्ज केला व आंगावर असलेले वळ आणि सुजलेलें तोंड वगैरे साहेब बहादुरांस दाखविलें. त्यांनीं सर्व गोष्टीचें टिपण घेतलें आहे म्हणून समजतें. तीन चार दिवसांपूर्वी त्यां-

च्या घरीं महाराजांचे कुपेंतला एक अट्टल चुगलखोर—ज्याचें नांव आजच येथें देण्याचें विशेष प्रयोजन दिसत नाहीं, तो सकाळपासून जाऊन बसला व सुमारें ११ वाजतां पोलिस शिपाई वगैरे आणून त्यांच्या घरचीं माणसें मुलें इत्यादि सर्वांस पकडून इंदूर पासून चार मैलांवर हवा बंगला म्हणून आहे, तेथें महाराज गेले अस ल्यामुळें त्या सर्वांस तिकडे घेऊन गेले. विनायकरावाचे घरची कांहीं मंडळी जी त्यावेळीं घरांत नसून दुसरीकडे गेली होती त्यांस ही पकडा पकड समजतांच त्यांनीं परभारें छावणीचा आश्रय केला. व सर्व हकिकत फर्स्ट असि. क्याप्टन न्यूमार्च यांस सांगितली. इंदूरच्या लोकांनीं आपल्या दुःखाबद्दल इंग्रज सरकाराकडेस अर्ज केला असतां त्याचा परिणाम किती भयंकर होतो याचा हा एक मासला आहे. विनायकराव तर छावणींत सुरक्षीत आहेत. पण त्यांच्या मुलांबाळांचे हवा बंगल्यावर काय हाल होतील या काळजीनें विनायकरावानें अन्न खाणेंही सोडल्याचें समजतें. सध्यां बडेसाहेब बहादुर (एजन्ट गव्हनर जनरल) ग्वाल्हेरीकडेस गेले असल्यामुळें या दुःखाचें निवारण कसें व केव्हां होईल याची काळजी त्यांस पडली आहे. परम दयाळू अंतःकरणाचे बडेसाहेब इंदूर छावणीस लाभले असल्यामुळें छावणीचा आश्रय धरून राहिलेल्या लोकांस मोठा धीर आहे. तसा प्रकार नसता तर मोठी मुष्कील होती. साहेब बहादुरांना इंदुरच्या लोकांची जशी दया येते तशी ते महाराजांच्ये बाबतींतही जर आपली कडक नजर ठेवतील तर त्यापासून पुष्कळ हित होणार आहे. या आमच्या सूचनेचा साहेब बहादूर विचार करतील अशी आशा आहे.

## रिवाज आहे.

श्रावण महिन्यांत देवाचे मंदिरांतून झांकी व रोषणाई होण्याचा इंदुरास रिवाज आहे. तसाच देवास झोल्यांत व पाळण्यांत बसवून रात्रीचें नृत्य गायन वगैरे सर्व ठिकाणीं होत असतें. त्या प्रमाणें सध्यां मोठ्या भीतीनें व बेताबातानें रोषणाई वगैरे इंदूरच्या सर्व मंदिरांत होत असून भाविक लोकांच्या झुंडीच्या झुंडी रात्रीस हा देखावा पहाण्यास शहरांतून फिरत असतात. पुरुषांपेक्षां स्त्रियांचे थवे अधिक नजरेस पडतात असें आमचा बातमीदार कळवितो. त्यांत कित्येक भक्तिपूर्वक दर्शनाच्या हेतूनें येत असून कित्येक सावेल तोंवर आपली दुष्ट वासना तृप्त करण्याचे हेतूनें बाहेर पडतात.

प्रस्तुतच्या झोटिंगी कारकिर्दीत अशा प्रकारचे लोक इंदुरास फारसे झाले म्हणजे महाराजांच्या कृपेंतील होत. दुसरे जे अब्रुदार आहेत ते बहुतकरून बाहेर पडतच नाहींत, तरी देखील त्यांजवर आफतही येतेच.

## बलात्कार केला.

चालू महिन्याच्या पहिल्या तारखेचे रात्रीं एका मंदिरांत बऱ्याच नवयौवना अलंकृत होऊन देवदर्शनास गेल्या होत्या. त्या वेळीं महाराजांच्या अत्यंत प्रीतींतल्या त्यांच्या बाडिगार्डांपैकीं एका इसमानें एका बाण्याचे बाईवर बलात्कार केल्याची ओरड झाली. पुढें बाणीलोक जमून त्या घटिमाण बॉडिगार्डाचा धिक्कार करितात तोंच त्या उन्मत्त पशूनें जमलेल्या बाणी लोकांची पूजा करण्यास आरंभ केला. एकदम हो हो होऊन गेली. लोक पुष्कळ जमा झाले. तितक्या समुदायामध्यें घुसून त्या बॉडिगार्ड पशूनें आपल्या चुस्त चालाखीनें एक दोघां इसमांस पकडून वाड्यांत महाराजांसमोर ओढून नेले. या अनन्वित कृत्याची दाद लागेल अशा इराद्यानें त्या पशूच्या मागून दोन तीनशें बाणीलोक धांवत वाड्याकडे गेले. तोंच तो मस्तमल्हारी ओढीत नेलेल्या दोन इसमासह वाड्यांत शिरला. व ती धांदलीची बातमी महाराजां पावेतों पोंचली. परंतु सरकारस्वारी त्या वेळीं वेगळ्या रंगांत असल्यामुळें त्या धांदलीचा निकाल लगेच न करतां सर्वांस वाड्यांत बसवून ठेवण्याचा हुकूम दिला. त्यांतून लाग साधून कित्येक तर निसटून गेले आणि कित्येकांस रात्रभर कैदी होऊन तेथें बसावें लागलें. दुसरे दिवशीं महाराजांनीं तें प्रकर्ण आपल्या समोर बोलावून चौकशी करून बॉडिगार्डास **पंधरा थापडा** मारून घेण्याची सजा दिली व बाणी लोकांस चालू वहिवाटी प्रमाणें बोलावयाचें तें बोलून—मारपीट न करतां फक्त शिव्या देऊन—सिटीमाजिस्त्रेटाकडेस रवाना केले. सिटीमाजिस्त्रेटनें प्रत्येकाचा १६ रुपयांचा मुचलका घेऊन त्यांस तूर्त मोकळे केले आहेत.

## स्पेशलमंजुरी पाहिजे.

बॉडिगार्ड वगैरे सरकारचे प्रीतींतिल जी मंडळी आहे त्यांवर सरकारचे स्पेशलमंजुरी वांचून कोर्टांत काम चालूं नये असा ठराव असल्यामुळें, जितके सरकारच्या कृपेंतील लोक आहेत तितके या मूर्ख शिरोमणी राजासारखे जुलूम, अन्याय करण्यांत पटाईत आहेत आणि त्यांचा जेव्हां कोणाशीं संबंध

झडतो तेव्हां तेव्हां ते हरएक प्रकारें होईल. नुस्त्या ताकिदीवरच निभा-
हवानसा मुडे उगवून आपली मन वळें. मारपीट कोणास झाली नाहींसें
कामना तृप्त करतात व आपण ज· वाटत.
गली पशू पेक्षांही पल्लिकडचे प्राणी **दुसरी हजेरी.**
आहेंत असें आपल्या वर्तनानें लो· त्याच रात्रीं ( ता० २ मिनहू )
कांस भासवितात. अनेकांस असा दुसरा हुकूम सुटला कीं, राणीपुरा
अनुभव आला आहे. ताजें उदाहरण उर्फ शिवगंज–इंदूर स्टेशना जव-
वरील बलात्काराचें वाचल्यानें सं ळील जुन्या वसलेल्या आठीस महा-
शयास अगदीं जागा रहाणार नाहीं. राजांचें नांव दिलें असल्यामुळें त्यास

## हजेरीचा फार्स.

ता० २ मिनहू रोजीं महाराजां शिवगंज म्हणतात. या जुलूमी राजा-
ची स्वारी फिरावयास निघाली अ- च्या कारकिर्दीत नवीन वसाहात तर
सतां न जाणो कोणत्या कारणा नाहींच पण जुनी आहे ती कमी
वरून, पण असा हुकूम सुटला कीं, होऊन ओसाडीच अधिक झालेली
सायर चबुत्र्यापासून पंढरीनाथा पा- आहे, तेथील लोकांस हजेरी करतां
वेतों सर्व आळींतील लोकांस हजेरी बोलवावे. व त्याच वेळेस बुळ्यां-
करतां समक्ष हजर ठेवावे. त्याप्र- कडील नवे व जुने नोकर लोकही
माणें सर्व लोक हजर ठेवण्यांत आले. हजर ठेवावे. रात्रींचा समय होता
त्यांत कांहीं इसम स्वयंपाकाचा धंदा तरी तीन वाजल्या पासून खाने-
करणारे मद्रासी अय्याही होते. पैकीं सुमारी प्रमाणें पोलिसांची गडबड
कांहीं अय्यांना गालीप्रदानादिकां- सुरू झाली. तेव्हां जो तो बकासुरा
ची बक्षिसी देऊन त्यांस काढून पुढें जाण्याचा प्रसंग आल्या बद्दल
दिले. इतरांचीही तीच दशा झाली. चिंतातूर झाला. तेवढ्या रात्रीं कोणी
कित्येकांचे चेहेरे पाहूनच परत जोशाकडे जाऊन उद्यांचा दिवस
जाण्याचा त्यांस हुकूम झाला. जम- माझे भावास, मुलास, सुनेस्यास
लेली मंडळी सुमारें दोन हजारांवर कसा आहे ? आमचीं माणसें सुख-
होती. त्या सर्वांस जनरल ताकिद रूप रहातील का ? असें विचारूं
आणि सक्त समज देण्यांत आला लागले. कित्येक आम्हीं जावें कीं
कीं, लुच्चे लोकांच्या नादीं लागूं न जावें असें आपल्या विश्वासू इष्ट
नये; लागल्याम फार खराबी मित्रांस विचारूं लागले. अखेर कोणीं
संधी साधून पळाले व जे कित्येक

तेथं गेले त्यांची संख्या सुमारें चार-शेंवर होती ह्मणतात. हा सर्व फार्स पहांटचा समजावा. त्या हजेरींत कित्येकांस नुस्त्या शिव्या, कित्येकांस शिव्यांसह ताकिद, कित्येकांस नुस्तें हांकलून देणें याप्रमाणें दुपारचे बारा वाजेपर्यंत फार्स होऊन निकाल लागला. मागाहून बुळ्यांकडील मंडळीची वास्तपुस्त झाली. ती मंडळी सुमारें १९० होती. त्यांस दोन रांगेनें समोर उभे करून नीट रेखून त्यांची टेहेळणी महाराजांनीं केली, त्यांतून १५ इसम निवडून काढण्यांत आले. त्यांत प्रसिद्ध चार पांच इसम होते. बुळ्यांचे घरांत एक मोठा नामांकित, चांदभाई नांवाचा कारभारी होऊन गेला त्याचा थोरला जांवई ६० वर्षांचा ह्मातारा त्या वावटळींत सांपडला गेला. त्यानवर महाराजांचे बेवकूबपणामुळें चमत्कारिक अपराध लागू होऊन त्यास दीडतास पावेतों उठाबशा काढण्यास लाविलें. दुसरा याचा साडू होता त्यासही अशीच उठाबशा काढण्याची शिक्षा मिळाली. तिसरा चवथा वगैरे निवडून काढलेल्या लोकांस अशाच प्रकारची सजा होऊन कोणास बेशुद्ध होईपर्यंत मारही देण्यांत आला व कोतवाली पिंजऱ्याची मरतीही करण्यांत आली.

## एका बाईचे उद्गार.

वरील हकिकतीसंबंधानें दोवे इसम आपसांत बोलत असतां जवळचे रस्त्यावर एक मुसलमान बाई उभी होती. तिला भिक्षेकरीण समजून बोलत असलेल्या इसमांनीं तेथून तिला जाण्यास सांगितलें. तेव्हां ती मोठ्या दुःखानें ह्मणाली, 'बाबा, मी भिक्षेकरीण नाहीं. माझा मुलगा एकच्याएक असून तो आजच्या हजेरींत गेला आहे. त्याचे 'तो मेला सत्यनाशी' काय हाल करतो कोण जाणे! मी या काळजींत येथें उभी आहें. माझा मुलगा अशक्त असल्यामुळें त्याच्यानें उठाबशा काढवणार नाहींत.' हें तिचें भाषण ऐकून त्या इसमानें बुळ्यांकडील नोकरांची हजेरी आहे, त्यांत तुझा मुलगा आहे काय? ह्मणून तिला विचारलें. तिनें त्यांत तो नसल्याचें सांगून 'मोतपडा' एवढे शब्द उच्चारून ती तेथून निघून गेली.

## टिबल्याबावल्या.

ता. ४ मिनहूरोजीं सायंकाळीं शिवाजीराव महाराजांची स्वारी छावणींत गेली, तेव्हां महाराजांनीं टिबल्याबावल्या केल्याची हकिकत आली आहे ती अशीः—फकीरचंद नांवाच्या एका व्यापाऱ्याचें छावणींत

कापडाचें दुकान आहे. त्याचे दुकानीं नारायणराव गणपुले वकील, शिवप्रसाद वकील, फकीरचंद व त्याचा मुलगा, दुसरे कापड घेण्याकरितां आलेले बटालियनचे सात आठ शिपाई असे बसलेले महाराजांनीं पाहिले. त्यांना पहातांच चार दोन दुकानें पुढें गेलेली गाडी लगेच पाठीं फिरविली. आणि पुन्हां फकीरचंदचे दुकानावर येऊन बसलेल्या वकील मंडळींकडेस पाहून वेड्यावांकड्या कांहीं टिवल्याबावल्या करून दाखविल्या. डोळे मिचकावले आणि अशा चेष्टा करीत करीत स्वारी थोडीशी पुढें जाऊन पुन्हां दुसऱ्या बाटेनें परत फिरून त्या दुकानावर आली. पुन्हां तशाच चेष्टा करीत करीत दिवे लागण्याच्या सुमारास शहरांत गेली. महाराजांच्या या चेष्टा, जवळपासच्या सर्व लोकांनीं पाहिल्याचेंही समजतें.

## कांहीं उपयोग झाला नाहीं.

महाराजांचा कोणावर विश्वास नाहीं व कोणाचें महत्व ते समजत नाहींत. ८० हजार व ३० हजार रुपये देऊन ज्या सखाराम मार्तंडास या महाराजांनीं इंदुरास आणले, त्यांनीं येऊन काय केलें? एवढी रकम महाराजानीं त्यांस का दिली! व अशा अस्थीर अव्यवस्थेंत त्यांनीं तरी ती कां घेतली! व त्या रकमेचा मोबदला काय? या गोष्टींचा जर त्यांनीं विचार केला नाहीं तर त्यांच्या इंदुरास जाण्याचा उपयोग तरी काय? पूर्वीच्या पुष्कळ सहवासामुळें मोळ्यानें व निस्पृहपणानें बोलल्यापासून काय फायदा होणार! तात्पर्य, यांच्या जाण्या पासून कांहीं उपयोग झाला नाहीं व होत नाहीं आणि होणेंही नाहीं. यांच्या संबंधानें घडलेल्या गोष्टी व यांच्या येण्या जाण्याचा परिणाम या विषयीं अवकाशानुरूप कळविलें जाईल. तूर्त इतकेंच कीं, यांना आपले घरीं रहाण्यास सोय झाली, व संस्थानचें ऐश्वर्य मिळालें. यापेक्षां महाराजांचा अथवा रयतेचा कांडीमात्र फायदा न होतां इंदूर तिजोरींत मात्र दरमाहा १४००।१५०० रुपयांचा खाडा पडूं लागला या बद्दल वाईट वाटतें.

## महत्त्वाचे खटले.

राजाराम विश्वनाथ, राईबाई आणि गोविंदराव भाटे यांचे खटले पुढील आठवड्यास मांडले जातील.

नं ९

( विक्षिप्त अंक ४ ता. १७ आगष्ट ९५ )

गतांकीं कट ल्या प्रमाणें मह त्वाचे तीन खट ले वाचकां पुढें आज प्रथम मांडतों.

## खटला १ ला.

**राजाराम विश्वनाथ** नांवाचा एक अत्यंत जुलूमी इसम, प्रसिद्ध दरवडेखोर **तंट्याभिल्ल** याचा साथीदार होता. व तो नेहेमीं तंट्याला पूर्ण मदत करीत असे. हा राजाराम फार वर्षांपासून दरवडे खोरांचेच सहवासांत व त्यांचे नोकरींत असे. त्याच्या जुलूमाची प्रसिद्धी फार होती. राक्षसी कृत्यें करण्यामध्यें त्याची प्रविणता विशेष असून ज्या कोणाला त्याची विस्तृत हकिकत पाहिजे असेल त्यानें बॉम्बे ग्याझेटची फाईल आगष्ट सन ८७ पासून ती मार्च सन ८८ पर्यंतची चाळून पहावी. तेवढ्या दरम्यान राजारामाची सांग्र हकिकत आढळून येईल. हा इसम ब्रिटीश सरकारचा अपराधी होता. पुढें त्याच्या क्रूर कृत्यांचा घडा भर ल्या बरोबर तो पकडला गेला. नंतर खटला चालून इंदूर सेशन कोर्टातून त्यास ७ वर्षांची सक्त मजूरीची शिक्षा झाली होती. त्या कामीं ब्रिटीश सरकार तर्फे इंदूर सेशनांत काम चालविणारे परलोकवासी सरदार बहादुर ईश्वरी प्रसाद सी. आय ई. व नामदार फीरोजशाहा मेहेता असे विद्वन्मणी नेमले होते. त्याला शिक्षा झाल्या नंतर १५ दिवसांनीं पुढें त्याच्या नोकरा मार्फत तंट्याही पकडला गेला.

राजारामास झालेली शिक्षा त्यानें फार तर दोन वर्षें भोगली असेल. बाकीची शिवाजीराव महाराजांनीं माफ करून त्यास कैदमुक्त केला. इतकेंच नव्हे पण त्याला आपल्या इलाख्यांत सरकारी सारा वसूल करण्या करितां १२५ रुपये दरमहा करून इनस्पेक्टरचे जागीं त्याची नेमणूक केली. शिवाय मागील कंत्राट संबंधानें ४० हजार रुपये त्याजकडून घेणें होते तेही त्यास माफ करून ७५ हजार रुपये सालाच्या वसुलाचा एक सोन्यासारखा महाल त्यास १५ वर्षांचे मुदतीनें इजाऱ्यानें दिला. त्यांतही पांच हजारांची ठोकर असतां तिकडे मुळींच लक्ष दिलें गेलें नाहीं.

शिवाजीराव महाराजांनीं केलेलें हें वरील कृत्य नीतिचें व न्यायास अनुसरून आहे असें कोणी म्हणेल काय ? त्या खटल्या वरून महाराजांस बदमाष लोकांची किती आवड आहे हें चांगलें व्यक्त होतें. महाराज गादीवर बसल्या पासूनची

त्यांची कारकिर्द अशाच झोंकावर घालली आहे. चोर, लुटारू, दरवडेखोर यांची ज्या शिवाजी महाराजांस आवड, त्यांचे हातून राज्यसूत्रें नीतिनें चालावीं तरी कशीं ? कधींही घालावयाचीं नाहींत. पण शिवाजी महाराजांचा जन्म लूटफाट करून सांपडेल त्याचा संहार करण्या करतांच झाला नसेल कशावरून ? अशाही एक प्रकारचा त्यांच्या जुलूमी आणि क्रूर लीला पाहून संशय येतो. व तो खरा ठरण्यास अनेक उदाहरणें आहेत. राजाराम विश्वनाथा सारख्या, सार्वभौम सरकारच्या अपराध्याला झालेली शिक्षा पुरी होण्यापूर्वी कैदमुक्त करण्याचा अधिकार होळकर महाराजांना कसा पोंचतो तें समजत नाहीं. आपल्या अधिकारा बाहेरचें महाराजांनीं हें कृत्य केलें असून तिकडे अद्याप आमच्या दयाळू सरकारचें लक्ष गेलें नाहीं हें एक मुचिन्हच समजलें पाहिजे. अन्यायप्रिय राजाला अशाच प्रकारचीं कृत्यें सुचावयाचीं आणि त्याचा शेवटही यांतच व्हावयाचा हें निर्विवाद आहे.

कोठेंही काय ? पहारेवाल्याच्या ताब्यांतून कैदी पळाला अथवा त्यानें त्यास सोडून दिला तर तो पहारेकरी अपराधी ठरविला जाऊन त्यास शिक्षाही होते. आणि अशी शिक्षा होळकर महाराजांनीं सुद्धां अनेकांस दिली असून आह्मीं ती मागें कळविलीही आहे. इतकी अक्कल—मग ती क्रूरपणानें असो अथवा उसनी आणलेली असो—जर शिवाजीरावांना आहे तर त्यांनीं, आपण केलेल्या अधिकाराबाहेरच्या कृत्या बद्दल आपल्यास शिक्षा भोगावी लागेल असा विचार करावयास पाहिजे होता. परंतु उन्मत्त झालेल्या महाराजांस तो विचार राहिला नाहीं. राजाराम विश्वनाथाची राहिलेली शिक्षा भोगण्याचें जर महाराजांचे कपाळीं आलें—मग तें केव्हांही येवो, आह्मांस त्याबद्दल फारच हळहळ लागणार आहे. जरी असें आह्मांस वाटतें आहे तरी अपराध्यास शिक्षा होणें कायदेशीर आहे असेंच आह्मीं त्यावेळींही ह्मणूं.

## खटला २ रा.

**गोविंद चिंतामण भाटे** हे गृहस्थ इंदूर क्यान्टोनमेंट माजिस्ट्रेट होते. त्यांना त्यांच्या मुलांबाळांसुद्धां इंदुरास कैद करून इंदुरापासून १०० मैलांवर चिखलदा ह्मणून गांव आहे त्यां गांवीं ३ वर्षें पर्यंत कैदेंत ठेविले होते. त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचा आरोप नव्हता. जो अपराध त्यांजवर लागू करण्यांत आला होता तो होळकर महाराजांच्या दुष्ट लहरीपेक्षां निराळा नव्हता.

ची शिक्षा त्यांला झाली होती त्याज बद्दलची वेगळी मिसल झालेली आहे. ज्यांना म्हणून तो खटला माहित आहे ते मांजलपणें म्हणतात कीं, विनाकारण महाराजांनीं त्यांज वर आग पाखडली. इंग्रजी राज्यांत जो अपराध करतो तोच गुन्हेगार समजला जातो परंतु होळकरशाहींत अपराध केल्या खेरीज सुद्धां तो, त्याचीं बायकापोरें, इष्टसोयरे, शेजारीपाजारी, त्याच्याकडे अथवा त्याच्या घराजवळून जाणारे येणारे देखील गुन्हेगार ठरतात असें प्रस्तुत स्थानापन्न असलेल्या इंदुराधिपती राक्षसानें आपल्या कारकिर्दीत ठरवून टाकलें असल्यामुळें, त्यांच्या त्या राक्षसी ठरावानुसार गोविंदरावांची बायको, त्यांची सून, त्यांचा मुलगा न त्यांची मुलगी इतकीं माणसें गोविंदरावाबरोबर त्या दुष्ट महाराजांनीं काराग्रहांत पाठवून दिलीं. त्या माणसांनीं महाराजांचा कोणता अपराध केला होता तें खुद्द महाराज अथवा त्यांच्या पुढें गोंडा हालविणारे अगर महाराजांचीं स्तुती स्तोत्रें गाणारे पत्रकार तरी सांगूं शकतील काय ? कोणीही सांगणारा पुढें येणार नाहीं हें खास आहे महाराजांच्या जुलूमी कृतींतले पशू, जे कोणी कांहीं लाळ घोंटून शिवाजीरावांना अधिक जुलूम करण्याचें प्रोत्साहन देणारे असतील ते त्यांचें तें क्रूर कृत्य त्यांनीं वाजवी केलें असें कदाचित् म्हणतील. एरव्हीं कोणीं कोठेंही तसें म्हणणार नाहीं.

गोविंदरावाचीं हीं सर्व माणसें कैदेंत असतां त्यांचा जांवई आपल्या बायकोस नेण्याकरितां इंदुरास गेला, तेव्हां त्याचे बरोबर एक शिपाई देऊन संस्थानाधिपती राक्षसीरावानीं हुकून दिला कीं, कैदेंत असलेली मुलगी तिचे नवऱ्याचे स्वाधीन करावी. परंतु गोविंदरावाचें व त्यांचे जांवयाचें कांहीं देखील भाषण होऊं देऊं नये. अशा आशयाचा एक हुकूम तोंडीं नव्हे बरें पण लेखी दिला गेला होता. कैदेंत असतां त्या सर्व मनुष्यांस इतक्या वाईट प्रकारें वागविण्यांत आलें कीं त्याचें वर्णनही करवत नाहीं. चिखलद्याचे अमीन कडून जेव्हां या दुष्टरावांकडेस रिपोर्ट आला कीं, गोविंदरावाचे बायकांना नेसण्याकरितां लुगडीं पाहिजे आहेत, तेव्हां कुठे दोन रुपये किंमतीचीं लुगडीं सरकारांतून त्यांस देण्याविषयीं हुकूम झाला. जी बाई ऐश्वर्याच्या थाटानें वागत होती त्या निरपराधी बाईला काराग्रहामध्यें दोन रुपड्यांच्या लुगड्याची मंजुरी ! वेळेचा गुण म्हटला पाहिजे. शिवाजीराव होळ-

करासारखें दुर्गुणी बाळ अधिकार संपन्न झाल्यावर त्याचे हातून अशींच कृत्यें घडावयाचीं. अशीं कृत्यें होतां होतां समजा कीं, महाराजांचा घडा पूर्ण भरला आणि त्यांस मद्रासेस मल्हाररावांची जागा भरून काढण्याकरितां पाठविण्यांत आले आणि तेथें त्यांना दीड दोन रुपये रोजाची बेडे संस्थानिक म्हणून पोटगी मिळाली तर त्या बद्दल त्यांसही त्यांत संतोष मानणें जरूर आहे. कारण, गोविंदरावाला जर पंधरा पैसे रोज दिले जात होते तर शिवाजीरावांसारख्या गरम रक्ताच्या, क्रूर कृतीच्या, विषारी नजरेच्या जुलूमाधिकारी राजास दीड दोन रुपयांपेक्षां अधिक रोज मुरा मिळण्याचें कांहीं कारण नाहीं. पण असा मुदीन केव्हां येतो अमें इंदूरस्थ प्रजाजन म्हणत असूनही अद्याप त्यांचा घडा भरण्याची वेळ आली नाहीं याचें आश्चर्य वाटतें.

अडीच वर्षेपर्यंत अशा हालअपेष्टा त्या माणसांनीं काढल्या नंतर महराजांची लहर लागून त्यांस म्हणजे गोविंदरावाच्या बायकोस व मुनेस फक्त कैदेतून सोडण्याचा हुकूम दिला. परंतु सक्त ताकीद अशी दिली गेली कीं, त्यांनीं इंदूर किंवा इंदूर छावणी अथवा उज्जन या गांवांच्या दिशाही न पहातां परभारें आपल्या देशीं जावें. कां? मोंगलाईवर ताण करणारा हुकूम आहे कीं नाहीं? जर त्या बायांनीं इंदूरची दिशा बघितली असती तर महाराजांस भूतबाधा झाली असती काय? गरीब बिचाऱ्या त्या हाल अपेष्टांतून मुक्त झालेल्या बाया, त्यांची मुक्तता झाल्यावरही त्यांस या समंधाची धास्ती, तेव्हां जुलूमाची शिकस्त झाली नव्हे काय?

गोविंदरावाचे बंधूनें रेसिडेन्सींत आणि गव्हर्नर जनरलकडे अर्जांचा सपाटा लाविल्या नंतर दाद लागली आणि हिंदुस्थान सरकारा कडून जेव्हां चाबूक मिळाला तेव्हां महाराज शिवाजीराव शुद्धीवर आले आणि मग गोविंदरावाचीही कारागृहांतून मुक्तता झाली. ज्या रितीनें गोविंदराव समजेल व राजी होईल आणि त्याजवर झालेल्या जुलूमाचा राजिनामा देईल त्या रितीनें त्याची समजूत घालावी व अशा प्रकारचा जुलूम रानटी लोकांकडूनही होत नाहीं हें लक्षांत ठेवून पुढें आपलें वर्तन ठेवावें अशा आशयाचा खरमरीत हुकूम व्हाइसराय साहेबांकडून आला. तेव्हां गोविंदराव भाटे मोकळे झाले. एकंदर २ वर्षे त्यांस कारागृहांत रहावें लागलें. या खटल्या

संबंधानें रावबहादुर बेदरकर कारभारी साहेब आणि महाराज यांचाही थोडाबहुत झगडा झाला होता म्हणतात. एथपर्यंत या खटल्याची तादृश हकिकत वाचकां पुढें ठेविली आहे. आतां तिसऱ्या खटल्यास आरंभ करूं.

## खटला ३ रा.

राईबाई गोडगस्ती. हिला सरकारांत नोकरी होती. पगारा शिवाय तिला शेर मिळे व ४ घोडे तिच्या हवालीं असत. ती मोठ्या श्रीमंती थाटानें रहात असे. तिचें तसें रहाणें महाराजांस न आवडून तिचेवर आग पाखडण्याचा महाराजांनीं विचार केला. ती बाई महाराजांच्या सापत्न मातोश्री राधाबाईसाहेब यांच्या मेहेरबानींतली असून त्यांच्याकडे ती नेहमीं जात येत असे. हाच कायतो तिचा महान अपराध समजून तिला तिच्या मुलांबाळांसह इंदूराहून निघून जाऊन महेश्वरीं राहण्याचा हुकूम झाला. एकंदर तिच्या आठ मनुष्यांवर ही गदा आली. महेश्वरीं तिला दरमहा ६ रुपये खाण्यास देण्याचा महाराजांचा हुकूम झाला होता. पुढें तिचा वडील मुलगा बाबुराव यास कैद करून मंडलेश्वर येथें कैदेंत ठेविला होता. त्या काराग्रह स्थितींत त्यास वेड लागलें म्हणून जामिनावर त्याचे आईनें त्यास सोडवून, इंदूरच्या दवाखान्यांत दुरुस्त करण्या करितां आणून औषधोपचार चालविला होता. त्यावेळीं राईबाई आपल्या सर्व मुलांमाणसांसह इंदूर छावणींत जाऊन राहिली होती. पुढें वेडेपणाच्या स्थितींत बाबुराव मरण पावला. नंतर राईबाईस 'तुम्हीं इंदुरांत येऊन रहा, तुम्हांस कांहीं उपद्रव व्हावयाचा नाहीं.' असे गोड वाटण्याजोगे शब्द महाराजांनीं तिला सांगून पाठवून शहरांत बोलावून घेतलें. राईबाई आपल्या सर्व मनुष्यांसह इंदूरशहरांत आली असें पाहून ती, तिचा एक धाकटा मुलगा, एक मुलगी, मयत मुलाची बायको व तिचा मुलगा, राईबाईचा दुसरा मुलगा भिमाजी याची बायको, तिचा एक लहान मुलगा इतक्या माणसांस पकडून देऊन **पालपूर** येथें कचेरींत ३ वर्षें पावेतों त्यांस कैदेंत ठेविलें. शिवाय राईबाईचा मधला मुलगा भिमाजी यास हतोद येथें ३ वर्षें ७ महिने कैदेंत ठेविला होता. देपालपूर कचेरींत राईबाई आपल्या सर्व माणसांसह कैदेंत असतां तिची सून ( भिमाजीची बायको ) प्रसूत होऊन त्याच दिवशीं ती व तिचें नूतन अर्भक, बाळंतीणीची जी योग्य व्यवस्था पाहिजे ती नसल्यामुळें मरण पावलीं. बाळंतिणीला खोली पडद्या वगैरेची किती

मजबूत व्यवस्था पाहिजे असते तें आमच्या वाचकांस अवगत आहेच. शिवाजीराव होळकरां सारख्या दुर्बुद्धीनें उन्मत्त झालेल्या राजास मात्र तें न समजणें शोभतें. कारण, त्यांचा मानवी अवतार मुळींच नाहीं. जीं लक्षणें ते आपल्या कृतीनें दाखवितात तीं राक्षसी कृत्यांहूनही भयंकर आहेत. तेव्हां अशा राक्षसाला वाळंतिणीसारख्या नाजूक वेळेची कींव कशी येणार ? न येणें त्यांच्या दुष्ट कृतीस साजण्याजोगेंच आहे.

बाळंतिण व तिचें अर्भक हीं दोघेंच त्या काराग्रहांत मरण पावलीं असें नाहीं; पण राईबाईची दुसरी सून झणजे बाबुरावाची बायको व तिचा मुलगा आणि भिमाजीचा मुलगा एवढीं आणखी माणसें त्याच काराग्रहांत मृत्यु पावलीं. महाराजांच्या दुष्ट कृतीनें हे पांच बळी घेतल्यावरही राईबाईची मुक्तता होईना. राईबाई, तिचा धाकटा मुलगा व तिची एक मुलगी इतकींच माणसें पुढें जिवंत राहिलीं व तीं त्या काराग्रहांतच होतीं. पुढें राईबाईच्या मुलीचें वय १६ वर्षांवर होऊन गेलें आणि कैदेंत असल्यामुळें तिचें लग्न होऊं शकेना व तिला नहाण आलें तेव्हां विशेष बोभाट होऊन लग्न करण्याचे शर्थीवर त्यांना सोडण्यांत आलें.

किती हृदयद्रावक प्रकार आहे हा ! जी राईबाई ऐश्वर्यानें रहात होती तिच्यावर असा हा दुःखाचा कडेलोट, कारण नसतां होणें किती अश्लाघ्य आहे, तें वाचकांनींच पहावें. ज्या ठिकाणीं त्यांना कैदेंत ठेविलें होतें ती जागा कचेरीच्या समोर असून अगदीं उघडी होती. त्या जागेला 'पडवी' हेंच नांव शोभतें. त्या उघड्या पडवींत तीन वर्षें बिचाऱ्यांनीं काढलीं. हिंवाळा, पावसाळा देखील त्यांना त्याच पडवींत काढणें भाग पडलें. त्याच उघड्या पडवींत खोली पडदा नसतां राईबाईची सून प्रसूत झाली. त्यावेळची तिची दुःखद स्थिती ऐकून कोणाचेही आंगावर कांटा आल्या वांचून रहाणार नाहीं. समोर कचेरीचे लोक, जवळ सासू नाहीं, दाई नाहीं, पडद्या दाखल एक घोतर वाघून सर्व प्रकारच्या गैरसोईमध्यें त्या बाईला प्रसुती समय आला. व अस्तमानचे आंत अर्भकासह तिचा अंतही झाला. त्यावेळीं तिची जाऊ, नणन्द व दीर हींच तेथें होतीं, त्यांना किती दुःख झालें असेल तें सांगवत नाहीं. अशा प्रकारचा छल करणारा दुष्ट राजा शिवाजीराव होळकरासारखा दुसरा होणेंच नाहीं झटलें असतां चालेल. अशा दुष्टाला जी शिक्षा मिळेल ती थोडीच समजली

पाहिजे. शिवाजीरावांची अखेर, अति वाईट होईल असें अनुमानानें अशा दुष्ट कृत्यांवरून सहज ठरतें.

## खरें असेल का ?

ज्या वर्तमानपत्रांत महाराजांच्या स्तुतीचे पत्रव्यवहार येतात ते शिवाजीराव दुसऱ्याकरवीं लिहून पाठवित असतील, असें एका इंदूरच्या गृहस्थाचें अनुमान आहे. खरें असल्यास आश्चर्य समजलें पाहिजे. इतका धूर्त प्रकार करण्यास महाराज तयार होणें कोणासही नवल वाटण्याजोगेंच आहे.

---

## नंबर १०

( विक्षिप्त अंक ४७ ता. २४ आगष्ट ९५ )

( आज सकृत दर्शनींच महाराजांस एक विनंती करून नंतर रोजच्या कर्तव्याकडेस वळावयाचा विचार आहे. ती विनंती एवढीच कीं, आम्हीं **इंदूर संस्थान** भाग पहिला, ह्मणून पुस्तक रूपानें श्रीमंत शिवाजीराव महाराजांचीं दुष्ट कृत्यें छापून प्रसिद्ध करण्याचें आरंभिलें आहे. व त्या संबंधाची वेगळी जाहिरातही दुसरीकडे दिली आहे. सदर पुस्तक तयार झाल्यावर तें श्रीमंत साळासाहेबांस नजर करण्याचा आमचा राजनिष्ठपणाचा हेतु आहे. त्या पुस्तकांत विक्षिप्तांत येत असलेल्या महाराजांच्या साग्र गोष्टी यावयाच्या असून, तें सचित्र असावें असें कित्येकांचें सुचविणें आहे. श्रीमंतांच्या क्रूर कृत्यांचीं चित्रें देणें फारसें कठीण नाहीं परंतु पुस्तकाच्या प्रथमारंभीं श्रीमंतांची अस्सल-तसबीर जोडावी असा विशेष हेतु आहे. करितां आमचे इंदुराधिपती जुलूम प्रविण महाराज सरकार शिवाजीराव, सदय अंतःकरण पूर्वक एक आपला फोटो आमच्याकडे पाठवून देण्याची कृपा करतील तर आह्मावर महत्उपकार होणार आहेत. तसाच श्रीमंतां कडून सदर पुस्तकाच्या किती प्रतींस आश्रय मिळेल तेंही दयाळू अंतःकरण पूर्वक आह्मांस कळेल तर त्या मानानें शुशोभित बांधणी करण्यासही ठीक पडणार आहे. पुस्तक रूपानें तरी महाराजांचे जुलूमाचें प्रदर्शन त्यांचे नजरे समोर गेल्यावर त्यांस कांहीं पश्चात्ताप होतो किंवा नाहीं हें पहावयाचें आहे. त्यांच्या समजुती प्रमाणें मराठी लेखांनीं त्यांची जागृती न झाल्यास इंग्रजी लेखांनीं त्यांना शुद्धिवर आणण्याचा आमचा प्रयत्न आहेच. करितां श्रीमंतांनीं आमची ही नम्रपणाची मागणी दुर्लक्ष न करतां पुरवावी अशी मनोभावें आज त्यांस प्रार्थना करितों. )

आतां प्रथम येवलेकर पाटलाची हकिकत देतों. त्या पाटलाचें नांव **द्वारकाजी लक्षुमण पाटील** अहे. ते येवल्याचे रहाणारे व वतनदार आहेत. त्यांच्या अर्ध्या हिशाचे कै. तुकोजीराव महाराज पाटिलकीच्या उत्पन्नांतील भागिदार असल्यामुळें पाटिलकी संबंधानें सरकारांत कांहीं पडलेल्या तक्रारींचें काम चालविण्यास लागणारा खर्च अर्ध्या हिशाचे भागिदार या नात्यानें होळकर महाराजांकडून मिळावा ह्मणून पाटिलबुवा तुकोजीराव महाराज हयात असतां त्यांजकडेस गेले. व निकाल होण्यापूर्वी पाटिलबुवांच्या दुर्दैवानें महाराज स्वर्गस्थ झाले. त्या वेळेपासून हे द्वारकोजीराव जाऊन येऊन इंदूरास असतात. गेल्या महिन्याच्या २६ तारखेस नागपंसमीचा मेळा पहाण्याकरितां हे पाटिलराव गेले असून इंद्रेश्वराचे पायरीवर बसले होते. तो वेळ सायंकाळचे ३ वाजण्याचा होता. तितक्यांत होळकर महाराजांची स्वारी मेळा पहाण्याकरितां चालली असतां लांबून त्या पाटलावर त्यांची नजर गेली. लगेच त्यास जवळ बोलावून वेडे वांकडे प्रश्न केले, शिव्या दिल्या आणि कैद करण्याचा हुकूम दिला. पुढें रात्रीं आठ वाजतां महाराजांसमोर त्यास नेऊन उभा केला. नित्याच्या संवयीप्रमाणें महाराजांनीं त्यास शिव्यागाळी देण्यास सुरू करून पाटलाचे आंगांतील कपडे काढण्यास जवळच्या हुजऱ्यांस सांगितलें. पाटिलगडी इंग्रजींतला असून घट्टाकट्टा असल्यामुळें सणसणीत जबाब देऊन उभा राहिला. पण बिचारा करतो काय ? यमाजीभास्करच्या जबड्यांत सांपडलेला, तेव्हां होतील तेवढे सोंहाळे सोसणेंच त्यास भाग पडलें. महाराजांनीं त्याचे आंगांतील कपडे फाडून काढण्यास हुकूम केला; तेव्हांही जोरानें पाटलानें त्या हुजऱ्यांस धमकावून आपला धीटपणा दाखविला. अखेर खुद्द महाराज पलंगावरून उठून पाटलाजवळ येऊन स्वहस्तें त्याचे आंगांतील कपडे फाडून, त्याच्या डोकीवरचें पागोटेंही फेंकून दिलें. व खुद्द महाराजांनीं पांच चार त्याचे थोबाडांत चढविल्या. पुढें त्यास नग्न करून त्याची चंपी करावयाची ह्मणून नानाजी केशव वगैरे जी मंडळी तेथें होती त्यांस खालीं घालवून नंतर लाथा बुक्क्यांचा सपाटा त्या पाटलावर चालू केला. अखेर तो खालीं पडला, तेव्हां त्याचा पायजमा फाडून त्यांत असलेलें दोन हजार

रुपयांचें सोनें काढून घेऊन, तें आपल्या पलंगावर फेंकून दिलें. तें सोनें चोरून आणलेंस असें आणखीं ह्मणून त्यास अर्धमेला केला. आणि एक लोखंडी ब्रश हातांत घेऊन त्यानें पाटलाचें सर्वांग सोलून काढलें. ( या ठिकाणीं ब्रश संबंधानें माहिती सांगणें जरूर दिसते. कपडे साफ करण्याचा ब्रश असतो त्या प्रमाणेंच एका लांकडाचे फळीस वेणीदार खिळे मारून घोड्याला साफ करण्याचा खुरा असतो त्या प्रमाणें एक प्रकारचें दुसऱ्यास मारण्याकरितां महाराजांनीं नवीन एक शस्त्र तयार केलें आहे. तो ब्रश ज्याच्यावर फिरविला जातो त्याचे आंगास कळा लागून त्याचें अर्धमेल्या मनुष्याप्रमाणें आंग होतें. असें तें यमाजीभास्करचें हत्यार आहे. ) ब्रशाचा विधी झाल्यावर नानाजी केशव यांस हांक मारून हुकूम दिला कीं, पाटलास शक्कर बाजारचे कोतवालींवर कैदेंत ठेवावा. हुकूमाची तामिली होऊन रात्रभर पाटिलगडी कैदेंत कुथत राहिला. दुसरे दिवशीं त्यास बोलवून त्याचा मुचलका लिहून घेतला कीं, 'मीं इंदूर शहरांत रहाणार नाहीं; राहिल्यास हुकूम अमान्य केल्याचा अपराध मजवर येईल.' असा मुचलका लिहून घेऊन त्यास जाण्याची परवानगी दिली. पांच चारशें पावलें तो गेला नाहीं तोंच पुन्हां त्यास परत बोलावून पुन्हां कैदेंत अडकवला. पुन्हां दुसरे दिवशीं कोतवाली वरून बोलावून मुचलका लिहून घेतला आणि जाण्यास सांगितलें. थोडे दूर जातो आहे तों पुन्हां परत बोलवून पुन्हां अटकेंत ठेवला. असा क्रम तीन दिवस पर्यंत चालून ता. ३० जुलई रोजीं त्यास सिटी माजिस्त्रेटकडे-स्पेशलकडे नव्हे बरें--पाठविला. त्यांनीं तेथें त्याचा तसाच मुचलका लिहून घेऊन जाण्यास परवानगी दिली. पाटिलगडी त्यादिवशीं मोकळा होतांच आडमार्गानें धांवत धांवत जीव मुठींत घेऊन छावणींत गेला. हिकडे शहरांत त्याची शोधाशोध चाललीच होती.

पुढें ता. ३ मिनहू रोजीं पाटिलबुवांनीं कर्नल बार साहेबांची भेट घेतली व आपलें दुःख निवेदन केलें. साहेब बहादुरांस वाटलें कीं, पाटिलराव इंदूरचे रहिवासी असतील परंतु इंग्रज सरकारची रयत असून या दुष्ट महाराजांकडेस अमुक अमुक कारणा करितां आलों आहें वगैरे पाटलांनीं सांगितलें. साहेब बहादुर ग्वालहेरीस जाण्याचे गडबडींत असल्यामुळें त्या दिवशीं तोंडी सर्व

हकिकत ऐकून घेऊन समाधानकारक असें कांहीं पाटलास त्यांनीं सांगितलें. पाटिल लेखी अर्ज वगैरे करण्याच्या विचारांत होता. पुढील हकिकत समजली नाहीं.

## दौलतखां चोपदार.

हा इसम महाराजांच्या फार मेहेरबानितला असून तरुण, सुस्वरूप, सकुमार व घरचा सधन असा आहे. त्यास ता. १ मिनहू रोजीं वाड्यांत आपल्या समोर बोलवून अतिशय मारपीट केली. त्या मारानें त्याचीं कानसुलें फुटून रक्तस्त्रावही सुरू झाला. त्याच्या बरगड्यांत व शरीराच्या दुसऱ्या भागावरही पुष्कळ मार बसल्यामुळें शेवटीं तो खालीं पडला. पुढें त्याचे पायांत बिड्या घालून त्याला कारागृहांत पाठविला. त्याच्यावर हा विनाकारण जुलूम झाल्यामुळें त्याच्या भावानें व दुसऱ्या त्याच्या आप्तांनीं रेसिडेन्सींत अर्ज व तार दिले. त्यांवरून बडेसाहेबांनीं दोन साक्षीदार मागितले. अर्जदारांनीं साक्षिदार हजर केल्यावर साहेब बहादुरांनीं त्यांच्या साक्षी घेऊन त्याला सोडून देण्याविषयीं महाराजांस लिहिलें. इतकेंच नव्हे पण त्यानंतर अशा प्रकारचा जुलूम झाला आहे किंवा नाहीं हें कारभारी साहेब व सखाराम मार्तंड आणि रेसिडेन्सी वकील या त्रिवर्गांनाही विचारण्यांत आल्याचें कळतें. तथापि महाराजांनीं त्यास अद्याप सोडला नाहीं.

## लिहून आलेला मजकूर.

बडोदावत्सल पत्रांत इंदूरसंबंधाचें एक पत्र 'प्र' या सहीनें प्रसिद्ध झालें आहे. त्यांत विक्षिप्त व पुणेंवैभव या दोन पत्रकारांस इंदूरचा अन्याय, जुलूम, प्रसिद्ध करण्याचे कामांत मोठा दोष दिला आहे. त्या संबंधानें पत्रकार तर लिहितीलच परंतु बातमीदाराच्या संबंधानेंही त्या पत्र लिहिणारानें आपलें तोंड खराब केलें आहे. व अशा घाणेरड्या पत्राम प्रजावात्सल्य सोडून बडोदावत्सलकार शिवाजीवत्सल बनून आपल्या पत्रांत जागा देऊन सांवसर्गिक दोषाला मात्र अधिकारी बनले आहेत याबद्दल फार वाईट वाटतें.

तो पत्र लिहीणारा एवढें कबूल करतो कीं, कांहीं व्यक्ती विशेषाचे दोष असतील तें तुम्हीं वर्णन करा, परंतु महाराजांचा मानमरातब राखून वर्णन करा. हलक्या शब्दांनीं त्यांस दोष देऊं नका. इतकाच जर त्याचा हेतु होता तर त्यानें वैभवकाराचें पुण्याचें वैभव मनांत आणून, त्यांनाच

परभारें तशी प्रार्थना केली असती तर त्यांनीं ती लक्षांत आणली नसती असें आह्मांस वाटत नाहीं. त्याच प्रमाणें विक्षिप्तकारास 'तुह्मीं एक विक्षिप्तपणा लोकांच्या विक्षिप्तपणास घालविण्याकरितां स्वीकारला आहे तरी आतां आमच्या महाराजांस तो योग्यता देऊं नका' असें कळविलें असतें तर विक्षिप्तकारांनींही ऐकिलें असतें. परंतु तो मार्ग न स्वीकारतां पत्रकारांपेक्षांही तो पत्र लिहिणारा अधिक मनून शहाण्या लोकांस उपदेश करतो हें फार चमत्कारिक आहे.

त्याच्या पत्रांतील कांहीं गोष्टींचा विशेष विचार आपण व आपल्या बातमीदारांनीं केला असता परंतु ज्या १०० शंभर गोष्टी जुलूमाच्या, अन्यायाच्या, वेडेपणाच्या, मूर्खपणाच्या अशा लोकांपुढें आल्या आहेत त्यांपैकीं एखादी तरी गोष्ट खोटी व ती अमुक कारणांनीं आहे असें त्यानें दाखवावयाचें होतें; परंतु तसें त्यानें न केल्यामुळें त्याच्या बरळण्यांत अर्थ कांहीं नाहीं असेंच म्हटलें पाहिजे.

'म' ह्मणतो कीं, महाराज तसे आहेत तर तुह्मीं त्यांच्या मोठेपणाकडेस लक्ष देऊन व त्यांला भिऊन-महाराजांस खरी त्याची जरूरी नाहीं व त्यांनीं अगदीं ताळ सोडला आहे तरी-तुह्मीं त्यांचा मान राखावा आणि लोकांस कसेंही दुःख होत असलें तरी माझा किंवा माझ्या आप्त-मित्रांचा रोजगार त्यांच्यामुळें उत्तम चालतो ह्मणून महाराजांचें नुकसान झालें तर मला व माझ्या आप्त-मित्रांस इंदुरास कोणी भीकही घालणार नाहीं ही गोष्ट तुह्मीं मनांत आणून त्यांच्या अधिकारास बाध येईल असें कांहीं करूं नका, व कराल तर मीं तुह्मांस नालायक ह्मणेन. मग सर्व जगानें तुह्मांस चांगलें ह्मटलें तरी त्यांत अर्थ कांहीं नाहीं असें तुह्मीं समजा व लक्षांत उमजा, अशा अर्थाचें व हेतूचें त्याचें ह्मणणें दिसतें. यावरून लोकांस त्याचें ह्मणणें व विक्षिप्त आणि वैभवकाराचें करणें याचा रास्त विचार करतां येणार आहे.

आणखीं तो असेंही ह्मणतो कीं, ज्यापक्षीं तुह्मीं आपल्या बातमीदारावर भरंसा ठेऊन महाराजां विरुद्ध गोष्टी प्रसिद्ध करतां, त्यापक्षीं तुमच्या जवळ पुरावाही असेल असें मी समजतों. अर्थात् पुरावा असल्या बद्दल त्याला संशय नाहीं. परंतु ज्याला आपणास कोणी मूर्ख ह्मणण्याची, पक्षपाती ह्मणण्याची व पोटार्थी ह्मणण्याची भीति व गरज

नाहीं त्याला दुसरा कांहीं उपाय राजांचें सांगणें व त्यांच्या प्रमाणास नमल्यानें जो पुरावा आपल्या कडेस महाराजांचा कनवाळू जो वत्सलाचा आहे असें तो समजतो तो पुरावा बातमीदार त्याची जर साक्ष आह्मीं खोटा असेल व बनेल असें ह्मण- दिली व उत्तम लेखी पुरावा दिला ण्याची त्याजला शंका वाटण्याचें तरी खोटे साक्षिदार बनविले व कारणच नाहीं; तरी त्याणें त्या खोटा पुरावा बनविला असें ते विद्वान संबंधानें महाराजांस खुष करण्या गृहस्थ आह्मांस ह्मणतील तर मग करितां कसेंही ह्मटलें तरी त्यापासून आह्मीं त्यांचें दुर्दैव समजावें किंवा खऱ्यास बाध कधींही येऊं शकत आमचें समजावें हें लोकांनींच नाहीं. शिवाय खोटा पुरावा करून सांगावें.

ह्या महाराजांचे विरुद्ध गोष्टी सिद्ध चौकशी होईल तेव्हां होईल करण्याची तयारी व प्रयत्न तोच पण आजच आमचा साक्षिदार तो मनुष्य करील कीं, ज्याला त्यांचें पत्र लिहिणारा गृहस्थ बनला आहे. राज्य मिळवावयाचें असेल. आह्मांस तो ह्मणतो कीं, ३०० लोकांवर तर त्यांचें राज्य व ते मूर्तिमंत दोन्हीं महाराजांची नाराजी आहे. तेव्हां कायम राहण्याचाच प्रयत्न मनोभावें तीनशें लोकांवर नाराजीच्या हुक्का करणें आहे व तशी खरोखर मुळें त्यांच्यावर जो अन्याय, जुलूम आमची इच्छाही आहे. त्याकरितां झाला आहे तो तुह्मीं अन्याय धरूं त्यांचें फक्त अडमिनीस्ट्रेशन सुधरावें नका असें त्याचें ह्मणणें आहे. तें व त्यांचा दुर्लौकिक व भावी परि- जर तसें मानलें जाईल तर मग णाम सुधरावा असेंच आह्मांस इष्ट निकालच झाला. मग आह्मीं खोटे आहे. तेव्हां अन्यायांस खोटा पुरावा व आमचें सांगणें खोटें असें मंजूर करण्याची जरूर काय ? आमच्या करणेंच आह्मांस भाग पडेल. इष्ट हेतु करतां जर आह्मांस पुरावा ३०० मनुष्यांवर नाराजी अस- देण्याचा प्रसंग येईल तर आमचे ल्याचें जें त्यांनीं कळविलें तें ३०० महाराज जी गोष्ट नाकबुल करतील महिन्याचें त्यांनीं सांगितलें किंवा ती आह्मीं मुळींच पुढें आणावयाचे वर्षांचें सांगितलें तें कळत नाहीं. नाहीं. अमुक गोष्ट माझ्या हातून शिवाय जे ३०० शें लोक केवळ घडली आहे असें महाराज सांगतील महाराजांच्या हुकूमावरून कैदेंत तोच आमचा पुरावा आहे. महा- घातले गेले व त्यांना वाटलें तेव्हां

सोडले गेले ते हे आहेत (?) किंवा नोकरींतून वजा केले त्यां पैकीं हे आहेत ( ? ) अथवा इंदुरांतून काढून दिल्यापैकीं जे उज्जनीस आहेत ते त्यांनीं हिशेबांत धरून सांगितले ( ? ) किंवा इंदूर छावणींत जे रहात आहेत ते हे आहेत ( ? ) अथवा दक्षणप्रांतीं जे गेले ते हे आहेत ( ? ) किंवा ज्यांच्या जप्त्या केल्या ते हे आहेत ( ? ) अथवा ज्यांना मारपीट केली ते हे आहेत(?) किंवा शहरांत रहातात ते हे आहेत ( ? ) अथवा ज्यांना विनाकारण दंड केला ते हे आहेत ( ? ) व ते ब्राह्मण आहेत अथवा इतर ज्ञातीचे आहेत, याचा खुलासा शिवाजीवत्सलोपादकांनीं केला नाहीं. यामुळें कोणते ३०० लोक समजावे अथवा नाराजींतल्या कोणत्या तीनशेंनीं समजावें ? या गोष्टीस मार्गच नाहीं. **दोन हजारांची यादी** तर मीं एकटाच देऊं शकतों. लांब कशाला ? सप्रमाण असें ९०० लोकांचें एकच उदाहरण ऐका.

ता.——माहे————सन ९४

रोजीं नंबर——चा महाराजांनीं हुकूम दिला होता कीं, फौजी खात्यांतील सर्व आफिसर लोकांस एक वर्षाचा पगार दंड केला आहे. तो दंड ज्याची इस्टेट असेल त्याच्या इस्टेटींतून वसूल करावा व इस्टेट नसेल त्याच्याकडून दोन वर्षांत वसूल करावा.

**दुसरा हुकूम**—९ वर्षांत ज्या फौजीखात्यांतील लोकांनीं महाराजांकडेस पाहरा वगैरेची नोकरी दिली, त्या सर्वांनीं चांगली नोकरी दिली नाहीं असें आह्मांस आज वाटलें, करितां एकंदर शिपाई लोकांस साहा महिन्याचा पगार दंड केला आहे. हा हुकूम झाला तेव्हां शिपाई लोकांचा पगार बंद झाला होता. पुढें त्याबद्दल विशेष बोभाट रेसिडेन्सी पावेतों होऊन तिकडून दपटशा आला कीं, शिपाई लोकांस नाराज करणें वाजवी नाहीं; तेव्हां एके दिवशीं त्या सर्वांचा पगार महाराजांनीं आपल्या समक्ष वांटला. अर्थात ते ३००० शिपाईही नाराजींतीलच समजले पाहिजेत. पण त्या ३००० पैकीं ३००, वर मानले गेले किंवा चुकीनें तीनहजारांचे तीनशें 'अ' नें हिशेबीं धरले तें कळत नाहीं.

**तिसरा हुकूम**—न्हावी, धोबी, शिंपी यांनीं ९ वर्षांत जें काम केलें तें चांगलें केलें नाहीं, त्याबद्दल त्यांना दंड केला ते ३५ हजार रुपये ६ मनुष्यांपासून वसूल करण्याचा हुकूम दिला आहे. ते एकंदर लोक ९

वर्षांत अदलून बदलून काम करणारे ३०० होतात, ते तीनशें पत्रव्यवहार करणारा 'म' समजला कीं काय ?

आतां महाराजांची नाराजी होण्याचीं उदाहरणें ऐका. गोपाळ लक्षुमण तारे हे पोशाखखान्याचे कारखानदार व हुजूर सेक्रेटरी होते. त्यांच्यावर महाराजांची फार मेहेरबानी होती. असें असतां एकदम त्यांच्यावर सखाराम पगडबंद पळाला म्हणून नाराजी झाली. आपण त्यास चापून मारला हें कारण महाराजांचे मुळींच लक्षांत आलें नाहीं अथवा त्यांनीं आणलें नाहीं. पगडबंद कारणीभूत झाला एवढेंच मनांत आणून गोपाळरावास जन्मभर आठवण राहण्या इतका मार दिला. त्यामुळें तो जीव वांचविण्या करतां पळाला म्हणून त्याजवर नाराजी झाली आणि पोशाखखान्यांतील नवे जुने लोक कैद केले व तो तारे आडनांवाचा होता आणि त्याला त्याचे आप्तांनीं पळून जाण्यास सांगितलें असेल असा दीर्घ तर्क करून, सर्व ताऱ्यांवर नाराजी झाली व त्या सर्वांस कैद करण्याचा हुकूम झाला व सांपडले तितके कैदही केले गेले.

गणपतराव पगडबंद चांगलें पागेटें बांधित होता हेंच राजीस व नाराजीस कारण होऊन त्याजला मारपीट केली. पुढें तो पळाला म्हणून कृष्णपुरा कोतवालीचे ताब्यांत त्याचें घर होतें म्हणून नथोपंत कोतवालावर नाराजी झाली व तो नोकरींतून वजा झाला. रेलवे स्टेशनाकडे कृष्णपुऱ्यांतून जातांना राणीपुरा कोतवालीची हद्द लागते, त्या सडकेवरून गणपतराव गेला असेल असें समजून राणीपुरा कोतवाल बळवंतराव याजवर नाराजी होऊन तो नोकरींतून वजा झाला.

शागिर्दपेशांतील नायब यांच्यावर गोपाळरावभैयाची मेहेरबानी होती म्हणून महाराजांची नाराजी झाली व एक वर्षांत निदान ४ महिने तरी तो कैदेंत रहातो. १५ दिवसां पूर्वी ६ महिने कैदेंत होता. नेहेमीं या प्रमाणें ४।६ महिने निदान २ महिने तरी कैदेंत रहातो व सुटतो. पुन्हां काम करतो व पुन्हां कैद होतो. नुकताच १५ दिवसां पूर्वी सुटला असून पुन्हां ता. ६ मिनहू रोजीं कैद झाला आहे.

नारायणराव जमखंड यानवर अत्यंत मेहेरबानगी होती व आहे. मध्यंतरीं नाराजी होऊन ६ महिने त्याचे पायांत बिड्या घालून एक एक महिना एक एक कोतवालीवर त्यास कैदेंत वसविला. पुढें त्यास सोडला.

हल्ली तो मोकळा असून अगदीं खुद्दांच्या सानिध्य आहे. हा कशापैकीं समजावा ? राजी पैकीं किंवा नाराजी पैकीं ?

शागिर्दपेशाच्या कारखानदारावर, रायनानकचंदावर, बक्षीखुमानसिंगवर, सर काशिरावदादांवर, सखाराम मार्तंडवर, खुद्द जांवयावर किती वेळां राजी व किती वेळां नाराजी झाली, हें त्या कनवाळू जनणारास माहित आहे काय ?

जास्त राहूंद्या. त्या पत्र लिहीणाऱ्या 'म' ला आम्हीं विचारतों कीं, तुझ्यातर व तुझ्या आप्तमित्रांवर हल्लीं राजी आहे कीं नाराजी आहे ? खात्रीपूर्वक तूं याचा खुलासा सांगूं शकतोस काय ?

अशीं पुष्कळ उदाहरणें आहेत. अशा प्रकारच्या नाराजी पैकीं ३०० मनुष्यें नाराजीतील कोणतीं व कशा प्रकारचीं त्या 'म' नें निवडलीं हें त्यानें सांगणें जरूर आहे. महाराजांच्या नाराजीस कारण—ज्यांच्यावर नाराजी होते त्यांजकडून होतें किंवा महाराजां कडून होतें याचाही जबाब 'म' नें दिला पाहिजे.

वत्सलाचा हा पत्रव्यवहार करणारा आणखी असेंही म्हणतो कीं, शिवाजीरावमहाराज साधारण मनुष्य नाहींत. मोठे प्रजाचालक नरपती आहेत. त्यांचे अधिकार, त्यांची सत्ता, त्यांचें वैभव हीं श्रेष्ठतर आहेतच, शिवाय ज्यांस सरकार ही संज्ञा आहे व सार्वभौम सरकारही ज्यांस मान देतें आणि लाखों लोक अन्नदाता म्हणून सन्मान पूर्वक मानून हात जोडून उभे रहातात, अशा राजाबद्दल मजकूर लिहितांना फार विचार केला पाहिजे. तसा न झाला तर परंपरेनें देशाचें नुकसान आहे. 'म' चें हें म्हणणें आम्हांसही मान्य आहे. परंतु ह्यांत पहिल्या पांच गोष्टी प्रस्तुतच्या महाराजांनीं मिळविलेल्या नाहींत. त्या त्यांच्या पूर्वजांनीं संपादन केलेल्या आहेत. प्रस्तुत महाराजांकडेस त्या केवळ प्रजा रक्षणार्थ म्हणून सोंपलेल्या आहेत. त्या गोष्टींस हे महाराज योग्य आहेत असें ह्यांनीं लोकांच्या तोंडून म्हणवून घेण्याचें संपादिलें नाहीं. तसें केलें असतें तर मात्र यांचा तेवढा संबंध त्या गोष्टींशीं लागू झाला असता. आमच्या शिवाजीरावांनीं प्रजाप्रीती संपादन केली नाहीं इतकेंच नाहीं पण त्या गोष्टीस हे मुळींच योग्य नाहींत असेंच प्रजामत यांनीं संपादन केलें आहे. अशा प्रकारें जर आमचे महाराज त्या योग्यतेस अपात्र असल्याची सर्वांची खात्री झाली आहे व दिवसेंदिवस

महाराज करून देत आहेत तर मग त्यांच्या कडून मनुष्य स्वभावा विरुद्ध पूर्वज्यांच्या व हिंदुस्थानांत यांच्या प्रमाणें मानास जे राजे योग्य मानले गेले आहेत त्यांच्या रीति विरुद्ध व धर्माच्या आणि नीतिच्या विरुद्ध वागणूक होईल तर मग त्यांना कोणत्या शब्दांनीं आळवावें हें प्रांजलपणें 'प्र' सांगू शकेल काय?

राजाच्या ताब्यांतील प्रजेपैकीं कोणी नीतिच्या, धर्माच्या, न्याया-च्या, लोकव्यवहाराच्या व लोक-समजुतीच्या बाहेर कोणी वर्तन करील तर राजा त्यास हा लुच्चा, हा पाजी, हा नीच, हा लबाड, हा गाढव, हा पशु अशीं विशेषणें देऊन त्याजवर नाराज होऊन शिवाय त्यास कायद्याप्रमाणें शिक्षाही देतो व देण्याचा त्यास अधिकार आहे असें जर वत्सलाचा 'प्र' समजत असेल तर, जो राजा कोणाचाही कांहीं अपराध नसतां विनाकारण आपल्या चैनीस्तव चांगल्या व नीतिमान मनुष्यांस वर लिहिलेलीं विशेषणें उच्चारून त्याची आई, बहीण, बायको यांच्या नांवानें अति बीभत्स शिव्या देतो, मारतो, बिड्या घालतो आणि कैदेंत पाठवितो इतकेंच नव्हे पण त्याची मालमत्ताही सरकारांत घेऊन त्यास आपल्या हद्दींतून काढून देतो व त्याच्या मुलांबाळांस, बायकांस कैदेंत घालतो व त्यांचे हालहाल करतो व कित्येक त्या छलवादापासून प्राणासही मुकतात अशी ज्या राजाची वर्तणूक आहे त्याला कोणतीं विशेषणें देऊन त्याचा गौरव करावा हें 'प्र' नेंच सांगावें. अगर या सर्व अन्यायाच्या व जुलूमाच्या गोष्टी राजाचे हातून घडल्या नंतर त्यांना तीं विशेषणें लागत नाहींत, उलट त्यांना उत्तमांतच गणावें असें कोणी प्राचिन अथवा अर्वाचिन विद्वानानें लिहून ठेविलें असल्यास तेंही आम्हांस कळवावें.

लाखों लोकांचा अन्नदाता हा महाराज नाहीं. याचे पूर्वज तसे होते व त्यांचे उपकार त्या लोकांवर आहेत. हल्लींच्या महाराजांस उलट ते उपकार सहन होत नसल्यानें त्याचे विरुद्ध वागणूक ठेवून पुष्कळ लोकांस अन्नाची भ्रांती पडली आहे.

शेंकडों लोक हात जोडून महाराजांपुढें उभे राहतात हा एक गुण महाराजांचा 'प्र' नें दर्शविला आहे. त्याबद्दल आम्हीं त्यास असें विचारतों कीं, हात जोडणारे लोक भीतिमुळें किंवा प्रीतिमुळें तसें करून उभे राहतात तें ईश्वर साक्ष ठेवून आपण खरें सांगावें. लोक हात जोडतात त्यानें काय

महात्म्य ? महाराजांच्या भीतिस्तव लोक भंगी बनतात, शिकारीचे कुत्रे बनतात, शिकारींत मारलेलें जनावरही ब्राह्मण लोक उचलून आणतात, वस्त्रें सोडून नागवे होतात, मोर नाचवितात व महाराज सांगेल त्याप्रमाणें आपआपसांत क्रीडाही करतात. आसांस शत्रु समजतात, मित्राचा घात करतात, निरपराध्यास शिक्षा करतात, अशा अनेकगोष्टी महाराजांच्या मर्जी करतां लोक करतात, म्हणून महाराजांवर लोक राजी आहेत व महाराज निंदेस पात्र नाहींत असें कोणी तरी समजुतदार म्हणेल काय ?

हल्लीं पुष्कळ लोक महाराजांच्या नोकरींत आहेत म्हणून 'प्र' नें सांगितलें आहे. पण ते आनंदांत व सुखी आहेत असें म्हणण्याची त्याची छाती झाली नाहीं. सन ८५ मध्यें जे नोकर होते त्यां—पैकीं ८६ सालांत किती कायम राहिले ? तसेच ८६ मध्यें जे होते व जे नवे ठेवले त्यां पैकीं ८७ सालांत किती राहिले ? याप्रमाणें सालोसालचा हिशेब काढून जुने व नवे आणि ते किती दिवसांचे हल्लीं कायम आहेत तें 'प्र' नें सांगितल्यास फार आभार होतील. नेटिव्ह संस्थानांतले पिढीजाद नोकर हे जर अशा त्रासामुळें नोकरी सोडतोल तर त्यांना दुसरीकडेस कोठेंही निर्वाह करण्याची सोय आहे काय ? वास्तविक विचार याचा केला म्हणजे मुलाबाळांकरितां जें होईल तें दुःख सहन करून, ज्या रीतिनें महाराज वागवील त्या रीतिनें वागून, तो काढून देई पावेतों नोकरीवर असला म्हणजे तेवढें महाराजांच्या लौकिकास कारण होईल काय ?

'प्र' च्या म्हणण्याचा भावार्थ ब्रीटिश राज्यांत अन्याय जितके होतात तितके शिवाजीराव महाराजांकडून होत नाहींत असा दिसतो; परंतु ब्रीटिश राज्यांत खुद्द गव्हर्नरसाहेब देखील कोणाची फिर्याद नसतां व कोणाचा रिपोर्ट नसतां अथवा दोन्हीं असलीं तरी शिवाजी महाराजां प्रमाणें कोणास कैद करण्याचा अथवा कोणाची जप्ती करण्याचा अगर कोणास देशांतून काढून देण्याचा व कोणास मारपीट करण्याचा असा हुकूम कधींच देत नाहींत. न्यायाचें कामा करितां जीं यंत्रें केलीं आहेत, त्यांतून तो न्याय काढला जातो. गव्हर्नरसाहेबांचा धोबी, न्हावी, शिंपी व दुसरे नोकर व रस्त्यानें जातांना त्यांच्या दृष्टीस पडणारे जे कोणी लोक त्यांस कैदेंत घालणें, मारपीट करणें वगैरे केलें जात नाहीं, व ते स्वतः कोणाशींच द्वेष ठेवित न-

हींत.निर्दोष न्याय सर्व जगाच्या ज्ञाना प्रमाणें, समजुती प्रमाणें व इच्छे प्रमाणें ईश्वराकडून सुद्धां होत नाहीं. त्यांत चुक्या, लबाड्या व हेतु प्रत्येक देशांत, प्रत्येक राज्यांत असण्याचा संभव आहेच; परंतु आमच्या महा राजां प्रमाणें रयतेचा नाश करण्या करितां व आपल्या पूर्वजांचें नांव बुडविण्या करितां मूर्तिमंत अवतार घेऊन जो जुलूमी राज्यकारभार चालविती तो त्याचा कारभार योग्य मानून आमच्या महाराजांची तारीफ कोणींही करूं धजणार नाहीं.

पूर्वजांचा संबंध व हल्लींचा देशाचा उपयोग हें लक्षांत आणून निंदा करण्याचा विचार करावा असें 'म' चें म्हणणें आहे. पूर्वजांच्या संबंधानें विचार केला तर ज्या पूर्वजांवर एक बालाग्रमुद्धां ज्याची प्रीति नाहीं व पूर्वजांच्या आत्म्यास ज्यानें अत्यंत दुःख दिलें आहे व हल्लीं त्यांचें नांव समूळ नाहींसें करण्याचा उपाय ज्यानें चालविला आहे त्या पूर्वजांचे संबंधानें या महाराजांच्या दोषाच्छादनाचें अगत्य बाळगणें त्या पूर्वजांस व या महाराजांस जो जाणतो त्यानें तसें केल्यास त्या पूर्वजांचा मोठा अपराध त्याच्या कडून होणारा आहे त्यांत कांहीं संशय नाहीं.

देशाचा उपयोग याच्या योगें लक्षांत आणावा तर कांहीं दहा पांच माणसेंच केवळ द्रव्य संपादन करण्याकरितांच आमच्या देशांत आलीं आहेत व उत्पन्न झालीं आहेत. जो त्यांचा उपयोग तोच देशाचा उपयोग आम्हीं समजावा, इतके देवभोळे व अज्ञान आम्हीं नाहीं. 'म' कदाचित् असेल तर त्यानें भलेही तसें समजावें. देशाचा उपयोग आमच्या राष्ट्रापासून आहे. शिवाजीराव महाराजांपासून अगदीं नाहीं. या करितां तें मात्र रक्षण करण्याचा आमचा प्रयत्न आहे. व 'म' ला या महाराजांपासून उपयोग होतो म्हणून त्यांना रक्षण करण्याचा व त्यांचें राष्ट्र बुडविण्याचा प्रयत्न त्याचा आहे, हें सहजीं लोकांच्या लक्षांत येईल. 'म' च्या म्हणण्याप्रमाणें या महाराजांचें महत्व व देशाचा उपयोग आम्हीं लक्षांत आणून त्यांच्या दोषांचें आच्छादन करणें म्हणजे तंट्याडाकूच्या प्रदेशांत रहाणाऱ्या त्याच्या जातभाईनीं व नोकरांचाकरांनीं त्याच्या त्या असत्कृत्यांस धोका न येण्याची इच्छा करण्यासारखें होणार आहे.

नित्य नव्या लोकांच्या घरावर धाडा, नित्य नव्या लोकांस मारपीट, जखमी करणें, जिवें मारणें

वगैरे करितां नित्य नवे शेंकडों पोलिस चहूं बाजूनीं गिरफतारी करितां येणें व स्वस्थपणानें कोणासही राहावयास जागा नाहीं, अन्न खाण्यास मिळण्याची सोय नाहीं, तंट्याचे हुकूमाप्रमाणें धाडा घालण्यांत कसूर झाला तर लगेच शिक्षा तो देणार अशा अडचणी होत्या तरी आणि तंट्या व ते लोक अत्यंत भीतींत व धोक्यांत आणि दुःखांत— पहाडांत खडी ऊणता सहन करून रहात होते तरी तंट्या पकडला न जाण्याची जशी त्या लोकांनीं इच्छा करावयाची तशीं आह्मीं आपलीं मनें केलीं तर मात्र महाराजांच्या दोषांवर आछादन घालूम त्यांचें नांव घेणें वर्ज केलें जाईल.

'म' नामधारकानें आपला विशिष्ट स्वामिभक्तिपणा दाखवून खऱ्या व नीतिमान, पापभीरू व सदाचरणी लोकांस आणि वैभव, विशिष्ट आणि त्यांच्या बातमीदारांस जे दोष दिले आहेत ते महाराजांचें हित चिंतून दिले नाहींत हा मोठा अविचार त्यानें केला आहे. व आमच्या मनास जास्त उत्तेजन देऊन चिडविलें आहे. असा प्रयत्न जो कोणी करील तोच महाराजांचा पूर्ण अहित करणारा आहे असें लोकांनीं समजलें पाहिजे.

आज ९ वर्षांत अशाच चटोऱ्या लोकांनीं हांजीहांजी करून दुष्टकृत्यें करण्यास महाराजांस उत्तेजन दिलें आहे व त्यामुळें आज हा परिणाम झाला आहे. महाराजांचा खरा हितचिंतक तोच समजला पाहिजे कीं, जो वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध होत असलेल्या गोष्टी तशा घडल्या नाहींत असें सप्रमाण व सयुक्तिक लोकांपुढें मांडील. तसें न करतां महाराजांचा जुलूम, अन्याय वगैरे कांहीं जरी असलें तरी त्यांत त्यांचा दोष नाहीं, महाराज अमुक अन्याय करतो असें ह्मणणारे जे लोक अहेत तेच दोषी आहेत, त्यांना वाईट शब्दांनीं, वाईट वाक्यांनीं जर तो ताडन करील तर त्याला तेवढ्या पुरती भलाई मिळेल परंतु महाराजांविरुद्ध आणखीं जास्ती महत्वाच्या गोष्टी ज्या स्वामिभक्ति करतां व महाराजांचें जास्त नुकसान न होण्याचे बुद्धिनें आमच्या पोटांत आह्मीं दाबून ठेविल्या आहेत व ज्यांचें आह्मांस अजीर्ण झालेलें आहे त्या बाहेर काढण्या करितां वत्सलामार्फत 'म' नें आह्मांस जुलाबच दिला असें आह्मीं समजतों. परंतु तो आह्मांस लागू न होवो असें मनापासून आह्मीं चाहतों.

आमच्या शिवाजीरावमहाराजांचें एकंदर आचरण कसें आहे

तें दिवाणापासून तर भंग्यापर्यंत सर्वांस सारखें माहित आहे. त्या ठिकाणीं उगीच उपरोधिकपणानें कोणीं कांहीं बोलेल तर तें शोभेल व धकेल काय ? कधींही धकावयाचें नाहीं. लोकांच्या खऱ्या राजानिष्ठेमुळेंच इतके दिवस सर्वांनीं सर्व प्रकारचें दुःख सहन केलें व महाराजांस आपल्या मनाची हौस पुरी करून घेऊं दिली; नाहींतर एक वर्षही त्यांचीं जुलूमीकृत्यें धकलीं नसतीं.

ता. १७ दिसंबर ९४ च्या इंदुप्रकाशांत आमच्या इंदुरच्या एका सखाराम गणेश नांवाच्या गृहस्थानें महाराजांस एक लांबलचक सूचना राज्यस्थितीच्या संबंधानें केली होती. तें पत्र कोणीही पाहिलें व त्यांत नुकसान सहन करणारांच्या नांवाची यादी दिली आहे ती पाहिली म्हणजे लोक राजनिष्ठ आहेत किंवा हे वत्सलाचे 'प्र' बक्षिस मिळविण्याची इच्छा बाळगणारे राजनिष्ठ आहेत तें लोकांच्या लक्षांत येईल. या करितां एकंदर साऱ्या गोष्टीचा विचार करून 'प्र' चें अनुकरण कोणीं करूं नये अशी आमची महाराजांच्या हिताकरतां सर्वांस प्रार्थना आहे.

ताजा कलम—आमच्या या लेखावर 'प्र' नें आमच्या अब्रू विरुद्ध आणि आमच्या गोष्टी खोट्या असल्याबद्दल सप्रमाण कांहीं लिहील्यावांचून आम्ही आतां त्याच्या बडबडी कडेस कधींही लक्ष देणार नाहीं. मग तो महाराजांची कितीही तारीफ करीत सुटो, आम्हांस त्याची जरूर नाहीं. बडोदावत्सलकारांनींही ता० ३ मिनहूचा श्री सयाजीविजय मनन पूर्वक वाचून प्रलाप करण्याचें बंद करावें असें रास्त दिसतें.

---

## खलिता दिला.

गेल्या १३ तारखेस रेसिडेन्ट कर्नल बार व त्यांचे फर्स्ट असिस्टंट कॅप्टन न्यू मार्च असे महाराजां कडेस शिरस्त्याच्या आफिशियल भेटीकरतां गेले होते. त्या भेटींत महाराजांचे नांवें व्हाइसराय साहेबांकडून त्यांचें अन्याई वर्तन त्यांनीं बंद करावें व लोकांवरील जुलूम दूर करावा अशा अर्थाचा आलेला खालेता होता तो त्यांनीं दिला म्हणून कळतें. शिवाय साहेब बहादुरांनीं महाराजांची चांगली कान उघाडणीही केली असें कळतें.

## पालथ्या घड्यावर पाणी.

रेसिडेन्ट साहेब उपदेश करतात, व्हाइसराय साहेब ताकिदीचे खलिते पाठवितात, वर्तमानपत्रें ओरडतात, रयत ढळढळां रडते तरी महाराज शिवाजीराव आपला करूर स्वभाव यत्किंचित्ही सोडीत नाहींत. इतका बोभाट झाला आहे म्हणून आणखी अधिक छलवाद त्यांनीं मांडला आहे. यांचा तावडतोब

## दिवाणी फौजदारी अधिकार

जर सार्वभौम सरकार आपल्या ताब्यांत घेईल तर प्रजा अत्यंत सुखी होणार आहे.

# शिवाजीमहाराजांचे सहीचा जाहीरनामा पहा.

पुरवणी—होळकर सरकार ग्याझेट.

ता. २० आगष्ट सन १८९५.

**श्रीशंकर.**

हुजूर जबानी हुकूमाचें टिपण नंबर $\frac{६३}{५}$

हुजूर जबानी हुकूमाचें टिपण ता.१९।८।९५

जनरल सखाराम मार्तंड हे हुजुराकडील नोकरांस वाईट रीतिनें नोकरी करण्यास व पळून जाण्यास कसें शिकवितात हें खालीं लिहीलेल्या संबंधावरून सहज लक्षांत येण्यासारखें आहे.

सखाराम मार्तंड हे धारचे जहागिरदार असून तेथें जे मोठे नोकर आहेत त्यांपैकीं बरेच त्यांच्या वतीचे आहेत. उदाहरणार्थ, तेथील दिवाण गोपाळराव हे यांच्याच वतीचे आहेत, व गोपाळराव दिवाणाचे साडू शिवरामशास्त्री हे मल्हारराव यांस शिकविण्यास मास्तर होते.

धारचे दिवाण गोपाळराव यांचा संबंध धारचे वकीलाशीं आहे व धारचे वकीलाचा संबंध भैया घोडे यांच्याशीं आहे. भैया घोडे याचें, येथील छावणींत इमारती लांकडें विकण्याचें दुकान आहे. व त्याजकडून इंजिनियारिंग कारखान्यांत पुष्कळ लांकडें रामभाऊ इंजिनियर यानीं खरेदी केलीं आहेत; याप्रमाणें इंजिनीयरींग कारखान्याशीं व रामभाऊ इंजिनियर यांच्याशीं भैया घोडे याचा संबंध आहे. रामभाऊ इंजिनियर यांचा व सखाराम मार्तंड यांचे बंधु गोविंदराव मार्तंड यांचा परम स्नेह आहे.

भैया घोडे यांचा बंधु नाना घोडे हुजूर शागीर्दपेशांत पुष्कळ वर्षे नायबीचे कामावर होता, त्या कारणानें हुजूर मुदबखांतील कामाठी, भालेकरी व अण्या लोकांशीं यांचा संबंध राहिल्यामुळें त्यांस नोकरी विघडविण्याबद्दल सखाराम मार्तंड हे, यांचे मार्फत शिकवित होते व असतील असें म्हणण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं.

तसेंच सखाराम मार्तंड यांचा एक परम स्नेही दौलतसिंग मांवाचा चालाख व लुच्चा मनुष्य कामाठीपुऱ्यांत रहातो, त्याचे मार्फत कामाठी व भालेकरी यांस व त्यांचे दुसरे एक परमस्नेही पेंढरकर यांचे घराजवळच हुजूर मुदबखांतील अण्या रहातात त्यांचे मार्फत अण्या लोकांस वाईट नोकरी करण्याबद्दल हे शिकवित नसतील असें म्हणतां येत नाहीं.

या शिवाय इंजिनियारिंग कारखान्यांत पैशांची विपुलता असल्यामुळें हुजूर मुदबखांतील कामाठी व भालेकरी यांस चांगली नोकरी न करणें, स्वयंपाक विघडविणें व पळून जाणें वगैरे गोष्टी करण्याकरितां त्यांस रामभाऊ इंजिनियर मार्फत सखाराम मार्तंड हे लांच देववीत नसतील असें म्हणतां येत नाहीं. कारण कीं, हुजूर मुदबखांतील कांहीं कामाठी व भालेकरी लोक इंजिनेरींतील ठेकेदारांजवळ काम केलेले असे आहेत. व इंजानियरींतील ठेकेदार ह्मणजे रामभाऊ इंजिनीयर यांचे मातेहातच आहेत.

हुजूर कडून काढलेले इसमापैकीं कांहीं लोकांस सखाराम मार्तंड हे नोकर ठेवितात. व कांहीं जणास यांचा व धारचा वर लिहील्या प्रमाणें संबंध असल्यामुळें तेथें नोकऱ्या मिळतात. हुजुरा कडून काढल्या पैकीं खालीं लिहीलेल्या इसमांस यांनीं नोकर ठेविलें आहे.

दामोदर रसे, नांवाचा एक इसम दिवाण कचेरींत पूर्वी कारकून होता त्यास

तेथून काढून दिला होता तो ह्यांनीं आपले घरीं नोकर ठेविला आहे.

वावुराव या नांवाचा इसम पूर्वी हुजुराकडे हुजऱ्यांत नोकर होता. त्यास, ह्यांणीं आपणापाशीं हलकाऱ्यांत नोकर ठेविलें आहे.

शेरअली, या नांवाचा इसम पूर्वी पोलिसांत नोकर होता. व जेलावर याचा पाहरा असतांना कांहीं खुनी कैदी ह्याचे मेळानें पळून गेले होते. व ह्यास तेथून वजा केलें होतें. ह्या इसमास त्यांनीं आपले जीनिंग फ्याक्टरींत नोकर ठेविला होता.

जे लोक एखाद्या कुटुंबांतील मनुष्यां मध्यें आपसांत तंटे लावतात असे लोकही, हे, आपणा जवळ ठेवितात.

जंगी फौजेंतही ह्यांचे वेळचे बरेच लोक नोकर आहेत. व त्यांचे पाहरे, राजवाड्यांत व स्वारी वाहेर जेथें राहाते त्याठिकाणीं लागत असतात. त्यावेळीं त्यांपैकीं आफिसरा मार्फत हुजुरा कडील नोकर लोकांस मालकाची नोकरी बिघडविण्या वद्दल व पळून जाण्या वद्दल शिकविणें वगैरे, हें काम यांचेंच असावें यांत कांहीं संशय नाहीं.

एकंदरींत विचार केला असतां अशीं कृत्यें करणें हें फार नीच व अती निंद्य कर्म आहे. थोर मनाचे मनुष्याचे हातून अशी गोष्ट कधींही होणें नाहीं.

अशा रीतिनें यांचे पासून मनस्वी त्रास हुजुरास झाल्यामुळें नाइलाजास्तव, याप्रमाणें लीहिणें भाग पडलें

जर असें होतें तर सखाराम मार्तंड यांस पुनः इंदुरांत कां आणले? असें कोणी मनांत आणील तर त्याचें कारण असें आहे कीं, आम्ही दीर्घद्वेषी आहोत असे कोणीहीं मनांत आणूं नये. खाजकरितां यांजला येथें आणलें आहे.यांचीं कृत्यें कांहीं चांगलीं नाहींत. सदरहु टिपण ग्याझीटांत छापून प्रसिद्ध होण्याकरितां दरबारांत रवाना. दस्तूर केशव वापूजी सोनाळकर मुक्काम हवावंगला.

---

महाराज कितीं मूर्ख आहेत तें वरील मजकुरावरून सहज समजेल, व ह्या संबंधीं आम्ही आमचे विचार पुढील अंकीं कळवूं.

---

## नंबर ११.

( विक्षिप्त अंक ४८ ता. ३१ आगष्ट ९५ )

गतांकीं होळकर सरकार ग्याझेटची पुरवणी दिलेली वाचून महाराज शिवाजीराव होळकर वेडेपणाच्या शेवटल्या पायरीपर्यंत येऊन पोंचले असल्याची आमच्या वाचकांची खात्री झालीच असेल. आम्हीं त्याचें इंग्रजी भाषांतरही करून व्हाइसराय-साहेबांकडेस त्यांची खात्री होण्याकरितां पाठविलें आहे. तेवढ्यावरूनच त्यांची खात्री होणें बाकी असेल असें आम्हीं समजत नाहीं. तथापि इंदूरची रयत सुखी होण्यास जे जे प्रयत्न करणें जरूर आहेत असें आम्हांस वाटतें ते ते करण्यास आम्हीं अगदीं तयार आहोंत. बडोदावरसल व त्यांचा देवासकर 'म' तसाच इंदुप्रकाशांतला निर्लज्ज, पोटार्थी व अन्यायप्रिय 'सिंह' आणि आमच्या मुंबईतला १०।२०

प्रतीनीं कधींमधीं प्रसिद्ध होत असलेला टारगा 'पांडित' यांची ग्याझेटच्या उताऱ्यानें तरी शिवाजी महाराजांच्या दुष्टपणाबद्दल खात्री झालीच असेल. असल्या वात्रटांच्या व तोंडपुजे पोटबाबूंच्या खोटसाळ प्रलापांमुळें डोकें फिरलेल्या होळकर महाराजांस आपल्या दांडगाईचा क्रम जोरानें चालविण्यास अधिक फावतें. परंतु परिणामीं महाराजांचे होणारे भावी सोंहाळे त्यांचे त्यानांच भोगावे लागणार आहेत.

शिवाजीमहाराजांचा अशा प्रकारचा पागलपणा हल्लींच्या चार दोन महिन्यांतलाच आहे असें नाहीं. सन १८९२ च्या अक्टोबर महिन्यांत या महाराजांनीं सखाराम मार्तंड हे मुंबईस असतां, त्यानां लिहून कळविलें होतें कीं, तुमचा व धारचे दिवाण गोपाळरावजी यांचा स्नेह असून त्यांच्या मार्फत धारचे महाराजांस बीमारीचे निमित्यानें इंदूर छावणींत साहेबलोकांजवळ आमची निंदा करण्या करितां आणून ठेविलें आहे. त्यानां लौकर धारेस घेऊन जा, नाहींतर आम्हीं तुमची जहागीर गांवें जप्त करूं. त्यानंतर त्यानां अनेक पत्रें व तारा करून आणि रुपये पाठवून इंदुरास बोलवून नेलें. पुढें तारिख ८ मार्च १८९३ चा एक हुकूम जारी केला कीं, सखाराम मार्तंड व सर काशिरावदादा यांच्यावर सरकारची नाराजी असून त्यानां हल्लीं कौन्सिलर कसे नेमले? कृष्णराव मुळे आदि करून नवीन मंडळीनें कांहीं मजकूर त्यांचे विषयीं सांगितल्या वरून नाराजी झाली होती. परंतु हल्लीं त्यांचें सांगणें खोटें आहे असें ठरल्या वरून अर्थात नाराजी दूर झाली म्हणून हा हुकूम जारी केला आहे.

दुसरा हुकूम ता. १६ मार्च सन ९३ चा नंबर १११ चा. सखाराम मार्तंड हे सरकारचे पिढीजाद नोकर असून कांहीं सरकारी कामाकरितां मुंबईस गेले होते. ते हल्लीं आले, तेव्हां त्यांना रियासतीचे सरसुभे नेमिले असून ८०० रुपये दरमहा केला आहे व बेदरकर रावबहादुर यांची अडीच महिन्यांची मुदत राहिली आहे ती संपल्यावर यांनीं कारभाराचें काम पहावें व यानां २५०० रुपये दरमहा दिला जाईल.

तिसरा हुकूम ता० २२ एप्रील सन ९३ चा. मुलकी खात्याचें कुल काम सखाराम मार्तंडनीं पहावें. त्यावर कारभारी साहेबांचे सहीची जरूर नाहीं. हा हुकूम सोडला

खरा परंतु एक दिवसही त्या हुकूमाप्रमाणें त्यांना काम पाहूं दिलें नाहीं. रोज त्याबद्दल भांडाभांडी चालू होती.

चवथा हुकूम गेल्या मार्च महिन्यांत दिला कीं, तुह्मांस रियासतीचे सर कारभारी नेमिलें आहे व हुजूरास जे अधिकार आहेत ते सर्व तुह्मांस दिले आहेत. हाही हुकूम थट्टेचा, लबाडीचा व मूर्खपणाचा नव्हे असें कोण ह्मणेल ?

प्रस्तुत त्यांना नोकरींतून बजा करून इंदुरांतून जाण्याचा हुकूम दिला आहे. ते जात नाहींत ह्मणून होळकरी ग्याझेटांत गतांकीं दिलेला जाहिरनामा प्रसिद्ध करून आपली वेडगळ स्थिती चांगली व्यक्त केली आहे. सदर मजकूर ग्याझेटांत छापण्याकरितां दरबारांत गेला, तेव्हां कारभारीसाहेबांनीं तो परत केला. त्यामुळें त्यांचें व महाराजांचें वैरंच भांडण झालें. पुढें महाराजांनीं परभारें तो मजकूर छापखान्यांत पाठविला. छापखान्याचे म्यानेजर यांनीं त्या मजकुरावर दरबारची सही नसल्यामुळें हरकत घेतली. व त्या हरकतीचा परिणाम जें सरकारी ग्याझेट सोमवारीं निघावयाचें तें बंद राहिलें. शेवटीं कारभारी साहेबांनीं म्यानेजरांस चिठी पाठविली कीं, दरबारची सही नाहीं तरी तुह्मांस छापण्यास हरकत नाहीं. कारण, छापखाना सरकारी आहे. अशा आशयाची चिठी जेव्हां कारभारी साहेबांकडून गेली तेव्हां सोमवारचें ग्याझेट बुधवारीं छापून प्रसिद्ध झालें व तो शिवाजीराव महाराजांचा ताजा मूर्खपणा लेगच आह्मीं आमच्या वाचकांस गेल्या शनवारच्या विक्षिप्त अंकांत कळवूनही सोडला.

या एकंदर वेडगळ हुकूमावरून सन ८८ सालीं सर लिपल ग्रिफीन यांनीं शिवाजी महाराज वेडा झाला आहे, याचे अधिकार रद्द करावे ह्मणून जो रिपोर्ट केला होता तो अक्षरशः खरा होता असें ठरतें. परंतु प्रजेच्या दुर्दैवानें आज हीं गेलीं ७ वर्षें अन्याय व दुष्टपणांची कारकिर्द चालून राहिली आहे, ही किती आश्चर्याची गोष्ट समजली पाहिजे !

शिवाजीराव महाराजांचे हातीं राज्यकारभार गेल्या पासून जीं कृत्यें त्यांचे हातून झालीं आहेत तीं सर्व जुलूमाचीं आणि अन्यायांचीं असून केवळ दोनच गोष्टी विशेष ह्मणण्या सारख्या व विचाराच्या झाल्या आहेत. कॉलेज स्थापना ही एक व दुसरी ब्रिटिश कामदारांस सरकारी

व खासगी वागणुकींत राजी ठेवणें; म्हणजे ब्रिटिश सरकारचा स्वतःचा ज्या कामाशीं संबंध असेल त्या कामांत त्यांच्या मर्जी बाहेर किंचितही वर्तन केलें नाहीं, त्यामुळें प्रजेवर होत असलेला जुलूम त्यांचे लक्षांत आला नाहीं. शिवाय हेनवी व कास्थवेट या माजी एजन्ट साहेबांनीं महाराजांच्या दुर्वर्तनाकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं त्यामुळें महाराज अधिक शेफारत चालले.

सध्यां वर्तमानपत्रांतून बोभाट फार होऊन राहिल्यामुळें महाराज फार खवळले आहेत. एखाद्या मनुष्यास बाहेर जोडे बसले म्हणजे तो तसाच रागाचे सपाट्यांत घरीं येऊन आपल्या बायकोवर तो सर्व राग काढून तिला मारपीट करतो, तद्वत अलिकडे महाराजांनीं नित्य नव्या लोकांस मारपीट करण्याचा सपाटा चालू केला आहे. ता. १९।२० मिनहूच्या हजेरींत ज्या लोकांस मारपीट केली त्यांपैकीं दोघांचीं डोकीं फुटून फार जखमाही झाल्या आहेत.

एक राजशालक पोलिस खात्याचा आफिसर असून मनसोक्त वर्तनानें आपलें काम करणारा असा आहे. त्यानें एका खटल्याचा तपास चालविला होता त्यांत दोन मनुष्यांच्या प्राणाची हानी झाली व त्या बद्दल चौकशीही झाली आहे. परंतु राजशालक पडल्यामुळें वांचला गेला. हल्ली तो म्युनिसिपल म्यानेजरचें काम पहात आहे. त्यानें ता. १९ मिनहू रोजीं हुकूम दिला कीं, वाणी लोकांनीं सडकेवर गाड्या उभ्या करून माल तोलूं नये. पिंपळी बाजार व मल्हारगंज या ठिकाणीं धान्याचा व्यापार असल्यामुळें व सडक रुंद आणि मोठ्या रस्त्याची नसल्यानें पूर्वी पासून तेथेंच माल तोलला जातो व गाड्या उभ्या रहातात आणि तसें केल्या वांचून त्या व्यापाऱ्यांस गतीच नाहीं म्हटलें असतांही चालेंल. जेव्हां म्यानेजरनें असा मनाईचा हुकूम पाठविला तेव्हां वाणी लोकांनीं अर्ज केला. व त्या अर्जावर कारभारी साहेबांनीं पूर्वीच्या वहीवाटी प्रमाणें करावें असा हुकूम दिला. तेव्हां म्यु. म्यानेजर साहेब दरबारा समक्ष जाऊन मनास वाटेल तसे भांडले व दरबारानें दिलेला हुकूम जो बारनिशींत गेला होता तोही फाडून टाकला म्हणून समजतें. तात्पर्य, इथून तिथून सर्व झोटिंगपादशाही महाराजांच्या जुलूमी कारकिर्दीमुळें इंदूर शहरांत चालून राहिली आहे. इंग्रज सरकारा कडून याचा लवकर बंदोबस्त न होईल तर

कोणत्या थरावर होळकरशाही जाईल तें सांगवत नाहीं.

**चालू महिन्यांतील मारपीट, कैद, उठाबशा इत्यादि हकिकत.**

ता. ११ रोजीं हवाबंगल्यावर पलटणींतील व बुळ्यांकडील लोकांची व गौरीकुंडाजवळ व्यांकेचे दुकाना पाठीमागील पुऱ्यांतील लोकांची हजेरी घेऊन त्यांत जे नोकर होते त्यांपैकीं १२ मनुष्यांस नोकरींतून वजा केलें, कित्येकांस मारपीट उठबशाही करविल्या. दोघांस कैद केले. त्या दोघांपैकीं एकाचें नांव शिवनारायण असल्याचें कळतें. त्याला दोन पाहऱ्यांनिशीं रामपूर जिल्ह्यांत रवाना केल्याचें समजतें. परंतु कोठें पाठविला, त्याचें काय झालें वगैरे त्याच्या घरच्या मनुष्यांस न कळल्यामुळें त्याचे घरीं रडारड चालू असल्याचें समजतें. ही एकाची झाली. दुसऱ्यास नेमाडांत सेंधवा नागलवाडी कडेस रवाना केला म्हणतात. त्याचीही खुलासेवार हकिकत समजत नाहीं. अशा प्रकारें इंदूरांतील आबाल वृद्धांची हजेरी घेण्याचा क्रम चालू झाला आहे.

ता० १२ मिनहूरोजीं फरासखान्याचे लोक सोडले होते, त्यांनां समक्ष बोलावून ९ वर्षांत फरासखान्यांत ज्या डेऱ्या राहुट्या सतरंज्या वगैरे खरेदी केल्या, त्यांत लबाडी झाली आहे, करतां ५६ हजार रुपये तुम्हीं सर्व मिळून द्या असा महाराजांनीं हुकूम दिला. या लोकांत कारकून व दुसरे दहा पांच रुपये पगाराचे सर्व नोकर असून त्यांचा कपडे खरेदीशीं अर्थाअर्थीं सुद्धां कांहीं संबंध नसून त्यांजवर हा जुलूम झाला आहे. फरासखान्यांत फक्त नोकरी, एवढाच काय तो त्यांचा महापराध समजावयाचा.

ता० १६ मिनहूरोजीं कारभारी साहेबांच्या तैनाती लोकांची हजेरी झाली, त्यांत मारपीट वगैरे होऊन १ काशिराम चपरासी २ गणु हुजऱ्या ३ नंदा न्हावी व ४ था एक इसम एवढ्यांना नोकरींतून वजा केले. दोघां कोचमीन लोकांस एक एक महिन्याचा पगार दंड केला. अशा हुकूमाच्या हुजूर सेक्रेटरीच्या सहीनिशीं चिठ्या नंबर १९१७।१८।१९ ता० १६।८।९५ च्या जारी झाल्या.

ता० १९ मिनहूरोजीं सखाराम मार्तंड कडील घरचा कारकून दामोदर व त्यांचे दोन हुजऱ्ये, बाबुराव चपरासी इतक्या इसमानां नोकरींतून वजा करून शहरांतून काढून देण्याचा हुकूम महाराजांनीं दिला. त्याच दिवशीं कोठी कारखान्या-

कहील लोकांची हजेरी झाली. त्यांत पुष्कळ लोकांस मारपीट व नोकरीं-तून बडतर्फ केले. पैकीं बळवंतराव कारकून फारच मारला गेला व गाडींत घालून त्यास हवा बंगल्यावरून शहरांत आणला म्हणून कळतें.

ता. २० रोजीं खासचरदार लोकांची हजेरी झाली. त्यांत दोन इसमांस अतिशय मारपीट केली. त्यांनाही हवा बंगल्यावरून गाडींत घालून शहरांत आणावे लागले. सदर दोन इसमांचीं नांवें कळलीं नाहींत. दुसऱ्या कित्येकांस मारपीट होऊन बडतर्फही केले व शहरांतून काढूनही दिले. एकंदर ७ इसमाची अशी दशा झाली.

सखाराम मार्तंड यांस इंदुरांतून निघून जाण्याबद्दलचा अतिशय तगादा आहे. ते आपल्या इस्टेटीची किंमत मागतात. एक लाख रुपये पर्यंत देण्यास महाराज तयार झाले असून एक महिन्याकरतां तरी तुम्हीं निघून जा असा त्यांच्या मागें ससेमिरा लागला आहे. ता. २० रोजीं त्यांच्याकडेस **एक गाढव** महाराजांनीं नजर पाठविल्याचें कळतें. पूर्वीही असेंच एकवेळ पाठविलें होतें, तेव्हां त्यांनीं तें परत करून हें **खासे घोड्यांच्या पागेंत बांधावें, एखादे वेळेस कामास येईल,** असें उलट सांगून पाठविलें होतें म्हणतात. कशी राजकृती आहे !

इंदूर शहरांत कृष्णपुरा व इमली बाजार यांच्या दरम्यान बुळ्यांची पागा आहे. ती रिकामी पडल्यामुळें लोक भाड्यानें तेथें रहातात. ९०।९० वर्रे त्या पागेंत आहेत. सदर पागेंत जे लोक रहातात ते सर्व बदमाष आहेत करितां त्यांना सर्वांना तेथून निघून जाण्यास सांगावें म्हणून महाराजांचा हुकूम झाल्याप्रमाणें त्या लोकांस ताकीद दिली गेली आहे.

इंदूप्रकाशांतील 'सिंह' या सहीचे पत्रांत ब्राह्मण लोक नालायक, बदमाष, लबाड; यांनीं पेशवाई वगैरे बुडविली, ते खोट्या बदनाम्या महाराजांच्या करीत आहेत, इंदुरास बिलकूल अन्याय वगैरे नाहीं; महाराज फार चतूर, न्यायी व राजकारणपटु आहे असे प्रलाप ज्या कोणीं ब्राह्मणेतर परभू किंवा मराठ्यानें अथवा मुसलमान धनगरानें काढले आहेत त्यांना ह्या सर्व राजकारणपटुत्वाच्याच गोष्टी दिसत असल्यास त्याच्या बडबडण्याची किंमत सहज कोणाचेही लक्षांत येण्याजोगी आहे. शिवाजीराव महाराजां कडून अन्याय होत नाहीं म्हणणारे ४ प्रकारचे लोक इंदुरांत आहेत. ते असे:—

१ ज्या कोणाचा रोजगार, सुख व ऐश्वर्य प्रस्तुत महाराजांच्या एका व्यक्तीवरच अवलंबून असलेल्या पैकीं कोणीं तरी.

२ ज्या कोणास महाराजांच्या जुलूमी व अन्यायी वर्तना पासून फायदा व उपयोग होत असेल त्या पैकीं कोणीं तरी.

३ महाराजांच्या जुलूमी कृत्यांत पोट जाळण्यास्तव अगर अशा प्रकारें मुर्दफरासी करून धनाढ्य होण्याची ज्याची उत्तम सोय असेल तो व महाराजांच्या जुलूमास मदत करणारे जे कोणीं असतील त्यांपैकीं कोणीं तरी.

४ महाराजांचा अधिकार भ्रष्ट झाला व त्यांच्या जुलूमाची चौकशी झाली तर तिचा परिणाम ज्याच्या पर्यंत येणारा आहे त्यांपैकीं कोणीं तरी.

या चौघांशिवाय दुसरे कोणीही महाराजांचे कैवारी दिसत नाहींत. अशा कैवारी पोटवाबूंस आमचें सांगणें आहे कीं, त्यांनीं कृतज्ञते करतां पाहिजे तर महाराजां विरुद्ध एक अक्षरही बोलूं नये. आह्मांस अथवा आमच्या बातमीदारास शिव्या देण्याचे इराद्यानेंच जर त्यांनीं हा पक्ष उचलला असेल तर जे दोन हात होतील ते सहन कर ण्यास तयार व्हावें. त्यांच्या खऱ्या गोष्टी उघडपणें बाहेर काढण्याचा आह्मांस प्रसंग आल्यावर त्यांना मोठा पश्चात्ताप होईल हें त्यांनीं पूर्णपणें समजावें.

प्राचीन म्हणीप्रमाणें कोल्ह्याच्या शिकारीस जाणारा मनुष्य वाघाच्या शिकारीचें सामान बाळगित असतो, त्याप्रमाणें आह्मांजवळ व आमच्या बातमीदाराजवळ भरपूर सामुग्री आहे. करितां अशा गिधडांची आह्मीं मुळींच भीति ठेवित नाहीं. महाराजांचें हित चिंतून ते शुद्धिवर यावे आणि त्यांचे हातून प्रजेला सौख्य मिळावें, हाच प्राधान्य हेतु आमचा आहे व तो साधण्यास्तव अदलून बदलून रामबाण गुटिकाही देण्याचें चालविलें आहे. कधीं गुण पडेल तेव्हां खरें.

## ताजी बातमी.

गेल्या ता. १२ रोजीं रात्रीस २ वाजतां जे लोक महाराजांचे हुकूमानें कैद होते त्यांस हवा बंगल्यावर नेले. एकंदर ६५ लोक होते. त्यांना मोकळे करणारं अशी शहरभर आफवा उठल्यामुळें सर्व लोक आनंदांत होते. परंतु महाराजांच्या क्रूर स्वभावाच्या लहरीनें पुन्हां उलट खाऊन फक्त पोशाख खान्यांतील व फरासखान्याकडील

जे लोक कैद होते ते व दुसरे चार पांच मिळून २१ मनुष्यें बंदमुक्त करण्याचा हुकूम दिल्याप्रमाणें सुटलीं. इंजिनियारिंगकडील माचाच्यासंबंधानें जे दोन कारकून कैद होते त्यां पैकीं एक सुटला. तात्या केळकर—ताज्यांचे संबंधानें कैदी होते ते एक सुटले. बाकीचे कैदेंतच आहेत. दवलतखां चोपदार हाही त्या दिवसच्या हजेरींत होता. त्याला शिव्यांची, माराची, बक्षिसी देऊन एक महिनाभर त्यानें जेलांत रहावें असा हुकूम दिला. पुढें तो चोपदार व त्याचे बरोबर दुसरे चार इसम यांना तुरुंगांत पाठविल्याचीं वारंटें स्पे. माजिस्त्रेट रानडे यांनीं दिलीं. परंतु त्या आठवड्यांत कारभारी साहेबांनीं माजिस्त्रेट, पोलिस, जेलसुप्रिन्टेडेंट यांस असा हुकूम दिला होता कीं, महाराजांचे हुकूमानें जे लोक कैदेंत येतील त्यांना आमच्या हुकूमा शिवाय कैदेंत ठेवूं नये. असा विशेष हुकूम कारभारी साहेबांचा झाला होता तरी सर्व लोक महाराजांचे नोकर असल्यामुळें ते कारभारी साहेबांच्या हुकूमापेक्षां महाराजांच्या हुकूमाचीच विशेष मातब्बरी समजून त्याप्रमाणें तामिलीही करतात. जरी असा प्रकार आहे तरी जेल सुप्रिन्टेडेंट यांनीं स्पेशल माजिस्त्रेट कडील कांहीं वारंटें परत पाठवून दरबारा कडेस मंजुरी करतां रिपोर्ट केला. तेव्हां कारभारी साहेबांनीं तीं वारंटें परत पाठवून स्पष्ट हुकूम केला कीं, स्पे. मा. कडील किंवा महाराजां कडील वारंटांवर मीं सही करीत नाहीं व त्याची तामिली होण्याचाही हुकूम देत नाहीं. ही बातमी महाराजांस समजतांच त्यांनीं कारभारी साहेबांस समक्ष बोलाविलें. पुढें उभयतांचें बरेंच भांडण होऊन कारभारी साहेबांनीं दुसरा आपला राजिनामा त्या दिवशीं बडेसाहेबांकडेस लगेच रवाना केला.

हा प्रकार झाल्यानंतर गिरणी संबंधाच्या नुकसानीचे २० हजार रुपये व दरमहा ५०० रुपये प्रमाणें ४ वर्षांचा घेतलेला पगार परत द्या तेव्हां जा, असा हुकूम त्यांस महाराजांनीं दिला. कारभारी साहेब इंग्रजी राज्यांत वागलेले, शहाणे, धूर्त असे आहेत तेव्हां असल्या पोरकट हुकूमास ते थोडेच जुमानणार? एवढा प्रकार त्या दिवशीं होऊन दुसरे तिसरे दिवशीं कारभारी साहेबांचे तैनातीस जे हुजऱ्ये जासूद, शिपाई, स्वार वगैरे ६८ लोक होते त्यांस ४ वाजतां रात्रींस समक्ष बोलावून पुष्कळांस मारपीट

करून हांकलून दिले. व दुसरे दिवशीं २ वाजतां रात्रीस कारभारी साहेबांचे तैनातीस जी बग्गी व घोडे दिले होते तेही परत मागवून घेतले. दुसरे दिवशीं ३तीन वाजतां पुन्हां परत ते दिले. कारभारी साहेबांनीं शेवटीं शेवटीं थोडासा जोर दाखविला परंतु उपयोग काय ?

मिस्तर दरजी याला कैदेंतून सोडला परंतु नान्या दरजी पळाल्या बद्दल गोम्याचें प्रायःचित्त सोम्यास या ह्मणीप्रमाणें मिस्तरजीचें घर जप्त केलें होतें व त्याचें लिलांवही चालू केलें होतें. परंतु त्यानें बडे साहेबांपर्यंत आपली मजल पोंचवून व साहेब बहादुरांकडून लिहून गेल्यामुळें कारभारी साहेबांनीं सक्त हुकूम देऊन तूर्त तें लिलांव बंद केलें आहे.

## कोंडाजी हुजऱ्या.

वरील हुजऱ्या महाराजांच्या एका राणीकडेस जामदारखान्याचें काम करीत असे. त्याला ता. १२ रोजीं झालेल्या हजेरींत समक्ष बोलवून चापून त्यास मारपीट केली. तो त्या त्रासानें संधी साधून हवा वंगल्या वरून परभारें पळाला तो उज्जनीस गेला. तो पळून गेल्याचें महाराजांस समजतांच त्याचे घराची जप्ती केली व त्याच्या दोन बायका ज्या घरांत होत्या त्यांस व त्याचे सामूस घरांतून काढून दिलें व कोंडाचीचे सासूचा भाऊ त्याचे जवळ रहात होता त्यास कैद केला. त्याचें नांव नवसाजी. त्याला कैद केल्या नंतर कोंडाजीस आणण्या करितां दोन बाया उज्जनीस पाठविल्या. त्यांनीं कोंडाजीस सांगितलें कीं, तुझ्या वांचून महाराज जेवण करीत नाहींत, तुझ्यावर महाराज फार प्रसन्न आहेत, तुझ्या मालकिणीस आतां मुलगा व्हावयाचा आहे, तसें झालें तर तुला जाहागिर वगैरे मिळेल, अशा प्रकारची भुलथाप त्याला त्यांनीं देऊन इंदुरास आणलें. तो इंदुरास येतांच त्याची काराग्रहांत भरती झाली. कसा जुलूम आहे ? घर गेलें, नोकरी गेली, कैद मिळाली, बायका मनुष्यांस अन्न मिळण्याची पंचाईत पडली; आतां त्यांनीं महाराजांचे नांवानें खडे फोडून दिवस लोटावेना ?

## सखाराम मार्तंड.

ज्यांना ८०।३० हजार रुपये बक्षिस देण्यास पात्र मानले होते, ते इंदुरास गेल्यावर त्यांना एक दिवसही कोणतेंही काम करूं दिलें नाहीं; नेहेमीं त्यांचा अपमान, त्यांना त्रास होईल अशीच वागणूक त्यांच्याशीं ठेविली. चालू महिन्याच्या पहिल्या आठवड्यांत

त्यांना समक्ष बोलावून तुम्हीं असे, तुम्हीं तसे वगैरे बोलून झणूं लागले कीं, वर्तमानपत्रांत आमच्या विरुद्ध जो मजकूर येतो तो मुंबईच्या पत्रांस तुम्हीं देतां व पुण्याच्या पत्रांस बेदरकर देतात; असा अनेक प्रकारें त्यांच्याशीं वाणीसंहार करून तुम्हीं व तुमचे बंधू एकदम येथून निघून जा असा हुकूम त्यांस दिला. त्यांनीं त्या प्रमाणें निघून जाण्याचा विचार करून इंदूर छावणी व महू या दोन ठिकाणीं रहाण्यास बंगले वगैरे पाहिल्यावर 'तुम्हीं जाऊं नका' असें परत सांगून पाठविलें. असा विचार महाराजांचे मनांत येण्यास काय कारण झालें तें कळत नाहीं. महाराजांनीं असें सांगून पाठविलें तरी त्यांनीं महाराजांस उलट कळविलें कीं, माझ्या सर्व इस्टेटीची किंमत तुम्हीं द्यावी झणजे मीं जातों. हा निरोप पोंचल्यावर तुम्हीं चालते व्हा व तुमच्या पोरांबाळांसही बरोबर घेऊन जा, नाहींतर आमची तुमच्यावर नाराजी असल्यामुळें तुम्हीं गेल्यावर तुमच्या मुलांबाळांस त्रास होईल, असा जबाब आला. तेव्हां त्यांना इंदुरास रामराम ठोकल्या शिवाय गत्यंतर नाहीं असें झालें आहे. त्यांची आपसांतही बंधू बंधू मध्यें या संबंधानें बोलाचाली होऊन राहिली आहे झणून कळतें.

**गेली ता. १६।१७।१८.**

या तीन दिवसांत महाराजांनीं वाटेल्या त्या मोहल्यांतील लोकांस व सरकारी खात्यांतील शिपाई कारकून यांस समक्ष बोलावून त्यांना मारपीट व नोकरींतून बडतर्फ आणि कारागृहाची भरती बरीच केल्याचें समजतें.

**शहरांतील सर्व लोकांवर धाड.**

वर्तमानपत्रांतून महाराजांचा जुलूम येऊं लागण्या पूर्वी व एजंट साहेबां कडून जास्त ताकिद होण्या पूर्वी सरकारी नोकरांसच बहुतकरून महाराज नित्य त्रास देत असत परंतु आतां तर सर्व शहरांतील प्रजेची हजेरी नित्य घेणें सुरू केलें आहे. मोहल्या मोहल्याची हजेरी अलिकडे होत असल्यामुळें शेंकडों लोकांवर जुलूमाचा कहर होत आहे.

**निश्चय केला आहे.**

लोक निंदा करोत, बडे साहेब दटावोत, वर्तमानपत्रें ओरडोत, हवा तितका इलाज होवो, त्या सर्वांची मुळींच परवा न करतां अधिकार नाहिंसा होई पावेतों माझ्या कडून जितका लोकांचा छल होईल तितका करण्यास कधीं मागार घेणार नाहीं, असा महाराजांनीं निश्चयच केल

अहे म्हणून समजतें. तुळशींत भांग म्हणतात ती ही. अशा दुष्ट बुद्धिमुळें संभाजीचे जसे हाल झाले तसे हाल होऊन या महाराजांचा अंतकाळ होईल यांत संशय नाहीं.

### १० हलकारे घालवून दिले.

ता. १८ रोजीं हलकारे लोकांची हजेरी झाली. त्यांत पुष्कळांस मारहाण होऊन १० इसमांस इंदुरांतून निघून जाण्याचा हुकूम झाला. त्या हजेरींत सन ८१ पूर्वी इंदूर फौजेचे जनरल कर्नल धापली यांच्या जवळ नोकर असलेला एक इसम होता, त्यास अतोनात मारपीट केली. दुसऱ्या पुष्कळ गोष्टी द्यावयाच्या आतां बाजूस ठेवून गेल्या आठवड्यांतील विशेष हकिकत देतों.

### ता. २१ पासून २७ पर्यंत.

कामाटी लोकांची व सरकारी मुद्दाखान्यांतील लोकांची हजेरी झाली. त्या सर्वांनीं आपआपलें काम चांगलें केलें नाहीं म्हणून सर्वांस मारपीट, उठबशा करविल्या. त्यांत नथु, राजाराम व दगडू या तिघांस फार मार बसला. मार दिल्या नंतर त्यांस सक्कर बाजारच्या कोतवालीवर कैदेंत बसविले व, बाकीच्यांस शागिर्दपेशांत कैदेंत बसविले. दगडूचे डोळ्यांस जास्त धक्का बसल्यामुळें त्याला गरीबखान्यांत औषधोपचार करण्याकरितां नेऊन ठेविला आहे.

याच दिवशीं सरकारी कोठीखान्यास टाळीं लाविलीं; व डाळ आटा वगैरे राणीसाहेब व दुसरे सरकारी खासे लोकांकडेस जात असे तो त्यानीं आपआपले जवळून पैसे खर्च करून बाजारांतून विकत आणावा असा हुकूम झाला. गणपतीचे पूजे अर्चेस व नैवेद्यासही कारखानदार यांनीं ५० रुपये आपले जवळून खर्च करून दिवे रोषनाई व नैवेद्य वगैरेची व्यवस्था केली.

कोठी कारखान्यांतील २४ कारकून नोकरींतून बडतर्फ केले. हिराचंद कोठारी—कोठीकारखान्याचा मुखत्यार यास फार मारपीट केली व त्यास उताणा आणि पालथा निजवून त्याचे प्रत्येक बाजू वरून जोड्या मुद्दां ५० वेळ माणसें चालविलीं. त्यामुळें त्याचें एका हाताचें हाड ढळलें आहे. त्यालाही औषधोपचार करण्याकरितां शक्कर बाजारच्या कोतवालीवर कैदेंत ठेवून उपचार चालू केले. पुढें ता. २४ रोजीं कारभारी साहेबांनीं हिंमत करून त्यास जामिनावर सोडला. काळूराम औदुंबर ब्राह्मण कोठीकडेस माल तोलणारा होता त्यासही

फार मार दिला. बेशुद्ध होई पावेतों त्याजवर मार चालू होता. दोन तीन ठिकाणीं त्याचे आंगावर जखमा झाल्या असून, त्याला हल्लीं शाकर बाजारच्या कोतवालीवर कैदेंत ठेवून औषधोपचार चालविला आहे.

**महाराजांनीं सैंपाक केला.**

कालका उर्फ मिसरजी हा खुद्द महाराजांच्या खाण्याच्या जिनसा (स्वयंपाक) करीत असे. त्याणें सैंपाक बिघडला ह्मणून त्यास अतिशय मारला. मारानें त्याचें डोकें फुटून पांच टांकेही लागले. त्याला मारल्यामुळें सर्व कामाच्यांनीं एकोपा करून महाराजांचा सैंपाक करणें बंद केल्यामुळें स्वतः महाराज व त्यांचे जवळचे नानाजी केशव या उभयतांनीं हवा बंगल्यावर भाकरी व दुसरे पदार्थ करून पोटें भरलीं. महाराजांचा सैंपाक चुलीवर होत नसून कोळशाचे विस्तवानें शेगडीवर होत असतो. एकंदर ७ रोगड्या पेटवून वर माडीवर नेऊन त्यावर महाराजांनीं सैंपाक केला. त्या दिवशीं अडीच पावं पीठ घेतलें होतें, तें वजन महाराजांनीं ध्यानांत ठेवून शाकुल काढली कीं, अडीच पावं आटा आमच्या टीचभर पोटाला लागत असून रोज ८०।९० रुपयांचा खर्च आमच्या पोटाकडेस लावला जातो ही लबाडी आहे. करतां हीराचंद कोठारी याजपासून १४ हजार रुपये आमच्या पोटखर्चा बाबदचे वसूल करावे असा हुकूम दिला. केवढें महाराजांचें लहान पोट तरी! अडीच पावं पिठापेक्षांही जर कमी लागेल तर महाराज अधिक खुष होतील यांत संशय नाहीं. खुद्द महाराजांचे मतानें जर असा हिशेब होतो तर तें **अडीच पावही पीठ सांचे पोटास न लागेल तर उत्तम** (!) असें त्यांच्या प्रजेनें ईश्वराजवळ गाऱ्हाणें करून तें फळास आलें तर महाराजांचा आनंद व त्यांचा हिशेब त्यांच्या प्रजेच्या सुखास कितीतरीपट कारणीभूत होणार आहे!

महाराजांनीं स्वहस्तें स्वयंपाक करण्याचें सुरू केलें तेव्हां तुरुंगातून मिसरजी यास हवा बंगल्यावर बोलावून घेतला होता. त्यानें पडल्या पडल्या स्वयंपाक कसा करावा तें महाराजांस शिकविलें. महाराजांस हा प्रसंग चालू वैभवांतच आला हें एक प्रकारें बरें झालें. कारण, वैभव रहित झाल्यावर दांडग्या वर्तनामुळें जर कोणी नोकर चाकर त्यांजवळ न टिकला तर दोनवेळ पोटाची भर करण्या करितां तरी अडूं नये. ही विद्या अशा भ्रमिष्ठपणांत महारा-

जांनीं संपादन करून घेतली याबद्दल त्यांनीं सौख्यच मानलें पाहिजे.

जो मिसरजी महाराजांचा स्वयंपाक संबंधानें गुरू झाला त्याला शिवाजीरावांनीं बंदमुक्त करून वडिलांसारखा मानणें रास्त होणार आहे. गुरू हाही एक पित्यासमान मानणें अवश्य आहे. परंतु वेडगळ बनलेल्या आमच्या होळकराधिपतीस एवढी अक्कल कोठली असणार? त्यांना प्रस्तुत स्थितीला स्वर्ग काय तो दोन बोटेंच उरल्या सारखें झालें आहे. त्यांना जगांतील बऱ्यावाईटाचा अनुभव घेण्यास व राज्यसूत्रें कशीं चालवावीं तें समजण्यास दुसरा जन्म घेतला पाहिजे. ज्या राजाचे आंगीं मनुष्यपण नाहीं असें ज्याच्या कृतीवरून तरी दिसून येतें त्याला राजा, महाराज म्हणणें म्हणजे देखील आपली जीभ विटाळून घेण्यासारखें आहे. निरुपायास्तव आणि कीर्तिवान पुरुषांच्या घराण्यांतून गादी संपन्न झाले असल्या मुळें शिवाजीराव होळकरांस महाराज म्हणावें लागत आहे. या परतें आणखी यांना कोणत्या शब्दांनीं भूषित करावें तें समजत नाहीं. शिवाजीरावांच्या नालायकी संबंधानें जितकें लिहावें तितकें थोडेंच आहे. ह्याला आपल्या आई बापाची स्मृति नाहीं तो दुसऱ्यांस कितिसा ओळखील तें सहज दिसतेंच. मराठी राज्याचा आह्मां लोकांस अभिमान ह्मणून जीव तिळतिळ तुटतो आणि वर्तन सुधरेल अशा आशेनें बऱ्या वाईट शब्दांनीं ताडण करून पहावयाचें. परंतु निगरगट्ट मूर्ती असल्यावर काळजास झोंबे पर्यंतचा दवा देणें भाग पडतें. इलाज नाहीं. आमचे आजपर्यंत ११ नंबर झाले तरी शिवाजीराव महाराज झोंपेंतच राहून जागृतावस्था झाल्यावर देखील अधिकाधिक जुलूम करूं लागतात, तेव्हां त्यांच्या मानव देहाची कमालच झाली ह्मटली पाहिजे. ह्मण आहे कीं, **दस मरे पण दसका पालनकार न मरे,** परंतु ही ह्मण होळकराधिपती शिवाजी महाराजांस अगदीं उलट आहे. याचें कारण त्यांचा जुलूम! त्यांचा क्रोधी स्वभाव! त्यांची दुष्टबुद्धि! आणि त्यांचा जन्मतः असलेला स्वभाव गुण. दुसरें कांहीं ह्मणतां येत नाहीं. असला राजा असणें ह्मणजे भुईला भार समजला पाहिजे. धिक् जिणें असल्या राजमूर्तिचें! या परतें काय अधिक ह्मणावें? असो. वाचकांस आतां मिसरजीची हकिकत सांगून शिवाजी महाराजांचे दुसरेही पराक्रम सांगितले पाहिजेत.

मिसरजीच्या कोणीं आप्तानें रेसिडेन्ट साहेबांकडेस अर्ज केल्या वरून रेसिडेन्सींतून इंदूर जेलांत त्याचे बरोबर एक ऑफिसर देऊन मिसरजीस खरोखर जखम झाली आहे कीं नाहीं याचा शोध आणविला व साहेबांनीं आपली खात्रीही करून घेतली.

ता. २२ रोजीं सर्व खासबरदार लोकांस हजेरी करितां हवाबंगल्यावर बोलाविले. ते तिकडे जाण्या पूर्वी गोपालमंदिरांत सर्व जण जमा झाले. व गंगा, तुलसीदल आणि गाईचें शेण आणून सर्वांनीं अशी प्रतिज्ञा केली कीं, आज हजेरीचे वेळेस आपल्या पैकीं कोणास मारपीट झाल्यास जो मारणारा असेल त्यास ठार मारावयाचा; पुढें जें होईल तें होवो. येणेंप्रमाणें प्रतिज्ञापूर्वक सर्वांच्या आणा शपथा होऊन ते तेथून निघाले. हवाबंगल्यावर ते लोक जाऊन पोंचण्या पूर्वीच त्या लोकांनीं केलेली प्रतिज्ञा महाराजांस समजली. तेव्हां महाराजांनीं त्या खासबरदार लोकांस पहातांच त्यांची स्तुती आरंभिली. तुम्हीं जुने आहांत, चांगले आहांत, विश्वासू आहांत, तुमच्यावर आम्हीं फार राजी आहोंत वगैरे गोडगोड भाषणांनीं त्यांचें समाधान करून त्यांस रवाना केले. नंतर सानिध्य जे पाहऱ्यावर खासबरदार लोक होते त्यांना ३।४ जणास मारपीट करून त्या दिवसचें व्रत पाळलें. मागाहून शागिर्द पेशांतील १७।१८ कारकून लोकांस समक्ष बोलवून त्यांस मारपीट करून समाधान मानून घेतलें. शाबास या खासबरदार लोकांची ! त्यांच्या प्रमाणें प्रत्येक वेड्याच्या लोकांनीं आणा शपथा घेऊन असा संप करून गेल्यास खरोखर मारपीट चुकली जाणार आहे. जिवावर उदार झाल्या वांचून कांहीं होत नाहीं. जसा त्या खासबरदार लोकांनीं एकोपा केला त्याप्रमाणें हजार दोन हजार माणसांनीं एकोपा करून शिवाजीराव महाराजांचे डोळे उघडतील अशा चार गोष्टी त्यांस सांगण्याचा प्रयत्न केल्यास फायदेशीर होणार आहे. तेवढ्यानेंही त्यांचे दुष्ट अंतःकरणास कांहीं पाझर न सुटेल तर अन्य इलाज सर्व खुंटले समजून, चौदावे रत्नाचा सुद्धां प्रयोग करून त्यांस ताळ्यावर आणले असतां कांहीं वावगें होणार नाहीं. मिंडेभांडे खातर झटला तरी कोठ पर्यंत जुलूम सहन व्हावा ? 'नशास तसा भेटे आणि मनचा संशय फिटे ' या म्हणीप्रमाणें महाराजां

मारल्या दीर्घद्वेषी मनुष्या जवळ वाग-णूक करणें अगदीं रास्त आहे. आपलें ह्मणायचें तिथे परकी भाव ठेवणें वरें नाहीं. शिवाजीराव महाराजांना आपले महाराज ह्मणावयाचे अहेत तर त्यांचें बिघडून गेलेलें डोकें ज्या उपायांनीं ताळ्यावर येईल ते उपाय करण्यास आपणच झटलें पाहिजे. प्रसंगीं त्यांना चौदावें रत्न देण्याची वेळ जरी आली तरी ती आपल्या सत्बुद्धि पूर्वक आणि स्वामिभक्ति पुरःसर मात्र असली पा-हिजे. तसा प्रकार करण्यांत द्वेषभाव थोडाच आहे ? आमचें दयाळू सार्व-भौम सरकारही अशा वेड्या लोकांना जेव्हां ताळ्यावर आणण्याचे इलाज करतें तेव्हां त्यांचाही वाईट हेतु मुळींच नसतो. कोणींकडून तरी बेफाम झा-लेलें डोकें निवळावयाचें असतें. तोच विचार होळकर महाराजांच्या राजनिष्ठ प्रजेनें अझून तरी मनांत कां आणूं नये ? हिमतीचें काम आहे. पिता पुत्राचे नात्यानें जी रा-मबाण गुटिका महाराजांस त्यांच्या प्रजेकडून मिळेल ती त्यांनीं फार प्रेमानें घेणेंही योग्य आहे. असो.

कामाठीलोक स्वयंपाक करण्यास आहे नाहींत ह्मणून त्यांचे जमादार एक नथु व दुसरा रखमाजी यांस समक्ष बोलावून, नथु याग नागकर्णी (निवडुंग) च्या फट्यांनीं त्याचें थोबाड फोडून काढलें व रखमाजीस साधा मार दिला. नथुचे तोंडावर कांटे घुसल्यानें त्याचें तोंड सुजलें आहे. हे इसम शक्करबाजारच्या कोतवालीवर दोन दिवस कैद राहून नंतर ता. २४ रोजीं हवाबंगल्यावर आपल्या जवळ नेऊन कैदेंत ठेविले आहेत. त्यांच्या प्रमाणेंच नन्या न्हावी याचीही स्थावर जंगम इस्टेट जप्त करून त्यासही हवाबंगल्यावर कैदेंत ठेविला आहे.

ता. २४ रोजीं रात्रीं ८ वाजतां अमीर जामदार हा जेलांत मयत झाला. त्याला महाराजांनीं हवाबंग-ल्यावर समक्ष बोलावून अतोनात मारपीट केल्यामुळें मरण पावला, अशी त्याचे बायकोनें रेसिडेन्सींत फिर्याद केली आहे. मजकूर अमीर पिढीजाद इंदूरचा राहणारा असून चुळ्यांकडील जामदारखान्याचें काम त्याचे घराण्याकडेस होतें. स्वतः तो मोठा खटपटी होता. त्याला दोन वर्षांचे मागें महाराजांनीं कैद केला होता व एक दोन खटले करून त्यास शिक्षाही दिली होती. पुढें तो सुटल्यावर कांहीं दिवस इंदूरछावणींत मुखबिरी (चुगल खोर) वर ठेविला होता व त्या बद्दल त्यास पगारही मिळत होता. नंतर त्याजवर छाव

णीत चुळयांचे येथील चोरीचा आरोप येऊन शिक्षाही झाली होती. ती भोगून तो सुटला. पुढें एक दिवशीं त्याला पकडून पुन्हां कैद केला. व कांहीं शिक्षाही दिली म्हणतात. त्यानंतर त्याची स्थिती वर कळविल्या प्रमाणें झाली आहे म्हणून समजतें.

**रामप्रताप काळूराम** नांवाचा फार मोठा सावकार इंदुरास आहे. व त्यांचा मोठा बंगला, व्यापार वगैरे मुंबईसही आहे. या शेटजीचा आणि एजन्ट गव्हर्नर जनरल कर्नल बारसाहेब यांचा चांगला परिचय असून केव्हां केव्हां साहेब बहादुरांस भेटण्या करितां शेटजी इंदूर छावणींतही जात असतात. त्यामुळें त्यांच्यावर वक्रदृष्टि होऊन त्यांस इंदूर शहर सोडून जाण्याचा सक्त हुकूम महाराजांनीं दिला आहे, म्हणून समजतें.

लोंढ्याशीं व त्यांच्या मुलाशीं कोणीं संबंध ठेवूं नये व त्यांना नोकर चाकर ठेवूं नये, ठेविल्यास हुकूम अमान्यतेचा त्याजवर खटला होईल असें होळकर ग्याझेटांत प्रसिद्ध झालें आहे. हा हुकूम इंदूर शहरांतल्या लोकांपुरताच किंवा सगळ्या हिंदुस्थानांतील लोकांस लागू आहे तें महाराजांनीं कळविलें असतें तर बरें होतें.

रावबहादुर बेदरकरसाहेब कारभारी हे ता २४ रोजीं आपल्या जागेला आणि दुष्ट महाराजांची तावेदारी सोडून मुंबईस निघून आले आहेत. फार उत्तम झालें. या पूर्वीच यांनीं आलें पाहिजे होतें, परंतु आज नाहीं उद्यां महाराज ताळ्यावर येतील अशी त्यांची उमेद असावीसें वाटतें. परंतु ती उमेद अखेर खचली जाऊन त्यांस अन्यायप्रिय राजाचे अन्नास शेवटचा राम राम करावा लागला. आतां इंदूरचे नवे कारभारी कोण होतात पहावें.

**सर काशिरावदादा** महाराजांचे चुलते यांसही इंदूर शहरांतून निघून जाण्याचा हुकूम झाला आहे.

ब्राह्मणी मुदवाखांतील मुलकी अम्या यास अतिशय मारल्यामुळें तो फार अजारी आहे.

येणेंप्रमाणें हकिकत आहे. पुढील अंकीं महत्पुरचे मुनीम बापुजी नारायण यांचा खटला देऊं. तशीच मल्हार अनंत यांच्या खटल्याचीही हकिकत लवकरच वाचकां पुढें मांडण्यांत येईल.

---

( वरील अंक निघाल्यानंतर जी भयंकर अशी बातमी आली ती दुसरे दिवशीं जादा पत्रक काढून प्रसिद्ध केली गेली ती पुढें दिली आहे )

मुंबई रविवार ता. १।९।९५.

# जुलूम ! जुलूम ! ! जुलूम ! ! !

## भयंकर ताजी बातमी.

## शिवाजीरावमहाराज ही दुर्बुद्धि सोडा आणि होळकरशाही वांचवा !!! खोटी ठरो.

—:*×*:—

इंदुराहून विश्वसनीय, ताजी व महत्वाची आणि अत्यंत भयंकर बातमी आज आली, तिजवरून समजतें कीं, इंदूरछावणींत राहणारे कोणीएक **सखाराम गणेश शिरसाळकर** नांवाचे सद्गृहस्थ वकिलीचें काम करित असतात त्यांस **श्रीमंत शिवाजीरावमहाराज होळकर** यांनीं गोळी घालून अथवा अन्य तऱ्हेनें ठार मारण्याची प्रतिज्ञा केली आहे. " आपलें पुढें जें काय होईल तें होवो; परंतु वरील सद्गृहस्थांची अशा प्रकारें खोडकी मोडल्या शिवाय राहणार नाहीं, " असा निश्चयात्मक **पण** महाराजांनीं नुकताच केल्याचें कळतें. थोड्या, वर्षांपूर्वीं उज्जनीस० बळवंतराव बुटीची झालेली व्यवस्था जगजाहीर आहेच. ती लक्षांत आणिली ' ह्मणजे महाराज आपली प्रतिज्ञा शेवटास नेल्याशिवाय राहणार नाहींत, अशी अटकळ साहजिक होते. महाराजांनीं केलेली ही भयंकर प्रतिज्ञा खरी असल्यास अति अविचाराची, अति अधर्माची व अति अज्ञानपणाची आहे असें कोणींही ह्मणेल. याचा परिणाम किती भयंकर होईल तें सांगवत नाहीं. महाराजांच्या चालू कृत्यांवरून त्यांच्या हातून कोणत्या वेळेस काय घडेल, याचा निर्णय करितां येत नाहीं. परमेश्वर करो आणि अशी अति भयंकर व नीच बुद्धि महाराजांस न होवो, व झाली असल्यास ती पालटो असें आह्मीं अंतःकरण पूर्वक इच्छितों. व त्याकरितां जगदीशा जवळ अनेक नवसही करितों.

छावणी इंदूरचे **वडे साहेब मेहेरवान कर्नल वार—एजंट गव्हर्नर जनरल सेन्ट्रल इंडिया** हे वरील मजकुराकडे अवश्य लक्ष पुरवून योग्य बंदोबस्त करतील व' महाराजांचें भावी संकट टाळून आपल्या आश्रयाखालीं असलेल्या निरपराधी मनुष्याचा जीव वांचवितील अशी आह्मीं आशा करितों.

तशीच

**सखाराम गणेश शिरसाळकर** यांसही—आमची सूचना आहे कीं, त्यांनीं वरील बातमीकडे लक्ष पुरवून

स्वदेह संरक्षणार्थ योग्य तो तावडतोब बंदोबस्त करून फार सावधगिरीनें रहावें. खुद्द महाराज अथवा त्यांचा कोणीही मनुष्य आपल्याकडे आल्यास, अथवा रस्त्यांत वगैरे कोठें भेटल्यास त्याचा बिलकुल विश्वास न धरितां समयास अनुसरून येईल वेळ ती टाळून न्यावी. महाराज शिवाजीराव दुर्बुद्धीनें पूर्ण ग्रासले असल्यामुळें आणि अलिकडे त्यांचें डोकें अतिशय बिघडल्यामुळें ते कोणत्या रूपानें एखाद्याचा घात करतील याचा नेम उरला नाहीं. करितां प्रत्येकानें व विशेषतः शिरसाळकरांनीं फार सावधगिरीनें वागणें जरूर आहे. आमच्या ह्या महत्वाच्या सूचनेकडे लक्ष देऊन आपला जीव धोक्यांत न येऊं देण्याची विशेष खबरदारी तुम्ही घ्याल अशी आशा करितों.

☞मजकूर सखाराम गणेश शिरसाळकर यांची मृत्युकुंडांत अकस्मात आहुती पडल्यास महाराज होळकरनेंच त्यांचा जीव घेतला असें निःसंशयानें ठरणार आहे. करितां वडे साहेबांनीं तत्काल याचा बंदोबस्त केल्यास महाराज ताळ्यावर येतील असें वाटतें.

---

## नंबर १२.

( विक्षिप्त अंक ४९ ता. ७ सप्टंबर ९५ )

या संस्थानसंबंधानें किती नंबर आह्मांस लिहावे लागणार आहेत याचें अनुमान कांहीं करवत नाहीं. आह्मीं मनोभावें महाराज शिवाजीराव यांचें वर्तन सुधरण्याबद्दल जितका प्रयत्न करीत आहोंत तितके ते आपला अधिक जुलूम चालवित आहेत. त्यांचें पाऊल जुलूमी क्रमांत वाढत्या प्रमाणावर असलेलें पाहून अत्यंत वाईट वाटतें. ते आपल्या अमलांतील लोकांवरच जुलूम करून राहिले आहेत असें नाहीं; पण इंग्रज सरकारच्या आश्रयानें राहिलेल्या लोकांवरही त्यांचा डोळा आहेच असें गेल्या रविवारच्या जादा पत्रकावरून सर्वांस समजून चुकलेंच असेल. ज्या सखाराम गणेश शिरसाळकरांस महाराजांनीं गोळी घालून अथवा अन्य प्रकारें ठार मारण्याची प्रतिज्ञा केली आहे ते गृहस्थ कांहीं वर्षांमागें शिवाजीमहाराजांचे सेक्रेटरी होते आणि त्यांनीं फार लायकीनें व सचोटीनें स्मरून आपलें काम नीतिनें केलें असल्याबद्दल दिवाण बहादुर आर. रघुनाथराव सारख्यांचे अभिप्रायही असल्याचें कळतें. त्या सदाचरणी गृहस्थावर महाराजांची वक्रदृष्टी—छे,

अवकृपा-कारण नसतां झाल्यामुळें सेक्रेटरीचा हुद्दा सोडून त्यांस परत आपला वकिलीचा व्यवसाय करणें भाग पडलें. पुढें जसजशी महाराजांची दुर्बुद्धि आणि चुगलखोरांचें बंड वाढत चाललें तसतशी शिरसाळकरांवरही महाराजांची वक्रदृष्टी होऊन त्यांस इंदूर शहर सोडण्याचा प्रसंग आला. सध्यां ते आपला वकिलीचा धंदा छावणी इंदूर येथें राहून बांगल्या रीतीनें करीत आहेत. ती त्यांची स्थिती महाराजांस न रुचून त्यांचा घात करण्याचें शिवाजीराव महाराजांनीं योजिलें आहे. किती द्वेषबुद्धि ही ! आह्मांस जी बातमी समजली आहे तिजवरून कोणत्याही प्रकारचा महाराजांचा अपराध शिरसाळकरांनीं केल्याचें ठरत नाहीं. असें असतां इंग्रजी हद्दींत रहाणाऱ्या निरपराधी व सदाचरणी गृहस्थास आपल्या नाराजगिंतला तो आहे एवढ्याच सबबीवर देहांत प्रायःचित्त द्यावयाचा विचार करणें फारच धाडसाचें समजलें पाहिजे. जर त्यांच्याकडून महाराजांचा अपराध कांहीं झाला असेल तर कायदेशीर इलाज करून त्यांस न्याय देवतेकडून शिक्षा करविणें योग्य आहे. परंतु तसें कांहीं नसतां तुझ्या × × × डोरलें या म्हणीप्रमाणें असा विनाकारण सूड उगविणें कधींही रास्त होणार नाहीं. महाराजांची अलिकडे माणसें ठार मारण्याकडेसच जर लहर लागली असेल तर त्यांची पुरी कंभक्ति भरली असें समजलें पाहिजे. कृपा आणि अवकृपा तशीच राजी आणि नाराजी या शब्दांचें महत्व एकट्या शिवाजीमहाराजांसच समजतें असें नाहीं. ते जितकें महत्व त्या शब्दांचें समजत असतील तितकेंच त्यांच्या प्रजेनें समजून जर महाराजांवर त्या समजण्याचा प्रयोग केला तर त्याचा परिणाम काय होईल बरें ? शिवाजीरावांनीं हा विचार मनांत जरूर आणला पाहिजे. आपल्या अवकृपेंतले लोक जसे आपण समजतों तद्वत **आपल्या प्रजेच्या अवकृपेंतला मूर्तिमंत जुलूमी पुतळा आपला आहे** असें महाराजांनीं निःसंशय समजलें पाहिजे. कदाचित् महाराजांचे मनांत हें. न आल्यास त्यांचे जवळ **जी सरकार** करणाऱ्या कृपेंतल्या लोकांनीं तरी हें त्यांस समजविणें जरूर आहे. एखाद्यास आपण ठार मारूं अशी प्रतिज्ञा करण्यापूर्वी आपल्या दुःखी प्रजेनें आपल्यास ठार मारलें तर कसें (?) असा विचार महाराजांचे मनांत न येणें अथवा त्यांच्या कुलकुलत्या

मंडळीनें त्यांचे डोक्यांत न ठसविणें असली अविचारी प्रतिज्ञा पुन्हां महाराजांकडून न होवो अशी परमेश्वराजवळ आम्ही प्रार्थना करून रोजच्या विषयाकडे वळतों.

### दुसरा खलिता.

गेल्या २८ तारखेस प्रातःकाळीं ८ वाजतां **कर्नल बार** साहेब व त्यांचे फर्स्ट असिस्टंट **क्याप्टन न्यू मार्च** हे महाराजांकडेस व्हाइसराय साहेबांकडून आलेला खलिता देण्यास गेले होते. तो खलिता दरबार भरवून देण्याचें ठरलें होतें. व त्या दरबारांत ५ साहेब लोकही जाणार होते. परंतु एकाएकीं तो विचार तहकूब होऊन वर लिहिलेलेच साहेब बहादूर गेले. महाराजांचे दोन कामदार **राय नानकचंद** व रेसिडेन्सी वकील, तिसरे महाराज व गेलेले दोन साहेब एवढ्या पांचांचाच छोटा दरबार होऊन तो खलिता साहेब बहादुरांनीं दिला व तेथें वाचला गेला. नंतर सुमार ५० मिनिटें पर्यंत कर्नल बारसाहेबांचें व महाराजांचे बोलणें झालें. त्या बोलण्यांत उभयतांचाही संतोष राहिला नाहीं. इतकेंच नव्हे पण त्या पासून कांहीं रहस्यही निघालें नाहीं. महाराजांनें खरोखर डोकें फिरल्यामुळें व किंचितही शाहाणपण आणि विचार त्यांच्या ठिकाणीं मुळापासून अगदींच नसल्यामुळें व हल्लीं वर्तमानपत्रांतून होत असलेल्या बोभाट्यामुळें त्यांचें वेड ज्यास्त वाढलें गेलें आहे. यामुळें पहिल्यापेक्षां अतिशय अविचार व अन्याय त्यांच्या हातून मुद्दाम होत आहेत. व त्याच हिशेबानुसार महाराजांनीं बडे साहेबांशीं भाषणही केलें. जें भाषण झालें त्या वरून रेसिडेन्ट साहेबांची पूर्ण खात्री झाली असावी कीं, या महाराजांचे मनांत किंचितही चालू क्रम कमी करावयाचा नाहीं. व तसें करण्याला यांचें डोकेंही नाहीं. करितां यांचे हातीं एक दिवसही आतां राजसत्ता ठेवणें यांच्या रयतेच्या कल्याणाचें होणार नाहीं. कर्नल बारसाहेबांनीं 'Take care' ( संभाळा ) असें एक वाक्य सांगून बराच बोध महाराजांस केला. त्यावर शिवाजीरावांनीं जें उत्तर दिलें तें फारच क्रोध येण्या सारखें होतें. तथापि कर्नल बारच्या शांत स्वभावी व पूर्ण विचारी आणि नेटिव्ह संस्थानच्या अभिमानी डोक्यानें त्यावेळीं बिलकूल रागाचें चिन्ह दाखविलें नाहीं, हें एक अर्थीं बरें झालें. कोणतीही गोष्ट रागानें न होणें हें उत्तम आहे. जें काय

करणें तें शांतपणें व ज्या करण्या पासून प्रजा सुखी होईल आणि महाराजांचा उपद्रव बंद पडेल तेंच झालें पाहिजे. रेसिडेन्सी दप्तरांत इंदूरच्या कामामुळें जीं दुसरीं कामें एकीकडे पडून राहिलीं असतील व त्यांना इंदुरांतील लोकांच्या अर्जांचा जो त्रास झाला असेल तो नाहींसा होऊन रयत, महाराज व रेसिडेन्ट साहेब असे त्रिवर्गही सुखी होतील अशी व्यवस्था आतां बडे साहेब फार लवकर करतील अशी आशा बाळगून इंदुरस्थ प्रजा बसली आहे.

### अशा अर्थाचा असावा.

जो खलिता दिला गेला त्यांत 'महाराजांनीं फार लवकर बोभाट बंद होईल असें करावें व पुढें आपला राज्यकारभार उत्तम प्रकारें चालल्याची सरकारची खात्री होईल अशी आपली वर्तणूक व व्यवस्था निदर्शनास आणून दाखवावी' वगैरे मजकूर असावा असें अनुमान होतें. आंगट महिन्यांत दोन खलिते येऊन धडकले तरी महाराज झोंपेंतच आहेत. खलित्यांकडेस महाराजाचें लक्ष पोंचून ते सुधरतील अशी आशा मुळींच नाहीं म्हटलें तरी चालेल. बेफाम झालेले महाराज असे ९० खलिते आले तरी थोडेच भिणार आहेत. त्यांचा अधिकार काढून घेतल्या नंतर न जाणो त्यांना कांहीं उपरती झाली तर. बाकी धमकावणीला जुमानणारे मुळींच ते नव्हत. त्यांच्या कृत्यांचा घडा भरत चालला आहे म्हणून हळहळत रहावें, झालें.

### लोक आनंदांत होते.

व्हाइसराय साहेबांकडील खलिता देण्याकरितां बडेसाहेब मोठ्या थाटानें शहरांत येणार, ही बातमी इंदुरांतील लोकांस समजल्यापासून लोक विशेष आनंदांत होते व तेथील आबालवृद्धांस बडेसाहेबांच्या येण्यानें आपलें दुःख आतां दूर होणार खास, असें वाटलें होतें. जणूं काय ईश्वरच इंदूरच्या लोकांस दुःखांतून सोडविण्याकरितां येत आहे, अशा आनंदी विचारांत लोकांचा समुदाय रेसिडेन्ट साहेबांच्या येण्याच्या मार्गावर, आपआपल्या घरांच्या गच्चीवर व माडीवर जमा होऊन राहिला होता. रस्त्यावर तर अतोनात गर्दी जमली होती. एखाद्या देवाची पालखी किंवा ताबूत अथवा लाट साहेबांच्या आगमनोत्सवार्थ जशी लोकांची गर्दी जमते तद्वत देखावा दिसत होता. कित्येकांस आपल्या जुलूमी शिवाजीराव महाराजांची पालखी निघणार कीं काय असाही संशय येत होता. अशा त्या लोक समूहांतून दुतर्फा पहात पहात बडे

साहेबांची स्वारी मोठ्या समारंभानें वर कळविल्या दिवशीं शहरांत गेली. रेसिडेन्ट साहेब नेहेमीं शहरांत जातात परंतु त्या दिवस सारखी लोकांची गर्दी कधीं झाली नव्हती. जमलेला समुदाय बडेसाहेब महाराजांस भेटून परत जाई पावेतों आशाबद्ध होता. पुढें तो दिवसही गेला आणि महाराजांचा नित्यक्रमही जशाचातसाच चालू झाला. तेव्हां तेथील सर्व लोकांस पुन्हां पूर्ववत कळजींत पडावें लागलें.

## घुश्शांतच राहिले.

खलिता देऊन बडेसाहेब परत गेल्यावर त्या दिवशीं बारांवर दोन वाजे पावेतों महाराज कोणाशीं बोलले नाहींत. घुश्शांतच राहिले. परंतु सखाराम मार्तंडकडे जो सरकारी पाहरा होता व कांहीं सरकारी घोडे त्यांच्या वापरण्यास दिले होते ते मागून घेण्याचा व पलटणच्या लोकांच्या हजेरीचा हुकूम दिला. पलटणच्या लोकांची हजेरी त्याच दिवशीं घेण्याचें महाराजांचे मनांत कां आलें तें सांगवत नाहीं. पण डोकें फिरलेल्या मनुष्यास काय ? तेव्हां जें मनांत येईल तेव्हां तें करून सोडावयाचें अशी त्याची स्थिती असते. शिवाजीराव महाराजांची ही स्थिती अधिकार संपन्न आहेत पर्यंतच अशी राहील असें अनुमान होतें. पण पुढें राहिली न राहिली सारखीच. अधिकार भ्रष्ट झाल्यावर मग यांचें महत्व काय राहिलें !

## डोलग्यारस बंद.

इंदुरास भाद्रपद शु॥ ११ चे दिवशीं सर्व मंदिरांतील देवांच्या मूर्तींची मिरवणूक प्रतिवर्षीं निघण्याचा सांप्रदाय आहे. म्हणून त्या एकादशीस **डोलग्यारस** अशी संज्ञा तिकडील लोकांनीं दिलेली आहे. सदर एकादशीचे दिवशीं १००। १५० देवांचे डोले मोठ्या थाटानें वाजतगाजत सर्व शहरांतून मिरवितात व मोठा मेळा जमतो. मजा पाहणाऱ्या लोकांचा समुदाय ५०।६० हजारांचा जमतो. रोषनी, बाजे वगैरेचा समारंभ पहाण्यालायक असतो. असा तो वार्षिक उत्साह यंदां शुक्रवारच्या दिवशीं एकादशी आल्यामुळें व्हावयाचा असतां, प्रत्येक मंदिरांतून मिरवणुकीची तयारी चालून राहिली आहे तोंच महाराजांकडून हुकूम गेला कीं, 'आजचा दिवस आमचा वर्ज वार आहे करितां आज डोले कांढूं नका.' हुकूमाप्रमाणें केलेली सर्व तयारी वायां दवडून सर्व बेत रहित ठेवणें जमलेल्या लोकांस भाग पडलें. नेटिव्ह राजाची

सत्ता व लोकांची स्वामिभक्ती कशी आहे ती यावरून व्यक्त होते. महाराजांच्या दराऱ्यामुळें धर्मसंबंधाचा प्रकारही दुसरे दिवशीं इंदूरशी असतां लोकांनीं केला; तेव्हां लोकांना राजनिष्ठ ह्मणून महाराजांना धर्मभ्रष्ट आणि विचारहीन ह्मणण्यास कोणती हरकत आहे ? हा उत्सव छावणी उज्जन, देवास, धार व इंदूर इलाख्यांतील सर्वत्र ठिकाणीं व माळव्यांतील प्रत्येक गांवीं शुक्रवारीं झाला आणि इंदुरास मात्र शनवारीं व्हावा हें लक्षांत ठेवण्याजोगें आहे.

## तयारी आहे.

सखाराम मार्तंड रेशिमवाले यांच्यावर महाराजांची अत्यंत नाराजी आहे ह्मणून मागें कळविलेंच आहे. त्यांच्यावर कांहींतरी घोरपड आणण्याची खटपट महाराजांनीं चालविली असल्याचें समजतें. लवकरच महाराजांचे रेशिमवाल्यां संबंधानें पराक्रम बाहेर येतील अशीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत.

## आज्ञा मानूं नका.

इंदूर छावणींत रहाणाऱ्या लोकांपैकीं सखाराम गणेश, शिवाप्रसाद व पेंढारकर या त्रिवर्गांवर महाराजांची अत्यंत नाराजी आहे हें आह्मीं मागें कळविलेंच आहे. त्यांत विशेषतः सखाराम गणेशावर फारच कटाक्ष आहे असें दिसतें. त्यांस बळवंतराव बुटीच्या सोबतीस पाठविण्याचा विचार महाराजांनीं केला असल्याचे कैक निरोप त्यांजकडे जाऊन धडकल्याचें आह्मीं आमच्या वाचकांस कळविलेंच आहे. महाराजांनीं हे उद्गार वेडेपणाच्या भरांत काढले असतील परंतु तसें करणें फारच धोक्याचें आहे असेंही ते शुद्धीवर असतां त्यांचे मनांत आलें असेल. त्यांच्या पदरीं जे लोक त्यांच्या प्रीतितले असतील व महाराजांचें कल्याण इच्छिणारे असतील ते महाराजांस तसें करूं देणार नाहींत अशी आह्मांस उमेद आहे; तसेंच ज्या कोणास महाराज तसें करण्यास सांगतील त्यानें इंदूरचे माजी पोलिस सुप्रिन्टेंडेंट असल्याचा परिणाम लक्षांत आणून महाराजांची अशी मूर्खपणाची आज्ञा मानूं नये अशी आह्मीं सूचना करतों.

## किंमत अधिक आहे.

सखाराम गणेशा सारख्या १०० मनुष्यांचे प्राणापेक्षांही महाराजांच्या प्राणाची व अधिकाराची किंमत जास्त आहे. करितां या सगळ्यावर पाणी सोडून सखाराम गणेशाच्या प्राणाची किंमत अधिक मानणें व त्यांला ठार मारून इंदूरची प्रजा

सुखी करण्याचें श्रय त्यांस देऊं नये असें आह्मांस वाटतें. महाराज इंदुरांतून गादीभ्रष्ट झाले ह्मणजे इंदूर मजा सुखी झालीच ह्मणावयाची. तशी वेळ न आणावी हें महाराजांस भूषणावह आहे.

**मागाहून प्रसिद्ध होईल.**

महाराजांजवळ जे कांहीं लोक केवळ त्यांच्या मर्जीस व हेतूस पुष्टीकरण देणारे आहेत व ज्यांना जुडिशिअल किंवा पोलिटिकल अथवा व्यवहार शास्त्रापैकीं व न्याय, नीति आणि धर्मशास्त्र यां पैकीं कोणत्याच विषयाचा अनुभव किंचित्ही नाहीं ते लोक दुष्ट कृत्यांबद्दल महाराजांस सल्ला देत असतात. प्रस्तुत महाराज गादीवर बसण्यापूर्वी किंवा असले सल्लागार नोकर होण्यापूर्वी नुकतीच ज्यांनीं शाळा सोडली असेल व ज्यांनीं कोणतीही डिगरी मिळविली नाहीं असे जे दुष्ट कुलांगार, महाराजांनीं आपल्या पदरीं ठेविले आहेत तेच महाराजांच्या घातकी वर्तणुकीस उत्तेजन देणारे होत असें कळतें. अशा लोकांची समजूत ही आहे कीं, एवढे मोठे महाराज, ते जो जुलूम करतील तो गैरवाजवी कसा असूं शकेल व त्यास आपण तरी गैरवाजवी कसें ह्मणावें ? त्यांच्या जुलूमाची वजावणी उत्तम रीतिनें व तावडतोब झालीच पाहिजे, असें समजणारे जे आहेत त्यांपैकींच कोणी महाराजांस सल्ला देऊन सखाराम गणेशाविषयीं अधिक द्वेष उत्पन्न करविला आहे असें कळतें. त्या मनुष्याचें नांवही पक्की खात्री करून घेतल्यानंतर प्रसिद्ध करण्यांत येईल.

**नित्य नवी योजना.**

महाराजांजवळ खालीं लिहिल्या प्रकारचे सल्लागार आहेत. महाराज ज्या मनुष्यास वाईट ह्मणतील तो अति वाईट ह्मणणारे; महाराजांनीं ज्यास जी शिक्षा देण्यास सांगितली असेल त्याहून अधिक शिक्षेस तो पात्र आहे असें समजणारे व तशा प्रकारचें आपलें कायम मत करणारे; शिवाय जुलूम व अन्याय ज्या लोकांवर होत आहे त्यांनाच बोभाट करणारे समजून त्यांस शिक्षा करणें हाच रामबाण उपाय ह्मणून महाराजांस सुचविणारे; जे लोक महाराजांचे लक्षांत येत नाहींत ते लोक त्यांचे नजरेस आणून देणारे व त्यांची पूर्ण माहिती करून देणारे; जुलूम, अन्याय न केले तर महाराज दबले, हरले, महाराजांचे पदरीं शूर व हिंमतदार कोणीं माणसें नाहींत असें लोकांस वाटेल व त्यामुळें

महाराजांचा व सानिध्य असणाऱ्या लोकांचा दुर्लौकिक होईल अशा अनेक प्रकारें जी हुजूर, जी हुजूर करून महाराजांस भारणारे व त्यांची दुष्ट कृत्यांकडे विशेष प्रवृत्ती करणारे; हे असे तोंडपुजे लोक कोण व किती आहेत आणि कसे आहेत तें सर्व इंदूरची प्रजा जाणत असून आह्मांकडेसही त्याची नामावळी आली आहे. अशा तोंडपुजे लोकांचा जेव्हां नायनाट होऊन जाईल तेव्हां महाराज त्यांच्या अंगीं असलेल्या विद्वत्तेला शोभून आपल्या प्रजेस प्रिय होतील हें निर्विवाद आहे. आजकाल महाराजांनीं जुलूमाचा वर्षाव करून सोडला आहे तरी, स्वतः त्यांचे मनांत यत्किंचित्ही दयेचा लवलेश नसून अगदीं बेफिकीर आणि मदोन्मत्त केल्या कृत्यांत आनंद मानून मागिल सुधारणा राहो पण पुढील कृत्यें तरी नित्य नवीं एकापेक्षां एक अधिक करीत आहेत व तीं छपविण्यास जवळच्या चारगट लोकांची मदत सर्व प्रकारें असल्यामुळें, रोज नवी नवी युक्ति डोक्यांतून काढून काढण्याचा क्रम चालू आहे. व त्या युक्तिस जवळच्या लोकांचें पूर्ण अंग असतें व महाराजही त्यांस मान देतात. अशा मंड्या आपल्या कळपांतील पुढाऱ्याचे मागोमाग चालत असतात तद्वत शिवाजीराव महाराजांजवळील सल्लागार मंडळ आहे. तात्पर्य, महाराजांविषयीं जसें लोकांचें मत आहे त्याच प्रमाणें त्यांच्या कांहीं सल्लागारांविषयींही झालें आहे. इतका प्रकार आहे तरी ते लोक अझून आपला पाय मागें घेत नाहींत ही मोठ्या दुःखाची व आश्चर्याची गोष्ट आहे.

## जवाहीर जवळ घेतलें.

ता. २८ रोजीं बडे साहेबांची मुलाकात होऊन गेल्यानंतर महाराजांनीं जवाहीरखान्यांतील एकंदर जवाहीर आपल्या जवळ मागून घेतलें आहे. यांत त्यांचा काय हेतु असेल तें कळत नाहीं. बहुधा अत्यंत प्रीतींतील जे लोक जवळ आहेत त्यांस जे दागिने बक्षिस दिले ते कमी वाटून त्यांची पुर्तता करण्या करतां कदाचित् हें हल्लीं जवाहीर मागवून घेतलें असावें असें धोरण दिसतें. पूर्वी एकवेळ सन ८८ मध्यें चार लक्षांचें जवाहीर असेंच आपल्या जवळ मागवून तें एका टेबलावर मांडून ठेविलें होतें. व जवळच्या लोकांचें पूर्ण अंग असतें व महाराजही त्यांस मान देतात. कित्येक प्रीतींतील लोक ह्यांस मनास वाटेल त्याप्रमाणें कारण नसतां जशा मंड्या आपल्या कळपांतील तें सर्व १९ दिवसांत वांटून दिलें

होतें. तशाच त्या सालांत एक दिव- जन्मास अंतरले आहेत व ज्यांना शीं १५ हजार रुपयांच्या नोटा "महाराजांमुळें परलोकचा रस्ता स्वीकारणें भाग पडलें त्यांच्या तळतळाटाचें हें फळ होय. यांत किती खरेपणा आहे तें महाराजांसच माहित. त्यांचें मन त्याबद्दल त्यांस डंवचित असेलच.

जाळून टाकल्या होत्या. ही वेडगळ स्थिती ७ वर्षांपूर्वीची होती. तेव्हां पासून आजपर्यंत तशाच स्थितींत सर्व चाललें असून तें ढांकलें गेलें. आणि सर्व खजिना जवाहीर व सावकार आणि दुसरे गरीब गुरीब लोक यांस सध्यां बुचाटून धुळीस मिळवून सोडले आहेत

## "पोषाख जाळला.

सात आठ दिवसां पूर्वी नानाजी केशव व सोनाळकर हुजूर सेक्रेटरी व एक महाराजांचा भैया अशा त्रिवर्गांस प्रत्येकीं ४।५ शेंचा महाराजांनीं पोशाख देऊन त्यांनीं तो आंगांतही घातला. व लगेच काढून घेऊन एका ठिकाणीं त्याचा ढीग करून तो जाळून टाकला व त्याची राख घेऊन त्या त्रिवर्गांचे आंगास फांसून दिली. कशी अद्वितीय लहर आहे ? एखादे दिवशीं राजवाड्याला सुद्धां आग लावून त्याची राख आपल्या कपाळास फांसून घेण्याकडे महाराजांची लहर न लागो म्हणजे झालें. अशा वेडगळ कृत्यांवरून महाराजां बद्दल अनेक प्रकारचे तर्क लोक करतात ते किती खरे असतील तें सांगवत नाहीं. कोणीं म्हणतात महाराजांचे हातून जे लोक जखमी होऊन आपल्या

## राजशालकांचा जुलूम.

इंदूर म्युनिसिपालिटीचे म्यानेजर एक राजशालक आहेत म्हणून मागील अंकीं कळविलेंच आहे. त्यांनीं गेल्या ३० तारखेस एका वाण्यास पकडून त्याचे हातांत हातकडी घातली. व दुसऱ्या वाणी लोकांच्या दारापुढील पूर्वीपासूनचे ठेवलेले तख्ते उखडून टाकले व दुसरीही कित्येक दांडगाई केली. तेव्हां मल्हार गंजांतील दोन हजार वाणी लोक महाराजांकडेस जाऊन त्यांनीं आपल्यावर झालेला अन्याय महाराजांस कळविला. त्यावरून ज्या मनुष्याचे हातांत हातकडी घातली होती ती तत्काल काढली गेली परंतु हें सर्व कृत्य वाणी लोकांनीं फिर्यादीस येण्याचें अमोलकचंदनें करविलें असावें असा तर्क करून, गेलेल्या वाणी लोकांस पुष्कळ शिव्या दिल्या. शिवाय दुसरे दिवशीं जी दंवडी पिटविली ती खालीं दिलीच आहे. सदर गुन्ह्यावरून राजशाल-

महाराजांचा व सानिध्य असणाऱ्या लोकांचा दुर्लौकिक होईल अशा अनेक प्रकारें जी हुजूर, जी हुजूर करून महाराजांस भारणारे व त्यांची दुष्ट कृत्यांकडे विशेष प्रवृत्ती करणारे; हे असे तोंडपुजे लोक कोण व किती आहेत आणि कसे आहेत तें सर्व इंदूरची प्रजा जाणत असून आह्मांकडेसही त्याची नामावळी आली आहे. अशा तोंडपुजे लोकांचा जेव्हां नायनाट होऊन जाईल तेव्हां महाराज त्यांच्या अंगीं असलेल्या विद्वत्तेला शोभून आपल्या प्रजेस प्रिय होतील हें निर्विवाद आहे. आजकाल महाराजांनीं जुलूमाचा वर्षाव करून सोडला आहे तरी, स्वतः त्यांचे मनांत यत्किंचित्‌ही दयेचा लवलेश नसून अगदीं बेफिकीर आणि सदोदित केल्या कृत्यांत आनंद मानून मागिल सुधारणा राहो पण पुढील कृत्यें तरी नित्य नवीं एकापेक्षां एक अधिक करीत आहेत व तीं छपविण्यास जवळच्या चारगट लोकांची मदत सर्व प्रकारें असल्यामुळें, रोज नवी नवी युक्ति डोक्यांतून काढण्याचा क्रम चालू आहे. व त्या युक्तिस जवळच्या लोकांचें पूर्ण अग असतें व महाराजही त्यांस मान देतात. अशा मंडळ्या आपल्या कळपांतील तें सर्व पुढाऱ्याचे मागोमाग चालत असतात तद्वत शिवाजीराव महाराजांभवळील सल्लागार मंडळ आहे. तात्पर्य, महाराजांविषयीं जसें लोकांचें मत आहे त्याच प्रमाणें त्यांच्या कांहीं सल्लागारांविषयींही झालें आहे. इतका प्रकार आहे तरी ते लोक अझून आपला पाय मागें घेत नाहींत ही मोठ्या दुःखाची व आश्चर्याची गोष्ट आहे.

### जवाहीर जवळ घेतलें.

ता. २८ रोजीं बडे साहेबांची मुलाकात होऊन गेल्यानंतर महाराजांनीं जवाहीरखान्यांतील एकंदर जवाहीर आपल्या जवळ मागून घेतलें आहे. यांत त्यांचा काय हेतु असेल तें कळत नाहीं. बहुधा अत्यंत प्रीतींतील जे लोक जवळ आहेत त्यांस जे दागिने बक्षिस दिले ते कमी वाटून त्यांची पुर्तता करण्या करतां कदाचित्‌ हें हल्लीं जवाहीर मागवून घेतलें असावें असें धोरण दिसतें. पूर्वी एकवेळ सन ८८ मध्यें चार लक्षांचें जवाहीर असेंच आपल्या जवळ मागवून तें एका टेबलावर मांडून ठेविलें होतें. व कित्येक प्रीतींतील लोक ह्यांस मनास वाटेल त्याप्रमाणें कारण नसतां दिलें

होतें. तशाच त्या सालांत एक दिवशीं १९ हजार रुपयांच्या नोटा जाळून टाकल्या होत्या. ही वेडगळ स्थिती ७ वर्षांपूर्वीची होती. तेव्हां पासून आजपर्यंत तशाच स्थितींत सर्व चाललें असून तें ढांकलें गेलें. आणि सर्व खजिना जवाहीर व सावकार आणि दुसरे गरीब गुरीब लोक यांस सध्यां बुचाटून धुळीस मिळवून सोडले आहेत

## "पोषाख जाळला.

सात आठ दिवसां पूर्वी नानाजी केशव व सोनाळकर हुजूर सेक्रेटरी व एक महाराजांचा भैया अशा त्रिवर्गांस प्रत्येकीं ४।५ शेंचा महाराजांनीं पोशाख देऊन त्यांनीं तो आंगांतही घातला. व लगेच काढून घेऊन एका ठिकाणीं त्याचा ढीग करून तो जाळून टाकला व त्याची राख घेऊन त्या त्रिवर्गांचे आंगास फांसून दिली. कशी अद्वितीय लहर आहे? एखादे दिवशीं राजवाड्याला सुद्धां आग लावून त्याची राख आपल्या कपाळास फांसून घेण्याकडे महाराजांची लहर न लागो म्हणजे झालें. अशा वेडगळ कृत्यांवरून महाराजां बद्दल अनेक प्रकारचे तर्क लोक करतात ते किती खरे असतील तें सांगवत नाहीं. कोणीं म्हणतात महाराजांचे हातून जे लोक जखमी होऊन आपल्या जन्मास अंतरले आहेत व ज्यांना महाराजांमुळें परलोकचा रस्ता स्वीकारणें भाग पडलें त्यांच्या तळतळाटाचें हें फळ होय. यांत किती खरेपणा आहे तें महाराजांसच माहित. त्यांचें मन त्याबद्दल त्यांस डंवचित असेलच.

## राजशालकांचा जुलूम.

इंदूर म्युनिसिपालिटीचे म्यानेजर एक राजशालक आहेत म्हणून मागील अंकीं कळविलेंच आहे. त्यांनीं गेल्या ३० तारखेस एका वाण्यास पकडून त्याचे हातांत हातकडी घातली. व दुसऱ्या वाणी लोकांच्या दारापुढील पूर्वीपासूनचे ठेवलेले तख्ते उखडून टाकले व दुसरीही कित्येक दांडगाई केली. तेव्हां मल्हार गंजांतील दोन हजार वाणी लोक महाराजांकडेस जाऊन त्यांनीं आपल्यावर झालेला अन्याय महाराजांस कळविला. त्यावरून ज्या मनुष्याचे हातांत हातकडी घातली होती ती तत्काल काढली गेली परंतु हें सर्व कृत्य वाणी लोकांनीं फिर्यादीस येण्याचें अमोलकचंदनें करविलें असावें असा तर्क करून, गेलेल्या वाणी लोकांस पुष्कळ शिव्या दिल्या. शिवाय दुसरे दिवशीं जी दंवडी पिटविली ती खालीं दिलीच आहे. सदर गुन्ह्यावरून राजशाल-

कांस एक दिवस त्या कामावरून सस्पिंड मात्र केले पण दुसरे दिवशीं ५० रुपये बढती देऊन पुन्हां त्या कामावर नेमिले म्हणून कळतें. खरा न्याय यालाच म्हणावा काय ?

### ता. ३१ ची दंवडी.

अमोलकचंद, ( ज्याच्या बद्दल पूर्वीही दोनवेळ , दंवडी पिटविली होती तो ) शिवाय दुसरे पांच वाणी ( ज्यांचीं नांवें येथें देण्यांत महत्व आहे असें नाहीं ) यांशीं कोणी संबंध ठेवूं नये, त्यांच्या सल्ला मसलतींत राहूं नये, त्यांना भेटूं नये वगैरे वगैरे मजकूर.

### ताकीद झाली आहे.

शहरांतील लोकांपासून व सरकारी नोकरांपासून लिहून घेतलें आहे कीं, 'आम्हीं कोणचीही शहरांतील खबर कोणासही देणार नाहीं.' हा लेख झाल्यानंतर जर एखादी दप्तरांतील किंवा दुसरी कोणती गोष्ट बाहेर गेली तर तुम्हांस सजा दिली जाईल, अशी त्या लोकांस ताकीद झाली आहे म्हणून कळतें.

### हा न्याय कोठला ?

सर्व इंदूर शहरभर हत्तीवरून, उंटावरून, घोड्यावरून दंवडी पिटवून आपण करीत असलेल्या अन्यायाचें उघड प्रदर्शन महाराज करीत आहेत, असें असून शहरांतील बातमी बाहेर जाऊं नये म्हणून लोकांवर सक्ती केली जाते हा न्याय कोठला ? कोणी या न्यायाला एखादें 'कोड' लावून योग्य आहे असें सांगेल काय ?

### लवकर बंदोबस्त पाहिजे.

एकंदर नव्या नव्या बातम्यावरून स्पष्ट दिसतें कीं, शिवाजीराव महाराजांचें डोकें निःसंशय फिरलें असून अपराध, न्याय व मनुष्य प्राण्याच्या शरिराचे व मालाचे हक्क आणि राजा व प्रजा यांचा संबंध काय व कसा आहे तें महाराजांस बिलकुल कळत नाहीं. हे महाराज गादीवर बसल्या पासून हल्लीं ऐकण्यांत येतात अशाच प्रकारचे अन्याय व जुलूम आणि वेडगळपणा प्रत्येक दिवशीं यांनीं केलेला आहे. रयतेच्या अगर सरकारच्या हिताचें असें शांतपणानें, शास्त्र, कायदा, नीति, धर्म यांस अनुसरून मुळींच काम केलें नाहीं. हल्लींची तर त्यांची अशी भयंकर स्थिती आहे कीं, एक क्षणमात्र सुद्धां त्यांचे हातीं राजसत्ता ठेवण्यास ते पात्र नाहींत. करितां अति लवकर याचा बंदोबस्त न झाला तर काय परिणाम होईल, किती लोकांच्या प्राणास, मालास व अब्रूस विलक्षण रीतिचें नुकसान

पंचेल त्याचा बिलकूल नेम नाहीं. या करितां फार लवकर बंदोबस्त होणें जरूर आहे. आणि तसें करण्यांत रयतेचें व महाराजांचें कल्याण असून ब्रिटिश सरकारासही भूषणास्पद होईल असें आह्मांस वाटतें.

## होळकर महाराजां संबंधानें येथील व्याकवेवरील वागेंत दोघां गृहस्थांचें चाललेलें बोलणें.

**एक**—कायहो × × जी, हल्लीं दोन तीन पत्रांनीं शिवाजीराव होळकरां बाबद्द जी ओरड चालविली आहे ती खरी असेल का?

**दुसरा**—खरी असलीच पाहिजे. खरी नसती तर महाराजांनीं इतके दिवस मौन्य कां धरलें असतें?

**एक**—तुमचें ह्मणणें बरोबर आहे. मराठी पत्रांच्या ओरडण्यानें काय व्हायचें आहे? असा महाराजांनीं विचार करून मौन्य धरलें नसेल कशावरून?

**दुसरा**—अहो पण विक्षिप्त पत्रानें इंग्रजींत पुस्तक काढून प्रसिद्ध करण्याचेंही आपल्या एका अंकांत प्रसिद्ध केलें आहे. तसें झाल्यावर मग तरी महाराजांचा समज खोटा ठरेलना?

**एक**—होय. पण तसें होण्यास अवकाश आहे. शिवाय तें पुस्तक प्रसिद्ध होण्यापूर्वीच जर विक्षिप्ताची खोड मोडली तर काय परिणाम होईल?

**दुसरा**—मला बुवा खोड मोडण्यासारखें कांहीं दिसत नाहीं. जे अन्याय, जुलूम महाराज करतात तेच विक्षिप्तानें लोकांपुढें मांडण्याचा क्रम चालविला आहे. तेव्हां महाराज जर पुढें आले तर उलट महाराजांची फजिती सर्वत्र होणार आहे. ज्या सप्रमाण गोष्टी आहेत व महाराजांनीं केल्या आहेत त्या तर त्यांच्यानें ना कबूल करवत नाहींत. मग विक्षिप्तची खोड कशी मोडणार!

**एक**—मार्ग अनेक आहेत. न्यायाचे मार्ग सोडून अन्यायी मार्गावलंबन झालें तर!

**दुसरा**—अहो, ही मुंबई आहे. उज्जन नव्हे किंवा इंदूर नव्हे. इंग्रजी राज्यांत व विशेषतः मुंबई सारख्या शहरांत महाराजांचे जुलूमी प्रकार कांहीं चालावयाचे नाहींत. आपण आहांत कोठल्या भ्रमांत!

**एक**—कबूल आहे. पण कल्पना करा कीं, महाराजांनीं एखादा विश्वासू मनुष्य त्याचे घरची सर्व व्यवस्था करून त्यास जिवावर उदार होऊन एखादें साहस करण्यास विक्षिप्तकडे

पांठविला तर तो द्रव्याशेनें आपली कामगिरी बजावील कीं नाहीं?

दुसरा—छे हो, हिकेडस कांहीं त्याची गडबड चालणार नाहीं. तशांत विक्षिप्त ऑफिस तुह्मीं पाहिलें आहे का? एकदां तिथे जाऊन त्यांचा कसा बंदोबस्त आहे तो पहा ह्मणजे खात्री होईल. महाराज असा एखादा वेडा विचार करतील तर तो त्यांच्याच घातास कारणीभूत होईल. आणि मला नाहीं वाटत कीं, महाराज असल्या अघोर कर्मास प्रवृत्त होतील. बोलणें सोपें आहे पण करणें .फार बिकट असतें. तुह्मांला सांगतों आतां, महाराज होळकरचे दिवस पूर्ण भरले गेले आहेत. एखादे दिवशीं आमचें सरकार त्यांस कराची किंवा दुसऱ्या एखाद्या ठिकाणीं मगजशुद्धि होण्याकरतां रहा ह्मणून सांगेल व त्यांच्या दोन पुतण्यांपैकीं ज्याचा हक्क पोंचत असेल त्यास गादीवर बसवून आपल्या देखरेखीखालीं इंदूरची व्यवस्था करील ह्मणजे आटोपलें.

एक—असें होईल तर वाईट ह्मालें असें इंदूर प्रजा तरी खचित ह्मणणार नाहीं.

दुसरा—महाराजांच्या दुर्वर्तनामुळें ही स्थिती इंदूर संस्थानला येणार आहे. नशीब त्या प्रजेचें! इडापिडा टळो आणि शिवाजीराव महाराज गादीभ्रष्ट होऊं वर्तमानपत्रांतून चाललेली ओरड बंद होवो ह्मणजे झालें. इंदूरचे रेसिडेन्ट साहेब एवढें श्रेय घेतील तर त्यांची चिरकाल कीर्ति होईल. ( चला आतां जाऊं. वेळ झाली. जातात. )

---

## नंबर १३.

( विक्षिप्त अंक ५० ता. १४ सप्टेंबर ९५ )

आज प्रथमत: अंक ४७ मध्यें दिलेल्या होळकर सरकार ग्याझेटच्या पुरवणीचें इंग्रजी भाषांतर देऊन नंतर दुसऱ्या मजकुराकडे वळूं. हें भाषांतर व्हःइसराय साहेबांकडेस पाठविल्याचें गेल्याच्या मागिल अंकीं आह्मीं कळविलेंच आहे.

**We publish below a translation of the Huzar Oral order which appeared in the Holker Sirkar Gazette of date 20th August 1895 which will easily show the state of brain of the Maharaja Holker. Government of India need not go for proof elsewhere to**

**see whether Maharaja is fit to be still retained on his illustrious Ancestor's throan.**

*Holker Sirkar Gazette extraordinary issue.*

20*th August* 1895.

Shri Shunker, (which is Maharaja's signature.)

Memo of Huzur oral order No.63 dated 19th August 95

5

The following Sambandh (narration, history) will easily show :—

How General Sukharam Martand tutors Huzur servants to serve in a wicked way and how to run away from here.

Sukharam Martand is a jahagirdar of Dhar, and therefore many of the big and high servants of that place are his friends and proteges. As for instance, Gopalrao Minister is his protege, and Shivram Shastri, who is a (Sadu) that is husband of Gapalrao's wife's sister was a tutor toMulharrao(nephew of present Maharaja). Gopal-Rao minister of Dhar has a relation to theVakil of Dhar and this Vakil of Dhar has a relation with BhayaGhode, Bhaya Ghode has a shop of building timber here in camp, and Rambhau Engr. (of Holker state) has bought a large quantity of timber in the Engineering Department thus Baya Ghode has a relation (connection) with the Engineering Karkhana and with Rambhau Engineer. Rambhau Engineer and GeneralSukharam Martand's brother Govindrao are intimate friends.

Bhaya Ghode's brother was the Naib of Huzur Shagirdpesha ( Department ) for several years, and therefore the Kamaties, Bhalekaries & Ayyas being connected with him, it is no wonder that Sukharam Martand taught the servants to spoil service through him or might have been so doing.

In the same way, one Dowlatsing, who is a rogue & rascal (chalakh and lucha) is a great friend of Sukharam Martand, he lives in Kamathipura, it cannot be said that, through him ( Doulatsing ) Kamaties and Bhalekaries are not taught to do bad service. It cannot be said that the Ayyas ( professional cooks ) of Huzur Mudbak ( cook house ) who live near

the house of Pendharker who is the most intimate friend of general Bapusaheb are not taught to do wicked service through the former.

Besides this, in as much as there is plenty of money in the Engineering Karkhana it cannot be said that Sukharam Martand is not in the practice of giving bribe through Rambhau engineer to Bhalekari, Kamati, in order that they may not do good service, they may spoil dinner, and run away &c. &c. because some of the Bhalekaries and Kamaties have served under the contractors of the engineering department, and these are of course the subordinates of Rambhau engineer.

SukharamMartand engaged some of the persons dismissed from the Huzur and some of these also get services in Dhar on account of Sakharam martand's connection with that state as already shown above; some of the persons who are dismissed from the Huzur and are engaged by him, are as follows:—

One Damodhar Rase, who was formerly a clerk in the Dewan Kacheri and who was dismissed from there, is engaged by him in his house.

One Baburao was in the Huzur as servant amongst the pages, was engaged by him as Halkara with himself.

One Sherali was formerly in Police service and while on guard at the jail, some of the murder prisoners had escaped from his guard through his, help was engaged by him in his Ginning Factory.

Those persons who set up quarrel in family members are also engaged by him.

There are many persons in Jangee Fouz (army) engaged in his time and they are made use of as guards in Royal palace and outside in places where the Swari (His Highness) goes and lives. At such times, there is no doubt at all that some of these persons in the Huzur are taught by the very man through their officers to do bad service of their master, to run away &c. &c. &c.,

On the whole after due consideration, it would be found that such acts are very mean and most reproachable. Men of high mind never do such acts. This is written owing to the excessive trouble thus caused to the Huzur from this man

and through indispensable necessity.

If one were to say to himself why, if such was the case, this man was brought back to Indore, the reply is that no-body should say that we are revengeful, for this very reason he is brought here; properly speaking his acts are not good.

This memo is sent to the Durbar for publication in the Gazette.

Dastur Kesheo Bapujee Sonalker,
Camp Hawa Bunglow.

वरील इंग्रजी भाषांतरावरून महाराज होळकर संबंधानें मराठी न जाणणाऱ्या लोकांचीही बऱ्याच प्रकारें खात्री होणार आहे. आज पुन्हां गेल्या ९ तारखेच्या होळकर सरकार ग्याझेटमध्यें वाणी लोकांसंबंधानें जो इस्तिहार ( जाहिरात ) महाराजांनीं प्रसिद्ध करविला आहे तोही गंमतीचा असल्यामुळें अक्षरशः येथें देतों.

## इस्तिहार.

श्रीशंकर. हुजूर हुकुमाचें टिपण नंबर ७३–१३०९. हुजूर जबानी हुकूमाचें टिपण तारिख ४ माहे सप्टेंबर सन १८९९ इसवी.

तारिख ३० माहे आगष्ट सन १८९९ इसवी रोजीं बाजारांतिल बहुतसे वाणीलोक जमून श्रीमंत सरकार साहेबांकडेस अर्ज करण्यास आले होते. त्या अर्जाची हकीकत पहातांना त्यांत अर्जदार फक्त कनीरामवाणी हा होता. तेव्हां इतके मनुष्यांनीं एकदम अर्जदार यांजबरोबर जमून येणें हें बेकायदे आणि बलवा करण्या सारखें दिसतें. यास्तव ऐंदेकरितां ज्या इसमास अर्ज करणें असेल त्यांनींच येऊन अर्ज करावा. त्याजबरोबर ह्यानीं विनाकारण जमावानिशीं अर्ज करण्यास बहुतसे लोकांस आणूं नये. जर ऐंदेकरितां जमावानिशीं लोक येतील तर त्यांपैकीं जे मुख्य मुख्य असतील त्यांचे निसबत योग्य तजवीज केली जाईल. याजवर सर्वत्रांनीं नजर ठेवावी.

तसेंच कोणासही कांहीं तखलीफ असेल तर त्यांनीं आपला अर्ज प्रथम ज्या कोर्टांत किंवा कचेरींत काम असेल तिकडेस करावा. तेथून योग्य निकाल न झाल्यास वरिष्ठाकडेस अर्ज करीत करीत नियमाप्रमाणें हुजूर अर्ज करण्यास येत जावें. असे जमावानिशीं कोणीही अर्जदारानें अर्ज करण्यास येऊं नये.

सदरहू लोक जे अर्ज करण्यास्तव हुजूर एकदम आले होते, हे लोक सरकारची रयत आहे व गरीब आहेत. या लोकांस इतक्यांत जमा-

वांनिशीं येणें योग्य नव्हतें. तत्रापि या मनुष्यांस कोणी सखाराम मार्तंड यांचे मेळांतील हावले कावलेवाला तिलोकचंद आणि अमोलकचंद किंवा हिरा चंपा वगैरेनीं त्यांचे इशाऱ्यानीं जमऊन अर्ज करण्यास पाठविले असावें असा हुजूरांस पक्का अंदेशा आहे. यास्तव कोणीही अर्जदारांनीं जमावानिशीं यांचे संगनमतानें अर्ज करण्यास येऊं नये, अशा विषयीं चांगली खबरदारी ठेवावी.

## नानाजी केशव.

वरील इस्तिहार वाचून कोणास-ही शिवाजीराव महाराजांचे हुकूमाची मौज वाटल्या वांचून रहाणार नाहीं. अशाच मासल्याचे बहुतेक सर्व हुकूम महाराजां कडून होत असतात. अन्यायी कृत्यांची रेलचेल महाराजांनीं करून सोडली आहे. त्यांच्या पराक्रमाचें प्रदर्शन आतां इंग्रजी पत्रांतही येऊं लागलें आहे. महाराजांची बाजू धरून त्यांच्या जुलूमी गोष्टींवर दडपण घालणाऱ्या मंडळीनें गेल्या ९ तारखेचा 'टाइम्स' वाचून तरी आपली चूक मांजलपणें कबूल करून, महाराज सुधरतील असा कांहीं मार्ग अमलांत आणून काढावा. तसें न होईल तर वंध्यावल्गना तरी करण्याचें सोडून देऊन स्वस्थ बसावें. ज्याला समज असेल त्याला एवढा इशारा पुरे आहे, असें आम्हांस वाटतें.

## राजशालक मतकर.

यांची ओळख गेल्या अंकीं यो-डिशी करून दिलीच आहे. हेच ते इंदूर म्यु. पा. चे म्यानेजर आहेत. मतकर हें त्यांचें आडनांव आहे. आडनांवी अक्षरें समविभागानें तोडून त्यांचा अर्थ केला तर फार गंमतीचा अर्थ निघतो. परंतु तो अर्थ मनांत आणून आपली तशी वागणूक ठे-वण्याकडे मतकर साहेबांचा किती कल आहे हें त्यांच्या काम कर-ण्याच्या शैलीवरून उघड दिसतें. महाराजांनीं तर त्यांना व्याघ्र असा किताब देऊन त्यांच्या शूरत्वाची तारीफ केली आहे. त्यामुळें मतकर साहेबांचे वाहू प्रस्तुत विशेष स्फुरण पावत असून नित्य सशस्त्र थाटानें स्वारी सर्व शहरभर व विशेषतः मल्हारगंजांत फिरत असल्याचें समजतें. शिवाजीराव महाराजांच्या इष्ट हेतूस पुष्टी देणारे हे त्यांचे शालक चांगले मिळाले म्हणावयाचे. मतकर साहेबांचे जुलूमी प्रकार लो-कांचे निदर्शनास आल्या नंतर महा-राजांनीं म्यु. पा. संबंधानें जो एक नुकताच हुकूम केला आहे तो मन-नपूर्वक लक्षांत आणला म्हणजे मतकरांचे कृत्यांस महाराजांचें उत्ते-

न कसें आहे तें समजतें. व महाराजांचे सुचनेवरूनच त्यांनीं अन्यायी कृत्यें करण्यास प्रारंभ केला असावा, अशीही अटकळ होते.

## पगारावर धाड.

दरबार जुडीशिअल नं. ,४२१/१८९५ मुखत्यार साहेब मुलकी फौज यांस हुजूर हुकूमावरून दिवाण कचेरीकडील पत्र नंबर ६३२ ता. २९।८।९५ चें जनरल डिपार्टमेन्टाकडेस गेल्याचे आधारें जनरल डिपार्टमेन्टकडील पत्र नं. १६६ ता. ३०।८।९५ चा आल्यांत म्यु. पा. कडील सडकेची तपासणी चालू आहे. त्याचा निकाल होई पावेतों प्रेसिडेन्ट गुप्तेसाहेब व माजी म्युनिसिपालिटीचे म्यानेजर गोविंदराव नारायण परूळकर व म्युनिसीपालिटींतील दप्तरदार, कारकून, दरोगे वगैरेची तनखा बंद ठेवावी. तसेच माजी म्यानेजर गोविंदराव हे हल्लीं मुलकी फौजेचे नायब आहेत करितां त्यांचीही तनखा बंद ठेवावी. बाकीच्या लोकांची तनखा बंद ठेवण्याकरितां प्रेसिडेन्ट म्युनिसीपालिटी गुप्ते यांस हुकूम नंबर २४ ता. २९।८।९५ चा जनरल डिपार्टमेन्टाकडून झाला आहे व खजिन्याकडेसही हुकूम नंबर ३३ ता: २९।८।९५ चा गेलाच आहे.

रामचंद्र महिपत-जुडीशियल सेक्रेटरी.

वरील हुकूमाप्रमाणें सडकेची तपासणी व्हावयाची आहे व ती राजशालक मतकरराव करणार असल्याचें ठरलें आहे. एकदां केली त्यांत तीन हजार लोक फिर्याद आले. अशाच धोरणावर पुढेंही काम चालावयाचें. हे मतकरसाहेब पूर्वी गुप्तेसाहेबांचे हाताखालीं मुलकी फौजेंत नायब ह्मणजे अव्वल असिस्टंट होते. त्यावेळीं त्यांच्यावर पोलिस तपासांत मनुष्य हानी झाल्याबद्दल आरोप आल्यावरून त्यांना म्युनिसिपल म्यानेजरचे जागीं बदलून नायबीचे कामीं गोविंद नारायण उर्फ मन्याबापू नांवाच्या एका श्रीमान गृहस्थास नेमिलें. हे मन्याबापू विशेष धर्मभोळे असून त्यांस ९०० पावलेंही चालण्याची संवय नाहीं; शिवाय नाजुक प्रकृतीचे आणि गर्भश्रीमंती पैकीं असे आहेत. हर्द्यास यांचे वडील ऑनररी माजिस्त्रेट आहेत. यांना २० हजार रुपये सालचें उत्पन्न आहे. पूर्वी एक वेळ हे मन्याबापू प्रस्तुतच्या या जागेवर होते, त्यावेळीं त्यांना कांहीं कारणावरून नोकरी सोडून देशीं जावेंही लागलें होतें; परंतु पुन्हां एक वर्षानें त्यांस परत बोलावून म्यानेजरचे जागीं नेमिले होते. त्यांची सध्यां नायबीचे जागीं नेम-

णूक झाली आहे. मतकर व गुंते यांचा संबंध पोलिसखात्या पासून आहेच व हल्लींही म्युनिसिपालिटी संबंधानें जडला आहे. या उभयतांचें क्षणमात्रही पटत नाहीं म्हणतात. नेहमीं यांचा झगडा चालू राहून कामाची व्यवस्था कशा रितीनें चालेल तें पहावें. एकंदरींत मतकर म्हणजे करूं नको असें म्हणणारा ज्यास कोणींच नाहीं त्या मतकरांच्या आणि महाराजांच्या हातून इंदूर शहरांतल्या लोकांची आतां कशी दैना उडेल तें सांगवत नाहीं.

### रेसिडेन्टकडे फिर्याद.

कोठी कडील कारकून उर्फ माल तोलणारा काळुराम ब्राह्मण यास अतिशय मारल्यामुळें त्याला जखमा वगैरे झाल्याची हकिकत गेल्याच्या मागील अंकीं कळविलीच आहे. त्याचे बायकोनें ता. ७ मिनहू रोजीं रेसिडेन्ट कर्नल बारसाहेबांकडेस जाऊन आपली फिर्याद लेखी दिल्याचें समजतें. साहेब बहादुरांनीं ता. ९ रोजीं तिला बोलावल्या वरून ती गेली व फर्स्ट असिस्टंट साहेबांनीं तिची सर्व कच्ची जबानीही घेतली असल्याचें कळतें. त्याच प्रमाणें आणखी दोन बाण्यांच्या बायकांनीही आपल्या नवऱ्यांस विनाकारण कैदेंत ठेविले आहेत वगैरे बाबत अर्जे दिल्यावरून त्यांच्याही जबान्या साहेब बहादुरांनीं घेतल्या असल्याचें कळतें.

### शहरांत गेले.

विनायकराव लोंढे ज्यांची हकिकत पूर्वी कळविलीच आहे, ते खटल्या सुद्धां छावणींत जाऊन राहिले होते. त्यांना शहरांत जाण्या बद्दल कर्नल बार साहेबांनीं हुकूम दिल्या प्रमाणें ते आपल्या मुलांबाळांसह राहण्या करितां शहरांत गेले आहेत म्हणून कळतें. आतां पुन्हां त्यांचा काय परिणाम होतो पहावा.

### स्वतः तयार करीत आहेत.

रेसिडेन्सींतून विचारलेल्या प्रश्नाचीं उत्तरें देण्याचें काम महाराज शिवाजीराव स्वतः तयार करीत असल्याचें कळतें. त्यांपैकीं मासल्या करितां एक येथें देतों.

दारकुजी शिंदे ज्यास द्वारकूजी म्हणून मागें म्हटलें आहे, त्याचे बाबतींत महाराजांनीं असा जबाब तयार केला आहे कीं, 'हा पुष्कळ दिवसांपासून इंदूरशहरांत येतो जातो व राहतो. हा आमच्या येथील खबरा बाहेर देत असेल असें आम्हांस वाटल्यावरून आम्हीं दोन दिवस त्यास कैदेंत ठेवून सोडून दिला व शहरांत न राहण्याचा त्यास हुकूम

दिला. याशिवाय त्याचें बाकीचें सर्व लिहीणें खोटें आहे.' महारा-जांचें हें सयुक्तिक उत्तर आहे काय? या उत्तरांत अन्याय कोणाचा झाला ? महाराजां वांचून दुसऱ्यास कळणें कठीण आहे.

### बाहेर पडत नाहींत.

गेल्या ता. २८ रोजीं रेसिडेन्ट साहेबांनीं व्हाइसराय साहेबांकडील खलिता दिल्यापासून महाराज छाव-णींत गेले नाहींत इतकेंच नाहीं, पण मुन्या राजवाड्याचे एका खिडकींत नेहमीं बसले राहून दिवस मोजित असतात. वाड्याबाहेर त्या दिवसा-पासून मुळींच पडले नाहींत. व स्व-तःचा स्वयंपाक सुद्धां त्याच वाड्यांत तिसरे मजल्यावर स्वहस्तेंच करून खातात असें समजतें. मनाला अतो-नात दुःख झालें असेल असें वाटतें. पश्चात्ताप होऊन तरी सुधरोत ह्म-णजे झालें.

### बरें झालें असतें.

मतकर साहेबांवर आजकाल महाराजांची बहाल मर्जी आहे. हे गृहस्थ जसे बेफिकीरीचे म्युनिसिपा-लिटीच्या कामास मिळाले तसे बुटी प्रकरणांत कैदेंत गेलेले पोलिस सुप्रि-न्टेडेंट असद्यारखां या वेळेस 'जी हुजूर' ह्मणण्यास असते तर त्या-चाही महाराजांस मोठा उपयोग झाला असता. स्पेशल माजिस्त्रेट रानडेसाहेब अहेत ते ठीकच आहेत.

### तनखा वगैरे बंद.

मोठ्या महाराणी साहेबांनां जी तनखा व जें कोठीकडून सामान मिळत असे तें बंद केल्याचें समजतें. कारण अद्याप बाहेर आलें नाहीं. तथापि महाराजांची लहर हेंच का-रण असावेंसें वाटतें. हातीं अधिकार आहे त्या जोरावर मन मानेल ति-तके प्रकार करून सोडावे.

### लक्षांत आणण्या सारखें आहे.

सखाराम मार्तंड विषयीं पूर्वी होळकर ग्याझेटांत मजकूर प्रसिद्ध केला असून पुन्हां गेल्या ९ तार-खेच्या ग्याझेटांत वाणीलोकां संबंधानें मजकूर आहे त्यांत सखाराम मार्त-डचा कसा विलक्षण संबंध जोडला आहे तें लक्षांत आणण्या सारखें आहे. तो ग्याझेटचा उतारा दुसरीकडे दिला आहेच. आतां महाराजांचे कारकिर्दींत लोकांची राहण्याची व त्यांना न्याय मिळण्याची कशी सोय आहे तें लक्षांत आणण्या-जोगें आहे.

### २६ हजाराचा जुलूम.

म्युनिसिपालिटीकडील नोकर लोकांची हजेरी गेल्या ७ तारखेस महाराजांनीं घेतली. त्यांत ९ मनुष्यें

नोकरींतून वजा करण्यांत आलीं ह्मणून कळतें. शिवाय ८ वर्षांत सडकेचीं जीं कामें म्युनिसिपालिटीनें केलीं तीं चांगलीं केलीं नाहींत, करितां प्रत्येक वर्षीं ८ हजार रुपये प्रमाणें ९६ हजार रुपये म्युनिसिपालिटींतील जुन्या व नव्या नोकर लोकांकडून वसूल करण्याचा श्रीमंतरावांनीं हुकूम सोडला आहे ह्मणून समजतें. या हुकूमास जुलूम नव्हे असें कोण ह्मणेल !

## पांचांवर धारण बसली.

गेल्या ता.८ मिनहूरोजीं खासगी कडील आश्रीत, उपाध्ये, जोशी, पुराणीक, अग्निहोत्री व दुसरे नेमणूकदार ब्राह्मण, भिक्षुक मंडळी यांची महाराजांकडे हजेरी झाली. जेव्हां त्या मंडळीस वाड्यांत बोलाविले तेव्हां त्यांची पांचांवर धारण बसली आणि जो तो यमरूपी वारंटास थरथरां कांपूं लागला. तेव्हां सरकारचे हितचिंतक व राजनिष्ट आणि धर्माभिमानी अशा एका आफिसरानें त्या ब्राह्मण मंडळीस न घाबरण्याबद्दलचें कांहीं सांगून थोडेंसें आमिषही दाखविलें, तेव्हां त्यांचा जीव शांत झाला. पुढें ते सर्व लोक हजेरीस गेले. नंतर त्यांची हजेरी होऊन ९९ मनुष्यांच्या नेमणुका ज्या खासगींत होत्या त्या महाराजांचे न्यायी कांट्यानें पारडें झुकतें केल्यामुळें बंद करण्याचा हुकूम दिला ह्मणून समजतें. जबरदस्त बक्षिस मिळालें हें! ह्या नेमणुका अनेक प्रकारच्या होत्या. त्या अशाः–कोणास नगदी, कोणास गहूंच, कोणास तांदुळच, कोणास लुगडीं, कोणास नित्य दुध फक्त, कोणास भाजी, फुलें; अशा अनेक रूपानें पुष्कळ नेमणुका दयाळू तुकोजीराव महाराज व भागिर्थीबाईसाहेब यांनीं करून दिलेल्या होत्या. त्या हल्लींच्या दिवट्या महाराजांनीं राज्यास अपायकारक समजून बंद केल्या. याप्रमाणेंच श्रीओंकारेश्वर व श्रीक्षेत्र त्रिंबकेश्वर येथेंही जीं अन्नछत्रें चालू आहेत तींही बंद करण्याचा श्रीमंतांनीं हुकूम सोडला असल्याचें समजतें.

## सांप्रदाय आहे.

एखादें संकट आलें किंवा बुद्धिभ्रंश झाला तर परमेश्वराची कृपा होऊन तें संकट व तो व्याधी दूर होण्यास दानधर्म वगैरे अधिक करण्याचा जगांत सांप्रदाय आहे. तो एका बाजूस ठेवून प्रस्तुतच्या इंदुराधिपतीस त्याचे उलट आराधना करण्याची इच्छा झाली आहे. यावरून पुढील भविष्य काय आहे तें जोशाकडे गेल्याशिवाय कोणासही वर्तवितां येण्याजोगें आहे.

**इन्साफास आग लागली.**

दोन वर्षांपूर्वी या महाराजांनीं असा एक जनरल लेखी हुकूम देऊन ठेविला आहे कीं, ज्या 'लोकांस कोर्टांतून शिक्षा होऊन ते ती भोगण्यास तुरुंगांत गेले असतील त्यांची मुदत संपल्यावरही त्यांना आमच्या हुकूमा वांचून सोडूं नयेत, असा विचित्र हुकूम दिला असल्यामुळें लोकांची कैदेची शिक्षा पुरी झाल्यावरही त्यांची सुटका होत नाहीं. व जेल सुप्रिन्टेडेंट करून त्यांना सोडण्याची परवानगी मिळण्याच्या रिपोर्टी होतो व कैक असे आजपर्यंत झाले आहेत तरी तिकडे आजपावेतों मुळींच लक्ष न दिल्यामुळें कित्येक लोक सुटका न होतां काराग्रहवास अन्यायानें भोगित पडले आहेत. कित्येकांची तर महाराजांनीं ते सुटण्याची वेळ झाली कीं अधिक शिक्षा वाढवून तसेच त्यांना तेथें ठेवले आहेत, अशीं शेंकडों उदाहरणें महाराजांकडून घडलेलीं आहेत. कोणत्या कायद्यांत ही न्याय पद्धती सांगितली आहे ? शिवाजी महाराज न्यायचतूर आहेत ह्मणणारे लोक याचा उलगडा करतील काय ? महाराज होळकरांना न्यायचतूर ह्मणण्यापेक्षां इन्साफास अगर न्याय देवतेस आग लावणारे राक्षस ह्मणणें विशेष शोभेल. रेसिडेन्टसाहेब या गोष्टीकडे लक्ष देऊन जे काराग्रहीं विनाकारण लोक पडून राहिले अहित, त्यांची सुटका करून महदाश्रय मिळवितील तर साहेब बहादुरांचे गोडवे, लोक अधिक गातील असें आह्मांस वाटतें.

**त्वरा झाली पाहिजे.**

आजपर्यंत ज्या हकिकती इंदूर संबंधानें सप्रमाण बाहेर आल्या आहेत त्यांवरून तेथील अडमिनीस्ट्रेशन अतिशय वाईट आहे असें मानण्यास आतां कांहीं शंका उरली नाहीं. यापुढें सरकार जितकी दिरंगाई करील तितकी अधिक नुकसानीस कारण होणार आहे. नेटिव्ह संस्थानांतील रयतेच्या सुखाकरितां व त्यांच्या वरील जुलूम दूर होण्याकरितां सरकारानें ज्या ज्या संस्थानांत हात घातला व तसें करण्यास जीं जीं कारणें योग्य व पूर्ण मानलीं असतील त्यांच्या शंभरपट अधिक तर शंभरपट भयंकर अशीं शिवाजीराव महाराजांनीं घडविलीं आहेत. करितां विलंब न करितां बंदोबस्त करण्याविषयीं सरकार जितकी त्वरा करील तितकी सरकारास, इंदूरच्या प्रजेस व खुद्द महाराज साहेबांस हितावह होणार आहे.

## मुळींच राहिला नाहीं.

होळकरशाहींत कोणीही रा ट्राचा व शिवाजीराव महाराज या नामधारी व्यक्तीचा किंवा रयतेचा हितचिंतक असा कोणीही राहिला नाहीं. जे आहेत ते सर्व आपआपला रोजगार चालविण्यावर बसले आहेत. कदाचित् एखादा दुसरा कोणी शहरांत किंवा बाहेर असेल तर त्याची तशी बुद्धि राहूं नये व त्याचें कांहीं चालूं नये व त्याची आपल्यावर प्रीती राहूं नये अशाबद्दल महाराजांकडून होईल तितकी खटपट चालू आहे. ज्या लोकांस महाराज आपले शत्रू वनवित आहेत त्या गोष्टींस कांहीं कामदार मंडळीचीही पूर्ण मदत मिळत आहे. याकरितां इंदूर प्रजेची किती भयंकर स्थिती होईल याचें अनुमान कांहीं करवत नाहीं.

## दोन तीनच आहेत.

इंदूर शहरांत फक्त अपवादाकरितां मात्र दोनतीन कुटुंबें अशीं आहेत कीं, महाराजांचा होत आहे या पेक्षांही अधिक जुलूम झाला तरी त्यांचा अधिकार असाच कायम राहो अशी इच्छा करणारीं व त्यां करितां मनलज्जा मनलज्जा सोडून वाटेल तो प्रयत्न करणारीं. यांशिवाय अन्य कोणीही नाहीं. या कुटुंबांचें इंदुरांतील अस्तित्व महाराजांच्याच केवळ राज्याधिकारावर अवलंबून आहे. त्या अधिकारास कमीपणा आल्यावर एक घटकाभरही हीं कुटुंबें इंदुरास राहूं शकत नाहींत. त्यांना तेथून एकदम पळच काढला पाहिजे. या कुटुंबां शिवाय आणखीं दोनचार मनुष्यांचा महाराजांशीं असा संबंध आहे कीं, महाराजां संबंधानें सरकार चौकशी करूं लागल्यास त्यांना व महाराजांना बरोबरच उभें रहाण्याचा प्रसंग येईल. दुसरीं एकदोन मनुष्यें अशीं आहेत कीं, महाराजांच्या दुष्कृतीचे छिटे त्यांच्या पर्यंत जाऊन पोंचणारे आहेत. याकरितां त्यांना सध्यां महाराजां पासून जें कांहीं दुःख होत असेल त्यापेक्षां सुखाचा व उपयोगाचा भाग अधिक असून एखादा निराळा परिणाम झाला तर त्यांच्यावरही संकट येणार आहे. करितां महाराजांचे अन्यायांची प्रशंसा न करतां असे जे आहेत त्यांनीं तूर्त तरी आपल्या तोंडास कुलुपें घालून स्वस्थ बसावें हें योग्य आहे.

## इंदुरकर मित्राकडून.

### लावणी.

वसंतसेना नायकिणीचा वाडा० (या चा •)
ऐकाहो शिवनामधारि या रा-

वाची काहणी ॥ मना ये कींव जीस ऐकुनी ॥ धृ० ॥ किती थोर नांव त्यास कतिला जवी लावि काजळी ॥ कुणत ये होळकराचे कुळीं ॥ दिसे शिरा गोजिरा भूलहा पाडि पराच्या मना ॥ पहातां न होय कीं कल्पना ॥ वेडे चाळे करी परोपरि बाळ सांगु कितितरी ॥ सज्जना दुःख होय अंतरीं ॥ माच आवडे भांडाचा त्या गुणें नांच राहिला ॥ तमाशा नवा-जना दाखिला ॥ इंदुर होतें गुणी जना आसरा तयाचे उलट आज जाहलें ॥ वाद्य रात्रिचें बंद राहिलें ॥ माकड, चेष्टा करणारा हा गादीवर हो वसे ॥ जनीं घे व्यर्थ करुन कीं हंसें ॥ सुवासिनीला करुन गुळगु-ळित शुभ्र वस्त्र नेसवी ॥ यांतच मानुन घे थोरवी ॥ अंगीं सारी बर्फ कुणाच्या छत्री गाजर मुळा ॥ मेण-बत्तिचा खेळ चालला ॥ बंधु, माय, वडिलांची छत्री तशीच कीं राहिली ॥ हवेली भय्याची उठविली ॥ वे वे म्हणुनी सख्या दिले जी सवालाख कादुनी ॥ मोहोछा ओसकरी हा गुणी ॥ १ ॥ सुना करुन माणीक चौक मंदीर नवें बांधिलें ॥ परी हें विघ्न जना जाहलें ॥ जबरीनें कीं घरें जनाचीं विकत म्हणुन घेतलीं ॥ किंमत निम्मेही न त्यां दिली ॥ गरिब बिचारे जाति कुणाहो शरण भूपजर लुटी ॥ नहो कुणि म्हणे तरी त्या कुटी ॥ काजी, मुल्ला, तेली, हुजरे राजमान्य जाहले ॥ शाहणे घरीं रडत राहिले ॥ घरें पाडिलीं कैकांचीं मग घालवून त्यां दिले ॥ बिचारे देशोधडि लागले ॥ भल्या बुऱ्यांची सकट फजीती असे नसे दादही ॥ इंद्रपुरि नहो राक्षसी मही ॥ जाय एजंटिंत दाद मागण्या तों घर मागें पडे ॥ मालही जप्तीमधिहो पडे ॥ जपे आहिल्या माय लेंकरा परि प्रजेला अती ॥ गांजली रुष्ट-शिवें आज ती ॥ नीज काय शंकरा तुला ये धांव सख्या झडकरी ॥ उपेक्षा करीं न ये अवसरीं ॥ पुण्याई सरली न म्हणेवा मुक्त संकटांतुनीं ॥ प्रजा करि पाव दयाळा गुणी ॥२॥ उजाड झाला थोर सराफा नांव मात्र त्या उरे ॥ जाति जन माल सोडुनी घरें ॥ नऊ कोट नारायण ज्यांची कीर्ति, दुकानें किती ॥ किबे सरकार ज्यांस बोलती ॥ अशा मिळविते रसातळाला राव कसे फांकडे ॥ पाझळी पोत, नव्हे कांकडे ॥ हे गादीवर बसल्यापासून नगर ओस पाडिलें ॥ आप्त, जन घालवूनहो दिले ॥ न्याय मनसुभा कोपऱ्यांत कीं सडुन राहिला परी ॥ नीतिला हद्दपार हा करी ॥ मना गमे तें अनुचित करुनी खेळ, दुज्या त्रासवी ॥

दुष्कृती नित्य आचरी नवी ॥ साह्य सौंगडे तोंडपुजे ते नीच दुष्ट घातकी ॥ मिळाले तसे सर्व यास कीं॥ परिवारासह, लुटून ठेवी जनास का-रागृहीं॥आयका सुजन न्याय रीत ही॥ लाथा, बुक्या, थपडा, चाबुक, वेत पाठिवर पडे ॥ प्रजा ढळढळां सदा हो रडे ॥ धन्य लोक गुणि इंदुरवासी आडनये या कुणी ॥ ह्मणुन हे करि चाळेहा धनी ॥३॥ एक मीच शहाणा धर्मेंडी असे यास त्यामुळें ॥ गमे दर-बार जमें बाहुलें ॥ घोटाळा हा सर्व शाहिचा करी सर्व मुखबिरी ॥ भीक ती मागवीलकीं खरी ॥ शाहणे सुरते वेडे बनती गुंगत यांची मती ॥ होय परि विटंबना कोणती ॥ हे तर वेडे पीरच बनले नया चाड अवरुची ॥ कोण मग करि परवा पर तिची ॥ इथें मारपिट गजर शिव्यांचा रेलि डेंट ते तरी ॥ खरमरित बोलति नानापरी ॥ एके बाजुस आड, दुज्या सेवका होय बावडी ॥ ह्मणे कवि मुंटेन या तावडी ॥ टिपणें होती नित्य फुकाचीं अर्थ त्यांत कीं नसे ॥ मासले पहा त्यांतले कसे ॥ शिपी आणा धरून, मारा कैद नापिका करा ॥ अचारी, रंगारी ते वरा ॥ बडवा ब्राह्मण, लुटून वाणी हद्दपार त्यां करा ॥ हजेरित मुलें बायका धरा ॥ आज फडणिशी उद्यां रिसा ला पागा तरि छावणी ॥ हजेरित मुळीं न सुटला कुणी ॥ ४ ॥ गमे महा विध्वंस जन्मला नृपाल हा कासया ॥ लाज ज्या भीति न खंती दया ॥ होति वरिष्ठा कडुनि टळाया अरिष्ट ज्या तजविजी ॥ करी हा तोंडा पुरत्याच जी ॥ जसें कारलें तुपांत तळलें साखरेंत घोळलें ॥ परी तें कडूच कीं राहिलें ॥ तसे राव हे होहो ह्मणति बडे साहेबां पुढें ॥ मागुती खूळ पुन्हां यांजडे ॥ हवा बंगला शांत स्थल तें आवडतें शिव मना ॥ तृप्त करि इथें दुष्ट वासना ॥ जनास नेती काळदूत पोलीस धरून या स्थळीं ॥ राय यम हवा तसा त्यां छळी ॥ हातपाय मोडिती उखडिती सांधि, हडें खिळखिळीं ॥ होति तों पडे जंव भूतळीं ॥ अर्धा मेला होय कुणी शिर फुटे, कुणाचें तरी ॥ परी त्या दया नये अंतरीं ॥ रडती बाया मुलें ह्मणतही टळेल कधिं यातना ॥ आग लागेल काय या तना ॥ सार्व-भौम सरकार उठाजी दया येउंद्या मनीं ॥ अंत किति पहातसा हो धनी ॥ ५ ॥

---

## नंबर १४

(विक्षिप्त अंक ५१ ता. २१ सप्टंबर १९५०)

श्रीमंत महाराज शिवाजीराव आनां पेन्शनांत जाण्यार्थी सुचिन्हें

दिसूं लागलीं आहेत तरी, अखेरपर्यंत ते आपला वर्तन क्रम असाच चालू ठेवणार असल्याचें ऐकून कोणासही वाईट वाटल्यावांचून रहाणार नाहीं. परंतु तें वाईट वाटणें केवळ संस्थान संबंधानें आहे. एकल्या शिवाजीराव महाराजांच्या व्यक्तीबद्दल यत्किंचित्ही आह्मांस अथवा ज्यांस त्यांच्या कारस्थानाची माहिती झाली असेल त्यांस खेद होण्याचें अथवा त्यांची कींव येण्याचें कारण मुळींच उरलें नाहीं. उलट त्यांच्या पेन्शनानें इतरांपेक्षां विशेषतः त्यांच्या प्रजेस अतोनात आनंद होणार आहे. ईश्वरा, इंदूर संस्थान उर्फ होळकरशाही कायम ठेवून वाटेल ती व्यवस्था उर्फ विल्हेवाट एकल्या शिवाजीराव महाराजांची करण्याबद्दल सुबुद्धि आमच्या दयाळू सार्वभौम सत्ताधीशांस दे आणि होळकरशाहींतील प्रजा सुखी करून न्यायदेवतेच्या छत्राखालीं त्यांस सुखासमाधानानें राहूंदे, एवढीच आज तुझ्यापाशीं प्रार्थना करून नैमित्तिक विषयाकडे वळतों.

## थोडा त्रास कमी आहे.

सध्यां महाराजसाहेब मागील अंकीं कळविल्याप्रमाणें राजवाड्यांतच बसून आहेत ह्मणून समजतें. पायांस कांहीं दुखापत झाली आहे असें निमित्त करून कोठेंही हवा खाण्यास व बाहेर फिरण्यास जाण्याचें त्यांनीं तूर्त बंद केल्यामुळें लोकांना होणारा त्रास थोडा कमी आहे. शिवाय त्यांच्या मागें 'आतां काय करावें, कसें करावें' अशी एक प्रकारची विवंचनाही लागून राहिली आहे ह्मणतात. आतां जरासे डोळे उघडत चालले असें वाटतें. पण फार उशीर होऊन गेला आहे. प्रस्तुत जें त्यांच्यावर संकट येऊं घातलें आहे तें दूर करण्याकरितां चार थोर लोकांची त्यांना मदत आहे. हे मदतगार गृहस्थ अव्वल नंबरांत राय नानकचंदजी, दुय्यम गुप्ते, तिसरे रेसिडेन्सी वकील लाला बिसेसरनाथ व चवथे रावजी जनार्दन भिडे हे आहेत, ह्मणून कळतें.

## बेता पुरतीच माहिती.

वरील चौघां मदतगारांस जुडीशियल कामाची व कायद्यांची माहिती बेता पुरतीच आहे असें तिकडील लोकांस वाटतें. न्याय कसा करावा, न्यायी राज्यांतील लोक कसा करतात वगैरेची माहिती उत्तम असो पण साधारण तरी त्या चौघांपैकीं एकासही आहे किंवा नाहीं याचा वानवाच आहे, अशी पक्की समजूत इंदुरस्थ प्रजेची असल्याचें कळतें. कारण, शिवाजीराव

महाराजांचे कारकिर्दीमध्येंच या चार थोर लोकांचा राजकारस्थानसंबंधानें जन्म आहे. ह्यामुळें इंदूर राष्ट्राच्या हक्काविषयीं व वहिवाटीविषयीं आणि रीतिभातीविषयीं मुळची वाकबगारी यांना नाहीं. हल्लींच्या महाराजांनीं आपल्या हेतुप्रमाणें कामें करण्याकरितां जी याना माहिती करून दिली असेल ती व दुसऱ्या रीतिनें आणखीं जी कांहीं त्यांनीं होऊन करून घेतली असेल तीच काय ती यांची वाकबगारी आहे. महाराजांचे ठिकाणीं यांचें जसें प्रेम असेल व त्यांच्या आज्ञेस व हेतूस अनुसरून काम करण्याची यांना जितकी अगत्य राहील तितकी इंदूरच्या प्रजेस किंचितही नसल्यानें व त्या प्रजेच्या योगें यांचा कांहीं उपयोग व अर्थ नसल्यानें, त्या प्रजेचे ठिकाणीं महाराजांचे मर्जी बाहेर आपलें हित लक्षांत आणून व त्यांचें विशेष अगत्य बाळगून, त्यांचे ठिकाणीं यांचें प्रेम राहणें हें होऊंच शकत नाहीं.

## थोडीशी माहिती.

मेसर्स गुप्ते व बिसेसरनाथ यांची फारशी माहिती नसल्यामुळें तूर्त त्यांच्या विषयीं आम्हीं कांहींच अभिप्राय देऊं शकत नाहीं. परंतु मेसर्स भिडे व रायनानकचंद यांची जी थोडी माहिती आम्हांस मिळाली आहे तिजवरून जें आम्हांस वाटतें तें येथें लिहीतों.

मि. भिडे हे सन ८८ मध्यें रा. ब. कीर्तने कारभारी यांच्या कारकिर्दीत इंदुरास शाळा खात्याचे मुख्य अधिकारी होऊन गेले. त्यावेळेस त्यांचें वय २४ वर्षांचें असून त्यांनीं नुकतीच शाळा सोडलेली असावी असें वाटतें. हे गृहस्थ बी. ए. असून शांत स्वभावाचे, निरुपद्रवी व पापभीरू आहेत. ते स्वार्थाकरितां कोणतेंही गैरवाजवी कृत्य करणारे नाहींत, तशीच महाराजांचे हुकूमाची अमान्यताही करणारे नाहींत असा पुष्कळांचा समज आहे. बाकी त्या हुकूमांतच जर अन्याय असला तर त्याला त्यांचा उपाय नाहीं व त्यांत त्यांचा दोषही नाहीं. त्यांच्याकडेस हल्लीं जें हुजूर खजानजीचें किंवा दुसरें काम आहे त्यांत महाराजांचा जो हुकूम जसा येईल त्याची तामिली त्यांनीं जरी केली तरी त्यापासून मनुष्याचे शरिराविरुद्ध व माला विरुद्ध किंवा अब्रुविरुद्ध कांहींच घडूं शकत नाहीं. यामुळें अशा राजाजवळ हल्लींच्या स्थितींत नोकरी केली तरी राज्यांतील जुलूम व अन्याय यांचा दोष आम्हांस लागूं शकणार नाहीं, असें ह्मणण्यास

त्यांना जागा आहे. इतक्यावरही अतिशय अन्याय सहन करण्याची ज्यांचे मनास सहनशीलता आहे व परार्चे दुःख पाहून ज्यांचा आत्मा तळमळत नाहीं, शिवाय ज्यांचें इंदुरास घर नाहीं--दुसरें इस्टेट नाहीं, आप्त इष्ट नाहींत व ज्यांच्या विद्येच्या मानानें कोठेंही ते राहून आपला कुटुंब निर्वाह करूं शकतात असे जे चांगले, शिकलेले व डिप्लोमाधारी 'अहेत त्यांनीं शिवाजी महाराजांसारख्या जुलूमप्रिय राजाची नोकरी हल्लींच्या शेवटच्या स्थितींत राहून करणें, हा महादोष आहे असें कोणीं म्हणेल तर त्यास मात्र यांचा कांहीं उपाय नाहीं.

### मि. नानकचंदजी,

हे गृहस्थ विशिष्ट स्वामीभक्त आहेत. यांना कायदा, न्याय व नीति हें बिलकूल समजत नाहीं, इतकेंच नाहीं पण इंदुरास मराठी मोडी लिपीचें दप्तर आहे, ती लिपी सुद्धां यांना चांगली कळत नाहीं. शिवाय एक शीट कागद कोणत्याही प्रकारचा दुसऱ्याचे सल्लेचांचून व माहितीवांचून यांना कोणत्याही लिपींत लिहीतां येत नाहीं, अशा प्रकारचा समज इंदुरस्थ लोकांचा आहे म्हणतात. त्याच प्रमाणें अपराध, अपराधाचें लक्षण, लोकांचे कायदेशीर हक्क वगैरे कोणत्या कारणांवरून व कसे असतात तेंही या रायसाहेबांना मुळींच कळत नाहीं, यामुळें यांचें कोणावर वजनही पडत नाहीं म्हणतात. इंदूरचे लोक या रायसाहेबांवर मुळींच प्रीति करीत नाहींत, पण उलट बहुतेक नाराज आहेत म्हणून ऐकण्यांत येतें. यांना स्वतः जज्जमेन्टच नाहीं असाही पुष्कळांचा समज आहे. 'हीसहो म्हणण्यांत मात्र हे पटाईत आहेत असें लोकांचें म्हणणें आहे. हे, शाळेतून निघाले व या महाराजांचे कारकिर्दींत एकदम हुजूर खजानजी झाले, तोच यांचा सन १८८६ सालापासून काम करण्याचा आरंभ. जोंपर्यंत महाराजांनीं एकंदर कामांत हात घातला नव्हता व खजिन्याचे कामावरून यांना नायब दिवाणाचे कामावर आपल्या जवळ आणिले नव्हते तोंपावेतों उत्तम प्रकारें न्यायाचें व दुसरेंही काम कसें होत असतें तें ऐकण्यास व कळण्यास यांना मार्ग होता. कारण, हे कौन्सिलर होते व दिवाण बहादुर आर. रघुनाथरावें हे कौन्सिलचे व्हाइस प्रेसिडेन्ट होते त्या वेळीं आठवड्यांतून चार वेळ कौन्सिल भरत असे व हे रायसाहेब त्यांत

महाराजांचे कारकिर्दीमध्येंच या चार थोर लोकांचा राजकारस्थानसंबंधानें जन्म आहे. ह्यामुळें इंदूर राष्ट्राच्या हक्काविषयीं व वहिवाटीविषयीं आणि रीतिभातीविषयीं मुळची वाकबगारी यांना नाहीं. हल्लींच्या महाराजांनीं आपल्या हेतुप्रमाणें कामें करण्याकरितां जी याना माहिती करून दिली असेल ती व दुसऱ्या रीतिनें आणखीं जी कांहीं त्यांनीं होऊन करून घेतली असेल तीच काय ती यांची वाकबगारी आहे. महाराजांचे ठिकाणीं यांचें जसें प्रेम असेल व त्यांच्या आज्ञेस व हेतूस अनुसरून काम करण्याची यांना जितकी अगत्य राहील तितकी इंदूरच्या प्रजेस किंचितही नसल्यानें व त्या प्रजेच्या योगें यांचा कांहीं उपयोग व अर्थ नसल्यानें, त्या प्रजेचे ठिकाणीं महाराजांचे मर्जी बाहेर आपलें हित लक्षांत आणून व त्यांचें विशेष अगत्य बाळगून, त्यांचे ठिकाणीं यांचें प्रेम राहणें हें होऊंच शकत नाहीं.

## थोडीशी माहिती.

मेशर्स गुप्ते व विसेसरनाथ यांची फारशी माहिती नसल्यामुळें तूर्त त्यांच्या विषयीं आम्हीं कांहींच अभिप्राय देऊं शकत नाहीं. परंतु मेशर्स भिडे व रायनानकचंद यांची जी थोडी माहिती आम्हांस मिळाली आहे तिजवरून जें आम्हांस वाटतें तें येथें लिहीतों.

मि. भिडे हे सन ८८ मध्यें रा. ब. कीर्तने कारभारी यांच्या कारकिर्दींत इंदुरास शाळा खात्याचे मुख्य अधिकारी होऊन गेले. त्यावेळेस त्यांचें वय २४ वर्षांचें असून त्यांनीं नुकतीच शाळा सोडलेली असावी असें वाटतें. हे गृहस्थ बी. ए. असून शांत स्वभावाचे, निरुपद्रवी व पापभीरू आहेत. ते स्वार्थाकरितां कोणतेंही गैरवाजवी कृत्य करणारे नाहींत, तशीच महाराजांचे हुकूमाची अमान्यताही करणारे नाहींत असा पुष्कळांचा समज आहे. बाकी त्या हुकूमांतच जर अन्याय असला तर त्याला त्यांचा उपाय नाहीं व त्यांत त्यांचा दोषही नाहीं. त्यांच्याकडेस हल्लीं जें हुजूर खजानजीचें किंवा दुसरें काम आहे त्यांत महाराजांचा जो हुकूम जसा येईल त्याची तामिली त्यांनीं जरी केली तरी त्यापासून मनुष्याचे शरिराविरुद्ध व माला विरुद्ध किंवा अब्रुविरुद्ध कांहींच घडूं शकत नाहीं. यामुळें अशा राजाजवळ हल्लींच्या स्थितींत नोकरी केली तरी राज्यांतील जुलूम व अन्याय यांचा दोष आम्हांस लागूं शकणार नाहीं, असें म्हणण्यास

त्यांना जागा आहे. इतक्यावरही अतिशय अन्याय सहन करण्याची ज्यांचे मनास सहनशीलता आहे व परार्चे दुःख पाहून ज्यांचा आत्मा तळमळत नाहीं, शिवाय ज्यांचें इदुरास घर नाहीं--दुसरें इस्टेट नाहीं, आप्त इष्ट नाहींत व ज्यांच्या विद्येच्या मानानें कोठेंही ते राहून आपला कुटुंब निर्वाह करूं शकतात असे जे चांगले, शिकलेले व डिप्लोमाधारी आहेत त्यांनीं शिवाजी महाराजांसारख्या जुलूमप्रिय राजाची नोकरी हल्लींच्या शेवटच्या स्थितींत राहून करणें, हा महादोष आहे असें कोणीं म्हणेल तर त्यास मात्र यांचा कांहीं उपाय नाहीं.

### मि. नानकचंदजी,

हे गृहस्थ विशिष्ट स्वामीभक्त आहेत. यांना कायदा, न्याय व नीति हें बिलकूल समजत नाहीं, इतकेंच नाहीं पण इंदुरास मराठी मोडी लिपीचें दप्तर आहे, ती लिपी सुद्धां यांना चांगली कळत नाहीं. शिवाय एक शीट कागद कोणत्याही प्रकारचा दुसऱ्याचे सल्लेचांचून व माहितीवांचून यांना कोणत्याही लिपींत लिहीतां येत नाहीं, अशा प्रकारचा समज इंदुरस्थ लोकांचा आहे म्हणतात. त्याच प्रमाणें अपराध, अपराधाचें लक्षण, लोकांचे कायदेशीर हक्क वगैरे कोणत्या कारणांवरून व कसे असतात तेंही या रायसाहेबांना मुळींच कळत नाहीं, यामुळें यांचें कोणावर वजनही पडत नाहीं म्हणतात. इंदूरचे लोक या रायसाहेबांवर मुळींच प्रीति करीत नाहींत, पण उलट बहुतेक नाराज आहेत म्हणून ऐकण्यांत येतें. यांना स्वतः जज्जमेन्टच नाहीं असाही पुष्कळांचा समज आहे. होसहो म्हणण्यांत मात्र हे पटाईत आहेत असें लोकांचें म्हणणें आहे. हे, शाळेंतून निघाले व या महाराजांचे कारकिर्दींत एकदम हुजूर खजानजी झाले, तोच यांचा सन १८८६ सालापासून काम करण्याचा आरंभ. जोंपर्यंत महाराजांनीं एकंदर कामांत हात घातला नव्हता व खजिन्याचे कामावरून यांना नायब दिवाणाचे कामावर आपल्या जवळ आणिले नव्हते तोंपावेतों उत्तम प्रकारें न्यायाचें व दुसरेंही काम कसें होत असतें तें ऐकण्यास व कळण्यास यांना मार्ग होता. कारण, हे कौन्सिलर होते व दिवाण बहादुर आर. रघुनाथराव हे कौन्सिलचे व्हाइस प्रेसिडेन्ट होते त्या वेळीं आठवड्यांतून चार वेळ कौन्सिल भरत असे व हे रायसाहेब त्यांत

मेंबर या नात्यानें जाऊन बसत असत. तेव्हां न्याय कसा असतो व कसा होतो हें त्यांचे दृष्टीस पडत होतें व कौन्सिलचे ठरावावर अवश्या पुंचव्या नंबरांत या रायसाहेबांची सहीही होत होती. त्यावेळीं देखील मजा अशी उडे कीं, जिकडे कारभारी साहेब, धुरंधर साहेब, लाला वैजनाथ माजी चीफ जस्टीस या सर्वांचीं मतें दिसतील तिकडेसच बाकीच्या भरती मेंबरांचीं मतें असावयाचीं. त्यांमध्येंच रायसाहेबांचेंही होस हो ह्मणण्यास पुरवळ्याचें संगीन मत नेहमीं असे. अलिकडे गुजराथी लोकांच्या सुधारणुकी रिवाजावर ज्या कित्येक सभा होतात त्यांतही केव्हां केव्हां 'तमारी वातनें मारोवी एक टेंको छे' असें ह्मणणारे कित्येक दृष्टीस पडतात. व तसा प्रकार बड्या बड्या ठिकाणींही होतो ह्मणणें बावगें नाहीं. तात्पर्य, त्या कौन्सिलच्या दोन अडीच वर्षांच्या मुदतींत न्यायाच्या कित्येक गोष्टीही रायसाहेबांच्या कानावरून गेल्या होत्या. आपल्यापेक्षां जे श्रेष्ठ आहेत त्यांच्या मतांत आपलें मत न त्यांच्या ठरावास आपला टेंकू देण्याचा रायसाहेबांचा अभ्यास त्याच ठिकाणीं बहुधा दृढ झाला होता. नंतर यांची नेमणूक रियासतीच्या नायब दिवाणीच्या कुलकुल्याचे जागीं खुद्द महाराजांजवळ झाली. अर्थात कौन्सिलांतील मोठ्या अधिकारापेक्षां विशेष मोठ्या व मुख्य अधिकाराचे हुद्यावर यांना पुढें प्रसंग पडला. तेव्हां त्या जागीं ते गेल्यावर त्यांची लगेच दिशा बदलली. खजानजी असतां कोणत्याही दिशेशीं यांचा संबंध नव्हता परंतु कौन्सिलांत गेल्यावर दक्षण दिशा यांच्यासमोर असे तरी पूर्व दिशेच्या कोपऱ्यांत रायसाहेबांची बैठक होती.

राय नानकचंदजी नायबदिवाण झाल्यावर पश्चिम आणि पूर्णदक्षिण या दिशांशीं त्यांचा संबंध जुळला. त्यामुळें महाराज जो हुकूम करीत तो त्यांना वाजवी ह्मणणेंच भाग पडे. व महाराजांच्या तोंडच्या सांगण्यावरून शेंकडों, हजारों हुकूम कायद्याच्या व न्यायाच्या विरुद्ध त्यांना आपल्या सहीनें जारी करावे लागले. आणि त्या हुकूमाखालीं हुजूर, कौन्सिलर, दरबार हें सर्व दबून गेलें. परंतु त्याबद्दल रायसाहेबांना दुःख वाटण्याचें प्रयोजन झालें नाहीं. कारण, त्यांनीं असा विचार मनांत आणला असावा कीं, महाराजांस सर्व अधिकार आहे व महाराज शिवाजीरावही एक असा-

धारण व्यक्ती आहे. कौन्सिलांत तरी आपल्यास आपल्या स्वतःचें स्वतंत्र मत देण्याचें कोठें कारण पडत होतें? आपल्यापेक्षां जे श्रेष्ट होते त्यांच्या मतांशीं मत मिळवावें लागत होतें, त्याच प्रमाणें येथेंही महाराजांच्या मताशीं मत देऊन होला हो म्हणावें लागतें यांत अधिकतें काय आहे? असें ते समजले असतील परंतु यांत व त्यांत काय अंतर आहे याचा विचार रायसाहेबांनीं केला नाहीं. त्यांत अगदीं थोडें अंतर इतकेंच आहे कीं, कौन्सिलांत मिनिस्टर आदिकरून महुमतांनीं जो न्याय करीत होते त्या त्यांच्या न्यायी मतांस यांना आपली मान डोलवावी लागत असे. व येथें एकट्या महाराजांच्या अन्यायी व जुलूमी मतास यांचा एकट्याचाच टेंकू यांना द्यावा लागतो. परंतु रायसाहेबांच्या विशिष्ट स्वामी भक्तीनें ते या ठिकाणीं असें करणें त्या ठिकाणापेक्षां अधिक सुकृतोत्पादक समजत असल्यानें त्यांना त्याचा दोष वाटत नाहीं.

वर दर्शविल्याप्रमाणें जर यांच्या ठिकाणीं अधिकपणा व उणेपणा आहे तर यांना एवढ्या मोठ्या अधिकाराचें काम करण्याची योग्यता महाराजांनीं कोणत्या कारणाकरितां मानिली हा एक मोठा प्रश्न आहे. त्याचा विचार केला असतां खालीं लिहिलेलीं कारणें दिसून येतात.

१ राय नानकचंदजी हे मुनशी उमेदसिंग यांचे औरस पुत्र आहेत व मुनशी उमेदसिंग हे तुकोजीराव महाराजांचे कांहीं दिवस शिक्षक होते.

२ यांना १५ हजार रुपयांची जाहागीर होळकरशाहींतून आहे.

३ यांच्या जवळ दहा लक्षांवर शिल्लक आहे असें म्हणतात.

४ हे लांच रुष्वत खाणारे नाहींत.

५ हे स्वतःचे अर्थाकरितां व स्वतःचे मतानें स्वतंत्र अशी स्वतः कोणत्याही प्रकारची लबाडी करणारे नाहींत.

६ हे कोणत्याही पार्टीशीं किंवा व्यक्तीशीं—मग तो विद्वान असो, अविद्वान असो, प्रामाणिक असो, लबाड असो, त्याच्याशीं यांचा स्वतःचा स्नेह नाहीं व द्वेषही नाहीं.

७ ब्राह्मण लोकांची यांना बिलकूल दया नाहीं व त्यांचे हे पक्षपातीही नाहींत.

८ कोणत्याही प्रकारचा अन्याय झाला असतां त्याकरितां किंचितही दुःख मानणारे हे नाहींत.

९ स्वतःचें त्यांना मुळींच मत

माहीं. बहुतेक ते अनुगामी अहित.

१० यांना उर्दुभाषा व लिपी येत आहे.

११ हे दिसण्यांत जाडे व ओबडधोबड नाहींत. उंच नाहींत. ठेंगणे नाहींत. गोरे नाहींत. काळे नाहींत. चेहेराही त्यांचा वाईट नाहीं. उत्तम नाहीं, पण सोज्वळ आहे.

१२ यांचा क्रोध बाहेर कधीं पडतच नाहीं. व अपशब्द हे कधींच कोणास बोलत नाहींत. सर्वदां 'आप' शब्दांचाच उपयोग व उच्चार हे करीत असतात.

१३ यांचें भाषण मृदू व मंजूळ आणि गोड आहे. हे बोलतांना इतकें तोतरें व अडखळत बोलतात कीं, लोकांस तें ऐकून हंसूं येतें व मौज वाटते. आणि महाराजांस तर यांचें बोलणें फारच प्रियकर होतें.

१४ हे शत्रु मित्रांना समदृष्टीचे आहेत.

१५ यांचें वय हल्लीं २० वर्षांचे आंत आहे. यांची कोणतीही परिक्षा पास झालेली नाहीं. तरी पण हे इंग्रजी साधारण बोलतात. जितके गुण महाराजांस पाहिजेत तितके यांचे जवळ बहुतेक आहेत असें म्हणतात.

इतक्या गुणांनीं रायनानकचंदजी मंडित असल्यामुळें यांना एवढ्या मोठ्या अधिकारावर महारानांनीं ठेविले असून हल्लीं बेदरकर कारभारीसाहेब राजीनामा देऊन गेल्यावरही यांनाच सध्यां स्टेटचे मिनिस्टर नेमिले असून, हल्लीं महाराजांचा बोभाट व लोकांवर जो अन्याय झाला आहे तो सुधारण्याची व रेसिडेन्सींतून विचारल्या प्रश्नाचीं व वर्तमानपत्रांना उत्तरें देण्याची कारवाई यांच्याच सल्यानें होत असल्याचें कळतें. येणें प्रमाणें रायनानकचंदजीची हकिकत थोडक्यांत अशी आज कळविली आहे. यांत कोणत्याही प्रकारें त्यांना विषाद मानण्या सारखा मजकूर नाहीं. तथापि कुठे कमजास्ती कांहीं मजकूर चुकून पडला असल्यास तो दुरुस्त करण्या बद्दल त्यांनीं कळविल्यास मोठ्या आनंदानें आम्हीं त्याची दुरुस्ती करूं.

## मि. गुप्तेसाहेब.

आतां गुप्तेसाहेबांच्या संबंधानें आम्हीं आज इतकेंच म्हणतों कीं, इंदूरसंस्थानांत जीं जुनीं व नवीं, शहाणीं आणि अब्रुदार माणसें होतीं व कांहीं आहेत त्यांच्यापेक्षां गुप्ते साहेबांची महाराजांजवळ फारच चलती होती व महाराजांसही यांचा मोठा अभिमान व अगत्य होतें. इंदुरास यांच्या जाण्यानें व राहण्यानें राष्ट्रास

किंवा प्रजेस कांहीं उपयोग झाला नाहीं हें तर आहेच, पण जवळ जवळ परभू ज्ञातीचे १०० लोक मुंबई पुण्याकडील—कारकून, आफिसर वगैरे यांच्या शिफारसीनें, यांच्या अधिकारानें व यांच्या वजनानें भरती झाले असल्याचें तिकडील लोकांकडून कळतें. मि. गुप्तेसाहेब मुंबईत क्युरेटरच्या जागेवर होते. याना जुडीशियल किंवा रेव्हिन्यू कामाची माहिती व अनुभव मुळींच नव्हता. असें असतां तीं कामें इंदुरास यांच्या सुप्रत केलीं गेलीं. व हल्लीं ते पोलिस-खात्याचे मुख्य ऑफिसर, पोलिस इन्स्पेक्टर जनरल वगैरे बड्या हुद्यांवर आहेत. एवढ्या बड्या जागीं गुप्तेसाहेब आहेत तरी हल्लीं महाराजांची त्यांजवर नाराजी झाली असल्याचें कळतें. तसेंच राजशालक मतकर यांनीं त्यांच्यावर कांहीं आरोप आणून त्याबद्दल महाराजांस कळविलें व महाराजांनीं स्पेशल मा-जिस्ट्रेटकडेस त्यांची चौकशी करण्याचाही हुकूम दिला होता. परंतु गुप्तेसाहेब यांनीं स्पे. मा. कडेस आपलें काम चालूं नये, आपण त्यांच्या कोर्टांत जाणार नाहीं असें महाराजांस कळविल्यावरून, त्यांच्या वरील आरोपांचा विचार प्रथम कौन्सिलांत व्हावा, नंतर "शिरस्त्यांत जावा असा महाराजांनीं दुसरा हुकूम दिल्याचें समजतें. त्याप्रमाणें एक दिवस कौन्सिलांत चौकशी करण्याचा नेमून गुप्तेसाहेबांस तेथें बोलाविलेंही होतें. पण ते न गेल्यामुळें व प्रस्तुत ते आजारी असल्यामुळें काम चालणें तहकूब राहिलें आहे.

मि. गुप्तेसाहेब चांगले असतील, हुशार असतील, अब्रुदार असतील व ते इंग्रजींतही फर्डे असतील आणि ते विलायतेस गेले तेव्हां त्यांचें विशेष वजन वाढून राणी साहेबांसही ते भेटले असतील परंतु त्यांना जर इंदूर संस्थानच्या कामाकाजाची व कायद्या कानुनाची माहिती नाहीं व त्यांच्या देखां उत्तम काम करणारे इंदूर संस्थानामध्यें जर शेंकडों लोक आहेत तर त्यांची ५०० रुपये दरमहाच्या पगाराची व त्यांचे वडिलांचे २०० व इतर नवीन परभू मंडळीचे निदान दोन हजार रुपये दरमहाच्या खर्चाची जबर धोंड संस्थानावर कां पडावी? व त्यां करितां जुने गरीब गुरीब कारकून व आफिसर यांच्या जागा रिकाम्या होण्याचा प्रसंग कां यावा तें कळत नसल्या बद्दल, इंदुरस्थ लोकांची कुरकुर आहे. त्यांची ती कुरकुर सकारण आहे किंवा काय, याचा विचार करणें महाराजांचें काम

आहे. आह्मांस तत्संबंधी आपला अभिप्राय देण्याचें आजच प्रयोजन दिसत नाहीं.

### लाला विसेसरनाथ.

या गृहस्थांना महाराजांनीं इंदूरच्या फडनविसीच्या कामाची सुधारणा व बंदोबस्त करण्या करितां मुद्दाम ब्रीटिश सरकारा कडून मागून घेतले. परंतु एक वर्षही त्यांना तें काम करूं दिलें नाहीं. जुडीशिअल सेक्रेटरी, रेव्हिन्यू सेक्रेटरी व दुसऱ्या कित्येक कामांवर त्यांची बदली केली आणि अखेर त्यांना इंदूर रेसिडेन्सीचे वकील नेमिले आहेत. हे गृहस्थ संभावित व शांत आणि जमाखर्चाचे कामांत अलबत्तां हुशार असलेच पाहिजेत. पण ज्या कामा करितां यांना नेले त्या कामांत किंचितही यांच्या जाण्या पासून उपयोग झाला नाहीं व व्हावयाचाही नाहीं. कारण, इंदूरच्या जमाखर्चाचा आणि ब्रीटिश इलाख्यांतील जमाखर्चाचा, तत्वाच्या संबंधानें जरी मेळ बसेल तरी इतर सर्व प्रकार व कारवाई यांत पूर्व पश्चिमे इतकें अंतर आहे. त्याला बाहेरचा मनुष्य जाऊन करणार काय? या कारणामुळें व महाराजांच्या क्षणिक आणि अव्यवस्थित हुकूमामुळें कोणी कसाही ब्रह्मदेव जरी तिकडे गेला तरी त्याचे हातून सुधारणा होण्याची व काम चालविण्याची कधींही सोय लागावयाची नाहीं असा तिकडील शहाण्या लोकांचा समज आहे. अतां याला एकच मार्ग आहे कीं, तिथल्या रीति प्रमाणें कामें करण्यास त्या संस्थानचेच जुने लोक असले पाहिजेत. तथापि त्यांच्यावर मिनिस्टर असणारा अति खंबीर, निस्पृह, धैर्यवान, विद्वान आणि अनुभवी असाच असेल तर सर्व कामें रीतसर आणि सरळ चालावयाचीं, हें निर्विवाद आहे.

प्रस्तुत लालाविसेसरनाथ यांना रेसिडेन्सी वकिलीचे जागीं नेमिलें आहे, तेव्हां वकिलीच्या कामाशीं आणि लालासाहेबांच्या गुणाशीं कांहीं तरी मेळ आहे काय? त्यांनीं १० वर्षें माहिती मिळविली तरी रेसिडेन्ट साहेब व महाराज यांच्या दरम्यान संस्थानचें व प्रजेचें हित लक्षांत आणून, काय व कसें काम केलें पाहिजे याचें ज्ञान पूर्णपणें होऊं शकेल काय? पूर्वीचे परलोकवासी रामचंद्र विठ्ठल व गणेश सिताराम गोळविलकर यांनीं व त्यांचे मागून नवीन तऱ्हेंत कृष्णरावमुळे यांनीं जसें काम केलें व त्यांचा प्रजेस आणि राज्यास उपयोग होऊन रेसिडेन्ट साहेब जसे अत्यंत सुप

राहिले तसें काम करावयाची ती विद्या, जी त्यांना माहित होती ती, प्रस्तुतच्या लाला साहेबांना कधींतरी येईल काय?

हे फक्त एवढ्याच कामाचे आहेत कीं, महाराजांचा निरोप बडे साहेबांस व बडे साहेबांचा निरोप महाराज साहेबांस यांनीं कळवावा. त्या संबंधांत दोहींकडेसही जुनी माहिती व वहिवाट यांना विचारली कीं, जुने कागदच धुंडावे लागणार. तात्पर्य, यांना न्यायखात्यांतील रीति भाती व कायदेकानुची मुळींच माहिती नसून, न्यायान्याया पासून होणाऱ्या सुख दुःखाचा परिणाम तत्रज्ञ मनुष्यावर जसा होतो तसा होण्याचें मुळींच कारण नाहीं, असे हे आहेत.

एकंदरींत इंदुरास दरबार मंडळी म्हणून जे हल्लीं आहेत तेही चतुष्टय आहेत. यांशिवाय इंदूरचे चीफ् जस्टीस धुरंधर साहेब हेही एक लोकांस आधारभूत न्यायाचें यंत्र आहे. त्यांच्या योगानें बरीच दाद लागण्याची सोय आहे. पण ती त्यांच्यापर्यंतच. दरबारांत व दरबारच्या कामांत यांची सल्ला व मदत आणि संबंध मुळींच नसल्यानें त्यांचा पूर्ण उपयोग होऊं शकत नाहीं.

## वाचकांनींच करावी.

तात्पर्य एवढेंच कीं, महाराजांच्या वरील चित्तचतुष्टयांच्या हातांत व विचारांत प्रस्तुत इंदूर दरबारचें काम आहे, तें वरील एकंदर हकिकती वरून राजा आणि प्रजा यांच्या हल्लींच्या स्थितीस कसें उपयोगाचें व हिताचें होईल याची कल्पना वाचकांनींच करावी.

## हें काय गारुड आहे?

जुन्या लोकांपैकीं एक सरदार सखाराम मार्तंड रेशिमवाले यांच्याशीं महाराजांची वागणूक उंदरा मांजराच्या खेळाप्रमाणें होत असल्याचें ऐकून फार चमत्कार वाटतो. अशा पोरखेळामुळें ते कोणत्याही उपयोगाचे नाहींत असें म्हणण्याचा प्रसंग येतो. महाराज जसे त्यांना नाचवितील तसे ते नाचतात. **बापुसाहेब, आपण तें काम पहा; पुन्हां थोड्या वेळानें आतां नका पाहूं; तुम्हीं मुंबईस जा, तुम्हीं लष्करास जा, तुम्हीं कुठेच न जातां स्वस्थ घरीं बसा; असें करा, तसें करा** इत्यादि प्रकार महाराज सांगतील ते कबूल करणारे हे सरदार बहादुर असल्यामुळें, यांच्या कडून संस्थानच्या हिताचें कांहींएक होणें नाहीं. व करण्या इतकी यांच्या जवळ विद्या, निस्पृहपणा व आणखी दुसरे गुण यांचे ठिकाणीं असावे इतके नसल्यामुळें सर्व गोंधळ होत आहे. यांचे बाबतींत

आजपर्यंत आह्मीं मागच्या अंकांत वेळो वेळीं बरीच हकिकत कळविली आहे. तिजवरून गेल्या तीन वर्षांत यांना कोण कोणते हुद्दे मिळाले, त्याची बजावणी यांनीं कशी केली, महाराजांचें व यांचें प्रेम कसें आहे, तशीच विरोधभक्ती कशी आहे हें बहुतेक प्रसिद्धीस आलेंच आहे. यांना शेवटचें काम गिरणीतील कारखान्याचें मि. इझिकल याचें दिलें होतें व आठ दहा दिवसांनीं तें त्यांजपासून काढून राबर्टसन नांवाच्या एका साहेबास सांगितलें. तेव्हां हे बापूसाहेब घरीं बसले. त्यावर ग्याझेटांत व दुसऱ्या रीतिनें त्यांना हुकूम झाले व इंदुरांतून निघून जाण्याचाही हुकूम झाला. पुढें त्यांनीं छावणी इंदूर व महू येथें राहण्यास जाण्याचा विचार करून जागा वगैरे पाहिली तोंच पुन्हां त्यांस ता. १५ मिनहू रोजीं पुण्य नक्षत्राचे मुहूर्तावर गिरणीतील कारखान्याचें काम पहाण्याचा हुकूम महाराजांनीं केला, व ते तेथील चार्ज घेऊन कामही पाहूं लागले. महाराजांचें व त्यांचें मेतकूट पुन्हां जुळलें असें लोक म्हणतात, हें काय गारूड आहे तें महाराजांस व सखारामबापूंसच माहित, असेंही लोक म्हणूं लागले आहेत.

रेशिमबांध्यां संबंधानें महाराजांचें मन न वर्तन कसें आहे तें पुष्कळ गोष्टींनीं प्रमाणसिद्ध लोकांच्या लक्षांत आलेंच आहे. तरी आणखीं एक मासला समजण्यांत आला तोही गंमतीचा असल्यामुळें खालीं देतों.

"हुजूर जबानी हुकूमाचें टिपण नं. ७९ ता. २० सप्टेंबर सन १८९४

सदाशीव मार्तंड दुकानचें घेणें अलीज्यानखां यांजकडेस असून त्याची जामनी सदुभाऊमुळे, दवळे यांचे मामा कृष्णरावमुळे यांचे आजोबा यांनीं दिली होती. तो रुपया अलीज्यानखां याजकडून वसूल आला नाहीं व सदुभाऊमुळे याचे जागेंत गोविंदराव दवळे हे राहात असून, सदुभाऊनें जर अलीज्यानखां यांची जामनी दिली आहे तर सरकारी रुपया दिला पाहिजे होता. तो त्यानें आजपावेतों कां दिला नाहीं, याजबद्दल गोविंदराव दवळे यांजला विचारणा होऊन ते सरकारी रुपया वसूल देणें बद्दल काय तजवीज करतात? कारण, ज्या इसमाकडेस घेणें असतें त्याची जामनी कोणी दिल्यास त्या इसमाकडून जर रुपया वसूल न आला तर जामिनदारानें केवळ तो मनुष्य हजर करून दिल्यापासून उपयोग होत नसून त्या इसमाकडून जर रुपया वसूल न आला तर जामिनदारानें दिला पाहिजे. तेव्हां हा रुपया सदुभाऊमुळे यांजकडून कां वसूल होऊं नये? याजकरितां गोविंदराव दवळे याजला विचारलें जाऊन त्यांणीं अलिज्यानखां याजकडून रुपया सरकारी येणें असलेला वसूल करून देववावा; अथवा वसूल करण्या विषयीं तजवीज करावी किंवा स्वतः देणें, व तशी तजवीज करावी.

गोविंदराव दवळे हे इंग्रजी दफ्तरांत आमचे पार्शी सेक्रेटरीचे कामावर होते त त्यांचे मामा सदुभाऊमुळे हे भूरजी सूरजमल यांचे घरीं असून ते त्यांचे कारभारी होत असें ह्मटल्यास चालेल. भूरजी सूरजमल मोदी, याचा पुतण्या इंदुरीलाल असून त्याचा व ह्मातल्या कायल्याचा संबंध होता व त्याचा स्नेह **सखाराम मार्तंड** यांचा असल्यामुळें गोविंदराव दवळे यांजकडून इंग्रजी दफ्तरांतून त्याजला खबरा मिळत असतील असें म्हणण्यास कांहीं शंका वाटत नाहीं. तामिलीस्तव दरबारांत रवाना. दस्तुर गणेश लक्षुमण नि॥ हुजुर. "

वरील मजकूर महाराजांनीं स्वतः अक्षरशः लिहिण्यास सांगून आपल्या सहीनें दरबारांत पाठविला होता. त्या हुकूमावरून विचार करण्यासारखी गोष्ट ही आहे कीं, पूर्वी कळविल्या प्रमाणें हे शिवाजी महाराज आजकाल वेडे झाले आहेत असें नाहीं पण ह्मळापासूनचे हे वेडे, अक्कलहीन आणि द्वेषी आहेत असें खास समजलें पाहिजे. सन ९३ मध्यें रेशिमवाल्यांस महाराजांनीं इंदुरास बोलवून ८० हजार रुपये देऊन मोड्या हुद्यावर नेमिलें आणि ९४ च्या सप्टंबरांत त्यांचे विरुद्ध हुकूम जारी केला. असे अनेक हुकूम व अनेक प्रकारची कारवाई व बापुसाहेबांचें महाराजांशीं वागणें याबद्दल अनेक लेखी व दुसरीं प्रमाणें आहेत. शिवाय एका शिलालेखून सर्व भाताची परिक्षा करतां येते तेव्हां मुळाशींच गेलें पाहिजे असें नाहीं.

## २२ कैदी सोडले.

ता. १९ मिनहू रोजीं इंदूर कोतवालींतील २२ इसम महाराजांनीं सोडले. त्यांची नांवनिशी आली आहे परंतु ती देण्यांत विशेष कांहीं महत्व दिसत नाहीं. अजून इतके इसम कोतवालीवर व याच्या जवळ जवळ तुरुंगांत राहिले आहेत. ते कधीं सुटतील ते सुटोत.

## तरी चालू आहे.

आपलें आता काय होईल, कसें होईल याची महाराजांस अत्यंत भीति पडली आहे व ते अत्यंत फिकीरींत आहेत तरी, त्यांच्या अंगभूत दुर्गुणाची कवाईत——हजेऱ्या, जप्त्या, मारपीट—चालूच आहे. परवां नुकतेच कृष्णपुऱ्यांतील बोहरे लोकांस समक्ष बोलावून त्यांस शिवीगाळ करून तुम्हीं लबाड आहांत, लुच्चे आहांत वगैरे प्रकारें त्यांस समजूत दिली. तशीच हलकारे, चपरासी यांची हजेरी झाली, त्यांतही वजावाट झालीच. व दोन मनुष्यांस शहरांतून निघून जाण्याचाही हुकूम झाला.

## नवी वाघीत.

मागील अंकीं न्हावी, धोबी

यांच्या संबंधानें वाणी लोकांकडून रुपया वसूल करण्याचा हुकूम झाल्याचें बाहेर आलेंच आहे. त्याप्रमाणें ता. १९ मिनहुरोजीं नंदराम भंडारी, मंगलजी न्याहालचंदजी, दयाचंद पुनमचंद वगैरे वाण्यांच्या मालाची जप्ती केली गेली. त्यानंतर या लोकांनीं हल्लींचे मिनिस्टरकडेस लेखी अर्ज केल्यावरून एक महिना पावेतों जप्ती करणें तहकूब ठेवावें, आह्मीं हुजूरला विनंती केली आहे असा जप्ती करणाऱ्या आफिसरास हुकूम दिल्यावरून जप्ती उठली गेली.

## बडा चमत्कार.

मुंबईकडील रहाणारा एक परभू ज्ञातीचा २२।२३ वर्षांचा तरूण मुलगा इंदुरांतील एका कामगाराचा भाचा ह्मणून आपल्या आईबापासह मामाचे घरीं पाहुणा गेला होता. तो एके दिवशीं श्रीमंत महाराज साहेबांचे दृष्टीस पडला. तेव्हां महाराजांनीं त्याला समक्ष बोलावून तूं कोठचा रहाणारा, येथें कोणाकडेस आलास वगैरे पूस तपास करून उद्दईक पुन्हां आह्मांस भेट ह्मणून महाराजांनीं त्यास सांगितलें. तो नंतर घरीं गेला व मालेला सर्व प्रकार त्यानें आपल्या आई बापास व मामास सांगितला. पुढें दुसरे दिवशीं १० वाजतां तो मुलगा घरांतून बाहेर गेला तो अद्याप पावेतों परत आपल्या घरीं गेला नाहीं व त्याचा पत्ताही लागत नाहीं ह्मणून कळतें. मुंबईस व दुसरे ठिकाणींही त्याचे आप्त आहेत, तेथेंही त्याचा शोध केला गेला परंतु पत्ता लागला नाहीं. तेव्हां आतां तो कोठें गेला व त्याचें काय झालें असेल तें एक ईश्वरासच माहित? बडा चमत्कार नव्हेका हा!

## विक्षिप्तांत न आलेला मजकूर.

### नारायण दाजी कामतकडून.

छावणी इंदूर ता. ४।९।९५.

नारायण दाजी कामत यांची पूर्वी हकिकत ता. २ जुलै सन १८९५ पर्यंतची देण्यांत आली आहे, त्या पुढील ही हकिकत.

ता. २ जुलै १८९५ रोजीं रेसिडेंटींत चौकशी होऊन नारायण दाजी दोषमुक्त झाले. त्यावर त्यांचीं घरचीं माणसें प्रतिबंधांत ता. १२।६।९५ पासून घरींच दोन पोलिसचे पाहारे ठेवून त्यांत होतीं, तसाच माल सरकारांत नेला होता व त्यांचे धाकटे बंधूस शाळेंत सुद्धां जाऊं देत नसत याचें कारण काय तें कळवावें, अगर माल परत मिळून घरच्या मनुष्यांस मोकळीक मिळावी, अशा विषयीं इंदूर दरबारास एक अर्ज छावणी पोस्टांतून रजिस्टर नंबर ९७५

ता. ३ जुलै सन १८९५ रोजी केला. त्याचा जबाब न आल्यामुळें पुन्हां ता. १०।७।९५ रोजीं रजिस्टर नंबर १२५ चें केलें कीं, पूर्वीचे अर्जाप्रमाणें कांहींच निकाल अद्याप झाला नाहीं; हरकत असल्यास लेखी दाखला मिळावा. त्यावरून इंदूर दरबारांतून रामचंद्र महिपत ज्युडीशिअल सेक्रेटरी यांचे नांवाचें पत्र नंबर २३० ता. १९।७।९५ चें आलेलें ता. २९।७।९५ रोजीं दाखल झालें त्यांत 'तुमचे घरीं मनुष्यांस प्रतिबंधांत ठेविलें नाहीं, फक्त माल अफरातफर होऊं नये म्हणून जाबता झणजे पाहारा ठेवण्यांत आला आहे. परंतु मनुष्यांस प्रतिबंध होता तो सदर तारखेपासून बंद झाला.' ह्या दाखल्याची साग्र नकल सोबत पाठविली आहे.

ता. २२ जुलै रोजीं रेसिडेंटींत अर्ज दिला कीं, मीं निरदोषी आपले कोर्टांतून झालों अशाबद्दल लेखी मजला दाखला मिळावा. त्यावरून रेसिडेंटींतून इंग्रजी दाखला नंबर ५६३९ ता. २५ जुलै १८९५ रोजीं मिळाला आहे, त्याचीही नकल या सोबत पाठविली आहे.

घरचा पाहारा अद्याप उठला नसून सरकारांत गेलेलें सामानही मजला मिळालें नाहीं. शिवाय, घरांतील सामान सरकारांत किती गेलें, घरीं जसींत किती आहे याजबद्दलही माहिती पडत नाहीं. करितां मालाच्या याद्या मिळाव्या. मीं घरांतून सर्व इस्टेट दागदागिन्यासुद्धां सोडून एकदम एक वस्त्रासह आलों आहें करितां आपण पाहारा घरीं ठेविल्यामुळें मजला भीति नाहीं परंतु यादी मिळावी; सोबत रेसिडेंटींतून मिळालेल्या दाखल्याची नकलही पहाण्यास पाठविली आहे, असा अर्ज रजिस्टर नं.५२२ ता. ३०।७।९५ रोजीं पुन्हां केला, परंतु त्याचा निकाल मिळाला नाहीं. म्हणून खुद्द वडील दाजी नारायण यांजबरोबर दरबारचे नांवचा अर्ज ता. ८।८।९५ रोजीं दिला कीं, मीं आजपर्यंत बरेच अर्ज केले, छावणींतील ठरावाची नकलही पाठविली, तरी माझा माल मिळत नाहीं, व घरची जसी उठत नाहीं किंवा लेखी काय हरकत आहे ती कळत नाहीं करितां निकाल कां मिळत नाहीं याची समज मजला मिळावी. त्याजवर रावबहादुर कारभारीसाहेब यांनीं स्पेशल माजिस्त्रेट रानडे यांजकडेस हुकूम नंबर ३५९ ता. ९।८।९५ चा दिला कीं, अर्जदाराचे घरची जसी खुली करावी व माल वापस द्यावा. त्याप्रमाणें प्रकरण तसेंच ठेवून ता. १६।८।९५ रोजीं रिपोर्ट नंबर ७४ चा स्पेशल मा० यांणीं असा केला कीं, हुजूर झणजे महाराजांच्या हुकूमाशिवाय माल देतां येत नाहीं व जसीही खुली करितां येत नाहीं वगैरे. नंतर दरबारांतून कांहींच निकाल होत नाहीं तेव्हां शेवटीं रजिस्टर नंबर ९०७ ता. १६।८।९५चा दरबारांत अर्ज केला कीं, आजपावेतों घरेंच अर्ज पाठविले परंतु निकाल होत नाहीं, लेखी समजही हर्कातिची मिळत नाहीं तेव्हां आतां मजला अपिल बडेसाहेबांकडे करण्यास हरकत नाहीं वगैरे. त्याजवर स्पेशलकडील रिपोर्टावर मिळून हुकूम नंबर ६६५ ता. १७ अगस्ट सन १८९५ रोजीं बेदरकर साहेबांनीं साफ हुकूम स्पेशल मा० यांस दिला कीं, हुजूर हुकूमाचा आक्षेप न घेतां माल परत द्यावा, व जसी खुली करावी. तसें न केल्यास व पुढे या

संबंधांत कांहीं कोठून विचारणा आल्यास त्याची जबाबदारी दरबार घेऊं इच्छित नाहीं वगैरे. त्यावरून घरीं दोन पाहारे असलेले मात्र ता. २१ आगस्ट रोजीं उठले. माल कांहीं मिळाला नाहीं व मिळतही नाहीं असें रानडे यांनीं वडिलांस ता. २३।८।९५ रोजीं समक्ष सांगितलें.

वरचा एकंदर मजकूर घेऊन माझे घरांतील पांच हजारांचे इस्टेटीपैकीं पन्नास रुपयांची रकम फक्त घरीं राहिली, बाकी सर्व सरकारांत गेली वगैरे मजकूरचा अर्ज ता. ३१ अगस्ट रोजीं बडेसाहेब कर्नल. डि. डब्ल्यु. के. वाग. एजन्ट गव्हरनर जनरल इनसेंट्रल इंडिया यांजकडेस रजिस्टर नंबर २१६ ता. ३१।८।९५ चा केला आहे.

याप्रमाणें हकिकत आहे. मागील हकिकतीस जोडून बुकांत घ्याल अशी आशा करतों.

---

दरबार जुडीशियल पत्र नंबर $\frac{२३०}{१३०५}$

रा. रा. नारायण दाजी मु॥ छावणी यांस—

वि. वि. तुमचें ता. १०।७।९५ इसवीचें पत्र रावबहादुर कारभारीसाहेब यांचें नांवें आल्यांत तुमचें खटले व बंधु वगैरे येथें आहेत त्यांजला बाहेर जाऊं देत नाहींत त्यामुळें अभ्यास वगैरेचें नुकसान आहे. व मालही कोर्टांत गेला आहे व जाबत्यांत आहे म्हणून मजकूर आहे त्यावरून, स्पेशल माजिस्ट्रेट यांस विचारतां त्यांजकडून उत्तर नंबर ३६ ता. १३–७–९५ इसवीचें आल्यांत तुमचे मनुष्यांस कोणत्याही प्रकारें प्रतिबंध नसून, फक्त माल अफरातफर न व्हावा एाज्याचकरितां जाबता आहे. व तुमचा माल तूर्त जप्तींत ठेवावा, अफरातफर होऊं देऊं नये म्हणून दरबार हुकूम असल्याप्रमाणें जाबता ठेविला आहे म्हणून मजकूर आहे. तेव्हां तुम्हीं अर्ज केल्यांत मजकूर असल्याप्रमाणें मनुष्यांस प्रतिबंध नाहीं तें तुम्हांस कळावें, हे विनंती.

ता. १९।७।९५.

**रामचंद्र महिपत**
ज्यु. सेक्रेटरी.

## वरील हकिकती संबंधानें रेसिडेन्सींतून मिळालेला हुकूम इंग्रजी मध्यें जशाचा तसाच खालीं दिला आहे.

## ORDER.

The evidence adduced by the Indore Durbar for the extradition of Naraien Daji on charge of embezzlement and criminal misappropriation &c, does not in my opinion establish a PRIMA-FACIE case against him or justify his arrest or detention on any charge. He should therefore be released from bail and allowed to go where he pleases.

Indore Resy:
The 23 rd
July 1895.

(Sd.) L. S. Newmarch
First Assistant to the Agent to the Governor-General in Central India.

**No. 5639 of 1895.**

CENTRAL INDIA AGENCY OFFICE.

Copy forwarded to Narayen Dajee Kamate, for information, with reference to his petition dated the 23rd July 1895.

(Sd.) L. S. Newmarch
First Assistant to the Agent to the Governor-General in Central India.

Indore Residency,
The 25th July 1895.

---

## नंबर १५.

(विक्षिप्त अंक ५२ ता. २८ सप्टंबर ९५)

चालू वर्षाचा आजचा हा शेवटला अंक असून इंदूर संस्थान प्रकरणाचीही १५ नंबरां पर्यंत मजल येऊन ठेपली आहे. अद्याप श्रीमंत महाराज शिवाजीराव आपल्या दांडगाई वर्तनांतच गर्क होऊन गेलेले आहेत असें कळतें. त्यांचा वर्तनक्रम सुधारण्याची आशा आतां मुळींच राहिली नाहीं. त्यांना उपदेशपर दोन गोष्टी सांगून त्यांच्या अन्यायी वर्तना पासून त्यांस सोडविणारा त्यांचेपाशीं कोणी नाहीं. महाराजांना सध्यां आपल्या कृतीचें कांहीं वाटत नाहीं परंतु उचलबांगडी झाल्यावर त्यांस अतोनात दुःख झाल्या वांचून रहाणार नाहीं. मागाहून त्या दुःखाचा कांहीं उपयोग नाहीं. वेळ हीच आहे आणि एव्हांच जर महाराज ताब्यावर येऊन झालेल्या व होत असलेल्या बोभाट्याचें निर्मूलन करण्याचा प्रयत्न करतील तर त्यांचें व त्यांच्या प्रजेचें सर्वांशीं हित होणार आहे. पण ही बुद्धी त्यांना व्हावी कशी ? विकोपास गेलेलें काम माघार घेऊन स्थितीवर आणण्याचें चातुर्य महाराजांचे अंगीं असतें तर त्यांनीं एवढा बोभाटा होऊंच दिला नसता व आपल्या पायांवर कुऱ्हाडही पाडून घेतली नसती. महाराजांनीं अझून कांहीं विचार करावा. युक्तिप्रयुक्तीनें या वेळीं आपल्या प्रजेस संतोषित करून व आपलें प्रजावात्सल्य प्रदर्शित करून आपणावर स्वहस्तेंच ओढून आणलेलें संकट दूर करण्यास झटावें. तसें करण्या पासून लांच्छन नाहीं, उलटा फायदाच होईल.

### ताज़ी वातमी.

महाराजसाहेब जुन्या वाड्यांतच बसून आहेत. अद्याप बाहेर पडत नाहींत. त्यांचा एक पाय सुजला आहे म्हणतात. पाय सुजण्याला कोणत्या रोगानें ग्रासलें वगैरे कळलें नाहीं. त्यांचा पाय लवकर [redacted] होवो असें आम्हीं इच्छितों.

२

खंडू नांवाच्या एका कामाव्यास अतिशय मारल्यामुळें तो पळून गेला अमून कोठें गेला याचा शोध त्याच्या घरचीं माणसें करीत आहेत, पण पत्ता लागत नाहीं. शोध न लागल्यास महाराजांचे नांवानें रडत बसण्याखेरीज अन्य उपाय नाहीं.

३

गेल्या शनवारीं दिवसा ३ वाजतां वामनराव मेहेंदळे नांवाचा इसम जो जनरलींत ( फौजेंत ) कारकून आहे तो राजवाड्या खालून जात होता. तो महाराजांचे दृष्टीस पडला. तेव्हां त्याला समोर बोलावून खालीं सडकेवरच उभा केला. नंतर त्याला त्याचें नांव, नोकरी वगैरे सर्व विचारून घेतलें. तो इसम ठेंगण्या कदाचा व जाडा असल्यामुळें त्याचें पोट त्याच्या बांध्यास जरा मोठें दिसत होतें. तें पाहून श्रीमंतांचे उद्गार बाहेर पडले कीं, 'तूं पैसे फार खाल्ले असतील म्हणून तुझें पोट मोठें झालें आहे, करितां तुझ्या थोबाडांत दोहों बाजूनीं मारणें जरूर आहे.' असें बोलून लगेच खालीं दोन हुजऱ्ये होते त्यांस मेहेंदळे यांच्या थोबाडांत दोहों बाजूंनीं मारण्याचा हुकूम दिला. त्या हुकूमाची तामिली स्वतःच करून वितों असें वामनरावानें महाराजांस सांगितलें पण महाराजांनीं तें न ऐकतां शिरस्त्या प्रमाणें झालें पाहिजे असें म्हणून हुजऱ्यां करवीं त्याचे थोबाडांत मारविल्या. नंतर त्यास पूर्व दिशेकडे न जातां आपल्या कामावर जा, असा हुकूम केला. हुकूमा प्रमाणें वामनरावानें आपला पुढील मार्ग सोडून आल्या मार्गानें परत जाण्याचें केलें. पूर्व दिशेकडेस जाऊं नको म्हणून महाराजांनीं कां सांगितलें असा येथें प्रश्न उत्पन्न होतो व त्याचा निकाल अजमासानें असा होतो कीं, वाड्याच्या पूर्वेस इंदूर छावणी आहे. या करितां तो तिकडे गेल्यास बडे साहेबांकडे फिर्याद वगैरे करील म्हणून ती दिशाच वर्ज करण्या बद्दल महाराजांनीं हुकूम दिला असावा. छावणीचें नांव घेऊन तिकडेस जाऊं नको असें उघड सांगण्याचा महाराजांस संकोच वाटला असावा म्हणून त्यांनीं दिशा सांगून आपल्या मनाची समजूत करून घेतली असावीसें दिसतें. धन्य आहे शिवाजीराव महाराजांची !

**बातमी आहे.**

रा. ब. खंडेराव बेदरकर यांना फार जरूरीच्या तारा गेल्यामुळें त्यांनीं पुन्हां इंदुरास जाण्याचें कबूल

केलें असून चार दोन दिवसांत ते असत कीं, महाराज सर्व गुणसंपन्न लिकेडेस जाऊन पोंचतील अशी अहित. त्यांच्या ठिकाणीं कोणचाच खास बातमी कळते. तथापि विचारी दोष नाहीं व त्यांचे हातून कोणचेंच मनुष्याचे मतें आतां रावबहादुरांचें पापही घडत नाहीं. परंतु एक मात्र जाणें संभवत नाहीं. जरी हें खरें दोष त्यांना लागू आहे व तो तरी आहे तरी एका प्रकारें महाराजांच्या अगदीं लहान आहे. तो हाचकीं, स्वतःच्या वर्तनामुळें जो त्रास होत त्यांना लोभ फार आहे. कित्येकांचे असेल तो सहन केला ह्मणजे बा- समजुती प्रमाणें सर्व गुण उत्तम कीचीं जीं सुखोपभोगाचीं साधनें असणारा जवळ लोभ हाच एक इंदुरास आहेत तीं तशीं आतां दुर्गुण असला तरी हरकत नाहीं पण दुसरीकडेस कोठेंही मिळावयाचीं असें मानणें व ह्मणणें फार-चुकीचें नाहींत हें उघड असल्यामुळें 'दु आहे. कारण, सर्व दोषांचें आणि **भस्या ह्मशीच्या लाथा गोड**' पापांचें मूळ तेंच आहे. **लोभ मू-** या ह्मणी प्रमाणें रावबहादुरांचें जाणें **लाने पापानीं** असें जें वाक्य आहे कदाचित् होईलही. परंतु तें परिणा- तें कदापि खोटें ठरणार नाहीं. तद्वत मास हितकर नाहीं. बेदरकर साहेब आतां बेदरकर साहेबां संबंधानें ते जे इंदुरांतून निघाले ते राजीनामा इंदुरास पुन्हां गेल्यास विशेष प्रकारें देऊन निघाले हें अगदीं खरें बोलण्याचा प्रसंग येणार आहे. इंदूर आहे. मागाहून त्यांना 'तुह्मांस एक सोडून जाण्यांत त्यांचा जो लौकिक महिन्याची रजा दिली आहे' असें झाला व महाराजांचा अन्याय व महाराजांकडून कळविण्यांत आलें. जुलूम त्यांना सहन न झाल्यामुळें त्यावर ३ महिन्यांची रजा बेदरकर ते एकदम आपला हुद्दा सोडून निघून साहेबांनीं मागितली व महाराजांनीं गेले असें जे कांहीं लोक समजतात ती दिली. असा प्रकार झाला असून तें खोटें ठरून, पुढें असेंच ह्मणावें मध्येंच त्यांना आतां बोलाविलें आहे व लागेल कीं, महाराजांचा अन्याय व ते जाऊंही घातले आहेत असें समजतें. जुलूम जो त्यांच्या प्रजेवर झाला तो

परलोकवासी तुकोजीराव महा- कारभारी साहेबांनां सहन झाला नाहीं राजांच्या संबंधानें इंदूरची प्रजा व असें नसून, महाराजांनीं त्यांना हिंदुस्थानांतील सर्व लोक त्यांचें गु- स्वतःला कांहीं विशेष त्रास दिल्या- णवर्णन करीत असतांना ह्मणत मळें इंदूर सोडून जाणें भाग पडलें

व तसा प्रकार आतां आह्मीं करणार नाहीं असें महाराजांनीं कबूल केल्यामुळें बेदरकरसाहेब पुन्हां आपल्या हुद्यावर रुजू होण्यास तयार झाले असें निःसंशयानें लोक ह्मणूं लागतील. बाकी **कोणीं वंदा कोणीं निंदा, आह्मां स्वहिताचा धंदा** अशाच जर विचार आमच्या राव बहादुरांचे मनांत भरला असेल तर बेधडक त्यांनीं जावें आणि बेबंद शाहींतल्ल ऐश्वर्य व चैन सुखेनैव भोगावी.

महाराजांच्या स्वतःच्या मतानें व त्यांच्या अधिकारांत त्यांना मिनिस्टर नेमणें असेल तर बेदर करां सारखा ताऊन सुलाखून आणि खात्री करून घेतलेला असा दुसरा त्यांना दिसावयाचाच नाहीं व मिळावयाचाही नाहीं असें अनुमान होतें. अशा स्थितींत पुन्हां बेदरकरांचें इंदुरास जाणें सर्व जगास अतिशय चमत्कारिक वाटण्या सारखें ह्मणूनही जर ते तिकडे जातील तर त्यांत आणखीं कांहीं अर्थ असावा असें अनुमान करण्यास जागा होणार आहे व त्यांत कांहीं इंगीत असल्यास तें परमेश्वरासच माहितअसेंच ह्मणावें लागणार आहे.

## किती अविचार हा !

व्हाइसराय साहेबां कडून महाराजांस नो दुसरा खलिता आला होता त्यास आजच पुरा एक महिना झाला. त्याचें उत्तर देण्यांत महाराज साहेबां कडून अति अविचार झाला आहे ह्मणून कळतें. त्या अविचारीपणांत महाराजांनीं **कर्नल बार** जे हल्लीं इंदूरचे रेसिडेन्ट आहेत त्यांच्यावर बराच ताशेरा उडविल्याचें समजण्यांत आलें आहे. महाराज ह्मणतात कीं, पूर्वी जे इंदूरचे रेसिडेन्ट **क्रास्थवेट** साहेब येथें होते त्यांच्या वेळेस आपल्याकडे आमचा इतका बोभाटा गेला नव्हता. याचें कारण, आमच्या येथील लोक लुच्चे आहेत अशी त्या साहेबांची पक्की खात्री झाली होती. तसा प्रकार कर्नल बार यांचा नसून, आमच्या नाराजींतील जे लचाड व लुच्चे लोक आहेत त्यांच्या सांगण्यावर **कर्नल बार** साहेब विश्वास ठेवित असून आमच्या बद्दल हवेंतसें आपल्याकडे लिहून कळवितात. हें असें करणें त्यांना योग्य नाहीं. शिवाय तहनाम्याचे शर्तीप्रमाणें आमच्या संस्थानांत हात घालण्याचा हिंदुस्थान सरकारला बिलकूल अधिकार नाहीं. असा प्रकार असतां बारसाहेबांचे लिहीण्या वरून आपल्या कडून जी आह्मांस ताकीद येते हा आपला आमचेवर अन्याय होत आहे वगैरे

वराच मजकूर लिहून, व्हाइसराय साहेबांचे खलित्याचा जवाब महाराजांनीं पाठविला होता. हा जवाब बार साहेबांचे मार्फत गेला तेव्हां अर्थात त्या संबंधानें बार साहेबांनीं आपल्या समजुतीप्रमाणें त्यावर टीका करून हिंदुस्थान सरकारास रिपोर्ट केलाच असेल. हा इतका प्रकार झाला व महाराजांचे पत्राचें उत्तरही व्हाइसराय साहेबांकडून नुकतेंच महाराजांस आलें त्यांत, कर्नल बार किंवा आह्मीं कोणाचे सांगण्यावर विश्वास ठेवून कांहीं करतों असें मुळींच नाहीं. आपल्या संबंधानें जो आज कित्येक दिवसां पासून बोभाटा होऊन राहिला आहे तो पूर्णतेस आल्या बद्दल आमची पक्की खातरी झाली आहे. आणि आतां आपल्या हातून राज्य कारभार वाईट रीतिनें चालत असल्याचें गव्हर्मेंट ऑफ इंडिया, यांस पुरें वाटत आहे. व यामुळें सरकार आपल्यावर नाराज आहे; करितां एकंदर कारणें लक्षांत आणून तूर्त आह्मीं आपल्या तेथें येऊन आपला पाहुणचार घेण्याचें अंतःकरण पूर्वक नामंजूर करतों. अशा अर्थाचें नुकतेंच लिहून आलें आहे ह्मणून कळतें

## पुन्हां दुसरें पत्र.

वरील पत्राचें उत्तर ह्मणून पुन्हां महाराजांनीं गेल्या २०।२१ तारखेस व्हाइसरायसाहेबांस एक स्वतंत्र पत्र पाठविलें असून त्यांत असें लिहिलें आहे कीं, 'माझे वडील जी. सी. एस. आय होते व हिंदुस्थान सरकारचे कौन्सिलर होते. तोच अधिकार व तीच जागा मला मिळालेली आहे. या करितां कौन्सिलर या नात्यानें आपण अन्याय करतां असें ह्मणण्याचा मला अधिकार आहे. तसाच भरतपूरचे संबंधांतही आपण अन्याय केला असें मी ह्मणतों. हल्लीं आमची प्रकृती चांगली नाहीं. व आमच्या पत्राच्या उत्तरांत आपल्याकडून जीं मिस्क्रिप्शनें येतात तीं वाचून चमत्कार वाटतो. अशा स्थितींत आतां डाक्टर क्यालिकेटकडून आमची प्रकृती कशी दुरुस्त होईल ती समजत नाहीं.' या प्रमाणें प्रस्तुत हिंदुस्थान सरकार व महाराज यांच्या दरम्यान लेखणीच्या जोरावर भांडण चाललें आहे. पुढें काय लठ्ठालठ्ठी होईल ती नकळे.

## निंदा केली.

कर्नरबार यांचे वडील चिरंजीव इंदुरास गेले होते. त्यांना महाराजांनीं भेटीस बोलाविलें व त्यांच्या

जवळही बारसाहेबांची बरीच निंदा राहिली होती असेंही नाहीं. केली म्हणून कळतें.

### असें समजतात.

महाराजांच्या समजुतीनें ज्या प्रकारें त्यांनीं आपला राज्यकारभार चालविला आहे त्याच्यांत किंचितही दोष नाहीं व कांहींएक सुधारणा करण्याचेंही कारण नाहीं असें ते खास समजतात. उणीव काय ती बेदरकर गेल्याची त्यांना वाटली होती, ती त्यांना परत बोलावण्यानें दूर झाली असेंही महाराज समजतात.

### शोभलें असतें.

किंचित तरी सुधारणा व्हावी, लोकांस न्याय मिळावा असें महाराजांचे मनांत असतें तर बेदरकरच गेले नसते. कदाचित् ते गेले म्हणून रायनानकचंद जे केवळ जातीचे वाणी आहेत व ज्यांची योग्यता अशा बेचंदशाहींत तर काय, पण कोणत्याही स्थितींत इंदूरच्या मिनिस्टरचें काम एक घटकाभरही करण्याची जाडी विद्वत्ता नाहीं त्यांना इनचार्ज मिनिस्टर, महाराज कधींही न नेमते. कोणी म्हणेल कीं, बेदरकर एकदम गेले आणि काम पहाण्यास तर कोणा पाहिजे, मग नानकचंद यांस न नेमावें तर काय करावें ? परंतु नानकचंद यांस नेम ण्या सारखी अशी अडचण होऊन रायनानकचंदच्या शतपट विद्वान, योग्य असे सध्यां तेथें असलेले चीफ जस्टीस धुरंधर हे होते. थोडे दिवसां करितां त्यांना मिनिस्टर नेमिले असते तर कदाचित् शोभलेंही असतें.

### दुसरेही होते.

रायनानकचंदापेक्षां सखाराम मार्तंड रेशिमवाले हेही पुष्कळ प्रकारें अधिक गुणवान होते. असे सर कारभारी नेमण्यास योग्य मानले होते व मुलकी खात्याचा पूर्ण अधिकार ज्यांना एका हुकूमांतच लिहून दिला होता व ज्यांना ८० हजार रुपये बक्षीस देऊन नोकरी करण्या करतांच इंदुरास बोलवून घेतले त्यांना कां नेमिले नाहींत ?

### शिवाय तिसरेही एक.

वर कळविलेल्या दोघांपेक्षांही महाराजांच्या अत्यंत प्रीतीपैकीं व पसंतीपैकीं, कीं ज्यांना नोकरी पत्करण्या बद्दल कांहीं प्रॉमिसरी नोटा, नोकरींतून बजा केले गेले तर पेन्शना दाखल आगाऊ देऊन ठेविल्या आहेत व मागें एकवेळ बेदरकर साहेबांस होळकर शाहींतल्या रामपूर परगण्यांत दडव्यावर पाठवून ज्या गुप्त साहेबांस इनचार्ज कारभारी नेमिले होते व ज्यांनीं इनचार्ज

कारभारी अशा सह्या करून कामही केलें होतें त्या प्रीतितल्या गुप्ते साहेबांस यावेळीं कारभारी कां नेमिले नाहींत? त्यांच्या वरील प्रीति ढांसळली कीं काय? असेंच कांहीं असावें असें अनुमान होतें. मागील अंकांमध्यें गुप्ते साहेबां संबंधानें जो मजकूर कळविला आहे त्यावरून कमी प्रीतीमध्येंच ते आले असावे असा अजमास सहज होतो. क्षणिक बुद्धिच्या महाराजां जवळ अळवावरच्या पाण्याप्रमाणेंच प्रीती असावयाची. मात्र जे महाराजांची पूर्ण प्रीति आपल्यावर आहे असें समजत असतील ते महामूर्ख समजले पाहिजेत.

## असें कां केलें नाहीं ?

दिवाण बहादुर आर. रघुनाथराव काम सोडून गेल्यावर कीर्तने साहेब जाण्याचे दरम्यान ज्या प्रमाणें सर काशिरावदादा साहेब आणि वक्षी खुमानसिंग यांनीं दरबारचें काम पहावें असा हुकूम केला होता त्या प्रमाणेंच तूर्त कां केलें नाहीं ?

## हाच हेतु असावा.

एकंदरींत रायनानकचंदजीची व सरकारची मर्जी मिळाली आहे. व त्यांचीही महाराजांचे ठिकाणीं अनन्य भक्ती आहे. ह्या व नानकचंदजीची मागील अंकांत त्यांचे ठिकाणीं जे गुण असल्याचें कळविलें आहे, त्यास अनुलक्षुन आणि सर्वापेक्षां अधिक सुधारणा करण्यास महाराज लागले व त्यांच्या मनांत सुधारणा करणें आहे, असें किंचितही लोकांस न दिसावें ह्या करितांच नानकचंदजीची तूर्त नेमणूक केली असल्याचें कळतें.

---

# विक्षिप्त व शिवाजी.

## आर्या.

जे अन्यायें वागति । त्यांचे उपटावयास तूं कान ।
विक्षिप्त नाम घेउनि । राजपथावरिच मांडिसि दुकान १
छोटा किंवा मोठा । निर्धन, धनवान, रावरंक असा ।
भेद न बघतां उडविशि । चाबूक तयास झणझणेल तसा २
तद्दुर्वर्तन तुजला । कळतां चरचरित लेख लिहितोस ।
लोकहितार्थ सख्या तूं । वंदीचें दुःखही सहातोस ३
इंदूराधीशकरी विडे चाळे तयावरीबाण आजवरी सोडियले । बहुत दृढ धरूनियां भलें ठाण ४
विषदिग्ध बाण जैसें । ज्यावरि ते सोडिले तथा हरिती ।
मर्मोक्ति रूप बाणीं । शिवनृप तूं विंधिला तशा रीती ५

इंदूर दूर असतां । चतुर तुझे हेर
बातमीदार ।
प्रतिदिनिं कळावीति तुजला । जे
तेथें घडति नव चमत्कार ६
तव सर्व अंक भरुनी । जातो मूर्खत्व
वर्णितां त्याचें ।
तें वाचतांच अमुचें । मन संस्थानार्थ
वा बहू कांचे ७
मूर्तच शिवाजीचें । जें वर्णिशि
शानदार भाषेनें ।
ते लेख वाचण्याला । अमुचीं

आतुर सदैव असति मनें
हे लेख सर्व सखया । ग्रंथरू
काढितोसि बाहेर
ते काढ सत्वर अह्मां । त्यांचा मा
वेध लागला फार
लवकर लवकर छापुनि । दे सत्व
ग्रंथ आमुच्या हातीं
भीती फार मनीं कीं । हे ग्रंथ पु
न शिल्लक रहाती १

गुणज्ञ.

———— ०

( पहिला भाग समाप्त. )

एका मित्राकडून विनंती.

## इंदूराधिपती श्री शिवाजीराव महाराज होळकर".

पद ( मालकंस—त्रिवट. )

स्वस्तिश्री नृपराज शिवाजी ॥ सौख्य सागरा अखंडी गाजी ॥ धृ० ॥
संप्रतची तव बघुनी दुष्कृती ॥ हळ हळ फारचि वाटे चित्तीं ॥
जाड्यप्रीयता प्रीय गमे ती ॥ कैशी तुजला नृपते आजी ॥ स्वस्तिश्री ॥ १ ॥

पद ( विहाग—झिंजोटी—दादरा. )

हर हर ! तुज दुष्ट बुद्धी स्पर्शली कशी ॥ सदय सुमन असतां तें
अदय धारिशी ॥ धृ० ॥
प्रेमातें नष्ट करुनी । सकल सुजन त्रासवूनि । राजनीति लोपवूनि ।
ईश भीति तीहि त्यजुनी ॥ अनितिपथा धरुनि पडसी व्यर्थ वा फ-
शीं ॥ हर हर० ॥ २ ॥

दिंडी.

पूर्वजांच्या विक्रमा मनीं आणी ॥ ज्यांहिं धरिली वा नित्य देश बाणी ॥
प्रजा पुत्रा परि मानूनि रक्षियेलें ॥ राज्य अपुलें; परकीय तुष्ट केलें ॥ ३ ॥

पद ( उद्धवा शांतवन करजा. )

"विक्षिप्त" लेख पाहोनी दुष्कृति तव ऐकों आली ॥ धृ० ॥
कुनिति कुणां हितकारी अजवरी नसे रे झाली ॥
राज्य लक्ष्मि चंचल पाही, धी कशी कुमार्गीं रतली ॥
अंतरीं करी सुविचारा, नका पडूं भ्रमजालीं ॥
जागि करा सोज्वल कीर्ती प्रार्थना असे पद कमलीं ॥
विक्षिप्त० ॥ ४ ॥

पद ( भैरवी—दादरा. )

प्रजा तोष हा भक्कम पाया ॥ राज्याचा वा ध्यानिं धराया ॥ धृ० ॥
रक्षण पुत्रा परी करावें ॥ कुमती मंत्री सदां त्यजावे ॥
कुमार्ग वर्तन सोडुनि द्यावें ॥ सुविचारानें राज्य करावें ॥
सकल प्रजेला प्रियकर व्हावें ॥ हीच विनंती तुज शिवराया ॥
प्रजा० ॥ ५ ॥

पद ( पांडु नृपति जनक० )

राज्य मदीं धुंद कसे ॥ वनतां कां व्यर्थ पिसे ॥
दुष्कृति तव जाळितसे ॥ दिन जनांस कीं ॥ १ ॥
'बेदरकर' मंत्रि सुमनी ॥ घालविला तुझी नृपती ॥

सुचलि कशीं दुष्ट अनिति ॥ तुंजसि वा नृपा ॥ २ ॥
कुमति जनां मित्र करिसी ॥ कुव्जांनां मान देसी ॥
वैभव व्यय ना करिसी ॥ चांग, हें नसें ॥ ३ ॥ ॥ ६ ॥

पद ( वैशाख मासि. )

आंग्ल प्रभू सुनिति पथा आणि वा मनीं ॥
राज्य मदोन्मत्तपणा संकल सांडुनी ॥ धृ० ॥
संस्थानिक आजवरी बहुत मूकले ॥
राज्य विभव, सत्तादी सिंधु आटले ॥
दुष्कृतिनें कोणी नच स्वस्ति जाहले ॥
सावध हो नृपतिवरा ! हीच विनवणी ॥
आंग्ल० ॥ ७ ॥

श्लोक.

दैवानें मिळली तुला वध नृपा ही राज्य लक्ष्मी वधू ॥
वाटेना प्रिय कां तुला, दवडण्या यत्ना करीसी विधू ॥
आहे वैभव जोंवरी न जहाली ही क्रुद्ध भार्या सती ॥
कोपें, होतिल जाण देह शकलें अंतीं नहो सद्गती ॥ ८ ॥

कामदा.

भ्रमित कां असें चित्त होतसें ॥ वाक्शरें भल्या ताडिसी कसें ॥
निंद्य कृति तुझी पाहुनि नसे ॥ तोष वा कुणां, जाहलां पिसे ॥ ९ ॥
ज्ञान, गुण कसे लोपती नृपा ॥ सदय अंतरीं नूरली कृपा ॥
दुर्मती कशी स्पर्शे ते तुला ॥ नवल वाटतें पाहुनी कला ॥ १० ॥

साकी.

अपकीर्तीचे दूत धराया जवळि न आले जों तों ॥
स वध्र होई नृपते ! सत्वर हीच विनंती करितों ॥
मानी काव्याते ॥ "मा. वी. दो." उपदेशाते ॥ ११ ॥

* * होळकर महाराज साहेब, वरील विनंतीकडेस तरी लक्ष द्या आणि वर्तन सुधारा ! !

विक्षिप्त.